ISBN 978-81-939072-1-4

# अध्यक्षीय भाषणे

## भाग २

## इ.स. २००१ ते २०१९

संकलन व संपादन
डॉ. पवन मांडवकर
डॉ. राजू आदे
प्रा. अतुल सारडे



अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या इंदिरा महाविद्यालय, कळंब येथे १९८६ साली संपन्न झालेल्या पहिल्या अधिवेशनाची दुर्मिळ छायाचित्रे, अधिवेशनाध्यक्ष राम डोके, उद्घाटक अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.जी. देशमुख, संस्थापक अध्यक्ष डॉ. भाऊ मांडवकर व इतर

ISBN 978-81-939072-1-4
Published by a Recognized National Level Publisher under Peer Review System as per UGC and ISBN guidelines.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या २००१ पासून २०१९ पर्यंत झालेल्या अधिवेशनाध्यक्षांच्या भाषणांचा संग्रह

# अध्यक्षीय भाषणे

संकलन व संपादन
डॉ. पवन मांडवकर
डॉ. राजू आदे
प्रा. अतुल सारडे

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
मराठी प्राध्यापक परिषद
नोंदणीकृत कार्यालय: द्वारा डॉ. सिंधू मांडवकर, 'युगंधर',
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६
पत्रव्यवहार: इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८, ९४०३०१४८८५
e mail : marathipradhyapak@gmail.com

मूल्य दोनशे रुपये

❒ ISBN 978-81-939072-1-4
❒ **अध्यक्षीय भाषणे**
Adhyakshiya Bhashane
❒ **संकलन व संपादन**
**डॉ. पवन मांडवकर**
**डॉ. राजू आदे**
**प्रा. अतुल सारडे**
❒ **ग्रंथप्रकार** भाषणे COLLECTION OF SPEECHS
❒ © **सर्व हक्क सुरक्षित**
❒ **प्रथमावृत्ती** १ ऑगस्ट, २०१९
❒ **प्रकाशन क्र.** २
❒ **प्रती** ५००
❒ **आकार** डेमी
❒ **पृष्ठसंख्या** १९२
❒ **मुखपृष्ठ** फोर कलर - डॉ. पवन मांडवकर
❒ **प्रकाशक**
नोंदणीकृत कार्यालय: द्वारा डॉ. सिंधू मांडवकर, ‘युगंधर’,
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६
पत्रव्यवहार: इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८, ९४०३०१४८८५
e mail : marathipradhyapak@gmail.com
❒ **मुद्रक**
सेवा प्रकाशन
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६
❒ मूल्य २०० रुपये
(या ग्रंथात प्रकाशित अध्यक्षीय भाषणांमधील विचार हे त्या त्या मान्यवरांचे असून त्या मतांशी संपादक मंडळ, प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही. त्यांच्या भाषणांतील मजकुरावर आक्षेप उद्‌भवल्यास ते स्वत: जबाबदार राहतील.)

# अनुक्रम


अनुक्रम ३

संपादकीय प्रस्तावना / ५

१. १६ वे अधिवेशन / कला—वाणिज्य महाविद्यालय, येवदा / ८ मार्च २००२ / डॉ. कुमुदिनी खोरगडे ११

२. १७ वे अधिवेशन / कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ / ६ फेब्रुवारी २००३ / डॉ. अक्षयकुमार काळे २१

३. १८ वे अधिवेशन / कला वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव ३ व ४ जानेवारी २००४ / प्रा. बा. वा. कळसकर ३०

४. १९ वे अधिवेशन / जनता कला आणि वाणिज्य महाविद्यालय मलकापूर / २२—२३ जाने. २००५ /प्रा.डॉ. र.का. कोलते ५०

५. २० वे अधिवेशन / इंदिरा महाविद्यालय, कळंब १० जानेवारी २००६ / डॉ. ना. ह. वानखडे ६२

६. २१ वे अधिवेशन / श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद / २४ जुलै २००७ / प्रा. डॉ. बा. दा. जोशी ७९

७. २२ वे अधिवेशन / श्रीमती शंकुतलाबाई धाबेकर महाविद्यालय कारंजा (लाड) / १४ मार्च २००९ / प्रा.डॉ. सुशीला पाटील ९०

८. २३ वे अधिवेशन / श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला / १५ फेब्रुवारी २०१० / डॉ. रमेश अंधारे ९९

९. २४ वे अधिवेशन / नेहरू महाविद्यालय, नेरपसोपंत १४ फेब्रुवारी २०११ / डॉ. अुत्तम रूद्रावार १०४

१०. २५ वे अधिवेशन / कला वाणिज्य महाविद्यालय, मारेगाव १३ मार्च २०१२ / डॉ. एस.एम. कानडजे ११५

११. २६ वे अधिवेशन / लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी ९ मार्च २०१३ / प्रा.डॉ. सुखदेव ढाणके १३१

१२. २७ वे अधिवेशन / जनता कला—वाणिज्य महाविद्यालय मलकापूर /३० जानेवारी २०१४ / प्रा. सतेश्वर मोरे १४२

१३. २८ वे अधिवेशन / स्वा.सै.श्री. कन्हैय्यालालजी रामचंद्र इन्नानी महाविद्यालय, कारंजा (लाड) / २६ मार्च २०१५ / डॉ. रविकिरण पंडित १५८

१४. २९ वे अधिवेशन / श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय
अंजनगाव सुर्जी / ५ फेब्रुवारी २०१६ / डॉ. विजया डबीर १७१
१५. ३१ वे अधिवेशन / जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा
१ फेब्रुवारी २०१८ / डॉ. केशव फाले १८६
१६. ३२ वे अधिवेशन / महात्मा फुले कला, वाणिज्य आणि
सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड
१६ मार्च २०१९ / डॉ. शंकर वा. राऊत १९६

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत
मराठी प्राध्यापक परिषदेची अधिवेशने — सूची २०३
मराठी प्राध्यापक परिषद — कार्यकारिणी २०४
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक
परिषद आजीवन सदस्य २०६

# संपादकीय प्रस्तावना

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत मराठी प्राध्यापक परिषदेच्या व्याप्त कार्याची सर्वत्र चर्चा होतच आहे. खंड न पडू देता सलग संपन्न झालेली ३२ अधिवेशनं, ही त्याची साक्ष आहे. प्रत्येक अधिवेशन हे त्याचे त्याचे स्वतंत्र वैशिष्ट्य जोपासून यशस्वी झाले, हे तर त्याहीपेक्षा भूषणावह! कदंबभूषण डॉ. भाऊ मांडवकरांनी अत्यंत उदात्त दृष्टीने स्थापन केलेल्या ह्या परिषदेचा वृक्ष आता वटवृक्षाचे रूप धारण करतो, ही संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील सर्वच मराठी विषय अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब ठरत आहे.

डॉ. भाऊ मांडवकर, प्राचार्य राम शेवाळकर, डॉ. गोविंद देशपांडे यांनी नागपूर विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचा पाया रचला. नागपूर विद्यापीठ, नागपूर प्राध्यापक परिषदेचे पहिले अधिवेशन वणीला झाले. त्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते डॉ.मा.गो. देशमुख, उद्घाटक डॉ. भाऊसाहेब कोलते आणि प्रमुख अतिथी प्रा.वा.ल. कुळकर्णी. नागपूर विद्यापीठाच्या मराठी प्राध्यापक परिषदेच्या स्थापनेत जसा डॉ. भाऊ मांडवकर यांचा सिंहाचा वाटा होता, तसाच नागपूर विद्यापीठापासून अमरावती विद्यापीठ वेगळे झाल्यावर अमरावती विद्यापीठाची स्वतंत्र मराठी प्राध्यापक परिषद स्थापण्यात होता. त्यासाठी त्यांनी बरीच मेहनत घेतली आणि या परिषदेला साकार केले. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचे पहिले अधिवेशन भाऊसाहेबांनी कळंब येथील स्वतःच्याच इंदिरा महाविद्यालयात १६ फेब्रुवारी १९८६ रोजी घेतले. पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते प्राचार्य राम डोके आणि उद्घाटक होते अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख.

या परिषदेचे आजतागायत एकूण नोंदणी केलेले अडीचशेच्यावर सभासद आहेत. निव्वळ अधिवेशन घेणं, हाच केवळ या परिषदेचा उद्देश नसून मराठी अध्यापन–अध्ययन–परीक्षा आणि तत्संबंधित बाबींवर साकल्याने केंद्रीपूर्वक चर्चा घडवून निर्णयाप्रत जाणे, विद्यार्थीहितास्तव योग्य असे प्रस्ताव आखणे व यशस्वी करणे तसेच परिषदेतील लोकशाही अस्तित्व अबाधित ठेवून निर्णयक्षम कृतीप्रवण धोरणे आखणे या बाबींवर विशेषत्वाने भर दिला जातो. वाङ्मयीन भूमिकासुद्धा परिषदेने जिवंत ठेवली आहे. परिषदेमार्फत उच्च दर्जाचे नियतकालिक अंक, विशेष विषयाला वाहिलेले अंक तसेच आतंरविद्याशाखीय विषयाला प्राधान्य दिलेले अंक नियमित प्रकाशित केल्या

जात आहेतच. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, सुरुवातीपासून ते पंधराव्या अधिवेशनापर्यंत संपन्न झालेल्या अधिवेशनांच्या अध्यक्षीय भाषणांचे एकत्रित संपादित पुस्तक परिषदेचे पूर्वाध्यक्ष तथा आमचे मागदर्शक बंधू मा. प्राचार्य डॉ. रा.गो. चवरे यांनी सन २००० साली 'सेवा प्रकाशन, अमरावती'तर्फे प्रकाशित केले. या पुस्तकात परिषदेच्या अधिवेशनातील नामवंत अध्यक्षांच्या अध्यक्षीय भाषणांचा अनमोल ठेवा संग्रहित झालेला आहे. तो ठेवा अभ्यासकांना अत्यंत मौल्यवान ठरणारा आहे. मार्मिक आणि अभ्यासू प्रस्तावना 'संपादकीय' सदरातून डॉ.रा.गो. चवरे यांनी लिहिलेली आहे. डॉ. चवरे यांच्या याच कार्याचा पुढील भागदेखील अभ्यासकांच्या दृष्टीने प्रकाशित व्हावा, ही मनोमन इच्छा खुद्द दिवंगत भाऊसाहेबांची तसेच, अधिवेशनाच्या पूर्वाध्यक्षा सिंधूताई मांडवकरांची होती. अनेक पद्धतीच्या कार्यव्यापामुळे, नव्या नव्या उच्चशिक्षण धोरणांमुळे आणि व्यस्ततेमुळे असे कार्य घडण्याला उशीर झाला. मात्र, परिषदेच्या धोरणांची अंमलबजावणी कुठल्याही परिस्थितीत करायचीच, असे ठरविले आणि सोळाव्या ते बत्तीसाव्या अधिवेशनापर्यंत झालेल्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणांच्या प्रती एकत्रित करून पुढील कार्य सुरू केले, ते एकदाचे फळाला आले. अध्यक्षीय भाषणाच्या पुस्तकाचा पुढचा खंड म्हणजे 'अध्यक्षीय भाषणे भाग २' आपणासमोर ठेवताना आज आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

प्रस्तुत संपादित पुस्तकामध्ये येवदा, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथे संपन्न झालेले परिषदेचे सोळावे अधिवेशन ते वरूड जि. अमरावती येथे संपन्न झालेले बत्तीसावे अधिवेशन अश्या एकूण सतरा अध्यक्षीय भाषणांचा समावेश केलेला आहे. या सतराही अधिवेशनांचे अध्यक्ष मराठीच्या क्षेत्रातील नामवंत व लौकिकप्राप्त साहित्यिक, संशोधक, वक्ते, ग्रंथकार तथा सामाजिक विचारवंत आहेत. त्यांच्या लेखणीतून झालेले विचार त्यांनी अधिवेशनस्थळी केलेल्या वक्तृत्वातून चपखल पद्धतीने श्रोतृवर्गासमोर प्रगट केले होते. हे सर्व विचार त्या त्या वेळी उपस्थितांच्या दाद देण्यामुळे लक्षणीय व वेधक ठरले होते. हे विचार केवळ अधिवेशनापुरते मर्यादित राहू नये, याकरिता त्यांचे संकलन करून ते प्रकाशित होणे गरजेचे होते. तसेच, त्या अध्यक्षीय विचारांतून मांडलेला धागा अनुपस्थितांना आणि इतरा सर्वांनाच नेहमीकरिता मार्गदर्शक ठरावा, ही भूमिका ठेवून त्याचे 'पुस्तकरूप' तयार केले आहे.

डॉ. कुमुदिनी खोरगडे, डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ.बा.वा. कळस्कर, डॉ. रमाकांत कोलते, डॉ. वानखडे, डॉ.बा.दा. जोशी, डॉ. सुशीला पाटील,

डॉ. रमेश अंधारे, डॉ. उत्तम रूद्रावार, डॉ. रवींद्र कानडजे, डॉ. सुखदेव ढाणके, डॉ. सतेश्वर मोरे, डॉ. रविकिरण पंडित, डॉ. विजया डबीर, डॉ. पी. एल. सोनटक्के, डॉ. केशव फाले, डॉ. शंकर राऊत या सर्व मराठी भाषेतील विद्वत्‌जनांची ही अध्यक्षीय 'विचारसंपदा' आहे. या प्रत्येकांनीच आपल्या आयुष्यामध्ये मराठी भाषेची मनोभावे सेवा केली आणि त्याकरिता प्रत्येकजण व्रतस्थ जीवन जगले आहे. त्यांना आलेल्या सर्वांगीण अनुभवाचे वैचारिक प्रगटीकरण त्यांनी मराठी प्राध्यापक परिषदेच्या विविध ठिकाणी झालेल्या अधिवेशनातून अध्यक्षीय मंचावरून केले. तेच विचार प्रत्यक्ष स्वरूपात या पुस्तकात आम्ही समाविष्ट केले आहे. विविध महाविद्यालये, त्यांच्या संस्था यांनी परिषदेच्या कार्यकारी मंडळीच्या सहमतीने आदरपूर्वक निवडलेल्या अध्यक्षांनी त्यांच्या अध्यक्षीय निवेदनातून भरपूर वैचारिक ठेवा श्रोतृवर्गासमोर मांडला. प्रत्यक्षदर्शींच्या कथनांचा आधार घेत आम्ही हे सांगू शकतो की यातील बहुतांश विचारांना उपस्थितांमधून भरघोस टाळ्या मिळाल्या होत्या तथा उत्स्फूर्त दादही !

येवदा, जिल्हा अमरावती येथे सन २००२ मध्ये संपन्न झालेल्या परिषदेच्या सोळाव्या अधिवेशनात डॉ. कुमुदिनी खोरगडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अभ्यासक्रमाबाबत विविध मुद्यांचा ऊहापोह केला. त्यांनी मुक्त चिंतनासाठी 'मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनांची नितांत गरज आहे', असे प्रतिपादन केले.

यवतमाळात २००३ मध्ये संपन्न झालेल्या परिषदेच्या सतराव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना प्रसिद्ध समीक्षक, चिंतनक डॉ. अक्षयकुमार काळे यांनी शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडवायच्या असतात, ह्याची जाणीव करून दिली. भाषा, वाङ्मय, कला आणि संस्कृती यांचे संरक्षण व संवर्धन, उच्च जीवनमूल्ये, खरा देश्य भाव, अध्यापकीय जीवनाची खरी सार्थकता याबाबतीत त्यांनी चिंतनपर विचार मांडले.

राळेगाव, जि. यवतमाळ येथे २००४ मध्ये संपन्न झालेल्या दोन दिवसीय अठराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. बाळाभाऊ कळसकर यांनी आपल्या परखड भाषेत जागतिकीकरणाचा व्हायरस, त्याचे समाज, शिक्षण, साहित्य व कला यावरील परिणाम, अध्यापकांची जबाबदारी, संशोधनकार्य, याबाबीवर प्रकाश टाकून जागतिक व्यवहाराच्या भाषेत मराठी भाषेचे अस्तित्व, या विषयी शंकास्पद भूमिका व्यक्त केली.

मलकापूर, जि. बुलढाणा येथे २००५ मध्ये संपन्न झालेल्या दोन

दिवसीय एकोणविसाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. रमाकांत कोलते यांनी आपल्या संवेदनापूर्ण, हळुवार भाषेतील चिंतनातून आपल्या स्वत:च्या भाषाशिक्षक म्हणून सेवाकार्यातील अनुभवांचा आधार घेत, 'स्वत:ला पुन्हा पुन्हा पारखून घेण्याची संधी म्हणजे हे अधिवेशन' असल्याचे सांगितले. अनेक उदाहरणांनी त्यांनी विद्यार्थीप्रिय भाषा–शिक्षक कसा घडू शकतो, याचे अनेक दाखले दिले आहेत. तंत्रज्ञान, स्वतंत्र मराठी विद्यापीठ, विद्यार्थ्यांना दिला जाणारा शिक्षकीय सजीव स्पर्श या बाबींचे त्यांनी सखोल विवेचन केले आहे.

सन २००६ मध्ये कळंब येथे झालेल्या विसाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ.ना.ह. वानखडे यांनी भाषेच्या अस्तित्वाची चिंता राहणारे दुटप्पी जनलोक, मराठी शुद्धलेखनाची आवश्यकता, व्याकरणाचा अभ्यास करण्याची गरज, मराठी भाषा व साहित्याच्या तासाला विद्यार्थ्यांची अनुपस्थिती आणि त्यासाठी मराठीला प्रात्यक्षिकाचे तास ठेवण्याची मागणी (ही मागणी पहिल्यांदा करण्यात आली), या मुद्यांचा ऊहापोह केला. मराठीत 'नोबेल' मिळविण्याच्या पात्रतेची एकही कलाकृती का निर्माण झाली नाही? हा त्यांचा प्रश्न तत्कालीन काळात खूपच गाजला होता.

परिषदेचे एकविसावे अधिवेशन पुसद येथे डॉ.बा.दा. जोशी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले होते. त्यांनी मराठी भाषेतील उजळणीवर्गाची स्थिती, प्राध्यापकांच्या व्यावसायिक हिताबरोबर मातृभाषा प्रेमाची वाढ, बृहन्ममहाराष्ट्रातील मराठीचे अध्ययन व संशोधन, मराठी अभ्यासमंडळ व मराठी प्राध्यापक परिषदेचे परस्पर संबंध, प्रसार माध्यमातील मराठीचे स्वरूप या सोबत इतरही मुद्यांचा विचार मांडला.

कारंजा (लाड), जि. वाशिम येथे संपन्न झालेले २००९ चे बाविसाव्या अधिवेशनातील डॉ. सुशीला पाटील यांच्या अध्यक्षीय भाषणातून त्यांनी, मराठी विषयाचे प्राध्यापक व त्यांची अधिकची जबाबदारी, साहित्याची उद्दिष्ट्ये, विनम्रता, ज्ञानलक्षणे इत्यादींची चर्चा करून, मराठीचा प्राध्यापक हा ज्ञानमार्गाचा प्रवासी असतो, हे सांगीतले आहे.

तेविसावे अधिवेशन अकोला येथे २०१० रोजी पार पडले. अध्यक्ष डॉ.रमेश अंधारे यांनी मध्यवर्ती भाषा (प्रमाणभाषा) आणि बोली भाषा यांचा सहसंबंध आणि गैरवाजवी अपेक्षा यावर प्रकाश टाकला. बहुसांस्कृतिकता, कोशनिर्मितीची गरज, वाङ्मयीन दु:स्वास, विद्यार्थ्यांचा 'स्पार्क', साहित्य आणि समाजाचे सेतूबंधन, साहित्य संस्कृतीच्या जगातील 'सांस्कृतिक अधोलोक' प्रवृत्ती यावर चिंतनीय विचार व्यक्त केले होते.

नेरपरसोपंत, जि. यवतमाळ येथे २०११ मध्ये संपन्न झालेल्या चोविसाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष, डॉ. अुत्तम रूद्रावार यांनी मराठीचा प्राध्यापक म्हणजे 'सांस्कृतिक दूत' असतो, असे सांगीतले. शुद्धलेखन घोळ, भाषिक व्यवहार, राजभाषा मराठीचे विद्यापीठ हे प्रश्न लवकर सुटावे, अशी अपेक्षा व्यक्त केली होती.

पंचविसावे अधिवेशन २०१२ मध्ये मारेगाव, जि. यवतमाळ येथे संपन्न झाले. डॉ.एस.एम. कानडजे यांनी अध्यक्षीय विचारांतून शाळा–कॉलेजमधील भाषा व साहित्याचा मुद्दा उपस्थित करून अनास्थेबद्दल चिंता व्यक्त केली. व्यावसायिक समाधानातून आत्मसमाधानाकडे वळण्याचा मोलाचा सल्ला त्यांनी दिलेला आहे. भाषाभान, सृजनशील करिअर, कालसंगत बाजू, जगण्याचा मंत्र, युगभान, नैराश्यजनक परिस्थितीचा त्याग या बाबींचा सखोल विचार त्यांनी भाषणातून मांडला होता.

सन २०१३ मध्ये वणी येथे पार पडलेल्या सव्विसाव्या अधिवेशनाच्या अध्यक्ष पदावरून बोलताना कवी डॉ. सुखदेव ढाणके यांनी, मी कवितेत रमणारा माणूस आपणासोबत शुद्ध हेतूने संवाद साधत असल्याचे म्हटले आहे. त्यांनी जागतिकीकरण आणि मराठी भाषा, अभिजात भाषेचा दर्जा, भाषाकौशल्य, अध्यापन कला, भाषा–अध्यापन पूरक उपक्रम, अभ्यासक्रम, लेखन, संशोधन, वाचन, नियतकालिकं या बाबतीत विस्तृत मतं मांडली.

मलकापूर, जि. बुलढाणा येथील २०१४ च्या सत्ताविसाव्या अधिवेशनात बोलताना डॉ. सतेश्वर मोरे यांनी शिक्षण व्यवस्था, भाषा : ध्वनी, अर्थ आणि बोली, अध्यापन व व्यवहार, सांस्कृतिक धारणा, वाङ्मयीन प्रवाह, अध्यापन तटस्थता, मूल्यात्मक मांडणी, संगणकीकरण, प्रशासनिक नोकऱ्या याविषयी सांगोपांग चर्चा केली.

२०१५ रोजी कारंजा (लाड), जि. वाशीम येथील अठ्ठाविसाव्या व्या अधिवेशनाचे अध्यक्ष, डॉ. रविकिरण पंडित यांनी मराठीचा प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा बौद्धिक दर्जा, साहित्यविषयक अनास्था, प्राध्यापकांचे साहित्य लेखन व पुस्तक प्रकाशन, साहित्य समाज या बाबींचा आपल्या शैलीतून ऊहापोह केला.

डॉ. विजया डबीर यांच्या अध्यक्षतेखाली २०१६ मध्ये अंजनगाव (सुर्जी), जि. अमरावती येथे एकोणतिसावे अधिवेशन पार पडले. त्यांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळा आणि मराठी भाषेविषयीचा सापत्नभाव, भाषा संवर्धन,

ग्रामीण बोली आणि प्रमाणभाषेचे नाते व्यवहार, भाषेचे दारिद्र्य व मराठीचे ज्ञानभाषापण, भाषिक विकास, अर्थकारण, तंत्रज्ञान या मुद्यांना सविस्तरपणे मांडले होते.

चांदूर बाजार, जि. अमरावती येथे २०१७ रोजी संपन्न झालेल्या तिसाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून डॉ.पी.एल. सोनटक्के यांनी मराठी भाषेची परंपरा, बोली, इंग्रजीचा प्रभाव आणि उपाय, कॉन्व्हेन्टीकरण, भाषा अध्ययन–अध्यापनातील उदासीन वृत्ती, मातृभाषेची अनिवार्यता यावर मत प्रकट केले होते.

एकतिसावे अधिवेशन दारव्हा, जि. यवतमाळ येथे २०१८ रोजी डॉ. केशव फाले यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडले. त्यांनी मराठीची अस्मिता जपण्यासाठी प्राध्यापकांनी एकदिलाने झटावे, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या समस्या निवारणासाठी हक्काचा माणूस म्हणजे मराठीचा प्राध्यापक हेही आवर्जून सांगितले. पदव्युत्तर मराठी अभ्यासक्रमाची आवश्यकता, संशोधनशिस्त, रोजगाराधारित मराठी अभ्यासक्रम, प्रकाशन व्यवसाय, प्रसारमाध्यमे, नाट्य सिनेमा जगत, जीवनविषयक विविध कौशल्ये यांचाही त्यांनी सांगोपांग विचार मांडला होता.

वरूड, जि. अमरावती येथे २०१९ मध्ये संपन्न झालेल्या बत्तिसाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. शंकर राऊत यांनी भाषा–वाचन, आकलन व आस्वाद, बोली, विद्यापीठाचे धोरण, भाषाधोरण समितीचे कार्य, शासनस्तरावरील अनास्था व उदासीनता, भाषिक इव्हेंन्ट्सवर टीका, तंत्रज्ञान, प्रशासकीय सेवासंधी या विषयी विस्तृत भाष्य केले होते.

मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनाच्या निमित्ताने विविध मान्यवर अध्यक्षांनी केलेल्या भाषणांचा हा सारांशात्मक परिचय. त्यांचे विस्तृत विचार हे त्यांच्या मूळ भाषणातूनच स्वीकारता येतील. आमचा हा अल्पसा प्रयत्न आपण उदार अंतःकरणाने स्वीकारावा, ही विनंती.

**- प्राचार्य डॉ. पवन मांडवकर**
**- प्रा. डॉ. राजू आदे**
**- प्रा. अतुलकुमार सारडे**

❖❖❖

# १६ वे अधिवेशन
# कला - वाणिज्य महाविद्यालय, येवदा
# ८ मार्च २००२
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. कुमुदिनी खोरगडे

मराठी प्राध्यापक परिषदेच्या १६ व्या अधिवेशनाच्या निमित्ताने आपण सर्व शारदेचे उपासक 'शारदीय नगरीत' शहाणूरच्या उत्तरेला वसलेल्या 'येवदा' भूमीत एकत्र जमलो आहोत. या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान मला देऊन आपण जी आत्मियता व्यक्त केली. जो गौरव प्रदान केला त्याबद्दल मी आपली सदैव ऋणी आहे. जगात अनेक ऋण असतात पण प्रेम, जिव्हाळा, आंतरिक अनुबंध यांचे एक आगळे–वेगळे ऋण असते. हेच एक ऋण असे आहे की जे माणसाला अधिकाधिक आनंद देते, अंत:प्रेरणा देते, कार्यस्फुरण देते म्हणून आपल्या या ऋणात मी कायम राहू इच्छिते.

आजच्या सोळाव्या अधिवेशनाचे उद्घाटक डॉ.के.एम.कुलकर्णी (सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, अमरावती), प्रमुख अतिथी मा. गजाननराव कोकाटे (सचिव, जनविकास शिक्षण संस्था, येवदा), जनविकास शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री. देविदासराव कोकाटे, परिषदेचे सन्माननीय संस्थापक, सुप्रसिद्ध साहित्यिक व धडाडीचे कार्यकर्ते आदरणीय डॉ. भाऊसाहेब मांडवकर, ज्यांच्या अथक परिश्रमाने हे १६ वे अधिवेशन घडवून आले ते येवदा येथील कला–वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रा.गो. चवरे परिषदेचे पदाधिकारी, व्यवस्थापन परिषदेचे पदाधिकारी, मान्यवर कार्यकर्ते, साहित्यप्रेमी रसिक मंडळी, गावातील प्रतिष्ठित नागरिक ज्यांच्यामुळे आज आम्ही मानाने मिरवत आहोत ते आमच्या अवती–भोवती पसरलेले आमचे लाडके विद्यार्थी, विद्यार्थिंनी व वाङ्मयाच्या उपासकांनो....

सोळा आकडा माझ्या जीवनाशी फार निगडित आहे. जन्म सोळाचा, विवाह सोळाला, पीएच.डी.ची मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली ती १६/३/१९८४ ला याप्रमाणे जीवनाला दिशा देणाऱ्या महत्त्वपूर्ण घटना घडल्या. त्या सोळालाच आणि आज सोळाव्या अधिवेशनाचे अध्यक्षपद प्राप्त होऊन एका विशेष कार्याची, वाङ्मयसेवेची प्रेरणा मला मिळत आहे हे मी माझे भाग्य समजते.

१९८६ ला मराठी प्राध्यापक परिषदेची स्थापना होऊन दरवर्षी ही परिषद 'वारकऱ्यांच्या निष्ठेने' भरविल्या जाते. याचे सर्व श्रेय डॉ. भाऊसाहेब मांडवकर यांना आहे. ते जसे वाङ्मयाचे उपासक आहेत तसेच मानवतेचे पुजारी आहेत. ग्रामीण परिसरातील, विदर्भाच्या कानाकोपऱ्यातील, तळागाळातील जिज्ञासूंना, अभ्यासकांना, प्रतिभावंतांना हेरून त्यांना प्रगतीची संधी देण्याचे, त्यांच्यातील आत्मविश्वास जागवून तो दृढ बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आजपर्यंत त्यांनी केले आहे व करीत आहेत. या वयातही त्यांचा दांडगा उत्साह, कामाची जिद्द, सतत लेखनमग्न राहून सातत्याने योगदान करण्याचे कार्य अनमोल आहे.

प्रथम ही परिषद वरिष्ठ महविद्यालयीन मराठीच्या प्राध्यापकांपुरती मर्यादित होती. नंतर कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना यात सामावून घेण्यात आले. अमरावती विद्यापीठांतर्गत पाचशेच्या वर असलेल्या मराठी विषयाच्या प्राध्यापकांपैकी बरीच मंडळी परिषदेच्या निमित्ताने एका व्यासपीठावर एकत्र जमतात. अध्ययन–अध्यापनाविषयी विचारमंथन होते. संशोधनाच्या दिशा ठरविल्या जातात. भाषाशुद्धी व भाषाभिवृद्धीचे मौलिक मार्गदर्शन लाभते. परिसंवादाद्वारे साहित्यिक चर्चा घडते. वाङ्मयीन विचारांचे आदान–प्रदान होते. टीका–टिप्पणी होते. क्वचितच प्रसंगी आरोप–प्रत्यारोपांच्या फैरीही झडतात. पण ही सर्व किल्मिषे, गैरसमज आरोप–प्रत्यारोप 'पेल्यातील वादळ' ठरून आणि विकल्पांची काळजी येथेच झटकून मुक्त चर्चा व चिंतनाद्वारे निर्मळ व शुद्ध अंतःकरणाने एक नवा उर्जास्त्रोत घेऊन आम्ही आपआपल्या गावी आमच्या विद्यार्थ्यांच्या जीवनातील ज्ञानज्योती पाजळण्यास, अधिक चोखंदळपणे, स्व–कर्तव्य बजावण्यास परत जातो. त्या दृष्टीने या अधिवेशनांना 'आत्मपरीक्षणाचे ज्ञानकेंद्र' म्हणणे संयुक्तिक ठरेल. शेवटी संधी व प्रोत्साहन माणसातील सुप्त गुणांना प्रस्फुटित करते हेच खरे! अनेक कवी, विचारवंत, ज्ञानवंत, समीक्षक या व्यासपीठाने समाजासमोर आणले आहेत. तसेच निवृत्त प्राध्यापकांचा, आचार्य पदवी प्राप्त करणाऱ्यांचा, विशेष पारितोषिके प्राप्त करणाऱ्यांचा या व्यासपीठाने सन्मान करून त्यांना गौरविले आहे. यादृष्टीने ज्ञानक्षेत्रातील ज्ञानवंतांचा, गुणिजनांचा गुणगौरव हेही या परिषदेचे एक वैशिष्ट्ये म्हणावे लागेल.

नेहमीच मराठीच्या प्राध्यापकांवर टीकास्त्र सोडली जातात. (आपल्यातील काही महाभाग यास कारण आहेत.) यांना काही कामच नाही. मराठी शिकवायचा विषय आहे का? पण बी कवींच्या 'आम्हाला वगळा

निष्प्रभ होतील तारांगणे' ही वस्तुस्थिती आहे. कारण गावात कुठेही काही कार्यक्रम असो किंवा महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेपासून तर विशेष दिन, राष्ट्रीय दिनापर्यंत सर्वच ठिकाणी पुढे असतो तो मराठीचा प्राध्यापक! तो सर्वज्ञ आहे अशीच सर्वांची समजूत असते. अशा या हरहुन्नऱ्याला काही हुनेर शिकून घ्यावे लागतात. इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी अनेक विषयांचे त्यातील शाखोपशाखांचे ज्ञान संपादित करीत स्वतःचा व्यासंग वाढवावा लागतो. समाजाच्या सर्वच स्तरात त्याचा वावर असल्यामुळे समाजाची नाडी त्याने बरोबर हेरली असते. त्यामुळे भाषाशुद्धीच्या कार्यासोबतच भाषाभिवृद्धीचे कार्यही तो सहज करू शकतो. (याला काही अपवाद असतील ती गोष्ट वेगळी) असे असता मराठी विषयाचा प्राध्यापक कनिष्ठ दर्जाचा कसा?

वाङ्मय शिकविणारे निष्ठावंत प्राध्यापक विद्यार्थ्यांना केवळ परीक्षार्थी म्हणून ज्ञान देत नाहीत तर त्यांच्याशी हृदयसंवाद साधतात 'आनंदाचे डोही आनंद तरंग' याचा प्रत्यय घेतात, त्यामुळे विद्यार्थ्यांची मने समृद्ध बनविणारे संस्कार आपोआपच घडतात. मोठमोठ्या पदावर आमचे संस्कारसंपन्न विद्यार्थी आत्मविश्वासाने वावरताना जेव्हा आम्ही पाहतो, तेव्हा आमचा ऊर अभिमानाने भरून येतो. असे माणसाला माणूस घडविणारे ज्ञान देण्याचे सामर्थ्य आमच्या वाङ्मयसेवेत असताना आपण आपल्याला कमी का लेखावे?

आज अमरावती विद्यापीठाची 'वास्तू' मराठीकरणाने उजळून निघत आहे. आपण कुठेही जा जिकडे–तिकडे मराठी पाट्या आपले स्वागत करताना आढळतात. त्यात शुद्धलेखनाच्या चुका असतील, भाषांतरित शब्द बोजड वाटत असतील पण सुज्ञांनी त्यावर टीका न करता आपल्या माय माऊलीचा प्रचार व प्रसार व्हावा, ती अधिक शुद्ध व सुंदर बनावी याकरिता विनयाने सूचना करणे, सुधारणा सुचविणे संयुक्तिक ठरेल.

१ मे १९८३ ला अमरावती विद्यापीठ स्थापन झाले तेव्हा फक्त मराठीचे एम.फिल.चे वर्ग सुरू करण्यात आले होते. तद्नंतर डॉ.वि.भि. कोलते यांच्या प्रस्तावानुसार स्वतंत्र मराठी विभाग निर्माण झाला. पदव्युत्तर वर्ग सुरू करण्यात आले. उजळणी वर्ग घेण्यात येऊ लागले. विविध विषयांवरील व्याख्यानमालेकरिता तज्ज्ञांना बोलावल्या जाऊ लागले. आधुनिक वाङ्मयप्रकारांवर विभिन्न अंगाने प्रकाश टाकल्या जाऊ लागला. १९६० नंतरची कादंबरी या विशेष वाङ्मप्रकाराची परिसंवादाद्वारे चिकित्सा केल्या गेली. विशिष्ट वाङ्मयप्रकारातील पुस्तकांच्या संदर्भग्रंथाबाबत चर्चा घडू

लागल्या. वक्तृत्व स्पर्धा व विशेष दिन समारंभाद्वारे सर्वांना या ज्ञानयज्ञात सामावून घेण्यात आले. महानुभावीय अध्यासन, वैराग्यमूर्ती श्री संतगाडगेबाबा अध्यासन याद्वारे विभिन्न चळवळी चालविल्या जाऊ लागल्या. त्या त्या विषयावरील पुस्तक प्रकाशनावर भर दिला जाऊ लागला. अनिवार्य मराठीची पुस्तके तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार विद्यापीठच प्रकाशित करू लागले. याप्रमाणे मराठी विभाग सुरू करण्यापासून तर मराठीला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यापर्यंतचे कार्य विद्यापीठ स्तरावर होत आहे.

विद्यमान कुलगुरू डॉ. सुधीर पाटील उत्साही, कार्यकुशल, प्रयोगशील, शिस्तप्रिय, गुणिजनांना प्रोत्साहित करणारे, विधायक कार्याकरिता नावाप्रमाणेच धैर्य धारण करून प्रशासनाची धुरा कुशलतेने पेलणारे समर्थ प्रशासक, महाराष्ट्राबद्दल स्वाभिमान व मराठीबद्दल नितांत प्रेम बाळगणारे असल्याने त्यांच्या कारकिर्दीत मराठी सर्वांगाने बहरेल यात शंकाच नाही. त्यातच विद्यापीठाचे अधिष्ठाता लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोडे स्वत: उत्कृष्ट वक्ते, सिद्धहस्त लेखक, गुणिजनांचा आदर करणारे मातृभाषेविषयी कळकळ बाळगणारे असल्यामुळे विद्यापीठ स्तरावरील मराठीचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल आहे. त्यांनी अधिष्ठाता पदावर विराजमान होताच अनेक विधायक बदल घडवून आणले. उजळणी वर्गाचे नव्याने आयोजन केले. तज्ज्ञांची व्याख्याने, चर्चासत्रे, ज्ञानसत्रे चालविली. नांदगाव खंडेश्वरसारख्या ग्रामीण परिसरात 'भारतीय मिथके आणि मराठी साहित्य' या विषयावरील चर्चेस, चिंतनास अधिवेशनाद्वारे एक व्यासपीठ खुले करून दिले. जेणेकरून जिज्ञासू अभ्यासकांना नवनवीन दिशा गवसाव्या व संशोधनाची अनेक दालने खुली व्हावी. याप्रमाणे केवळ विद्यापीठ स्तरावरच नव्हे तर महाराष्ट्रात मराठीचा सन्मान वाढविण्याचे, प्रतिष्ठा कायम राखण्याचे कार्य होत आहे. स्वदेशाप्रमाणेच परदेशातील मराठी माणसांची मराठीबद्दलची आत्मियता लक्षात घेऊन का.स. वाणीसारख्या संस्थांच्या कार्यास प्रोत्साहित केल्या जात आहे.

## वाङ्मयाची उज्ज्वल परंपरा व ऋणनिर्देश –

तेराव्या शतकात वारकरी संप्रदायाने अभंग–ओवी जन्माला घालून नाम संकीर्तनाद्वारे जनजागरण केले, महानुभाव पंथाने धवळे, दृष्टांत कथा, चरित्र–आत्मचरित्रादी वाङ्मप्रकाराद्वारे वऱ्हाडीचा अस्सल बाज कायम राखला. पंडितांनी लावणीला लावण्य बहाल केले तर शाहिरांनी मराठ्यांच्या पराक्रम

गाथा गाऊन महाराष्ट्र जागविला. शिवरायांच्या हिंदूपदपातशाहीच्या स्थापनेतून बखर वाङ्मय, पत्रवाङ्मय व व्यवहार कोष जन्माला आला. उर्दू—फारशीच्या प्रभावाने प्रभावीत झालेली यादवकालीन मराठी इंग्रजाच्या आगमनानंतर इंग्रजीने परपुष्ट बनली.

केशवसुतांनी आधुनिक काव्याची तुतारी फुंकली. हरिनारायण आपट्यांनी स्त्री दुःखाला वाचा फोडली. आंबेडकरी चळवळीने मोठ्या प्रमाणात दलितांचे शोषण समाजासमोर मांडले. महात्मा फुले—शाहू महाराज यांच्या सुधारणावादी विचाराने समाज ढवळून निघाला. मर्ढेकरांनी यंत्रयुगातील माणसाची ससेहोलपट काव्यबद्ध केली. विज्ञानयुगातील सुखोपभोगाला लालसावलेला माणूस आपली शाश्वतमूल्ये विसरू पाहत आहे. नवीन जीवनप्रणालीचा अंगीकार करताना जे सकस असेल, माणूसपण जपणारे असेल ते न विसरता ज्ञान—कर्म—भक्ती व विज्ञान यांच्या समन्वयातून समर्थ माणूस घडविणारे विचार आधुनिक काळातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांनी जनमानसावर ठसविण्याचा प्रयत्न केला. शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिक्षणाची ज्ञानगंगा खेड्यापाड्यापर्यंत पोचवून खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या जीवनात ज्ञानाच्या बागा फुलविल्या. संताप्रमाणेच विचारवंत, संशोधक, राष्ट्रपुरुष यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वराज्य संकल्पना साकार केली तर विनोबाजींनी स्वराज्याला सुराज्य बनविण्याकरिता आर्थिक विषमतेवर प्रहार करून भूदान चळवळीद्वारा समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. साने गुरुजींनी आपल्या साहित्याद्वारे संस्कारसंपन्न भावजीवनाचा वारसा चालविला. शिवाजीराव पटवर्धन, बाबा आमटे यांनी 'सेवा करणे मंत्र तयाचा खरा उपासक मानवतेचा' हे महारोग्यांच्या सेवेद्वारे खरे करून दाखविले. अशा विविध क्षेत्रातील क्रांतिवीरांनी, समाजसुधारकांनी, साहित्यिकांनी आपआपल्या परीने समाजजीवनात विधायक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्याचे पडसाद साहित्यात उमटून साहित्याला एक वेगळा आयाम मिळाला. डॉ.अ.ना. देशपांडे यांनी साहित्याचा इतिहास लिहिला. डॉ.मा.गो. देशमुख यांनी साहित्यशास्त्र तयार केले. डॉ.वि.भि. कोलते यांनी संशोधनाचे महान कार्य केले. वि.स. खांडेकरांच्या आदर्शवादी कादबंऱ्या, ना.सी. फडक्यांचे ललित निबंध, गुजगोष्टी, मधुकर केचे यांचे अभंग, सुरेश भट, ग्रेस, सुधाकर गायधनी यांचे दर्जेदार काव्य अशी कितीतरी मोठी नामावली आहे. येथे सर्वांच्याच नावाचा उल्लेख करणे शक्य होणार नाही. म्हणून 'महाराष्ट्र साहित्य परंपरा खंड न

पडला तिला जरा' असे म्हणून सर्व लेखकांचे लेखन विषयक ऋण मान्य करणे मी माझे कर्तव्य समजते.

विभिन्न वाङ्मय प्रकाराप्रमाणेच समीक्षा वाङ्मयाचे दालनही आज समृद्ध बनले आहे. गतिमान जीवनामुळे व दूरदर्शन संस्कृतीमुळे सर्वसामान्यांचे वाचन कमी झाले आहे. अशावेळी नवनवीन पुस्तकांचा परिचय समीक्षेद्वारा होतो. ही समीक्षा म्हणजे केवळ पुस्तकाचे आलोचन अगर समालोचन नसावे तर पुस्तकाच्या आशय गर्भतेची उकल करणारी, अभिव्यक्ती सौंदर्यावर भर देणारी समीक्षा असावी, जेणेकरून ते पुस्तक विकत घेऊन वाचण्याची इच्छा वाचकाला व्हावी. आजच्या विज्ञानयुगात संगणक संस्कृतीमुळे, ई—मेलमुळे जग जवळ येत आहे; पण माणूस माणसापासून दूर जाऊ पाहत आहे. या माणसांना जवळ आणणारी माणसाचे माणूसपण जपणारी मराठीची परंपरा आम्हाला जपायची आहे, वृद्धिंगत करायची आहे. तिचा दर्जा घसरणार नाही याची दक्षता घ्यायची आहे.

## अभ्यासक्रम तयार करण्याबाबत —

वरील विचार लक्षात घेता मराठीचा अभ्यासक्रम तयार करताना अभ्यास मंडळावर अधिक जबाबदारी येते. गेली अनेक वर्षे मी अभ्यास मंडळात कार्यरत असल्यामुळे त्याबाबत माझे विचार व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते.

१. अभ्यासक्रमात तयार करताना अभ्यास मंडळातील सर्व सभासदांना पुस्तके मिळतातच असे नाही. त्यामुळे एक अगर दोन व्यक्तींनी वाचलेली पुस्तके अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात येतात; पण जेव्हा अभ्यासक्रमावर आक्षेप घेतला जातो. तेव्हा त्यात सर्वच भरडले जातात. म्हणून सर्व सभासदांना पुस्तके उपलब्ध करून देता येतील अशी व्यवस्था असावी.

२. एक किंवा दोन सभांमध्ये अभ्यासक्रम तयार करणे जिकिरीचे काम असते. म्हणून अभ्यासक्रम ठरविताना जास्तीच्या सभांना विद्यापीठाने परवानगी द्यावी. नव्हे, किती सभा हव्या आहेत, ते अध्यक्ष व अधिष्ठाता यांच्यावर सोपवावे.

३. व्यक्तिद्वेषाने अगर प्रांतभेदाने उत्कृष्ट लेखन वगळल्या जाऊ नये जे उत्कृष्ट वाङ्मय असेल ते अभ्यासक्रमात लावण्याचा आग्रह असावा. सार्वकालिक चिरंतन वाङ्मय बंधनातीत असते हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना त्याचा

लाभ करून द्यावा.

४. वैदर्भीय लेखकांचे लिखाण निवडताना आपपर भेद बागळू नये. वाङ्मयीन गुणवत्तेच्या आधारावर ते निवडले जावे.

५. अभ्यासक्रम निश्चित करताना शहरी विभागातील विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण परिसरातील विद्यार्थी नजरेसमोर ठेवावा. (याचा अर्थ अभ्यासक्रमाचा स्तर खाली आणावा असा नाही.) माझा तर अनुभव असा आहे की, संत साहित्याचा परिचय ग्रामीण विद्यार्थ्यांना अधिक असतो. श्रम करण्याची त्यांची तयारी असते. फक्त त्यांना ज्ञानाची उपलब्धी व योग्य मार्गदर्शनाची, दिशादर्शकाची गरज असते. विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होईल काम करून, नोकरी करून शिकणाऱ्यांना शिकता येईल, अशा अभ्यासक्रमाची नितांत गरज आहे. शिक्षणाच्या, ज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणाच्या या युगात मराठी भाषिक मागे राहू नये म्हणून ही दक्षता घेणे आवश्यक आहे.

६. अभ्यासक्रमात लावल्या गेलेली पुस्तके बाजारात उपलब्ध असावीत. महाविद्यालय सुरू होताना विद्यार्थ्यांच्या हातात पडतील अशी व्यवस्था असावी. पुस्तके वाजवी किंमतीत मिळण्याची सोय असावी. मूळ पुस्तकाच्या भरमसाठ किंमतीमुळे विद्यार्थ्यांचा कल मूळ पुस्तकाऐवजी त्यावरील मार्गदर्शिका (गाईड) घेण्याकडेच अधिक असतो.

७. खाजगी (प्रायव्हेट) परीक्षेला बसणारे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या अभ्यासाच्या सोयीकरिता 'संदर्भग्रंथाची यादी सोबत जोडलेली असावी.' संदर्भग्रंथांचा शोध प्राध्यापकानेच घ्यावा हे जरी संयुक्तिक असले तरी सध्या वस्तुस्थिती अशी आहे की, ग्रामीण परिसरात अनेक महाविद्यालये निघालीत, इतकेच नव्हे तर पदव्युत्तर वर्गसुद्धा सुरू करण्यात आले. सरकारी धोरणानुसार नवीन नियुक्त्या बंद झाल्या. त्यामुळे अनेक महाविद्यालयातून नुकतेच एम.ए. झालेले विद्यार्थी तासिकाप्रमाणे पदव्युत्तर वर्गाला शिकविताना आढळतात. त्यांनी स्वत:सुद्धा मार्गदर्शिकांचाच आधार घेऊन अभ्यास केला असल्याने त्यांचे ज्ञान तोकडे पडते. अशावेळी संदर्भग्रंथांची यादी सोबत जोडलेली असल्यास तेवढी तरी पुस्तके मिळविण्याचा शिकविणारे प्राध्यापक प्रयत्न करतील. ज्ञान हे कष्टार्जित असावे, ते इतके सुलभ नसावे हे जरी खरे असले तरी आजचे गतिमान जीवन, बदललेले वातावरण लक्षात घेऊन मराठी विषयाकडील विद्यार्थ्यांचा ओढा कमी होऊ नये म्हणून वरील दक्षता घेणे अपरिहार्य

आहे.

८. केवळ सत्ताधारी, पदाधिकाऱ्यांच्या सोयीनुसार व धोरणानुसार निर्णय न घेता विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन अभ्यासक्रम निवडावा. दर तीन वर्षांनी मराठीचा अभ्यासक्रम बदलत असल्यामुळे केवळ जुन्या अभ्यासमंडळाने लावला म्हणून तो पूर्णपणे न बदलता त्यातील चांगले पाठ, उत्कृष्ट उतारे कायम ठेवून नवीन भर घालावी. अभ्यास मंडळातील सदस्यांवर अनेक प्राध्यापक टीका करतात. त्यात थोडे तथ्य जरी असले तरी काही कार्यालयीन अडचणी असतात. काही प्रशासकीय मर्यादा सांभाळाव्या लागतात. अनिवार्य मराठीचा अभ्यासक्रम तयार करताना पर्यावरण, महिला, दलित, सामाजिक ज्वलंत प्रश्न, घोषित झालेले विशेष वर्ष, विशेष दिन, विशेष व्यक्ती इत्यादी विषयावरील लेखांचा समावेश करावा लागतो. ही तारेवरची कसरत पार पाडताना अभ्यासक्रम सर्वांगपूर्ण बनविण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्यात काही त्रुटी राहून जातात. म्हणून मागील त्रुटी अगर अभाव पुढे राहणार नाही एवढीच दक्षता सदस्य घेऊ शकतात. तसेच अभ्यासक्रमावर घेतल्या गेलेल्या आक्षेपांचा विचार करून अभ्यासक्रम अधिकाधिक निर्दोष बनविण्याचा प्रयत्न करणे एवढेच आपल्या हातात असते.

९. विविध आवश्यक विषयावरील लेखांचा समावेश करताना त्या विषयावर दर्जेदार लेखन सापडेलच असे नाही. अशावेळी आपल्यापैकीच लेखक असलेल्या प्राध्यापकांना विषय दिल्यास चांगले लेख तयार होऊ शकतील.

१०. मराठी विषयाचा आवाका फार व्यापक आहे, अनेक वाङ्मयप्रकार आहेत. त्याच्या विभिन्न शाखा–उपशाखा अनेकांगाने पल्लवीत झाल्या आहेत. काव्य जरी घेतले तरी श्लोक, ओवी, अभंग, आरत्या, गौळणी, विराण्या, भारूडे, पोवाडे, लावण्या, भूपाळ्या, भावगीत, भावगीतातील अनेक प्रकार, गझल, अलीकडच्या काळात निर्माण झालेल्या चार ओळींच्या चारोळ्या असे असंख्य काव्यप्रकार. त्यातही रूपके, प्रतिमा, मिथके यांचे आकलन. जर एखादी प्रतिमा अगर मिथक उलगडले नाही तर नवकाव्याचा अर्थच लागत नाही अशी स्थिती बनते.

यावरून वाङ्मयविषयक ज्ञानशाखा जशा विस्तारत आहेत तशीच त्यांची सखोलताही वाढते आहे असे निदर्शनास येते. कालमानाने बोली व

प्रमाणभाषेच्या नवसंशोधनाने भाषाशास्त्र, सौंदर्यशास्त्र, साहित्यशास्त्र बदलू पाहत आहे. मार्क्सवाद, जनवाद, साम्यवाद इत्यादी वादातून साहित्यातील सामाजिक मूल्य शोधण्याचा प्रयत्न होत आहे. अशावेळी वाङ्मयाचे अंगभूत गुण, लालित्य, लय, प्रासादिकता, अनेकार्थप्रसवता, अलंकरण इत्यादींची गळचेपी तर होत नाही ना याकडे लक्ष द्यावे लागेल.

याप्रमाणे हा 'जगन्नाथाचा रथ' पेलण्याचे सामर्थ्य आपल्या ठिकाणी निर्माण व्हावे. शिक्षण ही विद्यार्थ्यांची साधना आहे तर प्राध्यापकाची ती तपश्चर्या आहे' हे लक्षात घ्यावे. आपल्या मराठी माय माऊलीची बूज राखून तिचे संरक्षण व संवर्धन आजच्या स्पर्धेच्या युगात करता यावे. याकरिता 'मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनांची' नितांत गरज आहे. आमचे सहाध्यायी त्याकरिता जिवापाड प्रयत्न करीत असतात. हे जरी खरे असले तरी प्रत्येक शिक्षकाने आपले कर्तव्य समजून योगदान करणे आवश्यक ठरते कारण त्यांच्या विचारांना मोकळेपणाने हेच व्यासपीठ न्याय देऊ शकेल!

## १५ वे अधिवेशनांचे भाग्यध्येय –

एका विशिष्ट ध्येयाने सुरू झालेल्या गेल्या १५ अधिवेशनांना सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत, तज्ज्ञ अध्यक्ष लाभलेत. साऱ्यांनीच आपापल्या विचारप्रवाहानुसार, सामर्थ्यानुसार मराठीच्या विविधांगी चिंतनाला वाट मोकळी करून दिली. कुणी तिच्या शुद्धतेवर भर दिला तर कुणी तिच्या गळचेपीबद्दल चिंता व्यक्त केली; पण साऱ्यांनीच आपले विचार मातृभाषेच्या कळकळीतून व्यक्त केले. तिला अधिकाधिक शुद्ध बनविण्याच्या प्रयत्नावर भर दिला. विद्यापीठ स्तरावर तिला एक दर्जा प्राप्त व्हावा, या सदिच्छेने हे सर्व प्रयत्न झालेत.

'माझा मऱ्हाटाचि बोल कौतुके
परि अमृतातेहि पैजा जिंके'

हा ज्ञानेश्वरांचा सार्थ अभिमान आम्ही सर्व बाळगून आहोत. मराठी माय माऊलीची अखंड सेवा करण्याचे असिधारा व्रत आम्ही अंगिकारले आहे. कोणतेही परिवर्तन एकदम घडून येत नाही तसेच एकाच वेळी सर्वांचेच समाधान होईल असेही घडत नाही. हे सर्व ध्यानात घेऊन आम्ही म्हणतो तेच १०० टक्के बरोबर असा अट्टाहास न धरता विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करणे एवढेच आपल्या हातात आहे.

आपले विद्यापीठ 'बहुजन हिताय—बहुजन सुखाय' लोकविद्यापीठ असल्यामुळे सर्व विचारप्रवाहांना सोबत घेऊन मातृभाषेची प्रतिष्ठा कायम राखण्याच्या दृष्टीने विद्यापीठाची विधायक वाटचाल सुरू आहे.

आजपर्यंत या परिषदेच्या अधिवेशनांचे अध्यक्षपद मोठमोठे साहित्यिक, विचारवंत, तज्ज्ञ, अभ्यासक यांनी विभूषित केले आहे. मी एक सामान्य शिक्षक, वाङ्मय सेवक, माझ्या अल्पमतीनुसार मी माझे विचार आपणासमोर मांडले. आपण ते शांत चित्ताने ऐकून घेतले याबद्दल आभारी आहे.

२००१ हे 'महिला सशक्तीकरण वर्ष' असल्याने महिला प्राध्यापक म्हणून माझी अध्यक्षपदी निवड करण्यात आली. योगायागाने आजच्या अधिवेशनाचा ८ मार्च हा दिवसही 'जागतिक महिला दिन' आहे. शिकविण्याच्या सेवेतून जरी मी मुक्त झाले तरी वाङ्मयाची सेवा व महिलोन्नतीचे कार्य सुरू ठेवण्याचा मानस आहे.

प्राध्यापक परिषदेच्या संस्थापकांनी, संयोजकांनी माझी निवड करून मला हा बहुमान दिला त्याबद्दल मी त्यांची शतश: ऋणी आहे. आपण सर्व श्रोतृवृंद माझ्या विचारातील 'न्यून ते पुरते अधिक ते सरते' करून घ्याल अशी अपेक्षा बाळगते.

पुनश्च एकदा सर्व उपस्थितांचे आभार!

❖❖❖

# १७ वे अधिवेशन
# कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ
# ६ फेब्रुवारी २००३
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. अक्षयकुमार काळे

मित्रांनो,

प्रारंभीच आपण मला या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून आपले विचार प्रकट करण्याची संधी दिलीत याबद्दल आपल्याविषयीची मी कृतज्ञता व्यक्त करतो. अशा सभा–संमेलनातून आणि अधिवेशनातून मराठी मनाच्या भाषा, साहित्य, संस्कृती ह्यांच्याबद्दलच्या अकृत्रिम जिव्हाळ्याचे आणि त्याच्याप्रती असणाऱ्या उत्तरदायित्त्वाच्या जाणिवेचे जे दर्शन घडते ते केवळ विलोभनीय असते. आपण या ठिकाणी जे आलेले आहात ते भाषा आणि साहित्य ह्यांच्या अभिवृद्धीसाठी, आपल्या विद्यार्थ्यांच्या कल्याणासंबंधी आपल्या मनाची जी दृढ धारणा आहे, आपल्या मनाचा जो दृढसंकल्प आहे त्याच्या विशेष जागरणाकरिता आलेले आहात, याबद्दल मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो. माझी अशी धारणा आहे की, सध्याच्या काळात मराठी भाषा आणि साहित्य, त्याप्रमाणे त्यांच्या शिक्षणाची प्रक्रिया एका दुचक्रात, एका आवर्तात सापडलेली असून त्यातून या सगळ्यांना मुक्त करण्याची आणि वैभव प्रदान करण्याची कामगिरी मुख्यत्वेकरून आपल्या हातूनच घडणार आहे. त्यातील बराचसा भाग हा आपल्या प्रदीर्घ प्रयत्नांचा आणि अविरत कष्टांचा असणार आहे. आपल्याकडून अपेक्षित असणाऱ्या विशिष्ट आणि वैशिष्ट्यपूर्ण उद्दिष्टानुकूल सामूहिक प्रयत्नांमधूनच या संदर्भातील अपेक्षित यश आपल्याला लाभणार आहे. अर्थातच हे यश आपण जो वाङ्मयाचा विद्यार्थी घडविणार आहोत, त्याच्या प्रत्यक्षातील जडणघडणीवर अवलंबून आहे. आपल्या अध्यापनाचे प्रधान उद्दिष्टच मुळी अशा वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची आणि समाजसापेक्ष निरामय वाङ्मयजगताची निर्मिती करणे हे आहे.

तथापि यासाठी वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व, त्याचे कार्य, त्याची वैयक्तिक आणि सामाजिक फलश्रुती कोणती ह्याचा विचार करणे अपरिहार्य ठरेल व तद्नंतरच ते वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आपल्या विद्यार्थ्यांना कसे प्राप्त करून देता येईल ह्याचा विचार करता येईल.

शिक्षण हीच मुळी व्यक्तिमत्त्वविकासाची निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आम्हालाही आमच्या विषयाच्या संदर्भाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावयाचा आहे. व्यक्तिमत्त्वाला अनेक परिणामे असतात व त्या सगळ्यांचाच विकास साधने शिक्षणात अपरिहार्य असते. तथापि काही प्रबळ अशी परिमाणे असतात की ज्यामुळे विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा त्या विशिष्ट परिमाणांमुळे समाजात आपले स्थान निश्चित करीत असते व त्यानुसार त्याच्याकडून वैशिष्ट्यपूर्ण कृती होत असते. वाङ्‌मयाचा विद्यार्थी म्हटला की वाङ्‌मयीन दृष्टीनेच त्याच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक वैशिष्ट्यांची जडणघडण करणे आवश्यक असते. एखादा तडफदार सेनाधिकारी किंवा कुशल डॉक्टर किंवा निष्णात वकील ह्यांच्यात व्यवसायानुरूप ते ते गुण एकवटलेले असतात व विकसित झालेले असतात. त्यामुळे त्यांचे पृथगात्म व्यक्तिमत्त्व उठून दिसते, व त्याच्या प्रगट आविष्कारामुळे समग्र समाजयंत्रणेस ते आधारभूत व उपकारक ठरत असते. अशा व्यक्तिमत्त्वाची समज आणि आवाका जसजसा वाढत जातो तसतसे विश्वव्यवस्थेतील त्याचे स्थानही ठरत असते. शिक्षणप्राप्तीनंतर आमच्याही विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्त्वे वाङ्‌मयाचा अभ्यासक, आस्वादक, मीमांसक ह्या दृष्टीने अशीच घडत नसतील तर आमचे शिक्षण व्यर्थच होय असे म्हणावे लागेल. म्हणूनच जीवनमूल्यांचा व वाङ्‌मयीन मूल्यांचा आकलन—आस्वादनाच्या मार्गाने सुनियोजित संस्कार करून विद्यार्थ्यांची कार्यप्रेरक व्यक्तिमत्त्वे घडविणे हे आपले प्रधान कर्तव्य आहे.

शिक्षकाला केवळ एक—दोन विद्यार्थ्यांना घडवायचे नसून संपूर्ण पिढीलाच घडवायचे असते. त्यामुळे ही वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्वविकासाची सामूहिक प्रक्रिया पार पाडणे म्हणजे आपल्या समोरचे एक प्रचंड आव्हान आहे. सध्याच्या उद्योगप्रधान व्यापारी वृत्तीच्या जगात कला, साहित्य, संस्कृती, तत्त्वज्ञान, मानवता इत्यादींना दुय्यम दर्जा मिळालेला असताना मूलतः ह्याच गोष्टी मानवाला मानवत्व प्रदान करणाऱ्या आहेत. ह्याचा सुनियोजित आणि सामूहिक संस्कार घडवू पाहणाऱ्या आत्मीय शिक्षणामधील आपली भूमिका केवळ आव्हानात्मक आहे ह्यात शंकाच नाही. म्हणूनच विद्यार्थ्यांचा सामूहिक पातळीवर असा व्यक्तिमत्त्वविकास घडविणारा शिक्षकही वाङ्‌मयीन दृष्टीने व्यक्तिमत्त्वसंपन्न असला पाहिजे हे ओघाने आलेच. ही संपन्नता आपोआपच येणारी गोष्ट नाही. व्यक्ती कितीही लहान असली तरी निरंतर विकासाकडे अग्रेसर होणाऱ्या मानवी मनाचे स्फुरण बघता तिचे विश्वव्यवस्थेत वैशिष्ट्यपूर्ण स्थान असते. आपलेही या विश्वव्यवस्थेत चिमुकले का होईना पण महत्त्वाचे

स्थान आहे, हे आपण ओळखले पाहिजे. अकृत्रिम भाषाप्रेमाचा आणि वाङ्मयसक्तीचा झरा खळाळता नसेल तर भाषेप्रती असणारी कमालीची उत्तरदायित्त्वाची भावनाही आपल्या मनात निर्माण होणार नाही. वाङ्मयास्वादाशिवाय आपले जगणे व्यर्थ होय असे वाटत नसेल तर युद्धनगारे झडत असतानाही बाहू स्फुरण न पावणाऱ्या क्लीबांसारखी आपली अवस्था होईल. वाङ्मयाच्या सतत आस्वादाने, डोळस जीवनदृष्टीने घेतलेल्या विश्ववेधाने आणि त्यावर झालेल्या चिंतनानेच एकप्रकारची मर्मदृष्टी तयार होत असते. त्यामुळे आस्वादनाचा आपला अधिकारही वाढत असतो व त्यावर विशेष भाष्य करण्याची आपली क्षमताही वाढत असते. वाङ्मय ही कलाच मुळात जीवनाशी आणि विविध ज्ञानशाखांशी इतकी संबंधित आहे, की आपले इतर विषयांचे पूर्वज्ञान जितके जास्त तितकेच कलाकृतीचे आपले आकलनही अधिक मर्मग्राही राहणार हे उघडच आहे. विद्यार्थ्यांमध्ये नितळ वाङ्मयाभिरूची आणि जीवनविषयक व्यापक असा यथार्थ दृष्टिकोन निर्माण करण्याकरिता अशा मर्मदृष्टीची नितांत आवश्यकता आहे, असे मला वाटते.

ह्या मर्मदृष्टीच्या सहाय्यानेच भाषा, वाङ्मय, कला आणि संस्कृती ह्यांचे संरक्षण व संवर्धन करून उच्च जीवनमूल्यांचा साक्षात्कार विद्यार्थ्यांना घडवून त्यांच्यात भाषाभिमानाच्या, वाङ्मयप्रेमाच्या, सर्जनाच्या आणि आस्वादनाच्या प्रेरणा निर्माण करणे हे आपले महत्त्वाचे कार्य आहे. तेव्हा या संदर्भातील प्रत्येक व्यापार अधिकाधिक शुद्ध कसा करता येईल, निरामय आणि सुदृढ कसा करता येईल हे बघण्याची जबाबदारी आपलीच आहे. कारण प्राचीन साहित्य व कला कितीही श्रेष्ठ दर्जाची असली तरी केवळ त्यावरच विद्यमान पिढ्यांची गुजराण होत नाही. समकालीन साहित्य आणि कला ह्यांना विन्मुख होता येत नाही.

सध्या या चारही क्षेत्रांतला व्यापार गढूळला आहे. आमची भाषा मग ती नागर असो किंवा ग्रामीण, तिच्या मूळच्या अकृत्रिम आणि सौंदर्यपूर्ण रूपापासून विचलित होत आहे. तिला तिचा सूर आणि आत्मा आहे. आपली अनुभूती प्रगट करण्यासाठी तिच्या शब्दांची, वाक्प्रचारांची, म्हणींची काही उणीव आहे असे नाही. तथापि इंग्रजी आणि हिंदी या भाषांची आमच्यावर प्रत्यही आक्रमणे होत आहेत. परंतु आमच्या भाषेचा मूळ पिंडच इतका सक्षम आणि ताकदवान आहे की, आजवर वेगवेगळ्या काळात इतकी आक्रमणे होऊनही तिचे मौखिक आणि लिखित स्वरूप सारखेच सतेज राहिले आहे व त्यामुळेच त्या त्या काळात आमचे महान साहित्यकार मौलिक वाङ्मयनिर्मिती

करू शकले. जी भाषा एवढ्या व्यापक पातळीवर बोलली जाते, सहा कोटींपेक्षाही जास्त लोक जी भाषा बोलतात, पाच हजार मानवी भाषांपैकी जास्तीत जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा दहावा क्रमांक लागतो, असे भाषावैज्ञानिक सांगतात, तिच्यावरील अशी आक्रमणे तिचे मूळ रूप विकृत करू शकणार नाही. ही गोष्ट सत्य असली तरी या संदर्भात आम्ही गाफील रहावे असे नाही. ही आक्रमणे होत असताना अगदी सोवळ्या पद्धतीने आम्हाला आमची भाषा सुरक्षित राखता येत नाही. आम्हाला परकीय शब्दांचे वावडे असण्याचेही काही कारण नाही, मात्र ते शब्द आमच्या भाषेच्या मुशीत घोळून आमचेच बनतात की सदैव उपरेच राहून भाषासौंदर्याची हानी करतात, हे पाहणे आमचेच कर्तव्य आहे.

सर्वसामान्य लोकांचा भाषिक व्यवहार कसाही चालत असला तरी आमचा भाषिक व्यवहार मात्र सजग आणि चेतनापूर्ण असला पाहिजे. विद्यार्थ्यांची श्रद्धा आणि अनुकरणशीलता लक्षात घेता आमच्या भाषिक उपाययोजनाचा संस्कारच मुख्यत्वेकरून त्यांच्या मनावर कोरला जाणार आहे. त्यामुळे हे उपयोजन परंपरेने दिलेल्या सकस भाषारूपाशी सुसंवादी कसे राहील ह्याचा आम्ही विचार केला पाहिजे.

विश्वनागरिकत्वाच्या पार्श्वभूमीवर आपण आपला भाषाभिमान बाळगणे तत्त्वत: योग्य नाही असे काही मंडळींना वाटते, कारण त्यामुळे वैश्विक ऐक्याला बाधा येईल अशी या मंडळींची भ्रामक समजूत असते. वस्तुत: विश्वनागरिकत्वाच्या संकल्पनेचा संबंध मुख्यत्वेकरून अखिल विश्वातील मानवांमध्ये असणाऱ्या भावनिक आणि व्यावहारिक ऐक्याशी आहे. संपूर्ण जगाची एकच भाषा असू शकत नाही. इंग्रजी ही विश्वभाषा आहे असे आम्ही मानत असलो तरी प्रत्यक्षात रशिया, जर्मनी, जपान, फ्रान्स इत्यादी अत्यंत प्रगत देशातील व्यवहार इंग्रजीतून चालत नाहीत व त्यामुळे विश्वनागरिकत्वाच्या संकल्पनेला बाधा येत नाही. हे सर्वच देश आपआपल्या भाषांचा सार्थ अभिमान बाळगतात तेव्हा मराठी भाषिकांनी आपली भाषा प्रादेशिक असली तरी तिचा अभिमान का बाळगू नये ?

भाषेनंतर आमच्यासमोर असणारा दुसरा प्रश्न समकालीन आणि उत्तरकारलीन वाङ्मयाचा आहे. कारण तो आमचा आजउद्याचा अभ्यासविषय आहे.

रंजनवादी घातकी प्रवृत्तीने युक्त असणारे प्रचंड वाङ्मय गेल्या काही वर्षात मराठीत निर्माण झाले आहे. वेगवेगळे मुखवटे धारण करून ते प्रगट होत

असते. विशेषत: अलीकडच्या काळातील रंजनप्रधान मराठी कादंबऱ्या पाहिल्या की ह्याची साक्ष पटते. हे रंजन केवळ नागरी जीवनावर प्रमाणभाषेत लिहिलेल्या कादंबऱ्यामध्येच असते असे नाही. कोणत्याही लेखकाने एकदा रंजनवादी सूत्रांचा पैसा, प्रसिद्धी, यश, मान्यता यासाठी स्वीकार केला की अगदी नागर व प्रमाणभाषेत लिहिलेली एखादी प्रणयरम्य कादंबरी असो की पुराण–इतिहासाची उधार उसनवारी करून लिहिलेली पौराणिक–ऐतिहासिक कादंबरी असो, किंवा वेगळ्या रंजनमूल्यांचा सवंगपणे वापर करून लिहिलेली झोपडपट्टी जीवनावरील कादंबरी असो किंवा ग्रामीण कादंबरी असो, सारखाच अनर्थ घडणार. वास्तवदर्शनाच्या नावाखाली सामान्य रंजनपर गोष्टींची दर्शने कोणत्याही जीवनाशी संबंधित असणाऱ्या कादंबरीत दाखवता येतात. प्रश्न रसिकांच्या मनोरंजनाचा नसून त्यांना अंतर्मुख करण्याचा आहे. जीवनाप्रती घेतलेल्या भूमिकेसंबंधीचा आहे. त्याकरिता लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातच खरी अंतर्मुखता व मानवसापेक्ष जीवनदृष्टी असावी लागते. केवळ कादंबरी हा प्रकारच नव्हे तर कथा, नाटक, आत्मचरित्रे व कविता या सर्वच वाङ्मयप्रकारात निर्माण होत असलेल्या साहित्यात आज आत्मनिष्ठेची वानवा आहे.

जीवनाची खरीखुरी समरसता, प्रामाणिकपणा आणि आत्मनिष्ठेचा अभाव त्यामुळेच बाह्य गोष्टींचा आमच्या लेखकावर फार जास्त प्रभाव पडतो. व्यापारी वृत्तीचे प्रकाशक ह्या अनर्थात अधिकच भर टाकताना दिसून येतात. उद्योगप्रधान संस्कृतीत वेगाला अनिवार महत्त्व असते. कमीतकमी वेळात जास्तीत जास्त गोष्टींचे उत्पादन करणे हे या संस्कृतीचे अपरिहार्य वैशिष्ट्य आहे. त्याचा अपकारक प्रभाव साहित्य आणि कला ह्यांच्या निर्मितीवर पडणे स्वाभाविकच आहे. कारण अप्रत्यक्षपणे त्यांचा संबंध व्यापाराशी येणारच. कलावंतांची मुळात इच्छा नसली तरी व्यापारी त्यांची मानसिकता यादृष्टीने कधी आणि कशी बदलतील हे सांगता येणार नाही. व्यापाऱ्यांची आमिषे लेखकांची अवघी निर्मितीप्रक्रियाच गढूळ करून टाकतात, तेव्हा त्यांनी त्यापासून कटाक्षाने दूर राहण्याची आवश्यकता असते. तथापि त्यासाठी विचलित न होणाऱ्या तेजस्वी जीवनदृष्टीची आणि सूक्ष्म कलादृष्टीची आवश्यकता असते. एरवी कलादृष्टीच्या अभावी मोठमोठे कलावंतही भरकटतात. तिथे कलानिर्मितिप्रक्रियेसंबंधीच्या अज्ञानामुळे नवोदित लेखक भरकटले त्यात आश्चर्य काय?

वस्तुत: जिवंत साहित्यनिर्मिती किंवा कलानिर्मिती मुख्यत्वेकरून

कलावंताच्या स्वतःच्या जीवनानुभूतीवर अवलंबून आहे. महात्मतेच्या पदवीपर्यंत पोचणारे वाङ्मय तर खऱ्या उत्कट जीवनानुभूतीशिवाय निर्माण होणेच शक्य नाही. तेव्हा गळ्यातून सच्चा सूर आणि शब्दांतून खरी वास्तवानुभूती प्रगट व्हायची असेल तर ही बाजारू वृत्ती नाहीशी झाली पाहिजे. प्रत्यक्ष जीवनानुभूतीत डुंबून राहत असताना चिंतनाच्या बळावर जी साक्षात्कारस्वरूपी सत्ये गवसतात तीच कोणत्याही कलावंतांची सकस अनुभूती होय. अशी अनुभूती जेव्हा कलारूप धारण करते आणि आस्वादप्रक्रियेने रसिकांच्या अंतर्हृदयापर्यंत पोचते तेव्हाच त्या प्रदेशात ती वर्षानुवर्षे विस्तार पावत असते. त्यामुळे अशा आत्मानुभूतीचा शोध कलावंतांनी घेतलाच पाहिजे. परंतु सद्यःकालीन चित्र फार विपरीत आहे. अनुकरणाच्या वेडाने आणि आयत्या पिठावर रेघोट्या ओढण्याच्या सवयीने आमचे कला—साहित्यक्षेत्रातले निर्माते इतके झपाटले आहेत व सांस्कृतिक आणि कलाविषयक आक्रमणे इतकी वेगाने होत आहेत, की त्या प्रचंड लाटेसमोर आम्ही आमच्या खऱ्या जाणिवांना, संवेदनांना, विचारप्रक्रियेला आणि तर्कबुद्धीला पारखे होत चाललो आहोत.

अर्थातच हे विष आपल्यात केवळ आज भिनलेले नाही. त्याचा इतिहास वाङ्मयीन दृष्टीने पाहता ब्रिटीशांच्या आगमनापासूनचा आहे. सांस्कृतिक, सामाजिक पातळीवर एकदा आक्रमण झाले की, जेत्यांची संस्कृती अधिक बरी वाटू लागते व मग आपली अभिरूचीही बदलून जाते. त्यामुळे आपल्याला आपल्या मराठी संस्कृतीतील तद्वतच भाषा आणि वाङ्मय ह्यांच्या संदर्भातील मूळ प्रेरणास्त्रोतांचा शोध घेणे आवश्यक आहे. आपण ज्ञानोबा—तुकोबा—चोखोबा ह्यांचे वंशज आहोत हे आपण कधीही विसरता कामा नये. आपल्याला आपल्या खऱ्या वाङ्मयपरंपरांचा शोध आपल्या प्राचीन साहित्यातून लागू शकतो. त्या साहित्याचा अभ्यास आपल्याला अभ्यासाकरिता अभ्यास म्हणून किंवा केवळ अध्यापनविषय म्हणून करावयाचा नसून नवे साहित्य निर्माण करणाऱ्या आणि आस्वादणाऱ्या पिढीच्या प्रेरणांचे खरे स्वरूप ठरविणे बरेचसे आपल्या हाती आहे म्हणून करावयाचा आहे.

आपली स्वतःची वाङ्मयीन संस्कृती निर्माण करणे आणि या संस्कृतीच्या संवर्धनार्थ विशिष्ट उद्देशानुगामी पद्धतीने ठरविणे ही गोष्ट आपल्याला वाटते तितकी सोपी नाही, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. प्रत्यही आक्रमण करणाऱ्या परक्या संस्कृतीपासून आपण दूर पळून जाऊ शकत नाही व तसा पलायनवाद आपण स्वीकारणेही योग्य नाही. आपल्याला यासंदर्भात एक विवेक अंगीकारावयाचा आहे. इंग्रजी शब्द, कल्पना अगदी वेचून

खड्यासारख्या वगळता येत नाहीत तशा त्या वगळण्याची तादृश आवश्यकताही नाही. विशाल मराठी संवेदना—जाणिवांत त्या विरघळून आम्हाला भावनात्मक, मानसिक व बौद्धिक पातळीवर परिपुष्ट करीत असतील तर त्यामुळे मराठी संवेदनविश्वाचे त्या नुकसान करू शकणार नाहीत. मराठी लेखकांनी स्वतःच्या आंतरिक प्रेरणा आणि आपली स्वतंत्र सर्जकशक्ती अधिक गतिमान करण्याची आवश्यकता आहे. एकीकडे ज्याप्रमाणे ऐतिहासिक आणि पौराणिक साहित्यावर अवलंबून राहण्याची पद्धत आपण सोडायला पाहिजे त्याचप्रमाणे पाश्चात्त्यांच्या उसनवारीची पद्धतही आपण सोडली पाहिजे.

सध्या तर जागतिकीकरणाच्या एका दुर्दम्य लाटेत आपण सापडलो आहोत. विश्व जवळ येत आहे. ज्ञान—विज्ञानाच्या क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती घडून आली आहे. त्याचा प्रभाव सर्व क्षेत्रांवर आपल्याला जाणवत आहे. कला आणि साहित्य ह्यांच्यावर ह्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या संदर्भात काही अनिष्ट शक्यता मला आपल्यासमोर मांडायच्या आहेत. आज विश्वाच्या कोणत्या तरी कोपऱ्यात एक शोध लागतो आणि त्याचा फायदा सर्व विश्वाला होतो. त्याचप्रमाणे जगाच्या कुठल्या तरी कोपऱ्यात एखादी महान वाङ्मयीन कलाकृती निर्माण होईल व तिचे भाषांतर चुटकीसरशी होऊन तुमच्या हातात पडू शकेल. चांगली भाषांतरे तुमच्या हातात पडली तर त्यामुळे तुमचे नुकसान होणार नाही. परंतु यापेक्षाही भयंकर शक्यता अशी आहे की, एखाद्या कलाकृतीची जमेल तशी भ्रष्ट नक्कल होऊन आमच्या नव्या पिढीच्या हातात पडू शकेल व देश्य वाङ्मय तितक्या ताकदीने निर्माण झाले नाही तर हे असे भ्रष्ट वाङ्मय त्यांच्यासमोर राहील. आपण हिंदी चित्रपटांच्या संदर्भात असे झालेले पाहत आहोत. देश्य स्वरूपाचा खोटा तोंडवळा धारण करून विदेशी चित्रपट आपल्या चित्रपटसृष्टीमध्ये उजळ माथ्याने मिरवीत आहेत. सातत्याने अशा चित्रपटांचा किंवा वाङ्मयीन कलाकृतींचा आस्वाद घेण्याची सवय लागली, जी सवय लावण्याकरिता धंदेवाईक चित्रपटनिर्माते आणि ग्रंथप्रकाशक आपली सगळी यंत्रणा जिद्दीने कामाला लावत आहेत, तर आमचा स्वानुभव प्रगट करणारे साहित्य आम्ही वाचायलाच तयार होणार नाही. खाण्याच्या पदार्थांपासून तर भेटकार्डापर्यंत आमच्या अभिरूचीमध्ये कसा बदल करता येईल व आपला माल हातोहात कसा खपविता येईल याकरिता त्या त्या वस्तूंचे निर्माते काय काय युक्त्या करतात ह्याची आपल्याला जाणीव आहे. झपाट्याने आपली नवी पिढी या सगळ्यांच्या आहारी आपला विवेक गमावून जात आहे. अशा अवस्थेत जर

त्यांच्या रसिकतेमध्ये, अभिरुचीमध्ये व्यापारी वृत्तीच्या ग्रंथप्रकाशकांना आपल्याला हवा तसा बदल घडवून आणता आला तर आपल्या साहित्याला अवकळा आल्याशिवाय राहणार नाही. आमचे चांगले कलावंतही मग अपरिहार्यपणे तडजोडी करू लागतील. केवळ रंजनप्रधान, मूल्यविहीन, कोणतीही नैतिक व जीवनसापेक्ष भूमिका नसलेले वाङ्मय आमच्या नव्या पिढीच्या हातात पडू लागेल.

याचा अर्थ असा नव्हे की आपल्याला आपल्या वाङ्मयाचा वरवरचा चेहरामोहरा केवळ मराठी हवा आहे. आपल्याला वस्तुत: खरा देश्यभाव हवा आहे. स्वानुभूतीवर आधारलेले आत्मनिष्ठ साहित्य आपल्याला हवे आहे. आपला वरवरचा चेहरा कसाही असो आपल्याला आपला आत्मा मराठी हवा आहे.

मर्ढेकरांच्या कवितेत किती तरी इंग्रजी शब्द येतात. तिच्यात इंग्रजी वळणाच्या भाषिक स्वरूपाचे आपल्याला दर्शन घडते पण जेव्हा तिच्या अंतरंगात आपण शिरतो तेव्हा आपल्याला मर्ढेकरांच्या देशी आत्म्याचे दर्शन घडते. पायलन्स, क्लच, रोबो एक ना दोन किती तरी इंग्रजी शब्द आपल्याला त्यांच्या कवितेत सापडतील. पण जेव्हा ते,

भंगु दे काठिण्य माझे
आम्ल जाऊ दे मनीचे,
येऊ दे वाणीत माझ्या
सूर तुझ्या आवडीचे

असे म्हणतात तेव्हा त्यांचा आपल्याशी संवाद होतो. इलियट, हॉपकिन्स, ऑडजू इत्यादींच्या कवितेचे ते गाढे अभ्यासक असूनही त्यांना त्यांचा आत्मा हिरावून घेतलेला नाही, ह्याची आपल्याला खात्री पटते. जागतिकीकरणात अपरिहार्य असलेल्या दोन भिन्न वाङ्मयाच्या आंतरक्रियेतून आपल्याला दूर पळायचे नसून आपला विवेक आपल्याला जागृत ठेवायचा आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

कदाचित आता आपण मला असा प्रश्न विचारला की हा सगळा अनर्थ मराठी प्राध्यापक कसा काय थोपवू शकणार आहेत? व आपणाला अपेक्षित असणाऱ्या नव्या निर्मितीशी त्याचा नेमका संबंध तरी कोणता राहणार आहे? म्हणून त्याचे उत्तर मी जाणीवपूर्वक देत आहे. माझे हे आवाहन केवळ मराठी प्राध्यापकांपुरतेच नसून समग्र पहिल्या वर्गाला शिकविणाऱ्या शिक्षकांपासून पीएच.डी.च्या मार्गदर्शकापर्यंत आणि भाषा आणि वाङ्मय

ह्यांच्याप्रती उत्तरदायित्वाची भावना असणाऱ्या सुबुद्ध नागरिकांसाठी आहे. त्यात मराठी शिक्षकांची भूमिका अधिक महत्त्वाची आहे. उमलणारी आणि विकसित होणारी पिढी आपल्यासमोर आहे. त्यांच्या अभिरूचीच्या व निर्मितिक्षमतेच्या विकसनाची जबाबदारी आपलीच आहे. वाङ्मयाचे निर्माते किंवा आस्वादक आणि अभ्यासक हे कधीतरी मराठी भाषा आणि वाङ्मयाचे विद्यार्थी असतात तेव्हा त्याचवेळी त्यांना उजू वाट दाखविणे हे आपले कर्तव्य आहे. ह्या सर्व गोी अभ्यासक्रमात असतातच असे नाही. अभ्यासक्रमात फक्त पुस्तके असतात. तेव्हा त्याचे अध्यापन करणे हे तर आपले कर्तव्यच आहे, पण त्यापेक्षाही वाङ्मयात विषवल्लीसारख्या पसरणाऱ्या, निर्मिती आणि आस्वाद ह्यांच्या संदर्भातील अपप्रवृत्तींची सवय आपल्या विद्यार्थ्यांना कशी लागणार नाही व वाङ्मयातील अपप्रवृत्ती कोणत्या हे जाणून घेऊन महात्मतेने युक्त असणारे वाङ्मय कोणते ह्याची प्रगल्भ जाणीव त्यांना कशी होईल, ह्याची काळजी घेणे हे मराठी शिक्षकाचे महत्कार्य होय असे मला वाटते. अभिरुची आणि अभिवृत्ती ह्या सर्वस्वी जन्मजात नव्हेत. त्यांचे यथायोग्य संस्काराने संपादनही करता येते. उद्याच्या श्रेष्ठ लेखकांची जपणूक करणे व त्यांच्या साहित्याचे उद्याचे आस्वादक निर्माण करणे हे आपल्या हाती आहे. ‘उप्रत्स्यतेऽस्मि मम कोऽपि समानधर्मा कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी’ या भवभूतीच्या वचनातून प्रगट होणारी खंत कमी करण्याची आणि त्याने प्रकट केलेला आशावाद प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांची आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

आपल्या समोरची पिढी समुत्सुक आहे. तिची निर्मितीक्षमता, ज्ञानाभिलाषा आणि रसिकता वाढविण्यातच, तिचा ‘आंतरअग्री फुलविण्यातच’ आपल्या अध्यापकीय जीवनाची खरी सार्थकता आहे. ती सार्थकता कसाध्यतेच्याच नव्हे तर एका परिपूर्ण तपस्येच्या बळावर आपण प्राप्त करावी यासाठी आपणा सगळ्यांना शुभेच्छा देऊन मी माझे भाषण पूर्ण करतो.

❖❖❖

# १८ वे अधिवेशन
# कला वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव
# ३ व ४ जानेवारी २००४
# अधिवेशनाध्यक्ष : प्रा. बा. वा. कळसकर

आज क्रांतिमा सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित केलेल्या अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या १८ व्या अधिवेशनाचे उद्घाटक सुप्रसिद्ध आंबेडकरवादी विचारवंत आदरणीय डॉ. यशवंत मनोहर, स्वागताध्यक्ष प्रा.वसंतरावजी पुरके, मंत्री, रोजगार तथा स्वयंरोजगार, म.रा.आणि पालकमंत्री, यवतमाळ जिल्हा, आयोजक आमचे मित्र प्राचार्य डॉ.सुभाष खंडारे, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग तसेच या अधिवेशनाला उपस्थित असलेल्या राळेगाव परिसरातील बंधू आणि भगिनींनो,

## प्रास्ताविक :

आतापर्यंत झालेल्या अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या सतरा अधिवेशनांमध्ये एखाद्या विषयाला केंद्रवर्ती ठेवून सर्वांगीण चर्चा करून निष्कर्ष काढण्याइतपत कार्यपद्धती अवलंबिल्या गेली नाही. आतापर्यंतच्या अधिवेशनांचे स्वरूप केवळ भेटीगाठी आणि तात्पुरत्या स्वरूपाचे खंडन–मंडण असे होते. यामुळे अधिवेशनांमधून काही प्रेरक गोष्टी निघाल्या, असे घडले नाही. हा पायंडा मोडण्याचे क्रांतीकार्य या अधिवेशनाद्वारे होत आहे; जागतिकीकरणासारख्या विश्वाची चिंता करायला लावणाऱ्या विषयाला बीजभूत ठेवून आयोजित केलेल्या मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनावर अध्यक्ष म्हणून माझ्यासारख्या जळगाव जामोद या आडवळणाच्या गावातील महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकाची निवड केली. हा आयोजकांचा हेतू केवळ त्यांचे माझ्यावरचे मित्रप्रेम असेल, असे मला तरी वाटत नाही. जेव्हा जेव्हा आम्ही भेटतो तेव्हा तेव्हा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाची, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीची चर्चा सहजपणे फुलत जाते. हे आमच्यातील व्यवसायाशी असलेली निष्ठा आणि वैचारिक चिंतनाची अभिरुची या साधर्म्यांमुळे घडत होते. त्यामुळे मित्रप्रेमापेक्षा शिक्षणप्रेम हेच या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी माझी निवड करण्यास कारणीभूत ठरले असावे. जागतिकीकरण या विषयावरचे माझे चिंतन मांडण्यासाठी मला मिळालेली ही

संधी नसून ती एक गंभीर जबाबदारी आहे याची मला नम्र जाणीव आहे. याबद्दल सर्व प्रथम प्राचार्य डॉ. सुभाष खंडारे, स्वागताध्यक्ष वसंतरावजी पुरके यांचे मी अभिनंदन करतो.

संगणकाच्या क्षेत्रामध्ये जसा एखादा व्हायरस शिरावा आणि संगणक चालकाची झोप उडावी, तसा शिक्षणाच्या क्षेत्रात नव्या अर्थाने जागतिकीकरणाचा व्हायरस शिक्षणप्रेमींची झोप उडवून टाकत आहे. अशावेळी आपण भाषा आणि साहित्याचे अध्यापन–अध्ययन आणि संशोधनाच्या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या सहाध्यायी मंडळींनी याबाबत गंभीरतेने विचार करावा, अशीच वेळ आलेली आहे. अध्यापनाचे कार्य करता करताच 'नॅक'साठीचे अहवाल तयार करणारे गतकालातील कार्यकलाप तपासताना तुम्हा आम्हा सगळ्यांची तारांबळ उडाली आहे. अशातच अहवाल सादर केला नाही, तर पुढच्या वेतनाचा हप्ता मिळणार नाही, असा खलिता प्रत्येक महाविद्यालयात येऊन धडकल्यामुळे आता हा अहवाल पाठविण्याशिवाय गत्यंतर उरले नाही, ही भावना प्रबळ झाली आहे. हे असे प्रश्न का निर्माण झाले, यांचा डोळसपणे विचार करण्यासाठी कळीचा मुद्दा मी आपल्यासमोर मांडत आहे. या मुद्याला डाव्या विचारसरणीच्या लोकांनी 'खाउजा' असा संक्षिप्त शब्द दिला आहे. या शब्दाचे विस्तारीत स्वरूप खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण असे आहे. यातील उदारीकरण आणि खाजगीकरण हे जागतिकीकरणाच्या रेट्यांमुळे आलेले आहेत त्यामुळे जागतिकीकरण ह्याच महत्त्वाच्या शब्दाला केंद्रीभूत ठेवून मी माझे विचार या निमित्ताने आपल्या समोर मांडत आहे.

मित्रहो, जागतिकीकरण हा शब्दप्रयोग १९७०–८० या दशकात सर्वप्रथम व्यापारी जगतात वापरला गेलेला आहे. जगाच्या पातळीवर असलेल्या भांडवली अर्थव्यवस्थेचे खुली अर्थव्यवस्था, उदारीकरण, खाजगीकरण हे विविध पैलू आहेत. भांडवलशाहीने भांडवलशाहीच्या मार्गातील अडचणी दूर करण्यासाठी उपयोगात आणलेला एक उपाय म्हणजे 'जागतिकीकरण' होय. जागतिकीकरण या धोरणाची अमेरिकेमध्ये सुरुवात होऊन आता एकवीस वर्षे झालेली आहेत. अमेरिकेने भांडवलवाद्यांच्या सहकार्याने स्वत:च्या देशाला प्रचंड नफा मिळविता यावा याकरिता हे धोरण साकार केले आहे. तिसऱ्या जगातील वेगवेगळ्या देशांवर व्यापारविषयक, भांडवलविषयक कठोर अटी लादून नफ्याच्या नावाखाली प्रचंड शोषण करण्याच्या प्रकल्पाचे नाव 'जागतिकीकरण' हे आहे. आपला भारत देश तिसऱ्या जगातील देश म्हणून ओळखल्या जातो. स्वातंत्र्योत्तर काळात येथील राज्यकर्त्यांनी या देशाकरता

मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. विविध कारणांमुळे या अर्थव्यवस्थेत कुंठितावस्था निर्माण झाली, म्हणून भारताने जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अत्यंत जाचक अटीला मान्यता देण्याची तयारी दाखविली. राजीव गांधी यांच्या काळातच या प्रक्रियेला सुरुवात झाली होती. १९९१ साली नरसिंहराव यांच्या दबावाखाली येऊन नवे आर्थिक धोरण स्वीकारले. अशा प्रकारे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपला देश सहभागी झाला आहे. नंतरच्या सर्वच सरकारांनी जागतिकीकरणाविषयीचे धोरण मान्य केलेले आहे. भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार जागतिकीकरणाच्या संदर्भात अती उत्साही आहे.

## जागतिकीकरण आणि समाज :

भारताची समाजव्यवस्था शोषणावर आधारित आहे. येथे अनार्य–आर्य काळापासून तर आजतागायत जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत विषमता अबाधित ठेवण्याचे सातत्याने प्रयत्न झालेले आहेत. येथील धर्म, देव, धार्मिक तत्त्वज्ञाने इत्यादींच्या आधारे सामाजिक विषमतेला पावित्र्य बहाल करण्यात आलेले आहे. हे विषमतेचे प्रत्यक्ष व्यवहारातील रूप वर्णव्यवस्थेच्या आणि जातीव्यवस्थेच्या स्वरूपात प्रामुख्याने सिद्ध झालेले आहे. त्याचप्रमाणे या समाजव्यवस्थेने सामंतशाही आणि भांडवलशाही या अर्थविषयक रचनांचा मन:पूर्वक स्वीकार केलेला आहे. या समाजव्यवस्थेने येथील उच्चवर्णीय आणि उच्चजातीय समाजाचे हितसंबंध सतत जोपासलेले आहेत. हे हितसंबंध अबाधित राखण्यासाठी त्यांना काही विशेषाधिकार देण्यात आलेले आहेत. उच्च वर्ण–वर्ग आणि जातींच्या विशेषाधिकारात प्रामुख्याने सत्ता, संपत्ती आणि शिक्षण हे अधिकार प्रमुख आहेत. ज्या जाती आणि वर्णाच्या जवळ सत्ता, संपत्ती आणि शिक्षणकेंद्रित झालेले आहे. त्या जाती आणि वर्ण यांना या व्यवस्थेने श्रेष्ठत्व बहाल केलेले आहे. याशिवाय संपूर्ण कनिष्ठवर्णीय आणि जातीय समाजांपासून हे अधिकार हिरावून घेण्यात आलेले आहेत. म्हणून इथे असणारा कनिष्ठ वर्ण–जातीय समाज कायम सत्ता, संपत्ती आणि ज्ञानापासून वंचित राहिलेला आहे. येथे ज्या वर्ण जातींजवळ सत्ता आणि संपत्तीकेंद्रित झालेली आहे, ती त्यांच्याच जवळ अबाधित रहावी म्हणून येथील कनिष्ठ वर्ण–जाती समूहाला धर्माच्या, कर्मकांडाच्या अज्ञानाच्या अंधारात ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न झालेला आहे. याचे परिणाम असे झाले की, संख्येने अल्प असलेल्या श्रेष्ठवर्णजातींच्या समूहाजवळ सर्व प्रकारची शोषणयंत्रणा केंद्रित

झालेली आहे. या यंत्रणेच्या माध्यमाने बहुसंख्य असलेल्या कनिष्ठ वर्ण–जाती समूहांचे अव्याहत शोषण करण्यात त्यांना यश मिळालेले आहे.

तसेच विषमतेवर आधारित असलेल्या या समाजव्यवस्थेला समताधिष्ठित करण्याचा प्रयत्नही झालेला आहे. चार्वाक, केशकंबली, गौतम बुद्ध, फुले, आंबेडकर आदींच्या तत्त्वज्ञानांनी आणि प्रत्यक्ष कृतींनी हा प्रयत्न केलाय. येथे असणारा बहुसंख्य मानवसमूह जाती–वर्णाच्या शोषणामधून मुक्त करून त्याला खरी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता व न्याय देण्याचा प्रयत्न येथे झालेला आहे. म्हणजेच भारतीय समाजव्यवस्थेमध्ये वेगवेगळ्या नावांनी शोषणाचा पुरस्कार करून स्वत:चे हितसंबंध अबाधित राखून, इतरांचे शोषण करून स्वत:चे श्रेष्ठत्व कायम राखणारा एक गट आहे. तर शोषणाचा निषेध करून सर्वांच्यामध्ये बंधुभावाचे संबंध प्रस्थापित करून त्यांच्यामधील विषमता न करून सर्वांना स्वातंत्र्य बहाल करू पाहणारा एक दुसरा गट आहे. पहिल्या गटाला 'शोषक' म्हटले तर दुसऱ्या गटाला 'शोषित' म्हणावे लागते.

अशा या भारतीय समाज व्यवस्थेमध्ये आजही वर्ण–जाती यांच्या निमित्ताने होणारे शोषण कायम आहे. विषमता कायम आहे. येथील जो गट शोषणाचा पक्षधर आहे, तो ही समाजरचना विषमतेवर आधारितच रहावी, असा सातत्याने प्रयत्न करीत असतो. या प्रयत्नाचा विरोध म्हणून ज्या विविध चळवळी येथे उभ्या राहिल्या होत्या त्या सर्वांना वेगवेगळ्या पातळ्यांवर बदनाम करून न करण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे. येथील माणूस खऱ्या अर्थाने स्वतंत्र व्हावा, सुसंस्कृत व्हावा असे ज्या गटाला वाटते, त्या गटाला संपविण्याचाच प्रयत्न या समाजव्यवस्थेत झालेला आहे. भारताच्या प्राचीन आणि मध्ययुगीन काळात या समाजाचे हे वास्तव आहे. मार्क्स म्हणतो की, "उत्पादनाची साधने बदलली की, उत्पादनाशी संबंधित असणारे हितसंबंधही बदलत असतात." याचा प्रत्यय या समाजव्यवस्थेला आलाच नाही. कारण येथे उत्पादनाची साधने कायम पारंपरिक आहेत. असे भारताच्या भूमीत एकोणिसाव्या शतकापर्यंत अव्याहत शोषण सुरू होते. इंग्रजी राजवटीत पारंपरिक शोषणाला तडे गेले, तरीही येथील वर्ण–जातीव्यवस्था आहे त्या रूपात कायम राहिली. उच्च वर्ण आणि उच्च जातीव्यवस्था यांच्या प्रतिष्ठा कायम राहिल्या. त्यांचे हितसंबंध त्यांनी याही काळात अबाधित ठेवल्याचे आढळून येते. याच काळात फुल्यांच्या चळवळीने, आगरकरांच्या विचारांनी येथील कनिष्ठ वर्ण–जातीसमूहाला जीवन जगण्याचे नवे भान बहाल करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांत फुल्यांनी शिक्षणाला अग्रक्रम दिला.

त्यासंदर्भात कृतिशील कार्यक्रम राबविला. फुल्यांच्या या सामाजिक आकलनाने या समाजव्यवस्थेचे एक नवीन विश्लेषण पुढे आले. या सर्व चळवळीनंतरही येथील कनिष्ठ वर्ण—जातीसमूहांचे शोषण थांबले नाही. त्याची तीव्रताही फारशी कमी झाल्याचे आढळत नाही. परंतु या प्रयत्नांच्या निमित्ताने एका नव्या जगाचा परिचय फुल्यांनी येथील शोषित समूहाला करून दिला होता. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानामुळे आणि विविध चळवळींमुळे कनिष्ठ वर्ण—जातींना नवे भान प्राप्त झाले. त्यांच्यामध्ये शोषणविरहित जीवन जगण्याचे स्वप्न साकार व्हायला लागले व वेगवेगळ्या आघाड्यांवर तसा प्रयत्न होऊ लागला. म्हणूनच इंग्रजांच्या काळात वेगवेगळ्या प्रकारच्या आरक्षणांचा जन्म झाल्याचे आढळून येते. पुणे कराराच्या निमित्ताने राजकीय आरक्षण इंग्रजी राजवटीत केलेल्या प्रयत्नांनंतरही सर्वच क्षेत्रांतील विषमता न होऊ शकली नाही. १९५० साली या देशाला खऱ्या अर्थाने देशपण प्राप्त झाले कारण या देशाची एक स्वतंत्र घटना या देशाने मान्य केली. घटनेच्या एका सूत्रात हा देश बांधला गेला. या घटनेने हजारो वर्षे वेगवेगळ्या नावे चालत आलेली गुलामगिरी एका क्षणात न करून टाकली. पण हे न होणे घटनेच्या कलमांत बंदिस्त करून ठेवण्याचे प्रयत्न सातत्याने होत राहिले. भारतीय राज्यघटनेने येथील सर्वांना समानतेने जगता यावे, या समाजातील वेगवेगळ्या पातळीवरील गुलामगिरी न व्हावी; म्हणून एका कल्याणकारी राज्याचे स्वप्न पाहिले आहे. या स्वप्नाचा मुख्य हेतू माणूस सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त व्हावा हा तर आहेच, पण याहीपेक्षा अधिक म्हणजे हा देश एकसंघ होऊन सामर्थ्यशाली व्हावा; असाही आहे. म्हणूनच येथील वेगवेगळ्या संदर्भात मागास असलेल्या जनसमूहांना वेगवेगळे संरक्षण देण्यात आलेले आहे. मूलभूत हक्कांच्या निमित्ताने येथील माणसांच्या वाट्याला सुंदर जीवन यावे, शोषण विरहीत जीवन जगता यावे असेच स्वप्न या घटनेने पाहिलेले आहे. म्हणूनच या देशाची अर्थव्यवस्था मिश्र स्वरूपाची असावी; आणि समाजव्यवस्था समतेवर आधारित असावी असे या देशाच्या घटनेला वाटलेले आहे. स्वातंत्र्याची पंचावन्न वर्षे पूर्ण होऊनही, भारतीय समाजाच्या सुंदरतेचे जे स्वप्न घटनेने रेखाटले आहे. ते अजूनही प्रत्यक्षात अमलात आल्याचे आढळत नाही.

भारताची सद्य:स्थितीतील समाजव्यवस्था अजूनही विषमतेवर आधारित आहे. येथील वरिष्ठवर्णीय आणि जातीय समूहाच्या शोषणाला आजही कनिष्ठवर्णीय आणि जातीय गट बळी पडतो आहे. आर्थिक,

सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विषमता आजही तशीच कायम आहे. शोषणाचे देव, धर्म, जात या नावे असलेले प्रकार आजही तितकेच सक्षमपणे कार्य करीत आहेत. म्हणून येथील कनिष्ठ वर्ण आणि जाती या देशाच्या स्वातंत्र्याच्या पंचावन्न वर्षानंतरही शोषित म्हणूनच ओळखल्या जात आहे. दलित–शोषित समाज आजही दलित–शोषितच राहिला आहे. तात्पर्य असे की, या देशात वर्णजातीवर आधारित शोषण व्यवस्था चिवट स्वरूपाची आहे. काळ कसाही बदलला, संदर्भ कसेही बदलले, तरी ही व्यवस्था नव्या रूपात सातत्याने कायम राहते, म्हणून आजचे भारताचे समाजवास्तव असे आहे की, येथे जाती आहेत. त्यांच्यात श्रेष्ठकनिष्ठत्व आहे. दारिद्र्य आणि लाचारी अजूनही येथे आहे. येथील उच्चवर्णीयांच्या मनातील सामंतशाही आजही जिवंत आहे. येथे असणारे विविध स्वरूपाचे शोषण न करण्यासाठी येथे प्रयत्न झाले नाहीत असे नव्हे. पण या प्रयत्नानंतरही भारताची समाज व्यवस्था फारशी बदलली, असे म्हणता येत नाही. याचे मुख्य कारण असे की, या देशात सार्वत्रिक शिक्षण हे परिवर्तनाच्या दिशेने कधी दिलेच गेले नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून या प्रश्नाचा शोध घेताना या विषयाशी निगडित काही सत्ये आपणांसमोर ठेवणे अपरिहार्य आहे.

## जागतिकीकरण आणि शिक्षण :

मानवाला अर्थपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी शिक्षण हे माध्यमासारखे काम करीत असते. शिक्षण ही सांस्कृतिक बाब आहे. जेवढ्या म्हणून सांस्कृतिक बाबी असतात, तेवढ्या प्रयत्नपूर्वक टिकवाव्या लागत असतात. शिक्षण हे मानवी स्वातंत्र्याला जसा अर्थ देते, तसेच मानवी स्वातंत्र्याचा अर्थ काढून घेण्याची शक्तीही शिक्षणाजवळ असते. समाजात समता निर्माण करण्याचे सामर्थ्य जसे शिक्षणात आहे, तसेच गुलामगिरी निर्माण करून टिकवून ठेवण्याचे सामर्थ्यही शिक्षणात आहे. म्हणूनच भारतात असलेल्या ज्ञानपरंपरांमध्ये सतत विरोध आढळून येतो. मानवी स्वभावातील पशुत्वापासून दूर जाण्यासाठी खरे तर शिक्षणाची आवश्यकता असते. माणसातील पशूत्व भयंकर चिवट असते. प्रयत्नपूर्वक माणूस सांस्कृतिक होऊ पाहतो; परंतु त्यांच्यामध्ये असलेला पशुत्वाचा वारसा त्याला लवकर सोडविता येत नाही. यामुळेच इतरांवर वर्चस्व गाजविणे आणि इतरांना गुलाम करण्यात धन्यता मानणारे मन माणूसपणापासून सतत दूर राहण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असते. असा प्रयत्न यशस्वी व्हावा म्हणून वेगवेगळ्या प्रकल्पांना जन्म

दिले जातात. धर्मसंस्था, सामंतशाही, भांडवलशाही इत्यादी रूपांनी हे प्रकल्प कार्य करीत असतात. हे प्रकल्प सतत टिकवून रहावे म्हणून त्याचेही ‘पंतोजी’ असतात. प्राचीन काळापासून शोषण परंपरा टिकविण्यासाठी विविध शैक्षणिक प्रकल्प राबविले गेलेले आहेत. जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, कर्मकांड, स्त्रियांची गुलामगिरी अधिक मजबूत करण्याचे प्रयत्न अशा शिक्षणाद्वारे केले जात असतात. म्हणूनच शिक्षण हे दुधारी आहे असे म्हटले जात असते. स्वत:मधील आणि समाजामधील पशुत्वाचा वारसा संपावा असे ज्यांना वाटते ती सर्व मंडळी सामाजिक परिवर्तनाच्या बाजूने, मानवी गुलामगिरी, विषमता यांच्या विरोधात उभी असल्याचे आढळून येते. माणसांतील पशुत्व सुखी करणारा आणि माणसांतील मानवास सुखी करणारा यांच्यात सतत विग्रह असणे अपरिहार्य आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून पंचावन्न वर्षे झाली असली, तरी शिक्षणाचे सार्वत्रिकरण पूर्ण होऊ शकलेले नाही. या देशात शालेय शिक्षण मोफत आहे असे समजले जाते. मात्र प्रत्यक्षात ते मोफत असत नाही. राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के रक्कम शिक्षणावर खर्च व्हावी असे धोरण असतानाही प्रत्यक्षात ३ ते ४ टक्के खर्च शिक्षणावर सरकार करीत असते. शिक्षणाच्या जागतिकीकरणामुळे आता सरकार शिक्षणविषयक जबाबदारी पार पाळवयास तयार नाही. म्हूणनच चौदा वर्षापर्यंत सक्तीचे मोफत शिक्षण या संदर्भातील घटनेच्या कलमात ‘सहा ते चौदा’ वर्षापर्यंत सक्तीचे मोफत शिक्षण अशी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. म्हणजे शून्य ते सहा वर्ष वयोगटासाठी असणारे सर्व शिक्षण शासनाने अत्यंत बेजबाबदारपणे नाकारले आहे. भारत सरकारने जागतिक बँकेचे निकष उच्च शिक्षणाच्या क्षेत्रालाही लागू केलेले आहेत. जागतिक बँकेच्या मते उच्च शिक्षण ही गुणवत्तेशी संबंधित नसलेली वस्तू आहे. त्यामुळे भारत सरकारने उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्याच्या बाबतीत टाळाटाळीचे धोरण अवलंबले आहे. उच्च शिक्षणाचा सर्व खर्च विद्यार्थ्यांवर शूल्क आकारून भागविला जावा असे सरकारला वाटते. दि.२६ डिसेंबर २००३ साली या संदर्भाचा महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे नाव बदलून उच्च शिक्षण विकास आयोग असे केले आहे. शिक्षणविषयक जबाबदारी टाळता यावी म्हणून भारत सरकारने उच्च शिक्षणाचे खाजगीकरण, व्यापारीकरण करण्याची भूमिका स्वीकारलेली आहे. भारतातील उच्च शिक्षणाचे खाजगीकरण, बाजारीकरण करण्याची तसेच या संदर्भात जागतिक बँकेची अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी मुकेश अंबानी आणि कुमार मंगलम् बिर्ला

या दोन उद्योगपतींवर सोपविलेली आहे. अंबानी आणि बिर्ला यांनी २४ एप्रिल २००२ रोजी शिक्षणपद्धतीतील सुधारणा अहवाल सरकारला सादर केला आहे. त्यांच्यामते 'शिक्षण ही एक भरपूर फायदा देणारी बाजारपेठ असून शिक्षणातून समाजविकासाचा एक भाग म्हणून शिक्षणाकडे पाहण्याचा आणि स्पर्धेत टिकणारे कुशल कामगार निर्माण झाले पाहिजेत हा दृष्टिकोन चुकीचा आहे, असे त्यांचे मत आहे. बिर्ला आणि अंबानी यांचा अहवाल स्वीकारून भारत सरकारने शिक्षणक्षेत्रात गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. याचे भयंकर परिणाम या देशाला निश्चितपणे भोगावे लागतील. उच्चशिक्षण हे फक्त श्रीमंतांचेच क्षेत्र म्हणून ओळखले जाणार आहे शिक्षण क्षेत्रातील महागाई भरपूर प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना न परवडणारी एक बाब म्हणजे शिक्षण आहे असे यानंतर ओळखले जाईल. भारताच्या प्राचीन समाजव्यवस्थेमध्ये शिक्षण हा जो विशिष्ट वर्णाचाच अधिकार होता, तसाच यानंतर विशिष्ट वर्गालाच शिक्षणाचा अधिकार राहील हा याचा अर्थ आहे. शिक्षणाच्या जागतिकीकरणामुळे माणसांमधील असलेल्या पशूंच्या गरजा तेवढ्या भागविल्या जातील. प्राणी पातळीवरील समृद्ध जगणे सिद्ध होईल. त्यामुळे माणसाचे माणूस म्हणून समृद्ध सांस्कृतिक जगणे न होत जाईल मन आणि शरीराच्या या फारकतीमुळे मानवी संस्कृतीच्या ज्ञानाच्या क्षेत्राच्या संदर्भात प्रचंड हानी होईल. माणसाची भौतिक संस्कृती विकास पावेल मात्र मानसिक संस्कृती न होत जाईल हा मानवी समाजातील असमतोल मानवी समाजाचीच प्रचंड हानी करणारा आहे, हे ओळखण्याची गरज आहे.

## जागतिकीकरणाचा परिणाम :

जागतिकीकरणाचा सुंदर चेहरा पाहून सुरुवातीच्या काळात भल्याभल्यांनी त्याचे स्वागत केले होते. या स्वागताचे मूळ कारण असे होत की, जागतिकीकरणामुळे भारतातील जाती व्यवस्था न होऊन देश विकसित होईल. यामुळे या देशातील नागरिकही विकसित होईल असे वाटले होते. जागतिकीकरणामुळे दरडोई उत्पन्न वाढेल म्हणून किमान जीवन जगण्याच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यास येथील माणूस सक्षम होईल अशा आशा जागतिकीकरणामुळे निर्माण झाल्या होत्या. आता जागतिकीकरणाचा खरा चेहरा पाहून ते हादरलेले आहेत. जागतिकीकरणाने सर्वसामान्यांचे अस्तित्वच निरर्थक ठरविलेले आहे. सर्व सामान्य माणसाने जगावे म्हणून; त्याला स्वातंत्र्य असावे

म्हणून, त्याची गुलामगिरी संपावी म्हणून भारताच्या राज्यघटनेने त्याला जीवनविषयक मूलभूत हक्क प्रदान केले होते, हे सर्व हक्क जागतिकीकरणामुळे संपुष्टात येत आहेत. इतकेच नव्हे, तर तिसऱ्या जगातील कोणत्याही देशाच्या घटनेला आता फारसा अर्थ उरलेला नाही. या देशाची घटना आणि सरकार जागतिकीकरणाच्या निमित्ताने होत असलेल्या संदर्भात जर काही असंतोष निर्माण झाला तर शांतता आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याची जबाबदारी आणि अधिकार घटनेला राहतील. शोषकांचे सर्व हितसंबंध सुरक्षित ठेवणे एवढेच येथील शासन व्यवस्थेचे कर्तव्य राहणार आहे. इतर सर्व अधिकार या जगातील मोठ्या शक्तींजवळ म्हणजे सद्य:स्थितीत अमेरिकेजवळ केंद्रित झालेले असतील. देशाच्या सर्व आर्थिक नाड्या मोठ्या भांडवलदाराच्या हुकुमानुसार चालणार आहेत.

जागतिकीकरण हा भांडवलशाहीचाच नवीन अवतार असल्यामुळे शोषणाच्या जुन्या यंत्रणा कायम ठेवून त्यांचे नूतनीकरण करून काही नवीन शोषण यंत्रणा उभारल्या जात आहेत. ह्या सर्व शोषणयंत्रणा अधिक आकर्षक स्वरूपात जगासमोर मांडल्या जात आहेत. शोषितांनीही आकर्षित होऊन या भांडवली यंत्रणेचा सहभाग व्हावे इतक्या त्या आकर्षक आहेत. आपल्या देशातील कालपर्यंत जी मंडळी शोषणाच्या बाजूने उभी होती, ती मंडळीच प्रामुख्याने जागतिकीकरणाचा भल्या मोठ्या आवाजात पुरस्कार करीत आहेत. शोषणाचे एक नवीन हत्यार जागतिकीकरणाच्या निमित्ताने त्यांच्या हाती सापडलेले आहे. कालपर्यंत जी मंडळी शोषणाच्या बाजूने उभी होती, ती म्हणजे उच्चवर्णीय/उच्चजातीय जमीनदार, भांडवलदार मंडळीच होती. सामंतशाहीच्या, भांडवलशाहीच्या माध्यमाने येथील कनिष्ठ वर्ण–जातीय स्त्री इत्यादींचे शोषण ही मंडळी अव्याहतपणे करीत होती. वर्ण, जात, धर्म, देव असे या शोषणाच्या हत्यारांची नावे आहेत. या हत्यारांच्या विरोधात येथील परिवर्तनवादी मंडळी उभा संघर्ष सतत करीत आलेली आहे. या संदर्भात म. फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर आदींची नावे घेता येतील धर्म, वर्ण, जात इत्यादी शोषक मूल्य व्यवस्थेच्या विरोधात येथील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्यव्यवस्था लढत आलेली आहे. हाच संघर्ष आता नवे रूप घेऊन जगाच्या मंचावर येत आहे. म्हणजे वेगवेगळ्या संदर्भात शोषणाच्या बाजूने असणारी मंडळी आज जागतिकीकरणाच्या बाजूने उभी आहेत. यांमध्ये उच्चवर्णीय, जातीय संघ आणि त्यांच्या सर्व शाखा, उपशाखा तसेच भाजपसारखे पक्ष आणि त्यांच्या स्वभावाला समांतर असणारे सर्व राजकीय पक्ष

एका बाजूने म्हणजे शोषणाच्या पुरस्काराच्या बाजूने उभे आहेत.

या देशाचे १९९१ नंतरचे समाजवास्तव पाहिले तर असे आढळते की, सर्वदूर धर्मांशी संबंधित घटना घडत आहेत. प्रसार माध्यमे धर्मांच्या पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम सातत्याने प्रसारित करीत आहेत. येथील लोकांच्यामध्ये कडव्या धर्मान्धतेचे जहर पसरविले जात आहे. येथील कट्टर हिंदुत्व कट्टर मुस्लिमांच्या विरोधात उभे ठाकलेले आहे. धर्मांधर्मांमधील संघर्ष कायम जिवंत ठेवण्याचा प्रयत्न होत आहे. त्यात गोध्रा हत्याकांडानंतरच्या गुजरातच्या दंगली, बाबरी मस्जिदसारख्या प्रकरणांमध्ये वाढ होत आहे. या प्रकरणामुळे एक प्रकारची असुरक्षितता लोकांमध्ये निर्माण होत आहे. म्हणून इथली माणसे स्वत:च्या धर्म/जातीजवळ अधिकाधिक सरकत आहेत. याचा नेमका फायदा येथील राजकारणी, भांडवलदार, व्यापारी करून घेत आहेत. येथील सर्व सामान्य माणूस अज्ञानी रहावा, गरिबीतच जगावा, तो शोषित रहावा या दृीने त्याच्यामधील दैववादी वृत्ती वाढविली जात आहे. स्वत:च्या होत असलेल्या शोषणाला शब्दानेही त्याने हटकू नये अशी मनोवृत्ती येथे साकारली जात आहे.

भारताच्या स्वातंत्र्याच्या काळात घटनेने दिलेल्या काही मूलभूत हक्कांच्या अनुषंगाने झालेल्या विकासाला गिळंकृत करण्याची क्षमता जागतिकीकरणामध्ये आहे. शासनाच्या सर्व सार्वजनिक क्षेत्रांचे खाजगीकरण केले जात आहे. सार्वजनिक क्षेत्र हे सर्वसामान्यांच्या जीवनाला महत्त्व देणारे क्षेत्र असते, तेच न केले जात आहे. राज्यघटनेमध्ये तशा दुरुस्त्या केल्या जात आहेत. म्हणजेच सर्वसामान्य किंवा शोषित वर्ग भारतीय राज्यघटनेच्या आधाराने शोषणाच्या तावडीतून बाहेर येत होता, ही संधीच न करण्याचे षडयंत्र साकार होत आहे. असे करण्यात शोषकांचा हितसंबंध गुंतलेला आहे. भारतासारख्या देशात म्हणून उच्चवर्ण, उच्चजाती परंपरावादी राजकीय पक्ष, भांडवलदार आणि मोठे व्यापारी जागतिकीकरणाचा जोरात पुरस्कार करीत आहेत. जागतिकीकरण ज्यांच्या फायद्याचे आहे अशी भांडवलदार मंडळी जगभर दहशत निर्माण करीत आहेत. कारण जगाच्या पातळीवर ‘नाहीरे’ हा वर्ग एक अभिशाप आहे. शोषण अबाधित रहावे म्हणून जागतिक पातळीवर जागतिकीकरणाच्या निमित्ताने दहशतवादाची निर्मिती करणे आवश्यक असते. जागतिकीकरणाच्या निमित्ताने असा दहशतवाद निर्माण झाला आहे याचा अनुभव भारत आणि भारतासारखे देश घेत आहेत. जागतिकीकरणाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या शोषणाचा अनुभव शोषित वर्गाला मिळाला आणि

तो जागृत होऊन शोषणाविरुद्ध लढ्यात उतरला तर शोषक वर्गाचे हितसंबंध धोक्यात येत असतात. म्हणून जागतिकीकरणाची शोषणयंत्रणा जागतिक पातळीवर दहशतवादाची निर्मिती करीत असते. त्याचे वेगवेगळ्या मार्गाने पालनपोषण करीत असते. अशा दहशतवादाचा चेहरा देशपरत्वे भिन्न भिन्न असतो. वेगवेगळ्या देशांच्या भांडवली वृत्तीच्या पक्षांमध्ये असलेले वेगवेगळे लोक धार्मिक, सांस्कृतिक, दहशतवादी निर्माण करीत असतात व स्वतःचे हितसंबंध जोपासत असतात. भारताच्या संदर्भात येथील नागरिकांना आलेला दहशतवादाचा अनुभव सर्वांना परिचयाचा झालेला आहे.

जागतिकीकरणाच्या नावाखाली संपूर्ण देशाचे शोषण करून येथे आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक दहशतवाद निर्माण करून हे नव साम्राज्यवादी राष्ट्रे संपूर्ण जगावर सत्ता गाजविण्यासाठी प्रचंड इच्छा मनात बाळगून असतात. या दहशतवादाने आजपर्यंत असंख्य माणसांचा बळी घेतला आहे. तिसऱ्या जगातील विकसनशील राष्ट्रातील विकास न केलेला आहे.

या पार्श्वभूमीवर माणसाच्या सांस्कृतिक जगण्याचे संदर्भ निश्चित होणे आणि त्यानुसार साहित्य आणि कलांची निर्मिती होणे गरजेचे आहे. कारण साहित्य आणि कला ही मानवी गरज आहे.

## जागतिकीकरण : साहित्य आणि कला :

माणूस म्हणून जगण्यासाठी कलेची नितांत आवश्यकता आहे. मानवी समाजाची ही गरज पूर्ण झाली नाही, तर त्याच्या आणि निसर्गातील इतर प्राण्यांच्या जगण्यात तसा फारसा फरक शिल्लक राहत नाही. माणूस हा त्याचे भौतिक जगणे समृद्ध व्हावे म्हणून त्याच्या भौतिक संस्कृतीचा विकास करतो. तसाच त्याचे मानसिक जीवन समृद्ध व्हावे यासाठी तो विविध कलांची निर्मिती करतो आणि निर्माण झालेल्या या कलांना प्राणपणाने जपत असतो. असे जरी असले तरी बहुतेकांना मानवाच्या समाजजीवनातील कलेचे महत्त्व कळले असेलच असे सांगता येत नाही.

आपल्या देशातही अत्यंत प्राचीन काळापासून विविध स्वरूपांतील कला निर्माण झाल्या आहेत आणि त्या समाजाचे हित जोपासण्यासाठी केल्या आहेत. साहित्य कला ही अशीच मानवी समाजाला आवश्यक असणारी, मानवी समाजाची मानसिक तहानभूक भागविणारी कला आहे. म्हणून साहित्याची आणि वाङ्मयाची निर्मिती वेगवेगळ्या कारणांसाठी का असेना, मानवी समाजात होत राहिलेली आहे, होतही आहे. बा.सी. मर्ढेकरांसारख्या

एखाद्या सौंदर्यशास्त्रज्ञाला वाङ्मय कलेचे जीवनात काडीइतकेही महत्त्व मान्य नसले, तरी साहित्याचा आणि मानवी जीवनाचा अन्योन्य संबंध मान्यच करावा लागत असतो. समाजाच्या सर्व भावभावनांना, समाजाच्या सर्व स्वप्नांना समाजातील सर्व असमतोलांना अशा कलेत अधोरेखित केलेले असते. म्हणजे मानवा मानवातील संबंध ज्या पातळीवरचे असतील, त्याला अधोरेखित करून या संबंधाचा तोल सावरण्याचा प्रयत्न करीत असते. म्हणूनही मानवी समाजातला कलेचे महत्त्व वाटत आलेले आहे. म्हणूनच मानवी समाजात कलावंतांना प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले आहे.

या सर्वच कलांमध्ये साहित्य कला ही अत्यंत महत्त्वपूर्ण कला आहे. कारण इतर कलांच्या तुलनेत मानवी जीवनाला कवेत घेण्याची क्षमता तिच्यात अधिक आहे. मनोरंजनापासून तर क्रांतीपर्यंत सर्वच आघाड्यावर ती मानवाच्या सोबत आहे. अशा या वाङ्मय कलेची वेगवेगळी सर्वच प्रस्फुरणे आपल्या परिचयाची आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये या कलांच्या स्थितीगतींचा, त्यातही वाङ्मय कलेच्या स्थितीगतीचा विचार करणे अपरिहार्य आहे.

जागतिकीकरणामुळे जगाच्या पातळीवर असणाऱ्या सर्वच कला प्रभावित होणार आहेत. याला अपवाद साहित्यकला सुद्धा असणार नाही. जागतिकीकरण हे भांडवली साम्राज्यवादाचे आधुनिक रूप आहे. त्यामुळे जगाच्या पातळीवर शोषणाची एक यंत्रणा कार्यान्वित होणार आहे. भारत देशात यापूर्वीपासूनच सामंती आणि भांडवली शोषण आहेत. त्यामुळे भारतातील कला ह्या प्रामुख्याने दोन परस्पर विरोधी छावण्यांमध्ये साकार झालेल्या आहेत. शोषणाच्या बाजूने उभे असणाऱ्या कलावंतांनी शोषण अबाधित राहील अशाच आशयाला केंद्रवर्ती ठेवून कलांची निर्मिती केलेली आहे. अशा कलांना आपण परांपरावादी कला म्हणतो. या संदर्भाने साहित्य कलेतही परांपरावादी साहित्याचा प्रवाह आढळून येतो. ज्यांचे शोषण होत आहे, त्यांना या शोषणातून मुक्त व्हायचे असते. मानव म्हणून एक स्वातंत्र्य उपभोगायचे असते. अशा वर्गातील कलावंत या समाजव्यवस्थेच्या प्रती स्वतःच्या कलांमधून विद्रोही साकार झालेला आहे. जागतिकीकरणामुळे शोषणाला देशाच्या, समाजाच्या मर्यादा राहणार नाहीत.जगाच्या पातळीवर शोषणाचा एकच एक प्रकल्प कार्यरत होत आहे. या प्रकल्पात शोषक आणि शोषित असे दोन ध्रुव आहेत. त्यामुळे संपूर्ण जगाच्या पातळीवर वाङ्मयातही द्विध्रुवात्मकता निर्माण होणार आहे. जागतिकीकरणाच्या बाजूने असणारा कलावंत जागतिकीकरणाचे हितसंबंध जोपासणारी जाणीव स्वतः कलाकृतींमधून अभिव्यक्त करणार आहे,

तर जागतिकीकरणाच्या विरूद्ध असणारा कलावंत जागतिकीकरणाच्या प्रति स्वत:च्या कलेमधून विद्रोह साकार करणार आहे. म्हणजेच जागतिक शोषणाचा होकार आणि नकार आता वाङ्मयकलेमध्ये सामर्थ्याने प्रकट होणार आहे. मराठी वाङ्मयकलेमध्ये यापूर्वीच परांपरावादी साहित्य आणि परिवर्तनवादी साहित्य म्हणजे शोषणाला अबाधित ठेवणारे साहित्य व शोषणाला विरोध करणारे साहित्य साकार झालेले आहे. मात्र ह्या साहित्याच्या सीमारेषा देशातील असलेल्या शोषणव्यवस्थेपुरत्याच मर्यादित स्वरूपाच्या होत्या. आता त्या सीमारेषा न होऊन जागतिक पातळीवर शोषणाला व त्यांच्या विरोधाला कवेत घेण्याचे सामर्थ्य साहित्यामध्ये निर्माण होणार आहे. म्हणजेच येथील परंपरावादी साहित्य कालपर्यंत वर्ण, जात, धर्म, इत्यादींच्या निमित्ताने होणाऱ्या शोषणाला त्याचे हितसंबंध जोपासता यावे म्हणून साकार होत होते. आता संपूर्ण जगाच्या पातळीवर जगातिकीकरणाच्या निमित्ताने झालेल्या शोषणाचा पाठपुरावा या साहित्याच्या जाणीवक्षेत्राचा ताबा घेणार आहे. म्हणजेच मराठी परंपरावादी साहित्य देशातील परंपरावादाने केलेल्या शोषणाच्या समर्थनाऐवजी जगाच्या पातळीवर होत असणाऱ्या शोषणाचे समर्थन करण्यात स्वत:ला धन्य समजणार आहे. अशाप्रकारे मराठी साहित्याचा परंपरावादी ध्रुव विकसित होणार आहे. या विकसनाचे स्वरूप मात्र आपण समजून घेणे गरजेचे आहे. येथील शोषण व्यवस्थेच्या बाजूने असणारा वर्ग जागतिकीकरणाच्या पातळीवर जागतिकीकरणामुळे होणाऱ्या शोषणाच्या बाजूने राहणार आहे, असे जरी असले तरी भारतातील शोषणव्यवस्थेला जागतिक शोषणव्यवस्थेमध्ये सहभाग मिळेलच असे सांगता येत नाही. कारण संपूर्ण जगाच्या तुलनेत भारत देशातील शोषणाचे स्वरूप भिन्न आहे.

जगाच्या पातळीवर साम्राज्यवादी, भांडवलवादी भारतातील परंपरावादी शोषक वर्गाच्या संदर्भात आस्था असण्याचे काही कारणच संभवत नाही. याउलट येथील परंपरावादी शोषण व्यवस्थेचेही सामाजिक जाणिवांच्या अनुभवांच्या कक्षा जरी काही प्रमाणात विस्तारल्या गेल्या, तरी त्या विस्ताराला जागतिक रूप प्राप्त होणार नाही. ही या जाणीव कक्षेची मर्यादा राहणार आहे. याउलट परिवर्तनवादी सामाजिक जाणिवतेच्या कक्षा जगाच्या पातळीवर विकसित होणार आहेत. कारण भारतीय परंपरावादाच्या निमित्ताने झालेले शोषण व जागतिकीकरणाच्या निमित्ताने झालेले शोषण यांच्यात एक घट्ट आणि निश्चित नाते निर्माण होणार आहे. सगळे शोषित विद्रोहाच्या अंगाने अभिव्यक्त होतील. मात्र जगाच्या पातळीवर भारतीय परंपरावाद्यांचा आनंद

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये विकसित होण्याचा कोणताही मुद्दा उपस्थित होत नाही. म्हणून या आनंदाला या देशाच्या मर्यादांमध्येच स्वत:ची जाणीव अभिव्यक्त करावी लागेल. ही या ध्रुवाच्या विकसनातील मर्यादा अधोरेखित करणे महत्त्वाचे आहे. हा दुसरा ध्रुव कालपर्यंत भारतीय शोषणाच्या विरोधात विद्रोह साकार करीत होता, याउलट आता जागतिक शोषणाच्या विरोधात जागतिक पातळीवर विद्रोह साकार करणार आहे.

## मराठी भाषेची स्थिती :

मराठी भाषेची स्थिती चांगली नाही, असे सतत ऐकावयास येते. इतर भाषांच्या अतिक्रमणामुळे आणि इंग्रजी भाषेच्या दादागिरीमुळे मराठी भाषेला वाईट दिवस आले आहेत असे समजले जाते, तसे बोललेही जाते. मराठी भाषेची स्थिती चांगली नाही, वाईट झालेली आहे असे म्हणणाऱ्या मंडळींना एक प्रश्न विचारला पाहिजे की, मराठी भाषेची अवस्था कोणत्या काळात चांगली होती? कारण अवस्था चांगली किंवा वाईट असणे हा मुद्दा तुलनेचा आहे. अवस्था पूर्वी चांगली होती आणि आता त्यापेक्षा वाईट झालेली आहे. असे जर सिद्ध करता आले तर आपण मराठी भाषेची सद्य:स्थिती वाईट आहे; चांगली नाही असे म्हणू शकतो.

मराठी भाषेचा विचार करताना, या भाषेतील लिखित पुराव्यांपासून जरी विचार केला तरी माझ्या मते आजच्या इतकी मराठीची अवस्था कधीच चांगली नव्हती. कारण कालपर्यंत मराठी भाषक जेवढा म्हणून समाज आहे, तेवढा पूर्ण समाज मराठी भाषेमधून वाङ्मयनिर्मिती करीत नव्हता. तसा त्याला अधिकारही नव्हतो. जो विशिष्ट समाज वाङ्मय निर्मिती करीत होता तो त्यांच्याच समाजाचे जीवनानुभव साहित्यातून सादर करीत होता हे एक आणि दुसरे असे की मराठी वाङ्मय आधुनिक काळ येईपर्यंत देव, धर्म, राजा यांच्या भोवती तसेच संस्कृतमधील पुराणग्रंथाभोवतीच रुंजी घालत होते. याचा अर्थ असा की, मराठी वाङ्मयामध्ये मराठी समाजाचेही संपूर्ण अनुभवविश्व दाखल झालेले नव्हते. संपूर्ण मानवी जीवन, त्याच्या ताण्याबाण्यासह कधी मराठी साहित्यात व्यक्त झाल्याचे आढळून येत नाही. ज्या साहित्याने संपूर्ण मानवी जीवनाला स्पर्श करण्याची ताकद दाखविली नाही, ज्या साहित्यात मानवी जीवनाला कवटाळण्याची शक्ती नाही, अशा काळातील भाषेची स्थिती चांगली होती असे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही.

मराठीच्या आधुनिक काळानंतर, इंग्रजी राजवटीत आणि भारतीय

स्वातंत्र्यानंतर मराठी समाजजीवनाचा एक एक घटक साहित्य निर्मितीत उतरू लागला. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीमुळे, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड यांच्या प्रोत्साहनाने, डॉ. पंजाबराव देशमुखांची शिवाजी शिक्षण संस्था व विठ्ठल रामजी शिंदे यांची रयत शिक्षण संस्था इत्यादींच्या शिक्षणविषयक प्रयत्नांमुळे मराठी भाषक विविध समाजगट शिकू लागले, वाङ्मयनिर्मिती करू लागले. १९६० पासून मराठीच्या रंगमंचावर इतरांचेही प्रयोग मोठ्या ताकदीने सादर व्हायला लागले. तेव्हापासून मराठी भाषेची स्थिती चांगली नाही ही ओरड अधिक तीव्र स्वरात ऐकायला येत आहे. श्री.म. माट्यांनी मराठी भाषेच्या समृद्धीबद्दल असा विचार मांडला होता की, वेगवेगळ्या व्यवसायांतील लोक जेव्हा लेखन करू लागतील तेव्हा नवीन कल्पना, नवीन वाक्प्रचार, नवीन शब्द मराठीमध्ये येतील आणि त्यामुळे मराठी वाङ्मय समृद्ध होईल, आज असे व्हायला लागले आहे. कालपर्यंत ज्यांच्यामध्ये वाङ्मयनिर्मितीचे सामर्थ्य नव्हते असे सर्व समाजगट वाङ्मयनिर्मिती करू लागले आहेत. कालपर्यंत जे मुके होते ते आता या क्षेत्रात क्रांतीची भाषा बोलू लागले आहेत. सर्व परंपरांच्या निष्ठांना प्रश्न विचारू लागले आहेत. विविध जाती, विविध प्रदेशांमध्ये विभागलेल्या जीवनाचे चित्रण आज मराठीमध्ये येऊ लागले आहेत. दलित मुस्लिम, आदिवासी, ग्रामीण, स्त्रिया इत्यादी घटक वाङ्मय निर्मिती करू लागले आहेत. क्रांतीची, विद्रोहाची, परिवर्तनाची वाट आज ते चालू लागले आहेत. हे सर्व वास्तव ज्यांना धोक्याचे वाटते, स्वतःच्या स्वार्थाच्या, प्रतिष्ठेच्या विरुद्ध वाटते त्या सर्वांची ओरड अशीच आहे की, मराठी भाषा अधोगतीला जात आहे, तिची अवस्था चांगली नाही. आपण तुलना करून विचार करू शकतो. आजच्यापेक्षा मराठीची अवस्था जर काल चांगली असेल, तर कालच्या वाङ्मयात आजच्या वाङ्मयापेक्षा संपूर्ण मानवी जीवन कवेत घेण्याचे सामर्थ्य अधिक असले पाहिजे, पण असे आढळून येत नाही. कुठल्याही भाषेचे स्थिती किंवा श्रीमंती त्या भाषेतील वाङ्मयावरून ठरविली जात असते. आणि मराठी भाषेतील वाङ्मयाची स्थिती कालच्यापेक्षा आज अधिक सामर्थ्यशाली आहे असेच चित्र आपल्याला दिसते. त्यामुळे मराठी भाषेची स्थिती वाईट आहे, हे मत खरे समजता येत नाही.

जागतिकीकरणामुळे मराठी भाषेच्या स्थितीगतीचा नव्हे तर तिच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. कारण जागतिक व्यवहाराची भाषा मराठी असणे शक्य नाही. ज्या भाषेत जागतिक व्यवहार होणार नाही ती भाषा

जगाच्या संदर्भात मृत ठरली जाईल. अशा मृत होणाऱ्या भाषांमध्ये मराठी भाषेचा क्रमांक कोणता? याची काळजी करणे गजरेचे आहे. यासाठी संशोधन होणे क्रमप्राप्त आहे.

## संशोधन :

संशोधनाला मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. निसर्गाचा मानवी दृष्टिक्षेपाच्या पलीकडे असणारा प्रदेश मानवी दृष्टिक्षेपात आणण्याला संशोधन म्हणावे लागते. असा प्रचंड प्रदेश असतो की, जो मानवी प्रज्ञेच्या स्पर्शाशिवाय राहून गेलेला असतो. अशा प्रदेशाला मानवी प्रज्ञेचा स्पर्श झाला की, मानवी ज्ञानात भर पडत असते. ज्या दृष्टिकोनातून आपण त्या प्रदेशाकडे पाहतो त्या दृष्टिकोनावरूनच त्या प्रदेशाला नाव पडत असते. एखाद्या प्रदेशाला आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले की, त्याचे अर्थशास्त्र होते. सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले की, त्याचे समाजशास्त्र होते. म्हणजे प्रदेशाला ज्या दृष्टिकोनातून पाहिले जाते त्या त्या प्रदेशाला त्या दृष्टिकोनाचे नाव प्राप्त होत असते. हा दृष्टिकोन मानवी जीवन केंद्रवर्ती ठेवूनच साकार होत असतो. म्हणून अशा संशोधनामुळे मानवी विचाराच्या आकलनाच्या कक्षा रुंदावत असतात. त्याचा फायदा संपूर्ण मानवी जीवनात होत असतो.

मराठी वाङ्मयाच्या संदर्भात आजपर्यंत जे संशोधन झाले, त्यात विद्यापीठांचा महत्त्वाचा सहभाग आहे. कारण हे संशोधन कुठल्याही पदवीची अपेक्षा न ठेवता मूलभूत संशोधन झाल्याचे आढळून आले आहे. संशोधनाची आजची स्थिती मात्र फारच विचित्र आहे. विद्यापीठाची आचार्य पदवी मिळण्याकरिता सादर झालेले प्रबंध आणि ज्या प्रबंधांना विद्यापीठाची आचार्य पदवी दिली असते ते सर्व प्रबंध (काही अपवाद वगळता) संशोधनकर्त्यांच्या घरी कपाटात पडून असतात. तरीही हा व्यवहार तेजीत आहे. याचे एक कारण म्हणजे वेळोवेळी आणि आश्चर्यकारकरीत्या बदलणारे शासनाचे नियम आणि अलीकडील 'नॅक'ची दादागिरी हे आहे. या दादागिरीसमोर शासनाने स्वत:चे डोके झुकविले आहे. महाविद्यालयाची गुणवत्ता वाढावी, शासनाने दिलेल्या अनुदानाचा योग्य वापर व्हावा. विद्यार्थ्यांना अधिक काही देण्याची क्षमता प्राध्यापकांमध्ये असावी हे सर्व मान्य असले तरी असा प्रश्न शिल्लक राहतोच की, काही तांत्रिक बाबींच्या संदर्भात यशस्वी होण्यासाठी ज्या विषयाचे आपले चिंतन नाही, ज्या विषयाचा मार्गदर्शकाला भेटेपर्यंत परिचय नव्हता, त्या विषयाचा प्रबंध पूर्ण करून विद्यापीठाला सादर करणे व आचार्य पदवी

मिळविणे आणि एकदा ही पदवी मिळाली की, संपले संशोधन! असे संशोधक आणि त्यांचे संशोधन संबंधित विषयाच्या अभ्यासकांपुढे नवीन विचार, नवा अभ्यास समोर आणावा अशी अपेक्षा असते, परंतु ती पूर्ण होण्याऐवजी त्या संशोधनावर प्रश्नचिन्ह लागते. यामुळे त्या विषयाला अधोगती प्राप्त होणे अपरिहार्य असते. आता मराठी भाषेव्यतिरिक्त जागतिक भाषांमध्ये आपल्या विषयाशी संबंधित असणाऱ्या संदर्भाचा, संशोधनाचा सखोल विचार करण्याची निकड निर्माण झाली आहे. कारण जागतिकीकरणामुळे ज्ञान हे एका विषयापुरते, भाषेपुरते किंवा एखाद्या देशापुरते मर्यादित राहिलेले नाही. जागतिकीकरणाने ज्ञानाचेही बाजारीकरण होत आहे. तरी या बाजारीकरणात टिकून राहणे ही काळाची गरज आहे. ज्ञानाच्या या व्यापारीकरणात आपले ज्ञान किती मूल्यवान आहे याची काळजी प्रत्येक संशोधकाला घेण्याची गरज आहे. आपल्या येथे आपल्या विषयाचे जे संशोधन होईल, असेच संशोधन आपल्या विषयाचे इतर देशांमध्येही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा, आपले संशोधन अत्यंत मूलगामी स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या युगात घरी बसून टेबलावर केलेल्या लिखाणाच्या मर्यादा आता ओलांडाव्या लागतील. नवीन तंज्ञत्रानाचा वापर भाषिक संशोधनामध्ये सुद्धा आता अपरिहार्य झालेला आहे. जागतिकीकरणात अनुभवाच्या विस्तारीकरणामुळे निर्माण होणाऱ्या साहित्यकृतींच्या संशोधनाचे नवेच आव्हान संशोधकांपुढे उभे राहणार आहे. या आव्हानाला पेलण्याची क्षमता मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यासक, अध्यापक आणि संशोधक म्हणून आपल्याला निर्माण करण्याची नितांत आवश्यकता आहे.

## जागतिकीकरण आणि अध्यापक :

कोणत्याही देशाचा अध्यापक त्या देशाचे होकायंत्र असतो. त्या देशाला दिशांचे संसूचन करण्याइतकी सुजाणता शिक्षकांजवळ असते. शिक्षक जसा देश घडवतो तसाच देश घडत असतो. म्हणून कोणत्याही देशाच्या जडण–घडण प्रक्रियेत शिक्षक हा घटक महत्त्वपूर्ण समजला जातो. शिक्षकाने सर्वांना शिकवावे व त्याच्या या शिक्षणातून दिशांचे भवितव्य साकार व्हावे. एवढी शक्ती शिक्षकांजवळ निश्चितच असते. कारण शिक्षक हा एकाच नव्हे संपूर्ण देशातील असंख्य पिढ्यांचा शिक्षक असतो. तो त्या देशाचा खरा शिल्पकार असतो. देशाच्या हृदयाचे प्रत्येक स्पंदन शिक्षकाच्या प्राणवायूने स्पंदित होत असते. त्यामुळे देशावर येणाऱ्या प्रत्येक वादळाचा परिचय प्रथमतः

शिक्षकांशी होत असतो. देशावरील संकटाच्या प्रत्येक लाटेला परतवून लावण्याचे सामर्थ्यं म्हणजे शिक्षक! कोणत्याही देशाच्या उंचीचे मोजमाप शिक्षकाच्या मापकाने करावे लागत असते. म्हणूनच देशाच्या प्रत्येक दुखऱ्या नाडीला सावरण्यात शिक्षकाची महत्त्वपूर्ण भूमिका असावी लागते. आज जागतिकीकरणाच्या संदर्भात शिक्षकाने नेमकेपणाने टोकदार भूमिका घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे. जागतिकीकरण ही एक अपरिहार्य बाब म्हणून या देशाला स्वीकारावी लागली. मात्र या स्वीकारामुळे या देशाचे देशपणच मोडीत निघते की काय अशी रास्त भीती आज निर्माण झाली आहे. अशावेळी शिक्षक या नात्याने देशाला सावरून धरण्यासाठी शिक्षकाने खंबीरपणे उभे राहणे आवश्यक आहे. या जागतिकीकरणाचा खरे तर प्राणपणाने विरोध करणे गरजेचे आहे, मात्र तिसऱ्या जगातील सर्व देशांजवळ विरोध करण्याइतकी कोणतीही साधन—सामग्री उपलब्ध नाही. त्यात साम्राज्यवादी मानसिकता असणारे या देशाचे राजकीय नेतृत्त्व देशाला जागतिकीकरणाच्या काळोखात बेमूर्वतपणे झोकून देत आहे. अशावेळी लोकशाही शासनप्रणालीमध्ये जनतेला राजकीय संदर्भात जागृत करणे हे आपले कर्तव्य आहे. जनतेच्या हिताच्या विरोधात शासन कुठलाही निर्णय घेण्याची हिंमत ठेवणार नाही. यासाठी जनतेचा दबाव गट तयार व्हावा असे प्रयत्न झाले पाहिजेत. जागतिकीकरणाच्या बाजूंनी सर्व राजकीय भांडवलदार मंडळी जनतेमध्ये परंपरावादी, कडव्या धर्मनिष्ठा निर्माण करीत असते. धर्म, वर्ण, जात इत्यादी शोषक मूल्यव्यवस्था न करण्यासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यव्यवस्थेचा पुरस्कार करणे आवश्यक असते. प्रत्येक क्षेत्रातील दहशतवाद संपविण्यासाठी लोकांच्या चळवळी, संघटना उभारण्याची गरज असते. कष्टकरी दलित, श्रमिक, आदिवासी, स्त्रीवर्ग यांच्या बाजूने उभे राहणे आणि त्यासाठी मार्क्स, आंबेडकरी तत्त्वज्ञानाला प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न करणे; अपरिहार्य असते. लोकशाही राष्ट्रांमध्ये राष्ट्राच्या घटनेच्या संरक्षणासाठी घटनेतील कल्याणकारी राज्याची कल्पना न होऊ नये म्हणून शासनावर जनतेचा दबाव आणणे आवश्यक असते. यासाठी 'नाहीरे' गटाला संघटित करणे, जागतिकीकरणाचा विरोध करण्यासाठी श्रमिक संघटना सशक्त करणे इत्यादी बाबींची गरज असते. सर्व शिक्षण क्षेत्रांविषयी जागृत राहून शिक्षणविषयक सर्व प्रकारची जबाबदारी पार पाडण्यास सरकारला भाग पाडणे, बिर्ला—अंबानी यांच्या अहवालाच्या विरोधात शिक्षक आणि विद्यार्थी यांना एकत्र यावे लागेल. परंपरावादी, जातीयवादी, कडव्या धर्मनिष्ठा जोपासणारे

राजकीय पक्ष सत्तेत येणार नाहीत. याची तयारी करून डाव्या पक्षांना मदत करणे व जागतिकीकरणाचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय पक्षांना विरोध करणे या व अशा स्वरूपाच्या जबाबदाऱ्या येथील नागरिकांवर अपरिहार्यपणे येऊन पडल्या आहेत.

हे नागरिक तयार करण्याचे काम खरे तर आपले शिक्षकांचे, प्राध्यापकांचे आहे. हे काम आजच्या आपल्या प्रस्थापित अभ्यासक्रमात वा अध्यापन पद्धतीत आपल्याला दिसून येत नाही. अशा वेळी सक्षम शिक्षक म्हणून काही गोष्टी आपल्याला कराव्याच लागतील. कारण आपल्याजवळ, आपल्यासमोर युवा पिढीची प्रचंड ऊर्जा बसलेली असते. या ऊर्जेला क्रियान्वित करण्यासाठी आवश्यक ते खाद्य आपल्याला पुरवावे लागेल. प्रत्येक दिवसाला होणाऱ्या सर्व घटना बारिक–सारिक तपशिलासह वास्तव म्हणून या विद्यार्थ्यांपुढे आपल्याला मांडाव्याच लागतील. आणि होणाऱ्या परिणामांची जाणीवही करून द्यावी लागेल. या जाणिवेबरोबरच आपल्या अस्तित्वाचा बचाव करण्याचे कोणते उपक्रम आपल्याला राबविता येतील, याचे दिशानिर्देशन आपल्याला करावे लागेल. अशा वेळी या कामी लागायचे म्हणजे एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात घेउन चालले पाहिजे विद्यापीठ ही स्वायत्त संस्था आहे. या संस्थेचा अभ्यासक्रम मांडण्याचा विद्यापीठांना स्वतंत्र अधिकार बहाल केला आहे. अभ्यासक्रम कसा असावा याचे दिशानिर्देशन शासन पत्रक काढून अलीकडे करीत आहे. या दिशानिर्देशनाला आपण लक्ष घालून आपला अभ्यासक्रम स्वत: बनवू शकतो. त्यांचा विद्यार्थ्यांमध्ये प्रसार करू शकतो. आपल्या निवडून दिलेल्या अभ्यासमंडळापुढे या विषयाच्या अनुरोधाने सूचना करू शकतो; आणि असे अभ्यासक्रम पाठ्यक्रमात लावू शकतो.

जागतिकीकरणात टिकायचे असेल तर नवी तंत्रज्ञाने आत्मसात करावीच लागतील. संगणक, इंटरनेट, अनुवादविद्या यांचा आपणासही अभ्यास करावा लागेल हे तंत्र प्रत्यक्षात हाताळावे लागेल. आणि विद्यार्थ्यांना हे तंत्र अवगत करून द्यावेच लागेल. मराठी भाषा या विषयात या तंत्राची पूर्णपणे मांडणी करावी लागेल. शेवटी आपला शब्दांशीच व्यवहार आहे. आपल्या शब्दांचा जागतिक पातळीवरचा गौरव व्हावा, त्यांचा दबदबा निर्माण व्हावा अशी परिस्थिती निर्माण करण्यास आपणास हातभार लावावाच लागेल.

आपण माझे जागतिकीकरणाबद्दलचे विचार शांतपणे ऐकून घेतले याबद्दल मी आपला आभारी आहे.

या विषयाच्या अनुरोधाने माझ्या आकलनाच्या मर्यादा लक्षात घेऊन

मी माझे चिंतन आपल्यासमोर ठेवले. याचे सर्व श्रेय माझे मित्र प्रा.डॉ.सुभाष खंडारे यांचे आहे. आज मला याचा आनंद आहे की, डॉ. यशवंत मनोहरांसारखे शिक्षक मला मिळाले. प्रा.डॉ. सुभाष खंडारे, प्रा. सत्तेश्वर मोरे, प्रा.ना.ह. वानखडे यांच्यासारखे मित्र मिळाले आणि त्यामुळेच विद्यापीठातील कामकाजांवर, विद्यापीठाच्या अभ्यासक्रमावर मला माझे लक्ष केंद्रित करता आले. यांच्या सहवासात मला माझ्या विचारांची भूमिका अधिक टोकदार करता आली. त्यांच्या ऋणात, मित्रप्रेमात मी स्वत:ला धन्य समजत आहे.

या परिषदेच्या आयोजनात ज्यांचा मोठा वाटा आहे ते स्वागताध्यक्ष मा.वसंतरावजी पुरके, मंत्री, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री यवतमाळ जिल्हा यांचा मी व्यक्तिश: ऋणी आहे. या महाविद्यालयाची आयोजन समिती आणि माझे सारे सहकारी मित्र यांचेही मी आभार मानतो. या कार्यक्रमाला बीजभाषक व उद्‍घाटक म्हणून डॉ. यशवंत मनोहर सरांनी आपली उपस्थिती दर्शविली गुरूपुढे शिष्याचा शोधनिबंध ही परीक्षाच असते. आज ही परीक्षा मला देता आली त्याबद्दलही मला आनंद आहे. मी सरांचे आभार मानतो आणि नव्या वर्षाच्या शुभेच्छा देऊन आपली रजा घेतो.

❖❖❖

# १९ वे अधिवेशन
# जनता कला आणि वाणिज्य महाविद्यालय
# मलकापूर, जि.बुलडाणा
# २२-२३ जानेवारी २००५
# अधिवेशनाध्यक्ष : प्रा. डॉ. र. का. कोलते

अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष, या अधिवेशनाचे उद्‌घाटक प्रा.सदानंद देशमुख, स्वागताध्यक्ष डॉ. अरविंद कोलते, कार्याध्यक्ष ना.सु. खर्चे, अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील प्राध्यापक बंधू भगिनी, उपस्थित सज्जन, या महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक कर्मचारी, सर्व बंधूनो....

नागपूर विद्यापीठ, नागपूर प्राध्यापक परिषदेचे पहिलं अधिवेशन वणीला झालं, त्यावेळी मी तिथे उपस्थित होतो. प्राचार्य राम शेवाळकर, डॉ. भाऊ मांडवकर, डॉ. गोविंद देशपांडे यांनी या परिषदेचा पाया रचला. त्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते डॉ.मा.गो. देशमुख, उद्‌घाटक डॉ. भाऊसाहेब कोलते आणि प्रमुख अतिथी प्रा.वा.ल. कुळकर्णी. मराठी अध्यापनाच्या आणि साहित्याच्या क्षेत्रातील ही श्रेष्ठ दर्जाची मंडळी त्यानंतरही प्राचार्य राम डोके, भाऊ भालेराव, डॉ.द.भि., डॉ. वाकोडे, डॉ. वाघ इत्यादी महाराष्ट्रात आपल्या कर्तृत्वानं गाजलेल्या मंडळींनी हे पद भूषविलं.

या पार्श्वभूमीवर या क्षेत्रातला मी एक सामान्य माणूस. मला आपण हा सन्मान दिला, मला संकोच वाटतो. डॉ. भाऊ मांडवकरांना मी याबाबत नम्र नकार दिला होता. दोन वर्षापूर्वी डॉ. चवरे यांनीही वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळच्या अधिवेशनाचं मी अध्यक्ष व्हावं, असा मला आग्रह केला होता. त्याहीवेळी मी नम्रपणे ते अमान्य केलं होतं. पण यावर्षी 'आणखी किती दिवस मागे राहाता?' असा त्यांनी प्रश्न करून मला आग्रहच केला. भाऊ मांडवकर जेव्हा माझ्याशी बोलले आणि मलकापूरच्या जनता महाविद्यालयात हे अधिवेशन भरत आहे, तुम्ही अध्यक्ष व्हावं, झालं पाहिजे असा आदेश झाला, त्यावेळी मी मान्य केलं. ह्यावेळी मला यादृष्टीने संकोच वाटत होता—मलकापूर व माझ्या जन्मभूमीचा परिसर, महाविद्यालयही ज्याच्या निर्मितीचे प्रमुख प्रेरणास्थान डॉ.भाऊसाहेब कोलते होते, आज अध्यक्षही डॉ.डी. एन. कोलते आणि सचिवही डॉ. अरविंद कोलते.

तेव्हा रमाकांत कोलतेला एवढ्यामुळेच अध्यक्षपद मिळालं असलं पाहिजे, एरवी हे पद भूषविण्यासारखं यांच्याजवळ काय आहे? असं वाटणं कुणालाही स्वाभाविक.

असं असूनही मी हे पद स्वीकारलं. या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनीही निमंत्रण दिलं. एवढं झाल्यावर नकार देणे औद्धत्याचं वाटणं शक्य होतं. म्हणूनही स्वीकारलं नम्रपणे. हे सारं आपण प्रेमापोटी माझा सन्मान केला, मी आपला अत्यंत आभारी आहे!

या महाविद्यालयाचं रूप, डॉ. अरविंद कोलते यांच्या नेतृत्वात देखणं झालं, याचाही मला अभिमान वाटतो. त्यांचे व्यवस्थापक मंडळातील सहकारी आणि तरुण प्राचार्य यांचं मी अभिनंदन करतो.

डॉ. राजकुमार खर्चे हे माझे विद्यार्थी, डॉ. शोभा नाफडे यांनी या अधिवेशनाची कल्पना, विचार मांडला असला पाहिजे. या आयोजनासाठी त्यांनी त्यांच्या प्राध्यापक सहकाऱ्यांना सोबत घेऊन बरेच परिश्रम घेतले असले पाहिजे. त्यांनाही मी धन्यवाद देतो!

'कर्म शृंघारोनी करावे' तसं सारं रमणीय, प्रसन्न असं हे वातावरण. आनंद होतो! या महाविद्यायाच्या या परिसरात याच सभामंचावर दोनदा मी कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. एका प्रसंगाची मला प्रकर्षानं आठवण होते.

'वैदर्भीय बहिणाबाई' म्हणून वृत्तपत्रांनी गौरविलेल्या रुक्मिणीबाई पाटील 'रुक्मिणीगान' या काव्यसंग्रहातील कवितेच्या निर्मात्या कवयित्री, यांच्या पुस्तकाचे मी संपादन केलं. त्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला कविवर्य वसंत बापट आणि समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर आले होते. डॉ. भाऊसाहेब कोलते हे आवर्जून उपस्थित होते. बॅ. पाटील हेही मंचावर होते. समारंभ थाटात संपन्न झाला होता.

माझी आई, सुशीला काकू श्रोत्यांमध्ये बसल्या होत्या. मंचावरील थोरामोठ्यांचा हार, तुरे, शाल, श्रीफळांनी सन्मान झाला होता. अर्थातच ते उचित होतं. समारंभानंतर आई आया बहिणींमध्ये बोलताना म्हणाली, एवढे हार, तुरे झाले. माह्या लेकानं एवढं पुस्तक केलं, भाऊले कोणी एक हारही देला नाही. मला काहीच वाटलं नव्हतं. मी असं कोणतं मोठं काम केलं होतं! पण तिला मात्र ते राहून राहून वाटलं होतं.

आज या मंचावर हारतुऱ्यांनी माझा सन्मान झाला. आयुष्यात मला अनेकदा हार मिळाले. मात्र सेवानिवृत्तीच्या वेळी माझ्या विद्यार्थ्यांनी जो माझा

सन्मान केला तो क्षण केवळ अविस्मरणीय! समोर टेबलवर टवटवीत गुलाब फुलांची रास पडली होती. भारावून जाऊन मी हलकेच त्यावर हात ठेवून असताना पाहून माझा एक विद्यार्थी मित्र प्रा.हेमंत खडके म्हणाला होता,

'बरे झाले सर
तुम्हीच फुलांवर ठेवला हात
फुलांनीच जपावं फुलांना
असं हृदयाच्या आत'

माझ्या आयुष्याची मराठीचा प्राध्यापक केवढी कदर झाली! सार्थकी झाल्यासारखं वाटलं आयुष्य. आज मित्रहो, आज आपणही माझा मोठाच गौरव केला. आयुष्यातला असा एक क्षण नंतरच्या क्षणांना चांगलं जगायला बळ देतो. आपण माझ्या पुढील आयुष्यासाठी बळ दिलं. त्याचं मी चीज करण्याचा प्रयत्न करीन. मित्रहो, आपण सन्मान दिलेल्या या महत्त्वाच्या पदावरून मी आपणाला काय सांगू? अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचं हे अधिवेशन कशासाठी दरवर्षी नियमानं हे अधिवेशन भरवायचं? मला वाटते या निमित्तानं एक मराठीचा प्राध्यापक म्हणून आपल्याच जीवनकार्याचं अंतर्मुख होऊन निरीक्षण—परीक्षण करावं. या कार्याच्या विकसनासाठी परस्पर संवाद करावा, पुढच्या वाटचालीचा शोध घ्यावा, हा या अधिवेशनाचा उद्देश असला पाहिजे.

'आम्हास आम्ही पुन्हा पाहावे
काढून चष्मा डोळ्यावरचा'

स्वत:ला पुन्हा पुन्हा पारखून घेणे, हा या अधिवेशनाचा उद्देश आहे. भाषा हा विषय माणूस घडविण्याचं, त्याला सुसंस्कारी करण्याचं, विविधांगानं त्याला ज्ञानसंपन्न करण्याच, लेखन, आत्माविष्कार, आत्मप्रकटीकरण करण्याचं सामर्थ्य वाढविण्याचं एक अत्यंत महत्त्वाच माध्यम आहे. या दृष्टीने विचार केला तर भाषा या विषयाचं आणि या विषयाचे आपण प्राध्यापक म्हणून आपल्या भूमिकेचं महत्त्व स्वत:ला कळू शकतं. अर्थात् सामाजिक संदर्भात या भूमिकेचं महत्त्व आहे, याचंही आम्हाला विशेष भान असण्याची गरज आहे. हे जर आम्ही मान्य केलं तर भाषेचा प्राध्यापक म्हणून माझं व्यक्तिमत्त्व समृद्ध संपन्न असणं, तसं ते करत राहणंही आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना, समाजाला काही भरभरून द्यायचं तर हे आम्हाला लक्षात घ्यावं लागणार आहे.

'भिजून भिजून वाळा सुगंधीत व्हावा
तसं देऊन देऊन प्राध्यापकानं श्रीमंत व्हावं'

आणि विद्यार्थ्यांची हीच अपेक्षा असते, नाही काय? आम्हीही असंच श्रीमंत होण्याची अपेक्षा करू नये काय? आज आपण रडगाणं गात राहू की विद्यार्थीच उदासीन झाले आहेत. मात्र यात सत्यांश कमी आहे. असलाच तर आम्ही आणि संबंधितांनीही त्यातून मार्ग काढला पाहिजे. आणि सर्वच विद्यार्थ्यांबाबत असं कसं म्हणता येईल? त्यांच्या अपेक्षा आपल्याकडून पूर्ण होणे आवश्यक आहे. रविंद्रनाथ टागोरांनी म्हटलं आहे,

"सूर्यानं जसा रोज आपल्याला प्रकाश दिलाच पाहिजे अशी आपली अपेक्षा असते तशीच आपल्या शिक्षकांनी रोज काही आनंददायक असं आपल्याला सांगितले पाहिजे अशी मुलांची इच्छा असते."

जाणीवपूर्वक असा प्रयत्न आपण कितपत करतो? आणि हे करीत असतानाही 'मातृमुखेण शिक्षण' असं मातृहृदयाने आपण दिलं पाहिजे. साने गुरुजींनी म्हटलं आहे, जे जगाला द्याल ते फुकट नाही जाणार आणि हृदय ओतून ओतून जे द्याल त्याची तर किंमतच नाही!"

डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांनी म्हटलं आहे, 'शिक्षण हे जीवनाचंही जीवन आहे.' जीवनाला जीवन देणं हे पुण्याचं काम, ही पवित्र भूमिका तुमची आमची आहे.

'तेचि माणुसकीचे कर्म<br>
जे दुसऱ्यासाठी केले श्रम'

राष्ट्रसंतांची नावं आमच्या विद्यापीठांना देत असताना याचं स्मरण आम्हाला ठेवावं लागणार आहे.

मुख्य मुद्दा असा मित्रहो, मराठी विषयाचा शिक्षक म्हणून विद्यार्थी आणि एकंदरीतच समाजाप्रतीच्या कार्याची कळकळ आमच्या मनात खोलवर असली पाहिजे. ही कळकळ असली तर आम्हाला आमच्या भूमिकेचं निश्चितच भूषण वाटेल आणि आम्ही आमच्या कार्याप्रती वाहून घेऊ.

जमिनीच्या आतला ओलावा संपत आला की तिच्यावरची हिरवळ सुकून जाते तसं कार्याविषयीच्या सदभावनेचंच आमच्या दुर्भीक्ष असेल तर आम्ही काय कार्य करू शकणार?

आठवड्याचे २० तास आणि विद्यापीठाने नेमलेल्या अभ्यासक्रमातील पाठ संपवणे एवढचं कार्य आपलं निश्चितच नाही.

आपण भाषेचं अध्यापन करीत असलो तरी यातच जीवनाच्या विविधांगाचं, विविध विषयाचं समावेशन यात केलेलं असतं आणि ते विद्यार्थ्यांच्या जीवनसमृद्धीसाठी, ज्ञानसमृद्धीसाठी आवश्यकच असतं. हे लक्षात

घेऊन कार्य करायचं तर विविध विषयांच्या वाचनाची, अभ्यासाची आम्हालाच आवश्यकता आहे.

कादंबरीकार सॉमरसेट मॉमला एकानं प्रश्न केला, चांगला लेखक कुणाला होता येईल? त्यानं म्हटलं, उत्तम लेखक होण्यासाठी उत्तम वाचक असलं पाहिजे. त्याचं हेच उत्तर आपल्यालाही लागू होणार नाही काय ?

आता हे आम्ही आम्हाला तपासून पाहू की आमचं वाचन किती? महाविद्यालयातले ग्रंथालय आपल्यासाठी खुले असले तरी आम्ही वर्षाकाठी स्वतःची म्हणून महत्त्वाची किती पुस्तकं खरेदी करतो? आणि नवीन नवीन उपयुक्त असं मुलांना किती सांगतो? पंच्याहत्तरीत असणाऱ्या गुरुवर्य डॉ. पठाणांना गेल्या वर्षात मी तीन चारदा भेटलो. त्यांना वाचत असताना किंवा लिहीत असतानाच प्रत्येकदा मी पाहिलं. गुरुवर्य वालंना मी एम.ए.च्या प्रवेशासाठी भेटायला गेलो. डॉ.भा.ल. त्यावेळी औरंगाबादला होते. त्यांच्या सूचनेवरून मी भल्या पहाटे त्यांच्याकडे गेलो. ते वाचनात दंग होते. त्यानंतरही दोन वर्ष मी अनुभवलं, जे विद्यापीठात मराठी विभागात, सकाळी ११ ला यायचे. एखादाच तास त्यांना असायचा. पण दिवसभर ते आपल्या कक्षात वाचन लेखन करीत बसलेले असत. भाऊसाहेब कोलत्यांचं तर 'रिकामा जाऊ नेदी क्षण' असं जीवन होतं.

पुस्तकावर, ग्रंथावर त्यांचं किती प्रेम होते हे मी जवळून अनुभवलं

'वऱ्हाडचा इतिहास' हे पुस्तक दुर्मीळ. एकदा डॉ. मेनकुदळे या मित्राला त्यातून काही संदर्भ घ्यायचे होते. ते पुस्तक कुठेच मिळेना, आम्ही भाऊसाहेबांकडे गेलो, त्यांना विनंती केली. ते उठले. कपाटाजवळ गेले. एक नजर फिरवली आणि हात घालून नेमंक तेच पुस्तक काढलं.

मग ते कपाळी लावून त्याला नमस्कार केला! म्हणाले 'रमाकांत खामगावला शाळेत असताना काही दिवस सायंकाळचं जेवण सोडून देऊन, वाचविलेल्या पैशातून हे पुस्तक मी घेतलं आहे. पाहा, हे मी तुम्हाला देणार नाही. हवं तर, पाहिजे ती पानं झेरॉक्स करून घ्या. पुन्हा त्यांनी त्या ग्रंथाला कपाळी लावलं!

मला स्वतःला लाज वाटते. एवढं ग्रंथावर प्रेम मला करता आलं नाही! आपण नव्या उमेदीचे प्राध्यापक. ते करू शकाल–केलं पाहिजे.

मोठ्या ध्येयाला बांधून घेतलं की, कार्याच्या वाटेनं झेप घेत माणूसही मोठा होतो. विद्यार्थ्यांना आपल्या विषयाची गोडी लावावी, त्यामधील सौंदर्य, त्यातील आशयघनता समजून घेता यावी यासाठी आपण अनेक उपक्रम करू

शकतो. 'रुचिरा' वाचून चांगला स्वयंपाक करता येईलच असं नाही. स्वत:चे प्रयोग महत्त्वाचे असतात. मी भाषेचा प्राध्यापक म्हणून काही उपक्रम केले आहेत. आपणही ते करीत असाल. माझे अनुभव मला सांगायला पाहिजेत. शैक्षणिक सत्राच्या आरंभी, वर्गभर विद्यार्थ्यांच्या जवळ जाऊन मी त्याच्या घरादारापासून गावापर्यंतचा परिचय करून घेत असे. यात आरंभीचे ३/४ तास जात असत. पण ते मला कधीही व्यर्थ वाटले नाही. मी विद्यार्थ्यांची मी नेहमी हजेरी घेत असे पण ती त्याचं नाव उच्चारून, सोबतच त्याच्याकडे पाहून. त्यामुळे समोरच्या रांगेतल्या विद्यार्थ्यांपासून मागच्या रांगेतील मुलांची नावासह मला ओळख असे. 'सर आपल्याला नावाने ओळखतात' ही भावना त्यांच्यात आत्मीयता निर्माण करून जाई. एखादे दिवशी कोणत्याही विषयावर, जे मनाला वाटेल ते ५/१० ओळी कागदावर मला लिहून द्या, असं सांगून त्यांचे लिहिलेले कागद घरी आणायचा. ४/८ दिवसात ते वाचून, लेखनातल्या चुका त्यांच्या मी निदर्शनास आणून देई व शुद्धलेखनाच्या नियमांचे तास घेई. कवितेचा पाठ घेताना त्यातला अर्थ आशय केवळ समजून सांगत नसे, शाळेतल्या पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना उभं करून तो त्यांना सांगायला लावत असे. गद्याच्या पाठावरही प्रश्नोत्तरे विचारी, ह्यामुळे विद्यार्थी सजग राहायचे नि वर्गात चैतन्य राही. एखादे दिवशी वर्गापुरतंच कविसंमेलन आयोजित करी. संकोचणाऱ्या मुलामुलींना आग्रहाने उभे करी. एकदा मुलं खुलली की वर्गात आनंदाला बहार, पहिल्या सत्रात, कधी दुसऱ्या सत्रात—

एकेका वर्गाला घेऊन जवळपास सहलीला आम्ही जायचो. सहलीतही कविता, गाणी, विनोदी चुटके असे कार्यक्रम हे सर्व उपक्रम आत्मीयता वाढविणारे, प्रेम वाढविणारे यातून एकदा विद्यार्थ्यांचा आणि आपला प्राध्यापकांचा प्रेमसंबंध निर्माण झाला की, वर्गातला अभ्यासक्रम, पाठ शिकवणंही आनंदाचा भाग! भाषा विषयाच्या प्राध्यापकाला विद्यार्थ्यांना दिशा देणारे—विचार देणारे आदर्श, मूल्ये सांगता येतील अशी स्थळं अनेकच, त्याचा योग्य तो उपयोग आपण करू शकतो, मात्र त्यासाठी उद्याचे तास घेण्यापूर्वी घरीच चिंतन करण्याची गरज असते. धडा, कविता प्रत्यही तीच असली तरी नवे रंग त्यात भरता येतात. हे सारे मनाला इच्छाशक्ती असली तर! 'रवींद्रनाथ टागोर हा महाकवी हजारो लोकांच्या सभेत बोलणारा, शिशू वर्गात शिकवायला जाण्यापूर्वी टिपण काढून तयारी करायचं!' ही गोष्ट आम्ही चिंतन करण्यासारखी आहे. आरंभीच्या १० वर्षात महाविद्यालयातील स्नेहसंमेलनात आम्ही ३/३ अंकी नाटकं सादर करायचो. महिना महिना अभिनयाचा सराव

चालायचा. मुलांसोबत सहभागी व्हायचो. वार्षिकांक भित्तिपत्रके हेही उपक्रम मन ओतून होत असत. दरवर्षी नव्या वर्षाचा स्वागत समारंभ आणि परीक्षेपूर्वीचा निरोप समारंभ हेही आत्मीयता वृद्धिंगत करणारे उपक्रम किमान १० वर्षे तरी मी मुला मुलींना सोबत घेऊन अ.भा.साहित्य संमेलनाचा आनंद घेतला. ती केवळ मौज नसे. परिसंवादाच्या नोट्स विद्यार्थी घेत असत. जाताना महाविद्यालयाच्या नावाचा फलक, त्यावर 'यात्रा साहित्य पंढरीची' असे नामकरण आणि सोबत ढोलक, झांज, मग बहिणाबाईच्या, विठ्ठल वाघांच्या कविता गाऊन घेर धरणे, नाचणे, त्यात एवढी ताकद की, रेल्वे गाडीतले इतर संमेलनार्थीही घेर धरीत नाचू लागत. संमेलन परिसरात विविध विषयांवरची पथनाट्ये सादर होत. गर्दी आमच्याकडेही अशी मौज, यातूनच शिकणे! मराठी माणसाला महाराष्ट्र निर्माण करणाऱ्या शिवाजीला समजून घेता यावं तर राजगड, रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग विद्यार्थ्यांनी पहायला हवं. मराठी साहित्य चांगल्याप्रकारे आकलन करायचं तर साहित्याच्या विद्यार्थ्यांनी देहू, आळंदी, महाडचे चवदार पाण्याचे तळे, गोविंदप्रभू, ऋद्धिपूर, तुकडोजींचं मोझरी आणि गाडगेबाबांनी निर्माण केलेले घाट, धर्मशाळा हे दाखवायलां हवं. हे आणि असे अनेक उपक्रम मराठीच्या प्राध्यापकाला आनंद घेत देत राबविता येतात. या साऱ्यांचाच एक चांगला संस्कार असतो. भाषाविषयाची गोडी, ज्ञानाची गोडी, जिज्ञासावृत्ती, ध्येय, जिद्द, निर्धार, निग्रह प्रेरणा निर्माण होण्यासाठी ते पोषक ठरतात. माणूस घडविण्याची ही प्रक्रिया आपण करू शकतो. आजच्या भूमिकेला सुसंगत अशी लहान लहान साहित्य संमेलने, व्याख्यानमाला आपण आयोजित करू शकतो. हे कसं करायचं? कसं शक्य आहे? हे प्रश्न व्यर्थ ठरू शकतात. मनात असलं की हातपाय चालू लागतात. चालायला लागलं की मदतीचे हात पुढे येऊ शकतात.

मंगेश पाडगावकरांनी म्हटलं आहे –

'गरूडाहून झेपावणारा प्रत्येकात प्राण आहे. विश्वास ठेवा, तुमच्या पायात न संपणारं त्राण आहे.' चालून पाहूया.

मित्रहो!

शिकविताना वाचून काही नोंदी, सोबत घेतल्याशिवाय मी वर्गात गेलो नाही, आणि वर्गातून निघताना प्रसन्नता घेऊन बाहेर पडलो, कधी कामचुकारपणा झालाच नाही असंही नाही. पण त्या दिवशी मला भाकरी गोड लागली नाही. भाकरी गोड लागायची, तर अगोदर कामाची गोडी असावी लागते.

वाङ्मयाच्या तासांमध्ये कवितेच्या निमित्तानं, कथानिर्मितीच्या निमित्तानं – निर्मितीची प्रक्रिया सांगताना, साहित्यशास्त्राच्या कसोट्या परीक्षेसाठी मी सांगितल्या पण साहित्याची बीजं, स्वतःलाच जगताना वेचता येतात, हे मी स्वतःच्या अनुभवातून सांगितलं, तेव्हा ते विद्यार्थ्यांना अधिक भावलं. जगण्याची उमेद या विश्वातूनच कशी मिळते, ती घेता येते हे सांगताना मी म्हटलं –

'निळ्या निळ्या नभाकडे
नेत्र लावावेत निरंतर
कुणी सूर्य, कुणी चंद्र
ध्रुव कुणी, घन तमी शुक्र
किमान अंधाऱ्या वाटेवर
दिलासा देणारा लहानसा तारा
व्हावं या भूमीवर!'

निसर्गातलं, हे, डोळ्याला खुणावणारं दृश्य भावस्पर्शी निर्मितीचं बीज होऊ शकतं, हे सांगितलं की, असचं काही यापेक्षाही अधिक उत्तम असं आपल्यालाही लिहिता येऊ शकतं, हा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये भरू शकतो.

एक लहानसा प्रसंग कथेचं बीज कसं होऊ शकतो, हे सांगतांना आकोटच्या वास्तव्यातील एक हृदयाला हात घालणारा प्रसंग मी सांगितला. पायजाम्याला गोठ शिवायची असते. फॅशनेबल मॉडर्न टेलर्स – स्टायलोत हे काम कसं शक्य? टपरीतला टेलर शोधला. त्याला पायजामा दिला. त्यानं गोठ शिवून दिली. किती घेईल? फार तर ५/१० रु.ची नोट दिली. तो म्हणाला, साहेब दोनच रुपये द्या! १० रुपये हातात देऊनही त्यानं परत केले. पुढे म्हणाला साहेब, अजून बोहनीच झाली नाही!

दुपारी दीड दोनची वेळ होती. बोहनी झाली असती तर कदाचित दोन रुपयेही त्यानं मागितले नसते! अशी माणुसकी.

धनदौलतीसाठी वखवखलेल्या या जगात अशी मनं.

याचंच रूपांतर एका प्रभावी कथेत होऊ शकतं.

असं मराठी भाषेचा एक प्राध्यापक म्हणून काम करत आलो. आनंद घेतला, असा आनंद आपणही घेत असाल. मित्रहो! तंत्रज्ञानाच्या विकासातून आज सायबर विश्वाची निर्मिती झाली आहे. हेही एक अध्यापन – शिक्षणाचे साधनच आहे. पण तरीही ते शिक्षकाच्या कार्याला पर्याय ठरू शकत नाही. शिक्षक हा विद्यार्थ्यात भोवतालचे पाहण्याची दृष्टी निर्माण करू शकतो. शिक्षकाचा 'सजीव स्पर्श' ही मोठीच शक्ती आहे. डॉ. माशेलकरांना त्यांच्या

सरांनी कॉन्व्हेक्स लेंन्सची फोकल लेंग्थ समजावून सांगताना लेन्स कागदावर धरून समजावून सांगितलच. पण सोबतच लेन्स कागदावर धरून ठेवत, कागद जळाल्यावर म्हणाले, 'माशेलकर सर्व ऊर्जा इतरत्र वाया न घालवता एका लक्ष्यावर केंद्रित केलीस तर जगातील कोणतीही गो तू जाळू शकशील'

यातून जीवनाचं एक तत्त्वज्ञान त्यांना मिळालं 'केंद्रित करा आणि मिळवा'

मातृभाषेचा शिक्षक तर आपल्या विद्यार्थ्यांमध्ये कितीतरी प्राण भरू शकतो. त्याचा 'सजीव स्पर्श' याची किमया काही आगळी वेगळीच आहे. सायबर विश्व जसं ताकदीनं परिवर्तन करू शकत नाही, आमच्यात प्राण भरू शकत नाही, तसंच आमच मूर्दाडपण ते दूर करू शकणार नाही. आम्हाला काळानुसार समोर येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भावभावनांचा, बदलत्या विश्वाचा वेध घेत त्यांच्याशी संवाद साधता आला पाहिजे.

यासाठी निवृत्तीच्या वेळेपर्यंत काय, नंतरही 'जुनं' होऊन जमणार नाही. नित्यनूतनता हे जसं वाङ्मयाचं एक वैशिष्ट्य आहे, तसंच ते विशेषत्वानं भाषेच्या प्राध्यापकांचही आहे. यासाठी

'सरोवर नही बनना चाहिए,
सरोवर तो सुखता है किचड बन जाता है,
सरिता बनना चाहिए, वह बहती है ।
जीवन सुंदर बनाती है ।'

मित्रहो! भाषाविषयाचं – अर्थातंच मराठी विषयाचं विशेष चांगल्याप्रकारे अध्ययन–अध्यापन व्हायचं असेल तर विद्यापीठाच्या परीक्षांमधील गुणांकनासोबतच गुणांकनही लक्षात घेतले पाहिजे. तशी व्यवस्था विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात निर्माण केली पाहिजे. २० टक्के गुण विद्यार्थ्यांकडून त्या त्या स्तराला उचित असे लहान लहान निबंध लिहून घेणे, जसे गद्य पाठांत १–२ आणि कविता पाठांवर एक, दोन निबंध लिहून घेणे, पदव्युत्तर विभागात एम.ए.भाग दोनला लघुशोध निबंध हा पर्याय एका पेपरसाठी ठेवला आहे. त्यासाठी प्रथम वर्षाला ५५ टक्के गुण असावे ही अट का असावी? ती असू नये, हा विचार स्वीकारल्यास विद्यार्थी अधिक प्रमाणात अभ्यासात–वाचनात राहू शकेल. या संदर्भात अधिक तपशीलानं विविध बाजूंचा विचार अभ्यासमंडळ करेल, करावा असे मला वाटते.

आचार्य पदवीसाठीही नव्याने ठेवलेल्या अटी अन्यायकारक आहेत. पुनर्विचार झाला पाहिजे. मित्रहो! आपल्या भाषेची समृद्धी आणि मराठी

माणसाचीही समृद्धी याचा विचार साकल्याने करायला आपल्याला वेळचं नाही, ही खेदाची बाब आहे.

तुमच्या माझ्यावर, एकंदरीतच जनमानसावर इंग्रजी भाषेने भुरळ घातलेली आहे. आम्ही मृगजळामागे धावत सुटलो आहे. कितपत तहान भागते आहे? भागणार आहे? याचा विचार करतो काय? आम्ही ज्ञानेश्वर—नामदेवादी संत आणि स्वामी चक्रधरांची पूजा करू पण त्यांनी भाषेविषयी दिलेला विश्वास आणि त्यांनी दिलेला विचार मात्र पार विसरून गेलो आहोत.

'मऱ्हाटीयेच्या नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी
घेणे देणे सुखाचे वेऱ्ही । जगा हो देई'

हे आम्ही विसरलो नाही का?

—'नको गा केशवदेया माझीये स्वामीचा सामान्य परिवारू नागवैल की'

कशासाठी त्यांनी हा आग्रह धरला? ज्ञानेश्वरांना संस्कृत येत नव्हते? चक्रधरांना, नागदेवाचार्यांना ते येत नव्हते? प्रश्न सामान्य माणसापर्यंत ज्ञान पोचविण्याचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी का मराठीतून राज्यव्यवहार कोश करवून घेतला? महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, "मराठी भाषेचा तुमचा आमचा अभिमान जर खऱ्या अर्थाने पहिल्या प्रतीचा राहणार असेल तर विज्ञानाच्या क्षेत्रात मूलभूत संशोधनाचे काम मराठी भाषेमध्येही झाले पाहिजे." हाच सूर आयुष्यभर आग्रहाने आळविणारे डॉ. भाऊसाहेब वि.भि. कोलते यांनी यासाठीच सर्व विद्याशाखातील सर्व विषयात, सर्व स्तरावर मराठी माध्यमातून शिक्षण देणारे व संशोधन करणारे एक स्वतंत्र मराठी विद्यापीठ स्थापन झाले पाहिजे, अशी मागणी केली. वणी येथे डॉ. गोविंद देशपांडे यांनीही हा मुद्दा उपस्थित केला. आज मराठी विद्यापीठाची स्थापना करून ५—५/१०—१० वर्षाच्या योजना केल्या तर जगातलं विविध विषयाचं ज्ञान मराठीत अनुवाद करून आणता येणे काय कठीण आहे? मनात कळकळ, प्रेम पाहिजे. आपल्या भाषेची अस्मिता असली पाहिजे. तेव्हा स्वतंत्र मराठी विद्यापीठाची स्थापना झाली पाहिजे आणि जगातलं विविध विषयांचं ज्ञान मराठी मातृभाषेत आणण्याचं आणि सर्व स्तरावरील शिक्षण मराठीतून देण्याचं व्रत स्वीकारलं पाहिजे. कुसुमाग्रजांनी अतीव कळकळीने म्हटले—

'परभाषेतही व्हा पारंगत, ज्ञानसाधना करा तरी
माय मराठी मरते इकडे । परकीचे पद चेपू नका'

आणि हे का ? तर

'भाषा मरता देशही मरतो, संस्कृतीचा दिवा विझे
गुलाम भाषिक होऊन आमच्या प्रगतीचे शिर कापू नका'

कुसुमाग्रजांनाही आम्ही डोक्यावर घेऊ, विचार मात्र डोक्यात घेणार नाही! इतर भाषांचा रोष, द्वेष असण्याचं कारण नाही. पण

'उंच हिमालय तुमचा अमुचा
केवळ माझा सह्यकडा'

ही अस्मिता असली पाहिजे आमच्या भाषेचं वैभव वाढविण्यासाठी! मराठी माणसांनी इंग्रजीचे ज्ञान आत्मसात करावेच, करता येते. ज्यांनी ज्यांनी लोकोत्तर कार्य केलं, जे जे प्रगतीच्या उच्च शिखरावर विराजमान झाले त्यांनी काय बालकमंदिरापासून इंग्रजीतूनच शिक्षण घेतलं? आज आम्ही बालकांच्या मनावर प्रचंड ओझं टाकून त्यांची आणि आमच्या संस्कृतीची फारकत करीत आहोत. निरीक्षण करा. केवळ आंग्ल भाषेतून शिकणारी, बोलणारी मुलं, सार्वजनिक जीवन, जनसामान्यापासून तुटत आहेत. अनेकदा त्यांच्यात अहंगंड निर्माण होता. विशिष्ट वेळी त्यांच्यात न्यूनगंडही प्रत्ययाला येतो. इंग्रजांनी ३/४ शे वर्षाचे फ्रेंच भाषेचे वर्चस्व झुगारून देऊन जाणीवपूर्वक त्यांच्या मातृभाषेच्या संस्कृतीच्या अभ्युदयाची चळवळ सुरू करून त्यांचे ज्ञानभांडार समृद्ध केले. हे करायचे तर स्वतंत्र मराठी विद्यापीठाची स्थापना, त्याद्वारे मराठी भाषेतून विविध ज्ञानशाखांचे ज्ञान आपल्या भाषेत आणण्यासाठी निरंतर प्रयत्न केले पाहिजेत. इच्छाशक्ती असली तर एका झटक्यात संस्कृत आणि हिंदी विद्यापीठ जसं निर्माण होऊ शकतं तसंच मराठी विद्यापीठ का निर्माण होऊ शकणार नाही?

मित्रहो !

'मॅन मेकिंग, नेशन फॉर्मिंग, कॅरेक्टर बिल्डींग एज्युकेशन वुइ वॉन्ट' विवेकानंदांचा हा संदेश मान्य असला तर आपण आपल्या मातृभाषेच्या खऱ्याखुऱ्या सेवेसाठी, पूजेसाठी, निष्ठापूर्वक डोळसपणानं कार्यप्रवण होऊन कार्य करीत राहून, आनंद घेत घेत, नव्या पिढीला देता देता स्वतःही उन्नत होऊ या. आणि असे होऊ नये की,

मरताना वाटलं
नुसतंच वाहून गेलं,
मला जगायचं जगायचं म्हणताना
माझं जगायचं राहून गेलं ! ...

यासाठी आत्मसंवाद करू. बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणे–

'जग जग माझ्या जीवा
अस जगणं मोलाचं
उच्च गगनासारखं
धरत्रिच्या रे मोलचं'

यासाठी एक करावं लागेल–

'जळत आहे दिवा तोवर
हसत हसत जगून घ्यावे
डोळ्यात उजेड आहे तोवर
दिव्यासारखे जळून घ्यावे'
मातृभाषा मराठीच्या कार्यासाठी !

पुनश्च, आपणा सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

❖❖❖

## २० वे अधिवेशन
## इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि.यवतमाळ
## १० जानेवारी २००६
## अधिवेशनाध्यक्ष : डॉ. ना. ह. वानखडे

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत आज होत असलेल्या विसाव्या मराठी प्राध्यापक परिषदचे उद्‌घाटक मा.ना. वसंतरावजी पुरके, शालेय शिक्षण तथा क्रीडा मंत्री, महाराष्ट्र राज्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत मराठी प्राध्यापक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊसाहेब मांडवकर, उपाध्यक्ष, प्राचार्य डॉ. चवरे, मराठी प्राध्यापक परिषदेचे सन्माननीय पदाधिकारी, माझ्या प्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. सुभाष खंडारे या विचारमंचावर विराजमान असलेले, या परिषदेला आवर्जून उपस्थित असलेले या परिषदेचे अध्यक्षपद भूषविणारे आदरणीय माजी अध्यक्ष तथा मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत तिडके, प्रा. बाळाभाऊ कळसकर, संत गाडगेबाबा अरावती विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सन्माननीय सदस्य प्रा. सतेश्वर मोरे, या परिषदेच्या निमित्ताने उपस्थित असलेले प्राध्यापक बंधू—भगिनी, या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. धरमकर, त्यांचे सर्व सहकारी प्राध्यापक बंधू—भगिनी आणि कर्मचारी, या परिषदेला सुरळीत पार पाडणारे सर्व अनामिक, कळंब शहरातील या परिषदेच्या निमित्ताने उपस्थित असलेले सन्माननीय नागरिक आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो,

या विचारमंचाचे अध्यक्षपद साहित्याचे मानदंड ठरलेल्या महान साहित्यिकांनी आणि विचारवंतांनी भूषविलेले आहे. मी साहित्यिक नाही. मात्र रसिक जरूर आहे. माझ्या आवडीचे विषय भाषाशास्त्र, भाषाविज्ञान आणि व्याकरणशास्त्र. माझा प्रबंधच मुळी प्रमाण मराठीच्या शुद्धलेखनाशी संबंधित आहे. या प्रबंधाचे पुस्तक व्हावे यासाठी प्रयत्नरत असता, एक फोन येतो, आणि आदेश दिला जातो की या वर्षीच्या मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष तुम्ही आहात, नेमणुकीचे पत्र पाठवीत आहे, लगेच होकार कळवा. बराच वेळ या संवादावर माझाच विश्वास बसेना. खरे म्हणजे भाऊसाहेब मांडवकरांनी, पूर्वीच्या अमरावती विद्यापीठांतर्गत स्थापन केलेल्या मराठी प्राध्यापक परिषदेचे आम्ही वारकरी. वारकऱ्याने कुठलीही आशा न धरता केवळ वारी करायची

असते. ती आम्ही करीतही आलो आहोत. या अध्यक्षपदाचे स्वप्नदेखील पडले नाही. त्याचे कारण आहे. अलीकडे पुरस्कार आणि पदेही विकत मिळतात असे म्हणतात. खरे खोटे देणारे आणि घेणारे जाणोत. त्यामुळे आपल्याला असे काही मिळेल असे वाटलेच नाही. बरे मी काही नामांकित साहित्यिक, समीक्षक वगैरे नाही हेही सर्वविदित आहेच. असे असतानाही या परिषदेचे अध्यक्षपद मला मिळाले म्हणून नवल वाटले. मला वाटले कदाचित प्रमाण मराठीच्या शुद्धलेखनानिमित्त गेली बारा पंधरा वर्ष मी हे शुद्धलेखनाचे नियम अनेक शाळा महाविद्यालयांमधून, उजळणी वर्गाच्या माध्यमातून, किंवा प्राथमिक–माध्यमिक–उच्च माध्यमिक स्तरांवरील शिक्षकांच्या असंख्य गटसंमेलनांमधून नि:शुल्क शिकवीत आलो आहे, त्याची परतफेड या निमित्ताने होत असेल, असे वाटून माझा याबाबतीत विचार झाला असावा. म्हणून मग मीही होकार दिला. शिवाय काही विचार या परिषदेच्या निमित्ताने आपल्याला मांडता येतील, याही कारणास्तव या अध्यक्षपदाचा मी स्वीकार केला आहे.

मित्रांनो,

जेव्हा आपण अशा परिषदांच्या माध्यमांतून एकत्र येतो, तेव्हा आपले मनोरंजन व्हावे असा विचार करून आपण घरून निघत नाही. मनोरंजन होत असेल तर ठीकच आहे; परंतु तरी ती बाब आपल्या दृष्टीने गौण असते. अशा परिषदांमुळे आपल्या वार्षिक भेटी तर होतच असतात, शिवाय निरनिराळ्या चर्चांच्या माध्यमातून वैचारिक देवाणघेवाणही होत असते. त्यांत प्रामुख्याने आजच्या ज्वलंत समस्या कोणत्या? त्यांच्या मुक्ततेसाठी आपला सहभाग कसा राहील? वर्गात शिकविताना जाणवणाऱ्या अडचणी, अभ्यासक्रमाशी संबंधित पुस्तकांची योग्यायोग्यता, याशिवाय वेळेवर उद्‌भवणाऱ्या चर्चा, तसेच 'नॅक'ची दहशत असतेच. नॅकमुळे आता वेगवेगळ्या विषयांचे प्राध्यापक त्यांच्या परिषदांना जायला लागलेत. पूर्वी काहींना नेमके त्याच दिवशी 'फार महत्त्वाचे' काम असायचे. आता असेल तर खरे असू शकते. तर सांगायचे हेच की या अशा परिषदांमुळे मिळालेला एक दिवस कसा भर्रकन् उडून जातो.

मित्रांनो,

ज्याला आपण आपला पोशिंदा मानतो, ज्याच्या कापूस उत्पादनामुळे आपली अब्रू झाकली जाते, त्या शेतकऱ्यांपैकी काही शेतकरी रोज आत्महत्या करीत आहेत. यवतमाळ जिल्हा याबाबतीत आघाडीवर आहे. हे कळंब गाव तेच आहे की, ज्या गावात कापसाचा शोध लागला होता. गृत्समद नावाचा

कापसाचा शोध लावणारा महान शास्त्रज्ञ हा याच गावचा! आपल्या अशा मानवी उपयोगाच्या शोधाचे असे दुष्परिणाम होणार आहेत, असे जर त्या महान संशोधकाला वाटले असले तर; त्याची मनोवस्था अणुबॉम्बचा ($E=mc^2$) हा फॉर्म्युला शोधणाऱ्या आईनस्टाईनसारखी झाली असती. अमेरिकेने हिरोशिमा, नागासाकीवर अणुबाँम्ब टाकून पाच मिनिटांत हजारो माणसे मारली, तर हजारो माणसांना कायमचे अपंग बनविले. केवळ जर्मनी अशाप्रकारची भयानक वस्तू बनवीत आहे, या संशयापोटी आईन्स्टाईनने त्या फॉर्म्युल्याची माहिती रूझवेल्टला दिली होती की, अशाप्रकारची वस्तू बनवून आपल्याजवळ आपल्या सुरक्षेसाठी असू द्यावी, अशी त्याची इच्छा होती. म्हणूनच अमेरिकेने जपानविरोधी कारवाई करताच आईन्स्टाईनने आपल्या कपाळावर हात मारून स्वत:शीच म्हटले होते 'मला जर अमेरिका असे काही करील अशी कल्पना असती तर, मी तो फॉर्म्युला दिलाच नसता. याचप्रमाणे कदाचित गृत्समदानेही या कापसाचा शोध लावण्याचे धारिष्ट्य केले नसते आणि इतक्या मोठ्या संख्येने शेतकऱ्यांच्या आत्महत्याही झाल्या नसत्या. या आत्महत्यामागची कारणमीमांसा आपल्याला ज्ञात नाही, असे नाही. म्हणून मी त्यांची कारणेही सांगणार नाही. पण हे कमी झाले की काय असे वाटून नुकताच केंद्र सरकारने निर्णय घेतला की, गव्हाची आयात करणे अपरिहार्य आहे. नाही तर भारतातील दक्षिणेकडील तांदूळ खाणाऱ्या लोकांची परिस्थिती फार गंभीर होईल. आणि हा गहू केव्हा येणार? तर बरोबर आपल्या शेतकऱ्यांचा गहू बाजारपेठेत विकायला येईल तेव्हा. तो चार महिने आधी किंवा चार महिने उशिराही आणता आला असता तर पटण्यासारखे होते. पण नाही. तो याचवेळी आला पाहिजे की, ज्यावेळी आपल्या शेतकऱ्यांचा गहू बाजारपेठेत विकायला येईल. अर्थात आयातीत गव्हामुळे या गव्हाचे भाव निश्चितच कोसळणार. याची कारणमीमांसा अशी सांगितली जाते की, जरी आपल्याकडची धान्याची कोठारे तुडुंब भरलेली असली, तरी हा गहू जर आयात केला नाही, तर गव्हाचे भाव वाढतील. परिणामी भात खाणाऱ्या दक्षिण भारतातील भारतीयांची प्रचंड गैरसोय होईल. अशावेळी गहू उत्पादक थोड्याबहूत शेतकऱ्यांनी आणखी आत्महत्या केल्या तरी फारसा फरक पडणार नाही. पण आमचे आंतरराष्ट्रीय राजकारण महत्त्वाचे! मरणाऱ्या सगळ्या लोकांचे, त्यांच्या उघड्यावर पडलेल्या कुटुंबीयांचे शाप घेऊन तुम्ही मरणार आहात, हे लक्षात ठेवा.

या शेतकरी बांधवांना मी विनंती करू इच्छितो, की असे मरण

स्वीकारण्यापेक्षा पुन्हा अशी परिस्थिती येणार नाही यासाठी संघटित प्रयत्न करा. सामूहिक शेती हा चांगला पर्याय ठरू शकतो. एक लाख रुपयांपेक्षा तुमचा जीव कोट्यावधी मोलाचा आहे. शिवाय यातून कधीकधी चुकीचा संदेश जाऊ शकतो की, एक लाख रुपये मिळण्याने माझ्यावरील कर्ज फिटेल, माझ्या घरचे लोक सुखी होतील. मग करा आत्महत्या. माझ्या शेतकरी बांधवांनो, आज जरी तुम्हाला एक लाख रुपये जास्त दिसत असले, तरी ते फार जास्त नसतात, नाहीतच. तुम्ही तुमची सुटका तर करून घेता; परंतु तुम्ही आपल्या कुटुंबीयांना संकटात टाकून निघून जाता. म्हणून हे आता थांबले पाहिजे. म्हणून शेतकऱ्यांजवळ गमतीनेही हा विषय कोणीही काढू नये.

मित्रांनो, मला कल्पना नाही की, हा विषय या ठिकाणी उपस्थित करणे योग्य आहे की, अयोग्य! कारण ही मराठी विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांची परिषद आहे. परंतु आपलेही काही दायित्व आहे. इतक्या सगळ्या आत्महत्या होत असताना या जिवंत मानवतावादी विषयावर थोडीही चर्चा न करता, त्याचा साधा उल्लेखही होत नसेल तर, आपण इतके हृदयशून्य निश्चितच झालो नाही. म्हणूनच हा विचार आपल्यापुढे व्यक्त केला आहे. आपल्यांतील लेखकांना, कवींना हा विषय निश्चितच अस्वस्थ करीत असेल. म्हणूनच मी आपल्या त्या सर्व हौतात्म्य पत्करलेल्या बळिपुत्रांना आपल्या सर्वांच्या वतीने शब्दसुमनांनी श्रद्धांजली वाहतो.

ही श्रद्धांजली पुण्या मुंबईतील काही 'महान' साहित्यिकांना कदाचित आवडणार नाही. कारण त्यांना बऱ्याच दिवसांपासून मराठी भाषेच्या अस्तित्वाची चिंता सतावीत आहे. अगदी आता जे कोल्हापूरचे अखिल भारतीय साहित्य संमेलन पार पडले. त्यातही चितमपल्लींनी हाच प्रश्न आवर्जून मांडला. बरेचदा मला असेही वाटत आले आहे की, ही सगळी माणसे एकाच विचारसरणीची आहेत आणि हेतुपुरस्सर हा विषय उकरून काढीत आहेत. जणुकाही आता सगळ्या समस्या संपल्या. बेकारीचा प्रश्न संपला, शेतकऱ्यांचे प्रश्न संपले, स्त्रियांच्या समस्या संपल्या, आता उरला केवळ मराठी भाषेच्या अस्तित्वाचा प्रश्न. आज जगात जवळपास ५००० भाषा/बोली अस्तित्वात आहेत. त्यापैंकी भारतात ८४५ भाषा/बोली बोलल्या जातात. त्यांच्यापैंकी एकानेही कधी आपल्या भाषेबद्दलची चिंता व्यक्त केल्याचे वाचनात आलेले नाही. तुम्ही कधी ऐकले आहे की कुठल्या तामीळ भाषकाने भाषेच्या अस्तित्वासाठी अश्रू ढाळले, किंवा कानडी किंवा केरळी माणसाने आपल्या भाषांच्या अस्तित्वाबद्दल शंका व्यक्त केली? कधी एखाद्या बंगाली

किंवा हिंदी भाषकाने अशी काही चिंता व्यक्त केली? कधीच नाही. कारण ते लोक जगात कुठेही गेले, तरी आपल्या मातृभाषेवर जीवापाड प्रेम करीत असतात आणि म्हणून आपल्या भाषेच्या अस्तित्वाची चिंता त्यांना कधीच पडत नाही. मराठी माणूस मात्र आपली मातृभाषा घरी ठेवून जातो; आणि तो जेथे जातो तेथील भाषा स्वीकारतो. आपली भाषा त्याला फार हलकट वाटू लागते. अशांपैकीच काहींना मराठी भाषेची चिंता सतावीत असते. मित्रांनो मला तर वाटते की, ज्या लोकांच्या पूर्वजांनी संस्कृतला कुलुपबंद करून संस्कृतचा सत्यानाश केला, त्यांचेच वंशज मराठीचाही नायनाट केल्याशिवाय राहणार नाहीत. मोडी लिपीला संपविण्यासाठी कोण जबाबदार आहेत? केवढी वेगवान लिपी! पण बालबोध आली; आणि मोडीला मोडीत काढले. इ.स. १३४७ नंतर हुसेन गंगो बहामनीने आपला दिल्लीच्या राजवटीशी संबंध तोडून दक्षिणेत आपल्या राज्याची निर्मिती केली. त्यावेळी त्याच्या राज्यकारभाराचे दप्तर कोणी सांभाळले? ज्यांनी ते सांभाळले त्यांनीच यादवपूर्वकालीन आणि यादवकालीन शुद्ध मराठीला ८० यावनी बनविले. ज्यांनी त्यावेळी मुस्लीम राज्यकर्त्यांपुढे लांगूलचालन केले, तेच आता चोरांच्या उलट्याबोंबा मारीत आहोत. या बोंबा कशा मारल्या जातात त्याचे रूपक उलगडून सांगतो.

एका गावात एक चोर चोरी करण्यासाठी शिरला. त्याने ज्या घरी चोरी करायची ते घर आधीच हेरून ठेवले होते. तो त्या घरातील मंडळी झोपण्याची वाट पाहू लागला. कारण शेवटी भीती त्यालाही होतीच ना. सामसूम झाल्यावर तो चोरू हळूच त्या घरात शिरला. त्याकाळी आजच्यासारखे लोड शेडिंग नसले, तरी घरात अंधारच होता. जमिनीवर असलेले एक भांडे त्याच्या पायाला लागून त्याचा आवाज झाला. घरातल्या बाईला वाटले मांजरबिंजर आली असेल म्हणून तिला हाकलून देण्यासाठी ती उठली. पाहतो तो एक अनोळखी माणूस घरात! ती मोठ्याने 'चोर चोर' अशी ओरडू लागली. घरातले लोकही जागे झाले. आता आपले काहीही होऊ शकते असे वाटून घराचे दार उघडून तो चोर पळू लागला. घरातले लोक त्याला पकडण्यासाठी त्याच्या मागे लागले. तेही मदतीच्या आशेने 'चोर चोर' म्हणून ओरडू लागले. त्यामुळे तो चोर पकडण्यासाठी त्या मोहल्ल्यातील लोक जागे होऊन दिशा मिळेल तिकडे 'चोर चोर' म्हणून ओरडत होते. चोराने मग एक नेहमीचीच शक्कल उपयोगात आणली. तोच त्या लोकांमध्ये मिसळून गेला आणि तोच मग तसेच 'चोर चोर' असे त्यांच्या बरोबर बोंबलू लागला. इतकेच नाही तर तो चोर त्या दिशेन पळाला, असे अधिकारवाणीने सांगू लागला.

म्हणून लोक तिकडे धावले. हा इकडे पळाला. अशा असतात चोराच्या उलट्या बोंबा. मराठीचे नुकसान करणाऱ्यांच्या ह्या अशा उलट्या बोंबा आहेत.

याउलट इंग्रजीने केले. त्यांनी कर्स्यू लिहिणे बंद केले. त्यामुळे इंग्रजी जशी वेगाने लिहिता येते तशी मराठी लिहिता येत नाही. बालबोध मराठीचे अक्षरे लिहिण्यासाठी दोन ते सात वेळा हात उचलावा लागतो. उदाहरणार्थ ऱ्हस्व 'उ' लिहिण्यासाठी दोन वेळा हात उचलावा लागतो तर 'औ' साठी सात प्रयत्न करावे लागतात. मोडी गमावल्यामुळे असे दोष मराठीत शिरले. कोण जबाबदार आहेत यासाठी? तेच, ज्यांनी संस्कृतबरोबर मराठीचेही प्रचंड नुकसान केले. पुन्हा बोंबा मारण्यास तयार!

आणि म्हणून या बाबतीत आणखी एक वेगळाच संशय शिल्लक राहतो. तो असा की, जेव्हापासून सर्वसामान्य मराठी माणसांची मुले इंग्रजी शिकायला लागली, तेव्हापासूनच त्यांना ही चिंता सतावीत आली आहे. आणि जेव्हा महाराष्ट्र शासनाने पहिल्या वर्गापासून इंग्रजी शिकविणे अनिवार्य केले, तेव्हा तर ही पोटदुखी आणखीच वाढली. केवढी मराठीच्या बाबतीत ही काळजी ! त्यांची मुले भलेही कॉन्व्हेन्ट संस्कृतीत शिकून परदेशांत वास्तव्य करीत असले तरी, त्याबद्दल मुळीच बोलायचे नाही. फारच झाले तर 'या देशात गुणवंतांना काहीच भवितव्य नाही होऽ!' असा टाहो फोडायचा. तर असे हे त्यांचे दुटप्पी वर्तन आता सगळ्यांनाच कळून चुकलेले आहे. त्यामुळे अशा मगरीच्या अश्रूंना काहीही अर्थ उरत नाही.

मित्रांनो,

मराठी टिकणार आहेच म्हणून हा आपल्या चिंतेचा विषय कधीच झाला नाही; पण तिला जागतिक दर्जाची बनवायची असेल तर त्याबाबतीत विचार झाला पाहिजे, त्यासाठी उपाय शोधले पाहिजेत. वर्तमान काळातील नवनव्या संशोधनामुळे जग इतके लहान झाले आहे की, इंटरनेटसारख्या साधनांनी जगातील ज्ञानाचा खजिना आता घराघरात जाण्यासाठी तयार आहे. अशावेळी जगातील उच्च दर्जाचे जेवढे साहित्य असेल, ज्या साहित्यकृतींना नोबेल पुरस्कार प्राप्त झाले असतील, अशा साहित्यकृतींना मराठीत अनुवादित करून त्यांना विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत लावले पाहिजे. असे श्रेष्ठ दर्जाचे साहित्य मराठीत अनुवादित झाले नसल्यामुळेच मराठी माणसाला श्रेष्ठ कलाकृती कशी असते ते कळलेच नाही. कोणत्या मराठी कलाकृतीला नोबेल पारितोषिक प्राप्त झाले? एकीलाही नाही, का? तर नोबेल पारितोषिक प्राप्त करण्यासाठी कशी कलाकृती असावी लागते? “To those who during the

prceding year, shall have conferred the greatest benefit on mankind" हा मानवतावादी विचार आपल्या किती साहित्यिकांनी स्वीकारला होता? मला तर बऱ्याच साहित्यिकांचं साहित्य शर्विलकवादी असल्याचे जाणवते. अर्थात जे प्रामाणिक आहेत त्यांच्याबद्दल आदर आहेच. आदरणीय वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज किंवा विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार कसा प्राप्त झाला तेही आपण सर्व जाणतोच. जे जाणत नसतील त्यांनी ज्या दिवशी ही बातमी वर्तमान पत्रात आली त्या दिवसाची वर्तमानपत्रे वाचावीत. तर मला हेच सांगायचे आहे की, आमच्या विद्यार्थ्यांना श्रेष्ठ दर्जाच्या साहित्याचे ज्ञान दिले जायला हवे. त्यासाठी शेवटी मराठीच्या प्राध्यापकांनाच पुढाकार घ्यावा लागेल. त्यासाठी आपल्याला इंग्रजी भाषा बोलता आणि लिहिता आली पाहिजे. ती भाषा कठीण आहे ही मानसिक न्यूनता काढून टाकायला हवी. मला इंग्रजी आलीच पाहिजे असा विचार केला तर मग ती भाषा आल्याशिवाय राहणार नाही. तसे प्रत्येकाला संगणकाचे ज्ञान असायला पाहिजे. या वयातही संगणक शिकून मी माझा प्रबंध स्वत: टंकलिखित करून विद्यापीठाला सादर करू शकतो, तर तुम्हा सर्वांना तो निश्चितच हाताळता येऊ शकतो याची खात्री बागळा. शेवटी निष्कर्ष असा की, जागतिक संस्कृतीचे ज्ञान आपल्या संस्कृतीत आणल्याशिवाय आपली मराठी संस्कृती अधिक विस्तृत होणार नाही.

जगात ज्या निरंतर संशोधन पद्धती अस्तित्वात आहेत, त्यांनी ज्या ज्या विषयावर संशोधन केले आहे ते विषय आपल्या भाषेत आले पाहिजेत. अशावेळी आपली संस्कृती न होईल होऽ असा टाहो फोडून चालणार नाही. एक मात्र नक्की की, ती निश्चितच अधोगतीस जाणार आहे. रोज जगातल्या कमीतकमी पाच बोली नष्ट होतच आहेत. जागतिकीकरणच्या या रेट्यात जे टिकून राहील ते आपले; आणि जे नवे प्राप्त होईल तेही आपलेच असणार. पूर्वी एक इस्ट इंडिया कंपनी आली होती, ती आल्यामुळेच या देशात प्रचंड सामाजिक अभिसरण झाले. जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले ही त्या काळाची नवनिर्मिती होती. ज्याचे दृश्य परिणाम आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, इंदिरा गांधींच्या रूपांत जाणवतात. संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणूनच समाजजागृती करू शकले. त्याचे प्रत्यक्ष परिणाम तुमच्या आमच्या रूपांत प्रत्यक्ष साकारलेत. आता तर जगातील अनेक कंपन्या भारतात आल्या आहेत, विविध देशातील विद्यापीठे यायला निघाली आहेत. त्यांना कळून चुकले आहे की, भारत ही

शिक्षणाची फार मोठी बाजारपेठ आहे. भारतीय माणूसही जगाच्या पाठीवर विविध देशांमध्ये नावलौकिक प्राप्त करतोय, करू द्या. गंमत अशी की या सर्व परदेशी कंपन्यामध्ये टी.व्ही.चॅलन्समध्ये काम करणारे तेच आहेत ज्यांना मराठीची फार काळजी पडल्याचे दिसत आहे. तरीही पण हा बदल मला स्वागतार्ह वाटतो. यात आणखीही परिवर्तन होणारच आहे. भारतातील निकृष्ट अशी जातीव्यवस्था न होण्यासाठी जागतिकीकरण हा एक फार मोठा घटक ठरू शकतो. आणि जिथे संस्कृतीच्या संस्कृती नष्ट झाल्या तेथे मराठी टिकून राहिली पाहिजे होऽ असे म्हटल्याने थोडीच ती टिकणार आहे? भाषा ही एक सामाजिक सजीव संस्था जर आहे, तर तिला केव्हातरी शेवट असणारच! जिथे संस्कृतीच्या संस्कृती नष्ट झाल्या तिथे एका भाषेबद्दल आपुलकी तरी किती बाळगावी?

असे असले तरी ती जोपर्यंत आहे तोपर्यंत तिचा आपल्याला अभिमान वाटायलाच हवा. शेवटी आपली मातृभाषा आहे. आणि म्हणूनच महाराष्ट्रात तरी मराठीतून भाषिक व्यवहार झाले पाहिजेत. अगदी न्यायालयांनी देखील मराठीचा वापर दैनंदिन कामकाजामध्ये केला पाहिजे. पण मग जर आम्ही मराठीचा एवढा अभिमान बाळगत असू तर, ती आपल्याला शुद्ध रूपात बोलता आली पाहिजे, लिहिता आली पाहिजे. पण किती प्राचार्यांना, प्राध्यापकांना, शिक्षकांना, कर्मचाऱ्यांना आत्मविश्वासपूर्वक नियमबद्ध मराठी लिहिता येते? मराठीचे प्रमाण लेखन स्वीकारणे चूक की बरोबर हा मुद्दा नंतरचा. आपली इंग्रजी शुद्ध असावी म्हणून आपण स्पेलिंगची किती काळजी घेतो? डोळे मिचकावून मिचकावून पाहत प्रत्येक शब्दाचे लेटर बरोबर आहे की नाही याची काळजी घेतो. 'डियरचे स्पेलिंग dear लिहिले काय किंवा 'deer' लिहिले काय? पण नाही 'dear' च्या ठिकाणी 'deer' लिहिले तर त्या प्रिय व्यक्तीचे एकदम 'हरीण' बनते. आणि म्हणून त्या स्पेलिंगची काळजी घ्यावी लागते. मराठीच्या स्पेलिंगचीही अशीच काळजी घेणे आवश्यक आहे. 'पाणी' म्हणजे जल' आणि 'पाणि म्हणजे हात' असे अर्थ होतात. मला 'पाणी' प्यायचे आहे अशावेळी तुम्ही हात पिणार काय? पिणार की खाणार?

काहींना वाटते शुद्धलेखन आले नाही तरी मराठीतून आपला व्यापार चालतच असतो. कारण भाषिक संज्ञापन झाले की, मराठीचे काम संपले. दैनंदिन व्यवहारासाठी हा युक्तिवाद योग्य असला तरी तो आपल्याला लागू पडत नाही. कारण आपल्याला केवळ भाषिक संज्ञापन करावयाचे नसून ती शिकवायची आहे आणि म्हणून आपल्याला येत नाही म्हणून प्रमाण मराठीचे

नियमच स्वीकारायचे नाहीत. हे मात्र पटत नाही. त्यापेक्षा असा युक्तिवाद करता येईल की आम्हाला शुद्धलेखनाचे नियम कधी कोणी शिकविलेच नाहीत तर येणार कसे? हा मुद्दा पटण्यासारखा असला तरी पुन्हा प्रश्न असतोच की जरी तुम्हाला कोणी शिकविले नव्हते, तरी ते नियम तुम्हाला यावेत म्हणून तुम्ही कोणते प्रयत्न केले? कोणतेच नाही. आणि म्हणून आपल्याला प्रमाण मराठीच्या नियमांनी लिहिता येत नाही. आणि त्यामुळे एक प्रकारचा जो न्यूनगंड निर्माण होऊ शकतो, तो होऊ नये असे मला वाटते.

अलीकडे असे ऐकिवात आले आहे की, आता मराठीच्या शुद्धलेखनाचे नियम शिकण्याची गरजच नाही. कारण संगणकच आता ऱ्हस्व—दीर्घाची चूक झालीच तर लगेच सूचित करतो. माझ्या मते अजूनतरी असा संगणक आलेला नाही. संगणकही मोठ्या गंमती करतो. तो मराठीच्या ऱ्हस्व—दीर्घाची चूक झाली असे जेव्हा टंकलेखन करताना सूचित करतो, तेव्हा त्याला मी विचारतो, चूक का आहे? मग तो काही सांगत नाही. निरुत्तर होतो. सांगायचे हेच की, संगणकातही अशी चुकीची माहिती भरलेली आहे. मला नियमांची पूर्ण माहिती असल्यामुळेच तो माझ्याशी बनवाबनवी करू शकला नाही. तर संगणक सांगतो ना, मग तेच बरोबर असले पाहिजे, असे वाटून आपल्याकडून आणखी चुका झाल्या असत्या. जेव्हा असा संगणक येईल तेव्हाची तेव्हा पाहून घेऊ. तोपर्यंत आपला प्रश्न सुटत नाही.

आपल्याला जर भाषा विषय शिकवायचा आहे, तर ती भाषा तिच्या व्याकरणासहित शिकविणाराला आलीच पाहिजे. पण आज तरी असे जाणवेल की, ९७ टक्के प्राध्यापकांना/शिक्षकांना ती आत्मविश्वासपूर्ण व्याकरणासहित येत नाही. विद्यापीठांमधील मराठीची अभ्यासमंडळे व्याकरणशास्त्राचा प्रत्येक वर्गाला काही भाग का लावत नाहीत समजत नाही. मी खात्रीने सांगतो कमीत कमी कला शाखेतील विद्यार्थ्यांना व्याकरणाचा थोडा थोडा भाग लावला तरी, एक अपरिहार्यता म्हणून आपणही व्याकरणाचा अभ्यास करायला सुरुवात करू. एकदा व्याकरण समजले, आणि ते समजतेच, प्रमाण मराठीचे नियम समजायला मुळीच कठीण जाणार नाहीत. कारण मराठी साहित्य महामंडळाचे शुद्धलेखनाचे नियम समजून घ्यायचे असतील तर व्याकरणाचा अभ्यास असणे अपरिहार्य आहे. याशिवाय व्याकरणामुळे भाषेवर प्रभुत्व निर्माण होते, हे महत्त्वाचे आहे.

प्रमाण मराठीच्या नियमांनी लिहिता येत नाही त्याचे आणखीही एक कारण आहे आणि ते फार महत्त्वाचे आहे. ते असे की, मराठी साहित्य

महामंडळाच्या शुद्धलेखनविषयक समितीने जे नियम केलेले आहेत, ते अपूर्ण आहेत. त्यात रेफेचे, प्रत्ययांचे, उपसर्गाचे नियमच नाहीत. अशावेळी लिहिताना हमखास चूक होतेच. 'ताना' कृदन्त प्रत्यय लागून सिद्ध झालेल्या क्रियापदांवर आता अनुस्वार देण्याची गरज नाही. हा नियम माहीत नसल्यामुळेच अजूनही आपल्याकडून 'करताना', 'जाताना', 'पाहताना' या रूपांतील 'ता'वर अनुस्वार दिला जातो आणि अनेकवचनी सामान्य रूपांवर अनुस्वार द्यावा लागतो हा नियम माहीत नसल्यामुळे नेमका आपण त्यांवर अनुस्वार देत नाही. याशिवाय स्त्रीलिंगी शब्दाच्या शेवटी 'स' किंवा पुल्लिंगी शब्दाच्या शेवटी 'सा' आल्यास त्यांची सामान्य रूपे होताना कसे बदल होतात, विभक्तीप्रत्ययरूप, अव्यये, सामासिक शब्द किंवा अभ्यास शब्दांचे लेखन कसे करावे किंवा शब्दयोगी अव्यय असल्यास त्या शब्दांचे लेखन कसे करावे याबद्दल माहिती क्वचितच उपलब्ध होते. व्याकरणाच्या ग्रंथात अशी माहिती उपलब्ध असते. पण लक्षात कोण घेतो!

याशिवाय नियमकर्त्यांनी आणखीही एक अडचण निर्माण करून ठेवलेली आहे. ती अशी की, जगातील विविध भाषांमधून मराठीत जे शब्द आलेले आहेत. उदाहरणार्थ अरबी, फारसी किंवा उर्दूतून मराठीत आलेले शब्द पहा. अर्ज, अनार, अपील, अश्रू, अस्सल, अक्कल, अखेर, अलगूज, आदत, इशारा, इनाम, इमान, इन्कार, इज्जत, उमेदवार, ऊर्फ, एकजिनसी, एरवी, ऐपत, ऐवज, ऐन, ऐनक, ओठ, औजार, अंमल, अंदाज, अंगूर, अंजीर, कनात, कत्तल, कर्ज, करार, कलेजी, काजू, कैदी, काबीज, कायम, कायदा, कारकीर्द, किनखाप, किंमती, कारभार, खरीप, खलास, खात्री, खानेसुमारी, खजील, खलाशी, खरबूज, खटमल, खुशी, खुनशी, खुशाल, खूर्ची, खालसा, खंबीर, गजरा, चिकना, चाकू, चिंगारी, चिकू, चेहरा, चोर, चोरी, चोळी, चौकी, चौकीदार, जमात, जमीन, जरूर, जखम, जहाज, जवाहर, जमानत, जडीबुटी, जहागीर, जाहीर, जाहिरात, जिमखाना, जिंदाबाद, जिना, जुलूम, जंजिरा, जंगली, झटका, झुमका, टमाटर, टोपी, डाक, डेंगा, तयार, तब्येत, तक्रार, तहहयात, तपास, तपशील, तबला, तहसील, ताईत, तारीफ, दिरंगाई, दिलदार, दवा, दवाखाना, दप्तर, दर्जा, नफा, नकलाकार, नशीब, नकाशा, नाइलाज, नुकसान, नेस्तनाबूत, निर्लष्करीकरण, पनीर, पंगत, पट्टी, पाग, पितळ, पेशी, पेशकार, पोशाख, पोलाद, प्याला, पिंजरा, फलाना, फिकीर, फितूर, फुलका, फायदा, फूल, फूलकोबी, फौज, बरबाद, बगिचा, बदनाम, बद्दल, बरोबर, बरखास्त, बहादूर, बक्षीस, बखर, बाब, बला, बाबत, बाजार,

बाबू, बाजरा, बिस्तरा, बिचवा, बिगार, बिलंदर, बिछायत, बेरोजगार, बिमार, बुढा, बीन, बेशक, बेहेत्तर, बेअब्रू, बेइज्जत, बेमालूम, बेलाशक, बेहोश, बेफिकीर, बेलन, बैठक, महिना, मजकूर, मजा, मस्का, मजाल, मसूर, मजलदरमजल, मच्छर, मच्छरदाणी, मालक, मसाज, मदत, मर्जी, मालमत्ता, माजी, मार्फत, मातब्बर, माफी, मायाजाल, मिठाई, मिरची, मुश्कील, मूर्दा, मुलूख, मुंग, मेहेरबान, मैदान, मोहोर, मोट, मोबदला, मोती, मंजूर, याद, यार, रसद, रवानगी, रसीद, रजा, रब्बी, रिवाज, रेती, रूजू, रूजूवात, रोग, रंगमहाल, लष्कर, लायक, लिफाफा, लेजीम, लोहार, लुंगी, वसुली, वहिवाट, वकील, शह, शरबत, शर्यत, शाल, शाबास, शाबूत, शाहीर, शिकार, शिवाय, शिक्का, शिलेदार, शिफारस, शोक, सनद, सल्ला, सनदशीर, सही, सदरहू, सरदी, सरकार, सरंजाम, साल (वर्ष), साहेब, सालाबाद (प्रमाणे) सागवान, साहुकार, सुमारे, सुरूवात, हवा, हवापाणी, हवामान, हवापालट, हजर, हयात, हजामत, हद्द, हजेरी, हवाई, हल्ली, हप्ता, हराम, हवालदार, हालत, हिशेब, हिंमत, हुकूम, हुशार हे थोडेस नमुने आहेत. आणखी पुष्कळ शब्द टाळले आहेत. एकनाथी भारूडातील 'अर्जदास्त' तर आपल्या वाचण्यातून केव्हातरी गेलेच असेल. त्यातील ९५ शब्दांपैकी ८० शब्द परभाषांतील आहेत; तर उर्वरित १५ शब्द मराठी आहेत. आजही तीच मराठी तहसील किंवा पोलीस स्टेशनमध्ये वापरल्या जाते. तरीही आपण मराठीचा ऱ्हास झाला असे म्हणू शकत नाही. उलट मराठीच्या शब्दभांडारात त्यामुळे वाढच झालेली आहे. याशिवाय पोर्तुगीज भाषेतूनही मराठीत शब्द आलेले आहेत. पपई, घमेले हे शब्द त्याच भाषेतून आलेले आहे. विस्तारभयास्तव आणखी शब्द येथे देत नाही. याशिवाय आता विविध बोलीमधूनही मराठीत असंख्य शब्द आल्यामुळे तिचा विस्तार वाढतच आहे. एकंदरीत मराठी भाषा दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत आहे. त्यामुळे मराठी भाषेवर आक्रमण वगैरे काहीही नसून, ती सतत विस्तारतच आहे. संस्कृत ही मराठीची आई अशी चुकीची व्युत्पत्ती सांगणारी या परभाषांतून आलेल्या शब्दांची व्याप्ती लक्षात घ्यावी. यास्तव काही लोकांनी चालविलेल्या अशा अपप्रचाराला बळी पडू नये म्हणून हे सांगणे गरजेचे वाटते.

शिवाय येथे मुद्दाम सांगायचे कारण असे की, अशा परभाषांतून मराठी भाषेत आलेल्या शब्दांच्या ऱ्हस्व–दीर्घत्वाचे लेखन मराठीच्या नियमांनी करावे, असा महामंडळाचा नियम आहे. मात्र जे शब्द संस्कृतमधून मराठीत आलेले आहेत, त्यांचे ऱ्हस्व–दीर्घत्व संस्कृतच्या नियमांनीच असायला हवे, ही

महत्त्वाची अट आहे. त्यातही मजेदार गोष्ट अशी की, प्रमाण मराठी भाषेचे जसे नियम आहेत, तसे नियम संस्कृतचे नाहीत. अशावेळी कोणते शब्द संस्कृतमधून आले हेच ओळखणे जेथे कठीण जाते, (कारण ते पूर्णत: मराठीमय झालेले आहेत.) तेथे संस्कृत भाषेच्या कोणत्या नियमांनी लिहावेत? त्यामुळे ही अट काहीतरी कारस्थान असलेली वाटते. या अडेलतट्टूपणाचा परिणाम असा झाला होता की, १९४७ मध्ये मुंबई विद्यापीठाने स्वत:चेच मराठीच्या शुद्धलेखनाचे नियम बनविले होते; आणि अंमलातही आणले होते. आजही महामंडळातील लोक लवचीक धोरण स्वीकारायला तयार नाहीत. अशा मराठी भाषेच्या शत्रूसमान विरोधकांविरूद्ध काहीतरी निर्णय घेणे ही आता एक अपरिहार्य बाब बनलेली आहे.

डॉ.वि.भि. कोलते आणि डॉ.भाऊ मांडवकरांनी यासाठी प्रयत्न केले. पण पुण्यातील ही दुराभिमानी मंडळी आपला हेका सोडायलाच तयार नाहीत. या परिषदेत त्यांच्या या वर्तणुकीचा निषेध करणारा ठराव पारित करता आला तर? पण तो निर्णय आपणा सर्वांना घ्यायचा आहे. जोपर्यंत मूल रडत नाही तोपर्यंत मायदेखील त्याला दूध पाजत नसते. त्या तुलनेत हे प्रकरण जरा जास्तच अहंपणाचे आहे. पण कोणीतरी जागरूक आहेत, हे तर त्यांना या निमित्ताने कळून येईल. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की, हा नियम संस्कृतमधून मराठीत आलेल्या शब्दांना लागू केल्यास मराठी लिहिणे सुकर होईल, त्याचवेळी संस्कृत भाषेचे मुळीच नुकसान होणार नाही. मला सांगा की, 'दिवाळी' या मराठी शब्दाच्या आद्याक्षराची इकार ऱ्हस्व आहे. 'दीपावली' या संस्कृत शब्दाची 'दी' दीर्घ असली (दीप+आवली=दीपावली अशी संधी साधलेला तो शब्द आहे.) तरी मराठी भाषेत हाच शब्द लिहिताना ही दीर्घ 'दी' ऱ्हस्व लिहिली, आणि अशाप्रकारे सर्वच शब्दांच्या आद्याक्षरांच्या इकार, उकार, ऱ्हस्व लिहाव्यात अस नियम झाल्यास या एकाच नियमाने मराठी शुद्ध लिहिता येते. पण असे होत नाही. अशा या साहित्य महामंडळात अढळ स्थान प्राप्त करणाऱ्यांच्या वर्तनाच्या प्रकाराला तुम्हाला काय म्हणायचे असेल ते म्हणा. मात्र जे वास्तव आहे ते आपल्यापुढे सादर करीत आहे. निर्णय आपल्याला सामूहिकपणे घ्यावा लागेल.

मराठीचे नियम व्याकरिणकदृष्ट्या कठीण असल्याची धारणा अनेकांनी व्यक्त केली आहे. एक प्रयत्न म्हणून मी त्याच नियमांना एका नव्या पद्धतीने मांडलेले आहे. या पद्धतीने मराठी लिहिता येते अशी माझी खात्री झाली आहे. शाळांतील शिक्षकांची गटसंमेलने भरत असतात किंवा महाविद्यालयामध्ये

विविध स्वरूपांच्या कार्यशाळा आयोजित केल्या जात असतात त्यांना व्याख्यांनासाठी पाहुणे पाहिजे असतात. असे पाहुणे म्हणून जाण्याचे प्रसंग आपल्यालाही आलेले असतील. अशावेळी या शिक्षकांपुढे किंवा विद्यार्थ्यांपुढे भाषण करण्याऐवजी आणि भाषण ऐकणे फारसे कोणाला आवडते असेही नसते. कारण सांगणारा जी गोष्ट सांगत आहे ती आपल्या उपयोगाची असेल, तरच तिला श्रोत्यांकडून ऐकण्याचा प्रतिसाद मिळू शकतो. तर, मी या नव्या नियमांनी शिकवायला लागलो. आश्चर्य असे की, पाच मिनिटांमध्ये कोणतेही कारण सांगून दांडी मारणारे प्राथमिक, माध्यमिक स्तरावरील शिक्षक सहा ते आठ तास टिपणे घेत बसून राहिल्याचे आढळून आले. विद्यार्थीदेखील अमाप संख्येने उपस्थित राहत होते. मलाही त्या निमित्ताने विदर्भात अंदाजे शंभर तरी ठिकाणी अशा कार्यशाळांना जाण्याची संधी मिळाली. अशा कार्यशाळांचा हजारो विद्यार्थ्यांना, शिक्षकांना प्राध्यापकांना उपयोग झाला. प्रत्येकाची आनंद उपभोगण्याची तऱ्हा वेगवेगळी असू शकते. मला असा नि:शुल्क ज्ञानवाटपातच आनंद वाटतो.

बंधूनो! 'प्रत्येकाला मृत्यू येणारच. तेच एक अंतिम सत्य आहे की ज्याला चुकवता येणे शक्य नाही. अशावेळी आपण इतरांकडून आपल्यासाठी काही अपेक्षा व्यक्त करीत असतो. त्याचवेळी माझे इतरांसाठी योगदान काय?' हे राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या एका पत्रातील वाक्यानुसार माझे आचरण असू शकते. आपलेही असावे असे वाटते. मृत्यूनंतर आपले येथे काहीही उरत नाही. उरतात त्या केवळ काही आठवणी त्याही काही दिवसांसाठी. म्हणून आपल्याजवळ आपले नुकसान न होता जर इतरांना उपयोगी पडणारे काही असेल तर ते वाटून द्या. कारण 'संधिकाली जेव्हा जीवनाच्या धुंदल्या धुंदल्या दिशा' होतील, तेव्हा माझे चांदणे शिंपण्याचे राहूनच गेले, असे होऊ नये. म्हणून प्रत्येकाने खलील जिब्रानच्या त्या रूपक कथेतील प्रेषीत सांगतो तसे दान द्यावे म्हणून आपल्यापैकी कोणीही मला बोलावल्यास ही शुद्धलेखनाची कार्यशाळा घेण्यास मी तयार असतो.

यानंतर आपण आपल्या ग्रामीण भागातील महाविद्यालयांच्या समस्या याबाबतीत चर्चा व्हावी म्हणून काही विषय आपल्यापुढे मांडतो.

ग्रामीण भागातील महाविद्यालयामध्ये शिकायला येणारे विद्यार्थी प्रामुख्याने खेड्यापाड्यांतून येत असतात. शिक्षण घेताना त्यांच्याकडे पुस्तकांचा अभाव आढळतो. आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांबद्दल वेगळा विचार करता येईल. पण सगळेच विद्यार्थी गरीब असतात असे नाही. विद्यार्थी आता मोटार

सायकलीवरून महाविद्यालयात यायला लागलेले आहेत. चांगली गोष्ट आहे. आपल्याला जे मिळाले नाही ते यांना मिळते आहे याचा आनंदच वाटायला हवा. पण त्यांच्याहीजवळ पुस्तके नसतात. इतर 'सर्व' कामासाठी मात्र पैसे असतात. पुस्तकांबद्दल इतकी अनास्था त्यांच्यात कशी यायला लागली, हा एक विचार करण्यासारखा गंभीर प्रश्न आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती निर्माण करण्यास आपण कमी पडतो का? वास्तव असे आहे की, विद्यार्थी जेथे क्रमिक पुस्तकेच घेत नाहीत, तेथे अवांतर वाचन तर मुळीच करीत नाहीत. परीक्षेसाठी मार्गदर्शिका मात्र घेतात, किंवा आपल्यालाच नोट्स द्या म्हणतात. खरे म्हणजे 'वाचाल तर वाचाल' हा वाक्प्रचार त्यांना पटवून देता आला पाहिजे. ते पुस्तके वाचत नसल्यामुळे त्यांचे ज्ञान सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षांसाठी अपुरे पडते. परिणामी मराठी अभ्यास विषय घेतलेला विद्यार्थी इतराच्या तुलनेत मागे पडतो.

आणखी एक गोष्ट अशी की, विद्यार्थ्यांचा गैरसमज असा आहे की, मराठी विषयाचा तास केला नाही, तरी आपण मराठी विषयात उत्तीर्ण होऊ शकतो. त्यांच्या डोक्यात शिरलेला हा गैरसमज आहे, ही वस्तुस्थिती आहे. कदाचित आपली दयाभावनाही त्याला कारणीभूत असू शकते. पण या दयाभावनेमुळे विद्यार्थी मराठीच्या तासांना गैरहजर राहत असतील तर मात्र ती चिंतेची बाब ठरते. अशाप्रकारे विद्यार्थी गैरहजर राहू नये म्हणून अभ्यासक्रमाबाबतची एक वेगळीच बाब या परिषदेत मांडण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी असा एखादा ठराव पारित करून विद्यापीठाकडे पाठविल्यास त्याचा फायदा होऊ शकेल असे वाटते. प्रथम याबाबतीत माझा विचार मांडतो. कृपया अभ्यासमंडळाच्या सदस्यांनी याची नोंद घ्यावी.

ज्याप्रमाणे भूगोल विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा असते व त्यामुळे त्या विषयाचे विद्यार्थी जसे तासिकांना अनुपस्थित नसतात, भूगोल विषयाची प्रात्यक्षिके असतात, प्रात्यक्षिक परीक्षा असतात, हीच बाब संस्कृत विषयाच्या अभ्यासमंडळाने हेरून संस्कृतची प्रात्यक्षिक परीक्षा ठेवलेली आहे किंवा ज्या ज्या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा असतात त्या विषयांचे आवर्जून तास होतात तशीच मराठी विषयांच्या, म्हणजे मराठी अनिवार्य व मराठी वाङ्मय या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा असल्यास विद्यार्थी मराठीचे तास टाळणार नाहीत असे मला वाटते. आता मराठी विषयाची प्रात्यक्षिके कशी? तर वर्गात वाचायला शिकविणे, कारण काही विद्यार्थी ज्या व्यवस्थेतून आलेले असतात, तेथे वाचनच शिकविलेले नसते. मग ते उत्तीर्ण कसे होतात? या प्रश्नाचे उत्तर

तुम्हाला माहीत असल्यामुळे मी देणार नाही. त्यानंतर निबंध लेखन, पत्रलेखन, जाहिरातीचे मसुदे तयार करणे, वक्तृत्व स्पर्धा, विविध विषयांवर सामूहिक चर्चा, विविध कला प्रकारांच्या चर्चा, दूरदर्शन संचाच्या माध्यमातून प्रत्यक्ष नाटक पाहणे, नवनव्या ग्रंथाची ओळख, त्यांची समीक्षा करण्याच्या रीती वगैरे या निमित्ताने विद्यार्थी पुस्तके वाचायला लागतील, अभ्यास करायला लागतील. अशा लेखी प्रात्यक्षिक परीक्षांमध्ये अनिवार्य मराठीत पत्रे, जाहिरातीचे मसुदे, वेगवेगळे अर्ज, तक्रारी हा भाग १० गुणांचा, तर १० गुणांचे व्याकरणाशी संबंधित मुलाखतीद्वारे घेण्यात येणारे प्रश्न असावेत. म्हणजेच ८०—२० अशी गुण विभागणी असावी. झाले आहे काय की, ज्या उद्देशाने विद्यापीठाने पत्रलेखन विद्यार्थ्यांना आले पाहिजे ही अपेक्षा व्यक्त केली होती, ती अपेक्षा आज जरी पूर्णत्वास जाऊ शकत नाही. प्रात्यक्षिक परीक्षांच्या माध्यमांतून साकार होईल कारण तुम्हाला माहीतच आहे की, विद्यापीठाचा परीक्षा विभाग या पत्रांच्या पत्यांवर कशा चिठ्ठ्या लावतो. तो भाग तपासताना आपल्यालाही त्यातले फारसे कळत नाही. मग टाका सरासरीने गुण म्हणून वाटते की प्रात्यक्षिक परीक्षा असावी. प्रात्यक्षिक परीक्षांच्या माध्यमांतून विद्यार्थ्यांना अर्ज, विनंती, तक्रार करता येईल असे लेखनतंत्र गवसले पाहिजे हा उद्देश अशा प्रात्यक्षिक परीक्षांच्या माध्यमांतून साकार होईल.

वाङ्मय विषयाच्या बाबतीत प्रात्यक्षिक परीक्षेसाठी असा अभ्यासक्रम असावा की, क्रमिक पुस्तकाशिवाय इतर कोणतीही पुस्तके विद्यार्थ्यांनी वाचली ते पहावे. ज्या दर्जाची पुस्तके विद्यार्थ्यांने वाचली असतील त्या आधारावर त्याची गुणवत्ता ठरवावी. त्यावर प्रश्न विचारावेत म्हणजे खरेखोटे कळून येईल. त्यामुळेच खऱ्या अर्थाने त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडून येऊ शकतो. आता वाचणे गरजेचे आहे असे त्यांना वाटायला लागेल. अर्थात आपलीही जबाबदारी वाढेल हे तर ओघाने आलेच, कारण पुस्तके वाचावीत ते आपल्याला विद्यार्थ्यांना सांगावे लागेल. की आपण करूही; पण दुसरी आणखी एक धक्कादायक बाब पुढे येत आहे. विद्यार्थी कधीकधी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणतात "सर तुम्ही देत असलेल्या शिक्षणाचा काय उपयोग आहे? शेवटी आम्ही बेकारच राहणार आहोत. बारावी झाल्यानंतर डी.एड.ला प्रवेश घ्यायचा होता. दोन लाख डोनेशन मागितले. कुठून आणायचा आम्ही हा पैसा? जे.डी.एड. झाले त्यांना शिक्षणसेवक होण्यासाठी पुन्हा तीन लाख द्यावे लागतात. पदवीधर झाल्यानंतर बी.एड.ला.ॲडमिशन घ्यायची असल्यास तीन लाख डोनेशन द्यावे लागते. आणि तरीही नंतर नोकरीची शाश्वती नाही.

प्राध्यापक व्हायचे असल्यास सर्व प्रकारची योग्यता असूनही पाच लाखांचे डोनेशन द्यावे लागते.” हे भाव आणखीही वाढू शकतात. विद्यार्थ्यांचा हा आर्थिक व सामाजिक अनुभव, आपल्याही चांगलाच परिचयाचा आहे. ज्यांच्याजवळ पैसा आहे ते देतातही. पण ज्यांच्याजवळ गुणवत्ता आहे पण पैसा नाही त्यांचे काय? मुलांचे वय एकीकडे ३५ च्या वर चालले आहे, तरीही तो बेकार राहतो. विवाहाचे वय टळून गेल्यामुळे मानसिक तणाव वाढत असतो. यामुळे घराघरात जी अस्वस्थता निर्माण होत आहे, झालेली आहे यावर काही मार्ग निघू शकतो का? यास्तव हा प्रश्न आपल्यापुढे ठेवत आहे.

शिक्षणसंस्था चालकांचे अशाप्रकारचे वर्तन मानवातल्या अमानवीपणाला आवतनच देत आहे असे वाटते. शिक्षणसंस्था चालकांचे म्हणणे असे की, आम्हाला सरकार अनुदानच देत नाही. आम्ही कशाच्या आधारावर संस्था चालवायच्या? हा त्यांचा युक्तिवाद निरर्थक असला, तरी ज्यांच्याजवळ भरपूर आहे त्यांच्याकडून जरूर घ्या परंतु ज्या शिक्षण संस्थांना अनुदान मिळते यांचे चालक तरी प्रामाणिक आहेत काय? याचेही उत्तर नकारार्थी द्यावे लागेल. सर्वच संस्थाचालक असे वागतात असे मला म्हणावयाचे नाही पण ज्या संस्थांचे चालक असे वागत नाहीत ते एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतके तरी आहेत काय? याचे उत्तर नाही असे दुर्देवाने द्यावे लागते. परिणामी एक भकासपणा विद्यार्थ्यांत शिरू लागतो, या जगातले आपले अस्तित्वच निरर्थक आहे असा निराशावाद तरुणवर्गात सगळीकडे पसरू लागला आहे. वयाची ३५ वर्षे उलटलेले तरुण जेव्हा रिकामे, बेकार म्हणून घरात असतात, त्या घरांतील मानसिकता कशी असते जरा कल्पना करून पहा. अजून सामाजिक संस्कारांची म्हणा की त्यांना विश्वासार्ह नेतृत्व मिळाले नाही म्हणून म्हणा, आज ते शांत आहेत. पृथ्वीच्या पोटात जसा ज्वालामुखी दडलेला असतो, तशी त्यांचीही मने पेटलेली आहेत. जेव्हा त्यांच्यातला समंजसपणा संपेल, तेव्हा अशा निराशेत आत्महत्या करून मरण्यापेक्षा ते कदाचित हाती शस्त्रेही धारण करू शकतील. याचे दुष्परिणाम अशी समाजव्यवस्था निर्माण करणाऱ्यांना निश्चितच भोगावे लागतील. म्हणून मानवतावादी दृष्टिकोन धारण करून संस्थाचालकांनी मला माझ्या देशातल्या तरुणाईला घडवायचे आहे, अशी कर्तव्यभावना बाळगून असंख्याचे शाप घेण्याचे टाळावे.

मित्रांनो !

जीवनात असे कितीही मानवी किंवा नैसर्गिक अडथळे येत असले

तरीही मला नेहमीच वाटत आले की,

आपुले कर्तृत्व आपुल्याच हाती ।
उद्धाराचा धाता माझा मीच ।।

अर्थात इतरांची मदत हवीच असते. या दोन ओळींचा अर्थ तुम्ही वाच्यार्थाने म्हणजे अभिधेने घेता की लक्षणेने घेता की व्यंजनेने ते ज्याचे त्यालाच ठरवायचे आहे, एवढेच मी येथे सुचवू इच्छितो.

आपण माझे भाषण ऐकले म्हणून पहिल्यांदा आपले आभार मानतो तसेच या परिषदेला अध्यक्ष म्हणून माझा जो सन्मान केला, त्याबद्दल परिषदेच्या आयोजकांचे आणि पुन्हा एकदा आपले सर्वांचे आभार मानून येथे थांबतो.

धन्यवाद !

❖❖❖

# २१ वे अधिवेशन
# श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय
# पुसद, जि.यवतमाळ
# २४ जुलै २००७
# अधिवेशनाध्यक्ष : प्रा. डॉ. बा. दा. जोशी

कर्मयोगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या एकविसाच्या अधिवेशनाचे उद्‌घाटक आदरणीय डॉ. कमल सिंह, कुलगुरू, अमरावती विद्यापीठ, मराठी प्राध्यापक परिषदेचे स्थायी अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब मांडवकर, उपाध्यक्ष डॉ. रा. गो. चवरे, विशेष अतिथी डॉ. केशव देशमुख, जालना, स्वागताध्यक्ष श्री.जय नाईक, अध्यक्ष, जनता शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद, आयोजक प्राचार्य डॉ.उत्तमराव रूद्रवार, या संस्थेचे सर्व मान्यवर आणि मराठी भाषा आणि वाङ्मयाच्या सन्माननीय उपासक बंधू भगिनींनो,

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या एकविसाव्या अधिवेशनाकरिता अध्यक्षपदी आपण माझी एकमताने निवड केलीत त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. वास्तविक मी सेवानिवृत्त होऊन चार वर्षे उलटली आहेत.

या परिषदेचे स्थायी अध्यक्ष डॉ.भाऊसाहेब मांडवकर, या मातृवत्सल संस्थेचे सर्व संचालक, पुसद महाविद्यालयाच्या स्वागत समितीतील सर्व स्नेही आणि परमस्नेही प्राचार्य डॉ. उत्तमराव रूद्रवार या सर्व मंडळींशी घनिष्ठ स्नेहसंबंध असल्यामुळे आपण अतीव आपुलकीने माझ्यावर ही जबाबदारी टाकली आहे. याची मला जाणीव आहे. वणी येथील प्रथम अधिवेशनापासून आतापर्यंतच्या बहुतांश अधिवेशनाला उपस्थित राहण्याचा नम्र प्रयत्न मी केला आहे. या परिषदेचा मी संस्थापक आजीव सभासद असून परिषदेने दिलेल्या निर्देशानुसार मी वेगवेगळ्या अधिवेशन प्रसंगी यथोचित सहभाग घेतला आहे. आज या अधिवेशनाच्या व्यासपीठावरून आपण जे विचारमंथन करणार आहोत, त्यात आपल्याबरोबरच मी या वाग्यज्ञात सहभागी आहे.

## इंग्रजी भाषेचा प्रभाव

खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यामुळे आज वर्तमानातील विश्वात मातृभाषेची अस्मिता कशी टिकवून दृढ करता येईल हाच

खरा प्रश्न आहे. संगणकाच्या आणि संवादाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारात, महत्त्वाकांक्षी स्पर्धेच्या दृष्टीने नूतन पिढी आंग्लभाषेमध्ये आकृष्ट केली जात आहे. गेल्या दशकापासून महाराष्ट्रात माय मराठी मातृभाषेच्या शाळांऐवजी इंग्रजी भाषा आणि माध्यमाच्या शाळा विना अनुदानित किंवा प्रसंगी कायम विनाअनुदानित धोरणाने चालविण्यासाठी शासन गतिमान झालेले आहे.

परिणामतः इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी बुद्धीने, ज्ञानाने स्पर्धेत सर्वोच्च स्थानांवर वरचढ ठरत असून, मराठीचे अभ्यासक विद्यार्थी कुपोषणग्रस्त, सोबती झालेल्या लहान मुलाप्रमाणे न्यूनगंडाने पछाडलेले आहेत. अशा न्यूनगंडाने प्रभावीत नूतन भाषा जिज्ञासू ज्ञानार्थी पिढीला मराठी भाषेच्या सार्थ अध्ययनाकडे कसे वळविता येईल, याचा विचार आपण केला पाहिजे. लोकशाही शासन प्रणालीत 'हे सर्व शासन करील' असे म्हणणे अप्रस्तुत आहे. काळ वेळ येताच जनतेचे, लोक प्रतिनिधींचे डोळे उघडतील आणि आपोआपच त्यांचे लक्ष मातृभाषेच्या अध्ययनाकडे वळेल अशी आशा बाळगणे भ्रममूलक आहे.

## आत्मचिंतन

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी याकाळात वास्तव्याला असलेल्या तत्त्वचिंतक कवी नारायण मुरलीधर गुप्ते उपाख्य 'बी' यांनी याबद्दल जी प्रतिक्रिया 'तीव्र जाणीव' या कवितेतून प्रकट केली आहे, ती उल्लेखनीय वाटते. देश स्थितीचे, लोक स्थितीचे, भाषिक अस्मितेचे प्रकट चिंतन त्यांनी येथे सादर केलेले आहे.

'आपोआप घडेल इष्टसमयी ते कार्य हे बोलणें
आहे भ्रामक! युक्त काय सगळे काळावरी टाकणे?
भागीदार कृतीत मानव असे कालानिसर्गासवे,
आणा त्यास समीप एकवटुनी यत्नप्रयत्नोत्सवे'

यासाठीच माय मराठीच्या प्राध्यापकांच्या परिषदेच्या आयोजनाचे प्रयोजन! आपोआप काही बदल, परिवर्तन, क्रांती होणार नाही त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावीच लागेल तरच आपण भाषिक स्वराज्याची फळे आणि गोडी चाखण्यासाठी मराठीची अस्मिता प्रस्फुरीत केली पाहिजे याची तीव्र जाणीव प्रकर्षाने मराठीच्या अध्यापक प्राध्यापकांना झाल्याशिवाय, तरणोपाय नाही.

## मराठीची पराधीनता

कला, वाणिज्य, विज्ञान या सर्व ज्ञानाच्या शाखोपशाखांतून आवश्यक

मराठी विषय शिकविला जातो. या आवश्यक भाषेला अनिवार्यता महाराष्ट्रात नाही. आवश्यक भाषा म्हणून हिंदी, संस्कृत, उर्दू असे पर्याय तिला उपलब्ध असल्यास मराठीला आपोआपच दुय्यम स्थान प्राप्त होते. विद्यापीठांच्या अभ्यासक्रम पत्रिकेत, महाविद्यालयाच्या माहितीपत्रकामध्ये जी विषय प्रणाली दिलेली आढळते त्यात अग्रक्रमाचे प्राथम्य देऊन इंग्रजी विषयाची गरज प्रतिपादन केली असून, ज्या इतर भाषा अनिवार्य गटातून निवडाव्या लागतात त्यांचे वर्णन दुय्यम भाषा (Second Language) म्हणून केलेले आढळते. 'पाहुणा म्हणूनी आला अन् चार दिवसात घरधनी झाला' अशी स्थिती आपल्या महाराष्ट्रात आपणच इंग्रजीसाठी पायघड्या अंथरून तयार केली आहे. मराठी भाषा वाढवावी, मराठी संस्कृती जोपासावी ही तात्त्विकता सर्वांना पटते, पण आपल्याच वर्तनात तत्त्व आणि व्यवहार यात तफावत निर्माण झाल्याने मराठीचा अभिमान पोकळ ठरेल की काय अशी भीती वाटते. विसंगती टाळण्यासाठी संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांचे 'बोले तैसा चाले' हे वचन ध्यानी घेऊनच आपणास वाटचाल करावी लागेल. मराठी राज्यभाषा आहे, मराठी राजभाषा आहे, आज अशा घटनात्मक सन्मान्य स्थितीत न्यायालयीन, न्यायनिवाडे, निकालपत्र, शासकीय आदेश, शासनाचे कामकाज इ. बाबतीत आमच्या मराठी भाषेला लागलेले ग्रहण अजून सुटलेले नाही असे दिसून येते. नागपुरात मुख्य रस्त्याला जे नाव दिले आहे ते 'वेस्ट हायकोर्ट रोड', असे आहे. औरंगाबादला मुख्य रस्त्याला जे नाव दिले आहे ते 'अदालत रोड' असे आहे. विदर्भातील विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात इंग्रजीला प्राधान्य, मराठवाड्याला आपण साधुसंतांची कर्मभूमी आणि मराठीचे माहेर मानतो तेथे यावनी–उर्दू भाषेचे प्राबल्य, अशा अवस्थेत मराठीची वाटचाल लोक व्यवहारात विशेषत: सुशिक्षित जाणत्या नागरिकांना अंग चोरून आहे असे वाटते. अशा विमनस्क, अस्मिताशून्य अवस्थेतून स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील विद्यापीठात मराठीला उपेक्षेने रहावे लागत आहे.

स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकरांनी यांच्या 'सागरास' या कवितेतून राष्ट्रोद्धाराची तळमळ व्यक्त करताना.

"जरी उद्धरणी व्यय न तिच्या हो साचा
हा व्यर्थ भार विद्येचा"

असे म्हटले आहे. आपल्या विद्येचा उपयोग, आपल्या ज्ञानाचे सामर्थ्य आपल्या मातृभाषेला मिळते का? मातृभूमीसाठी जे स्वाभिमानाचे आणि कर्तव्याचे धोरण आपण ठेवणे आवश्यक आहे तोच मानदंड मातृभाषेसाठी का

लावू नये असा प्रश्न पडतो. मराठीला अंतःकरणात स्थान देऊन, भावनात्मक ऐक्याचे सूत्र मनी ठेवून, जर आपण वर्तन करावयाचे ठरविले तरच मराठीला चांगले दिवस येतील 'हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडू' असे डॉ.ना.गो. नांदापुरकरांचे जे म्हणणे आहे, त्याप्रमाणे आमची पुढील वाटचाल करावयाची असेल तरच मराठीला भावीभाग्यसूचक चिन्हे दिसण्याची अपेक्षा करता येईल. यासाठी क्रियाशील राहून भाषिक अस्मितेने वाटचाल करावयाची आहे. इतर शिक्षक, प्राध्यापक कर्मचारी संघटना वेतनवाढ, पगारवाढ, वेतन आयोग, यांच्या मागण्यात व्यस्त असतात; परंतु मराठी प्राध्यापक परिषदेने मात्र अशा वाढीची अपेक्षा करताना लोकमानसात मातृभाषा प्रेमाची वाढ रुजविली पाहिजे.

## आमची कर्तव्यनिष्ठा

'थांबला तो संपला' असे म्हटले जाते. म्हणूनच सदैव जागरूक आणि संघटित राहिलेच पाहिजे. सण, महोत्सव, जयंती इ. स्मृतिचिन्हे सांस्कृतिक अस्मितेची द्योतक मानली जातात. संमेलने, परिषदा, अधिवेशने ही या संदर्भात महत्त्वाची सुसंवादाची केंद्रे आहेत. संघटनेचे चक्र चालविताना, फिरविताना आत्मबल जागवलेच पाहिजे. एकदा आपण मराठी भाषा आणि वाङ्मयाची स्नातकोत्तर पदवी घेतली म्हणजे 'धन्यो हं धन्यो हं' म्हणून प्राध्यापकपदी रुजू होताच आत्मकेंद्री, आत्मतुष्ट बनून निष्क्रीय बनतो हे कितपत अध्ययन आरोग्याचे चिन्ह मानता येईल? संघटना बळावर आणि अध्ययनाच्या तपःपूत सामर्थ्यांवरच आपली आपल्या मातृभाषेबाबत मान ताठ होऊ शकेल. यासाठीच अशा अधिवेशनातून आत्मचिंतन करून आपली कर्तव्यनिष्ठा प्रकट केली पाहिजे.

वरिष्ठ महाविद्यालयातील मराठीच्या प्राध्यापकांच्या मुलाखतीकरिता कुलगुरूंचे प्रतिनिधी म्हणून जाण्याची संधी मला मिळाली होती. एका महाविद्यालयात मुलाखतीसाठी गेलो असता स्वागत–निवास इ. व्यवस्था संस्थेने चोख ठेवली होती. पण अगोदरच त्या संस्थेच्या महाविद्यालयात दोन वर्षांपासून मराठीचे प्राध्यापक म्हणून सेवा देणारे एक प्रतिनिधी मुलाखतीस उपस्थित होते. त्यांना विचारले, 'आपण शिक्षण, पदवी, पदव्युत्तर शिक्षण कोठून घेतले?' तेव्हा त्यांनी सांगितले की, 'पुणे विद्यापीठातून', 'विशेष अभ्यास काही केला आहे काय? अभ्यासात विशेष ग्रंथकार कोणते होते?' तेव्हा ते म्हणाले 'विशेष ग्रंथकार वगैरे नाहीत, पण व्याकरणाचा विशेष अभ्यास एका प्रश्नपत्रिकेसाठी केला होता.' वाङ्मय पारंगत असलेल्या, दोन वर्षे मराठी भाषा आणि

वाङ्मयाचे अध्यापन केलेल्या त्या व्यक्तीस त्याच्या आवडीच्या विषयाबाबत म्हणजे व्याकरणाच्या बाबतीत काही सामान्य प्रश्न विचारले, त्यापैकी पहिला प्रश्न 'सर्वनाम कशाला म्हणतात?' असा होता. याबाबत मुलाखत देणारे निरुत्तर झाले. त्यांना पुन्हा विचारले, 'प्रथम पुरुषवाचक सर्वनाम सांगा?', त्याचेही उत्तर त्यांना देता आले नाही. माध्यमिक शाळेतील अपेक्षित असलेल्या या व्याकरण ज्ञानाबाबत मराठी भाषा पारंगत असलेल्या तेव्हा चार अंकी आता पाच अंकी वेतन घेणाऱ्यांची अवस्था अशी चिंताजनक आहे. नेट आणि सेट या परीक्षांचे महत्त्व ध्यानात घेऊनदेखील असे म्हणावे लागते की, चार ओळी शुद्ध मराठीत म्हणण्यापेक्षा प्रमाण मराठीत बोलता येऊ नये अशी आजची स्थिती आहे. आत्मस्थितीचे ज्ञान होणे म्हणजे सुधारणेची पहिली पायरी असे विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी म्हटले होते. आपण ही आमच्या देशाची स्थिती ऐवजी 'आमच्या भाषेची स्थिती' याबद्दल चिपळूणकराप्रमाणे विचार केल्यास 'रसना' व 'लेखणी' या दोन साधनांनी आपणास आपला ध्येयवाद सिद्धीस नेता येईल. याबाबत डोळस दृष्टीचा अवलंब आपण कधी करणार?

## विद्यापीठातील भाषेच्या उजळणी वर्गाची स्थिती

प्राध्यापकांच्या ज्ञानाची उजळणी व्हावी, नवीन प्रवाहांचे आकलन व्हावे म्हणून विद्यापीठ अनुदान आयोग विविध विद्यापीठांत विविध विषयांचे उजळणी वर्ग, प्रबोधन वर्ग घ्यावयास अनिवार्य करीत आहे. वेतनवाढ व्हावी, पदोन्नती मिळावी किंवा निर्वेध निवृत्ती प्राप्त व्हावी, यासाठी अशा तीन वर्गांना उपस्थित राहणे अनिवार्य केलेले आहे. इतर विषयाबद्दल बोलण्याचा आपणाकडे अधिकार नाही. परंतु मराठी भाषा आणि वाङ्मयाच्या या वर्गातील काही साधन व्यक्तींचे चिंतन मर्यादित, अपूर्ण, संशोधन—संदर्भ विरहित असते असे आढळते. या साधनव्यक्ती आलटून पालटून 'साटेलोटे' जसे विवाह संस्कारात करतात तसाच प्रकार या व्यवहारात व्हावा ही बाब चिंताजनक आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचा याबाबत होणारा खर्च किती प्रस्तुत वा किती अप्रस्तुत आहे, हे या अभ्यासक्रमातून प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या अंकेक्षणाशिवाय सांगणे अशक्य आहे.

## प्रारंभापासून मराठीची उपेक्षा

कनिष्ठ महाविद्यालयीन अध्यापन कार्याच्या वेळापत्रकात मराठीची उपेक्षाच केली जाते. विशेषत: उन्हाळी विशेष अभ्यासवर्ग, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकीच्या प्रवेशासाठी घेतले जातात त्यात अभियांत्रिकीच्या तीन

विषयांबरोबर इंग्रजीला मान दिला जातो. लोकसेवा आयोगाच्या स्पर्धात्मक परीक्षांमध्ये अशीच स्थिती आढळते. मराठीचा अभ्यास करण्याची गरज नाही, त्यामध्ये काठावर उत्तीर्ण झाले तरी चालेल, विशेष गुणवत्ता विशेष विषयात प्राप्त करावयाची, हा संकुचित ध्येयवादच मराठी प्रगतीच्या वाटेवरील मोठा गतिरोधक आहे. वैद्यक शास्त्राचे अध्ययन करून बनलेले डॉक्टर किंवा अभियांत्रिकी स्नातक जेव्हा लोकसेवेच्या निमित्ताने समाजात येतात तेव्हा त्यांना योग्य राज्यभाषेचा वापर करता येत नाही. विशिष्ट ज्ञानाने उत्तम पदवीधर असलेल्या लोकांना प्रमाण मराठी बोलता, लिहिता येऊ नये ही बाब म्हणजे 'नाव गंगाधर पण आंघोळ नाही महिनाभर' या लोकोक्तीप्रमाणे आहे, असेच म्हणावे लागते. यासाठी मराठीचे ज्ञान आवश्यक मानून, त्या विषयाची प्रश्नपत्रिका येथे अनिवार्य केल्याशिवाय मराठी भाषेबाबत प्रगती करता येणार नाही. लोकप्रतिनिधी, कुलपती, कुलगुरू या सर्वांना शिक्षण मंत्र्याबरोबर विचारविनिमय करून मराठी भाषेच्या विशेष गुणवत्ता अभियानाचा प्रारंभ करावा असे आवाहन करावेसे वाटते. यवतमाळ जिल्ह्याच्या मराठी भाषेच्या शालेय शिक्षणातील लिपीच्या प्राथमिक अभ्यासाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की, 'ञ' हे अनुनासिक आहे हे शिक्षकांनाच ठाऊक नाही, ते वर्णमाला शिकविताना च छ ज झ ञ असे शिकवितात 'ञ' चा परिचय या अध्यापकांना नाही, विद्यार्थी तर दूरच राहिले. राष्ट्रभाषा दिन देशात साजरा केला जातो. राजभाषा दिनही शासकीय आदेशानुसार होईल पण मातृभाषा दिन हा कधी संपन्न होणार? मातृभाषेचा यथार्थ स्वाभिमान आमच्या कोणत्या कृती उक्तीतून दिसून येईल याच्या प्रतीक्षेत आपण आहोत.

## बृहन महाराष्ट्रातील मराठीचे अध्ययन, संशोधन

बृहन महाराष्ट्रातील विद्यापीठातून आणि साहित्य परिषदांमधून जे कार्य चालते ते भूषणावह आहे. हैद्राबाद येथील डॉ.ना.गो. नांदापूरकर, प्रा. भालचंद्र महाराज कहाळेकर, डॉ. माढेकर, आनंद साधले, नलिनी साधले, प्रा. डॉ.व.दा. कुळकर्णी, डॉ.श्री.रं. कुलकर्णी, प्रा. माणिक धनपलवार, डॉ.द.पं. जोशी, डॉ. पदमाकर दादेगावकर, प्रा. सुरेश कुलकर्णी इत्यादी अभ्यासकांच्या सहयोगाने सुलतान बाजारात 'मराठी महाविद्यालय' या नावाने महाविद्यालय चालविते जाते. जिद्द, चिकाटी या मंडळींनी टिकवून ठेवली आहे. त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. हीच स्थिती बडोदा, अहमदाबाद, दिल्ली, वाराणसी, ग्वाल्हेर, देवास, इंदौर, जबलपूर–सागर, रायपूर, गुलबर्गा येथे असलेल्या

अभ्यासकांनी टिकवून ठेवलेली महाराष्ट्र मंडळे ही भाषिक अस्मितेची सेवाकेंद्रे आहेत.

भाषावार प्रांतरचना घटनात्मक रीतीने मान्य केल्यानंतर द्विभाषिक मुंबई राज्य समाप्त होऊन महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. परंतु बेळगाव, कारवार, भालकी, संतपूर–हुमणाबाद, निपाणी, मुधोळ इ. ठिकाणी मराठी अस्मिताच दडपून टाकली जात आहे. लोकमताचा विचार लोकशाही शासनप्रणालीत प्रमाण आणि प्रभावी मानायला हवा, हेच आम्ही विसरत आहोत. सामान्य बाबींसाठी सर्वोच्च न्यायालयाकडे जाण्यास प्रवृत्त होणे ही समाधानाची गोष्ट नाही. बृहन महाराष्ट्रात साहित्य संमेलने होतात, मराठी प्रदेशात समाविष्ट करून घेण्याचे ठराव होतात आणि केंद्रातील लोकशाही शासनकर्ते त्याची गांभीर्याने दखल घेत नाहीत ही चिंताजनक बाब आहे. सरहद्दीवरील मराठी लोकांना कानडी सक्तीची म्हणून शिकावी लागणे, कोणत्या भाषिक स्वातंत्र्याचे प्रतीक मानता येईल? आपण मराठीच्या प्राध्यापक मंडळीनी महाराष्ट्र शासनाचे लक्ष या समस्येकडे वेधले पाहिजे.

## मराठी अभ्यास मंडळ आणि मराठी प्राध्यापक परिषद यांचे परस्पर संबंध

विद्यापीठांची मराठी अभ्यासमंडळे आणि मराठी प्राध्यापक परिषद यांचे संबंध अन्योन्याश्रयी आणि अन्योन्यपोषक असे आहेत. अभ्यासमंडळ पदवी–पदव्युत्तर, पारंगत या अभ्यासक्रमाची रूपरेषा ठरविते. सूक्ष्म वाचन व स्थूल वाचन निश्चित केले जाते. अभ्यासक्रम नेमताना उपलब्ध पुस्तकेच नेमावीत असा दंडक असला पाहिजे. अमरावती विद्यापीठाच्या एम.फिल.च्या अभ्यासक्रमात 'राजे जाधवरावाची बखर' नेमली होती त्यावेळी ती उपलब्ध असताना शिकवली जात नसे. किंबहुना अभ्यासक्रमात नेमलेल्या एखाद्या पुस्तकाला वगळले तरी चालते, अशी पळवाट सांगितली जात असे. वामन पंडितांच्या 'पंचसुधा' काव्याबाबत असेच धोरण ठेवले जात असे, हे आपले दुर्दैवच म्हणावे लागेल. म्हणून सर्व संशोधक–अभ्यासक मान्यवर प्राध्यापक मंडळींना असे आवाहन करावेसे वाटते मराठी प्राध्यापक परिषदेत झालेल्या विचारमंथनाची गांभीर्याने दखल विद्यापीठाने घेतली पाहिजे. महाराष्ट्रातील इतर विद्यापीठात जे अभ्यासक्रम आहेत त्याच्या समतोल आपला अभ्यासक्रम असावा असे म्हणावे लागेल. काही समान प्रश्नपत्रिका व काही प्रादेशिक वैशिष्ट्यांसह अभ्यासक्रम तयार केला पाहिजे. गेल्या दोन दशकात विद्यापीठांची

व ग्रामीण महाविद्यालयांची संख्या वाढली आहे; वाढतच आहे. आता तर विनाअनुदान तत्त्वाचा अवलंब होत असून अजून प्रगतीचे पुढचे पाऊल म्हणजे कायम विना अनुदान तत्त्वांचा अंगीकार केला जात आहे. जेथे प्राध्यापकांच्या वेतनाची तरतूद नाही तेथे ग्रंथालये, प्रयोगशाळा, संगणकप्रणाली याबाबत विचार न केलेलाच बरा. ज्या ग्रामीण परिसरात ही नवी महाविद्यालये उघडली गेली आहेत. तेथील बोलींचा अभ्यास झाला पाहिजे. घड्याळी तासिकांवर प्राध्यापक नेमून एका महिन्याच्या वेतनात दहा महिने काम करून घेणे हे एक वेठबिगारीचे काम बनले आहे. ही पद्धती त्वरित बंद केली पाहिजे.

## लोकसाहित्य आणि विविध बोलींचे सर्वेक्षण कार्य

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर डॉ. सरोजिनी बाबर यांच्या अध्यक्षतेखाली जशी लोकसाहित्य संकलन समिती नेमली गेली, त्यांनी जे कार्य केले ते फार मोलाचे आहे, यापुढेही निरनिराळ्या परिसरात उपलब्ध लोकसाहित्य जमवून, निवड करून त्याचे यथोचित अध्ययन झाले पाहिजे. तसेच डॉ.ए.एम. घाटगे, संचालक, डेक्कन कॉलेज पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बोलीचे सर्वेक्षण करण्यासाठी जी समिती नेमली होती त्यांनी (Survey of Marathi Dielect) मराठी बोलीचे सर्वेक्षण असा प्रकल्प हाती घेतला होता. भाषिक अध्ययनासाठी आपण भाषाशास्त्रज्ञ ग्रिअर्सनने केलेल्या 'Linguistic Survey of India' या कार्यावरच विसंबून राहणे कितपत उचित आहे, हे ध्यानात घेऊन, कोकणातील पाच–सहा बोलींचा अभ्यास केला गेला, पुढे निधीअभावी आणि साधन व्यक्तीअभावी हे कार्य बंद पडले आहे. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेने या परिसरात ज्या बोली आहेत, त्यांचे संकलन–संग्रह, संशोधन करावयास हवे, तरच या बोली टिकतील. आता इलेक्ट्रॉनिक उपकरणे उपलब्ध झाल्याने पूर्वीपेक्षा अभ्यासासाठी सोयी उपलब्ध झाल्या आहेत. बुलडाणा व मध्यप्रदेशाच्या सरहद्दीवरील संमिश्र बोली, अहिराणी समान असलेल्या बोली, अकोला, वाशिम, यवतमाळ, अमरावती या जिल्ह्याचे नव्याने गॅझिटिअर्स तयार होत असताना या बोलीचे गांभीर्याने अध्ययन करून आपले सामाजिक ऋण फेडले पाहिजे.

## औद्योगिकरण आणि मराठी भाषेतील वाढते प्रदूषण

शेतकरी कारखानदार झाला पाहिजे हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक यांचे स्वप्न होते. त्यांनी त्यासाठी मन:पूर्वक प्रयत्न केले पण या औद्योगिक क्रांतीने ग्रामीण बलुतेदारी मोडीत निघाली असून, व्यवसाय

जनित शब्द कालवश होत आहेत. वास्तविक विविध जातीजमातीतून जेव्हा लेखक जन्मास येतील तेव्हा त्या त्या भाषेतील नवेशब्द आल्याने भाषा कशी समृद्ध होते हे मत प्रा.श्री.म. माट्यांनी 'भाषावृद्धींची सामाजिक दृष्टी' या निबंधातून मांडले होते. भाषावृद्धीची जशी 'सामाजिक दृष्टी' असते, तशीच सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय इ. दृष्टीने भाषांचे अध्ययन करणे हितावह असते. भाषेच्या अभिवृद्धीचा जसा अभ्यास होऊ शकतो तसाच भाषांचा, बोलींचा कालवश होणाऱ्या प्रक्रियेचा अभ्यास झाला पाहिजे. कृषी उद्योगाचे उदाहरण घेऊन सांगायचे झाल्यास पूर्वी शेतात पिकांचे खळे करावे लागत असे. त्यासाठी जी प्रक्रिया होती त्यांचे वाचक काही शब्द होते. आता उपनेर व नंतर मळणीयंत्र आली त्यामुळे खळ्यांशी निगडित शब्दप्रणाली कालवश होत चालली आहे. २०१० पर्यंत आपण उदासीन राहिलो तर या शब्दांचे अर्थ कोशातच शोधावे लागतील. उदा. काही शब्द आहेत. मेढ, फरसडी, खुरवत, तिवाळा, उपनवटी, रास, गोंडर, आकण, निकण, मदन, मळण, रासुंडा, डाव्हरा इ. खळ्याबाबतची शब्दसंपदा, तसेच मण, खंडी, पासरी, धडा, अडसरी, शेर, अच्छेर, पावशेर, नवटका, चिवटाक, अशी मापांची नावे, बैल गाडीशी निगडित अवजारे, सुतार, लोहार, यांच्या व्यवसायातील काही शब्द असे आहेत. धाव, आरू—पारीस, मानी, बंद, चुडे, मांडगं, धुरे—करळी, दंडे, डोमाळे—ढकली, पेचकाड, घोडी, पाचर, शेव, करळ, डवरणे, कोळपणे, दुंडणे, रानसावडी, मोघडा, भारणी, उभाट्या, पायट्या, वळाणी, वापसा, इळत, बेरणे, बिवड, येटन, आलंगे, वाख, इत्यादी उदीमबाबतची शब्दसंपदा, झोपडी बांधतांना कुड, धारण, आडे, वासाटे, सांगड, बोफले, वळनाटी, बंधाटी, सुवा, मोहगुळ, व्हरका, डाळण, मुडा इत्यादी शब्द, शाडा गवत—कुसळी, गोंडाळ, मार्वेल, पवना, शिप्रुड, हरळी, लव्हाळी, कुंधा, कावस, बावंची, कुर्डू, इचडा, तरोटा, दिवाळी, बेशरम, मडकेफोडी, भोकरन, ढोरगुंज, इ. शब्दांचे तणनाशक औषधीमुळे अस्तित्वच शिल्लक राहणार नाही. या शब्दांचे अस्तित्व टिकवून बोली व तिच्यातील शब्द टिकले—टिकविले तरच भाषेला नव संजीवन मिळेल. बोलींच्या पोषणातूनच प्रमाणभाषेचे वैभव अभिवृद्ध होत जाईल. आपल्या परिसरातील अशा शब्दसंपत्तीच्या संवर्धनाबाबत मराठीच्या प्राध्यापकांनी सतर्क राहिले पाहिजे.

## प्रसार माध्यमातील मराठीचे स्वरूप

वृत्तपत्रे व नियतकालिकांतून पूर्वी भाषेचे उत्तम पोषण केले जात

असे. 'लोकसत्ते'सारख्या दैनिकातून कै.ह.रा. महाजनींच्या काळात 'रविवारची चिंतनिका' विचारप्रवण आणि शुद्ध असे. आता मात्र लोकसत्तेचे शुद्धलेखनात गांभीर्य आढळत नाही. जाहिरातीमुळे अर्थप्रवणता इतकी वाढली आहे की, जाहिरातदार जसे सांगेल तसे छापण्यासाठी व्यवस्थापन तयार असते. मुंबई, १२ जुलै २००७ च्या अंकात पृष्ठ १० वर मध्यरेल्वेची एक जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. ती निविदा असून देवनागरी मराठीतून छापलेल्या या जाहिरातीचे आकलन सर्व सामान्य मराठी माणसाला अशक्य आहे. त्यातील काही शब्द, असे 'प्रदर्शन माध्यमात पुढील बाबींचा समावेश असेल. बोर्ड, होर्डिंग्ज, बॉऊण्डरी, वॉल्सवर पेटींग, ग्लोसाईन, निऑन साईन, स्कॉलर्स ट्रिव्हिजन्स, इलेक्ट्रॉनिक वॉल्स, बलून्स, युनि—पोल्स शोकेसेस, पॅनल्स, व्हिनियल स्टिकर्स, फुट ओव्हर ब्रिजेस, कॉनकोर्सेस, ट्रॅकसच्या लगतची जागा, इ. या शब्दांतून कोणते आणि किती आकलन मराठी लोकांना होईल यासाठी प्रतिशब्द तयार करून व्यवहारात आणले पाहिजेत.

## शुद्ध मराठीचा आग्रह अत्यावश्यक

मराठी भाषेबद्दल महाराष्ट्रातील सर्व जनतेला अभिमान आहे. आता कायद्याने दुकानावरील पाट्याही मराठीत लिहिण्याची सक्ती आहे. दूरदर्शन, शासकीय कार्यक्रम, चित्रपटांची श्रेयनामावली, विविध वस्तूंच्या जाहिराती दाखविण्यात येतात. न्याय निवाडे, शासकीय आदेश मराठीतूनच असले पाहिजेत असा मानदंड असल्याशिवाय मराठीला राजभाषेचा मान मिळणार नाही. वृत्तपत्रांत जाहिराती, बातम्या, अग्रलेख व अन्य लिखाण प्रसिद्ध होत असते. यात शुद्धलेखनाच्या असंख्य चुका दिसून येतात. शब्दांचे, वाक्यांचे संदर्भ, अर्थ, इकार, उकार, अनुस्वार शुद्धलेखनाच्या नियमांनुसार नसतात. मराठी साहित्य महामंडळाने शुद्धलेखनाची जी नियमावली तयार केली आहे तिचा अवलंब मराठीच्या अभ्यासकांनी आग्रहाने केलाच पाहिजे.

महाराष्ट्र शासनाने तीन कोटी रुपये खर्च करून प्रकाशित केलेल्या मराठीच्या शालेय अभ्यासक्रमातील भाषेच्या एका वर्गाच्या पाठ्यपुस्तकात दोनशे छपन्न चुका असल्याचे दिसून आले. त्या चुका शासनाने मान्य केल्या असून, या पाठ्यपुस्तकांचे नव्याने मुद्रण करणे सुरू आहे. तज्ञ अभ्यासमंडळ इतके उदासीन तेथे शिक्षण सेवकांची काय कथा? अशुद्ध मराठी भाषेचा चुकीचा संदेश मराठी जनतेस दिल्याने या भाषेचे किती नुकसान होत आहे, याची जाणीव माध्यमांनी ठेवली पाहिजे; आता शुद्धलेखन, अशुद्ध लेखन

राहिले नसून, बेशुद्ध लेखन रूढ झाले असून त्याचे समर्थनही केले जात आहे. जी दुर्दैवाची गोष्ट आहे.

## विद्यापीठीय मराठी संशोधनाचा दर्जा उंचवावा

महाराष्ट्रात मराठी संशोधन कार्य सर्वच विद्यापीठातून चालू असते. नव्या जाणीवा, नवे आकलन, नवे संदर्भ, नवीन संकल्पना जाणून ग्रामीण, नागरी–महानगरी, आदिवासी, दलित, प्राचीन, मध्ययुगीन आधुनिक–जनवादी या सर्व प्रवाहांचा वेध घेवून मानव्यविद्या अर्थपूर्ण करता येईल. संशोधनात पुनरुक्ती टाळणे सामाजिक दृष्टीने हिताचे आहे. महाराष्ट्रातील आणि बृहन महाराष्ट्रातील आतापर्यंत झालेल्या मराठी संशोधनाची सूची सिद्ध करून नोंदणी झालेल्या २००७ पर्यंतच्या अभ्यासकांची नावासह, विषयवार बृहत सूची प्रकाशित करणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या संगणक युगात हे काम सुलभ झाले आहे. संशोधन एम.फिल. किंवा पीएच.डी.चे असो, त्यांचे गांभीर्य सांभाळले पाहिजे, वाङ्मयीन नियतकालिकांचा परामर्श व त्यांचे अध्ययन झाले पाहिजे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, महाराष्ट्रातील विविध बोली यांचे संशोधन गांभीर्याने झाले तरच विद्यापीठाचे ध्येय सिद्धीस जाईल.

आपण माझे विचार ऐकून घेतले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. ज्या संस्थेने आणि महाविद्यालयाने मला बोलावून माझा सन्मान केला व ही संधी उपलब्ध करून दिली, याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. सर्वांना शेवटी असे आवाहन करतो की,

'स्मरोनी आत्मकर्तव्या प्रयत्नांची करी रास,<br>
स्व चोखाळितो वाटा तयांचा देवही दास'

ही कविवर्य यशवंतांची काव्यपंक्ती सदैव ध्यानी मनी स्वप्नी असू द्यावी एवढेच!

जय महाराष्ट्र!

❖❖❖

# २२ वे अधिवेशन
# श्रीमती शंकुतलाबाई धाबेकर महाविद्यालय
# कारंजा (लाड), जि. वाशीम
# १४ मार्च २००९
# अधिवेशनाध्यक्ष : प्रा. डॉ. सुशीला पाटील

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यंदाच्या मराठी प्राध्यापक परिषदेच्या अध्यक्षस्थानी आपण माझी एकमताने निवड केली, याबद्दल मी आपली मन:पूर्वक आभारी आहे. आपल्या या निवडीत माझ्या योग्यतेपेक्षाही आपल्या साऱ्यांचा माझ्याविषयीचा स्नेह अन् आदर हाच वरचढ ठरला यात शंका नाही. अलीकडे अध्यक्षपदासारखी सर्वच पदं अतिशय अटीतटीची, कटकटीची, खटपटीची अन् लटपटीची झाली आहेत. त्यामुळे असल्या पदावर आपण कधी आरुढ होऊ असं मला स्वप्नातंही वाटलं नव्हतं. तशी इच्छाही मनात कधी निर्माण झाली नव्हती. पण अनेकदा सत्य हे कल्पितापेक्षाही अनोखं रूप घेऊन पुढ्यात उभं राहतं. तो अनुभव मी सध्या घेत आहे.

माझी ही निवड म्हणजे प्राचार्य डॉ. फाले यांच्या मनीषेचा विजय आहे. त्यांच्यासारखा जू, नम्र अन् सरळ स्वभावाच्या व्यक्तीचा आग्रह मला मोडवला नाही. डॉ. फाल्यांच्या उत्कट मनीषेला माझ्या अन्य विद्यार्थी– प्राध्यापकांचाही पुरेपुर पाठिबा होता. त्यामुळे डॉ. फाल्यांची शक्ती अधिकच वाढली. आणि एकूणच माझ्या विद्यार्थ्यांपुढे माझं काही चाललं नाही. 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' – या वचनाचा मी एका वेगळ्या अर्थाने आज अनुभव घेतला. गुरूच्याच प्रातांत शिष्य पुढे गेला तर गुरूला आनंद होतोच, पण इथं मात्र गुरूच्या मनांत नसलेल्या पण शिष्यांच्या मनात असलेल्या इच्छेला शिष्यांनी मूर्त रूप दिले. त्यांचा हट्ट त्यांनी पूर्ण केला. मी पराभूत झाले आणि म्हणूनच आज मी आपणापुढे उभी आहे!

माझ्या पुढ्यात बसलेल्या प्राध्यापकांपैकी बरेचसे माझे एकेकळीचे विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकाचा असा सन्मान करावा, ही बाब आजच्या काळात कौतुकास्पद आहे. त्याबद्दल मी त्यांच्याप्रत कृतज्ञता व्यक्त करते आणि मला हा सन्मान त्यांनी दिला, याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजते.

## प्राध्यापक परिषदेची उद्दिष्टे

प्रत्येक विद्यापीठात त्या त्या विषयांच्या प्राध्यापकांची वर्षातून दोनदा तरी अशी परिषद भरावी, अशी प्रथा आहे. या परिषदेत त्या त्या विषयाच्या अध्यापकांनी एकत्र येऊन आपल्या समस्यांचं–प्रश्नांचं प्रगट चिंतन मनन करावं आणि सामूहिक चिंतनातून आपल्या समस्यांची उत्तरं शोधावी आणि त्याद्वारा आपलं अध्यापन अधिक विद्यार्थीभिमुख करावं – अशा हेतूंनी या परिषदांचं आयोजन होत असतं. प्राध्यापकांच्या अध्यापनाशी निगडित असलेल्या कोणत्याही समस्येचं विचारमंथन इथं होऊ शकतं. या समस्या कधी पाठ्यपुस्तकांविषयी, अभ्यासक्रमाविषयी, अध्यापनाविषयी, शिक्षणव्यवस्थेविषयी तर कधी वेळापत्रक – तासांची विभागणी वा संस्थेच्या अन्य प्रशासकीय बाबींविषयी असतील.

साधारणपणे एका विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांत सर्व विषयांचे अभ्यासक्रम सारखेच अभ्यासले जातात. त्यामुळे सर्व विषयांच्या सर्व प्राध्यापकांच्या काही समस्या समान असू शकतात. या साऱ्यांना अशा परिषदांतून ठोस उत्तरं मिळू शकतात. आपापल्या विषयाच्या संदर्भात प्राध्यापकांना विचाराचं मुक्त आदान–प्रदान करता यावं आणि परस्परांना परस्परांचं बौद्धिक–भावनिक सहकार्य लाभावं. साऱ्यांचाच अध्यापनाचा मार्ग सुकर व्हावा– अशा प्रकारचे अनेक हेतू या परिषदांच्या आयोजनामागे असतात.

## मराठी प्राध्यापक परिषद

ही मराठी प्राध्यापकांची परिषद आहे. त्यामुळे प्रामुख्याने मराठी विषयातील समस्यांचा इथे ऊहापोह व्हावा – असं वाटतं. मराठी साहित्य हा माझा आयुष्यभराचा चिंतनविषय होता आणि आहे. आपण माझे विद्यार्थी! त्यामुळे वडीलकीच्या नात्यानं आजच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाविषयी, साहित्याच्या सामर्थ्याविषयी, मराठीच्या प्राध्यापकांविषयी मला जे वाटतं ते आपल्यापुढे ठेवावं–असा माझा मानस आहे.

## अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके

शालांत अभ्यासक्रमाच्या पुढचा टप्पा महाविद्यालयीन अभ्यासक्रमाने गाठावा. त्या अनुरोधाने पाठ्यपुस्तक समितीच्या सदस्यांनी पाठ्यपुस्तकांची

निर्मिती करावी. सध्याचं चित्र तसं नाही. विद्यापीठ पातळीवरील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना पेलवणार नाही, म्हणून अगदीच हलकाफुलका सिद्ध केला जातो. तो तसा नसावा. विद्यार्थ्यांची ग्रहण क्षमता प्रचंड असते. ती शमवण्याकरता अभ्यासक्रम आणि प्राध्यापक दोघेही कमी पडताना दिसतात. असं माझं निरीक्षण आहे. पाठ्यपुस्तकनिर्मिती मंडळाच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांचं असं अवमूल्यन करू नये.

पाठ्यपुस्तकं दर्जेदार आहेत की नाहीत, ती कोणत्या निकषावर नेमली गेलीत, त्यांची अंगभूत गुणवत्ता काय आहे — याचा विचार प्राध्यापक परिषदेने करावा. अनेकदा दुर्मिळ पुस्तकं नेमली जातात. ती उपलब्ध होत नाहीत. परिषदेला आलेल्या एखाद्याला जरी ती पुस्तकं मिळण्याचं ठिकाण माहीत असलं तरी तो या व्यासपीठावरून ती माहिती सर्वांना देऊ शकतो. किंवा या संदर्भात दुसरी काही कार्यवाही होऊ शकते का, यासंबंधी इथं विचारविनिमयही होऊ शकतो.

## अध्यापन पद्धती

विषयाच्या अध्यापनात एक निश्चित असं समान धोरण असावं. एखादा पाठ, एखादा उतारा, एखादी कविता विद्यार्थ्यांपुढे कशी ठेवावी यावर इथं चर्चा व्हावी. या चर्चेने प्रत्येक प्राध्यापकाचं अध्यापन सामर्थ्य संपन्न होईल. अभ्यासक्रमाच्या मूल्यमापनाबरोबर अध्यापन पद्धतीचाही विचार परिषदेने करावा. शालेय अभ्यासक्रमात अभ्यासलेली एखादी कविता महाविद्यालयीन पाठ्यपुस्तकात असली तर ती पूर्वीच अभ्यासली म्हणून अनेकदा सोडून दिली जाते. कित्येकदा विद्यार्थीही तिकडे दुर्लक्ष करतात. असं होता कामा नये. कारण दोन्ही स्तरावरील अध्यपनपद्धती पूर्णत: भिन्न असते. असावी. शाळेतील अध्यापन पद्धती कवितेचा शब्दार्थ, एकूण आशय, पद्याचा गद्याचा अर्थ सांगणं यावरच भर देणारी असते. ही प्राथमिक पातळी महाविद्यालयीन अध्यापनात ओलांडली जावी. महाविद्यालयीन अध्यापनात त्या कवितेच्या आणि कवीच्या अंतरंगात विद्यार्थ्यांचा प्रवेश कसा होईल, याचा प्रत्यय व्हावा. त्याकरिता ती कविता ज्या कवीची असेल त्या कवीच्या अन्य कविता अभ्यासणं, तत्पूर्वीच्या काव्याचे त्या कवीवरील संस्कार टिपणं, त्या कवीचा पुढील कवींवरील ठसा चाचपणं, त्या कवितेच्या आणि कवीच्या मर्यादांचं अन् बलस्थानांचं विवरण करणं आणि एकूण वाङ्मयेतिहासात त्या कवितेला नि कवीला अधोरेखित

करावा या दिशेने महाविद्यालयीन अध्यापनाची वाटचाल असावी!

पदव्युत्तर अभ्यासक्रमात (१) एखाद्या ग्रंथकाराचा (२) एखाद्या वाङ्मयप्रकाराचा (३) एखाद्या कालखंडाचा (४) एखाद्या वाङ्मयीन प्रवाहाचा– अभ्यास करावा लागतो. तेव्हाही अशीच सखोल दृष्टी असावी. याखेरीज त्या त्या वाङ्मयप्रकाराचं मूळ अन्य भाषेत असल्यास त्यांचंही अवलोकन पदव्युत्तर पातळीवर व्हावं. बा.सी. मर्ढेकरांनी 'वाङ्मयीन महात्मता' या निबंधात अन्य भाषांच्या अभ्यासाची जोड मातृभाषेला द्यावी, असं म्हटलं होतं. याचं स्मरण इथं होतं.

वाङ्मयेतिहासाच्या अध्यापनात तत्कालीन लेखकांची नि त्यांच्या साहित्याची यादी देणं एवढाच अध्ययनाचा आवाका नसावा, तर त्या त्या लेखकांचे सर्व ग्रंथ प्राध्यापकाने स्वत: पूर्ण वाचावे, अभ्यासावे आणि नंतर त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, धार्मिक, भाषिक असे त्या त्या लेखकाच्या लेखनावरचे संस्कार टिपावे आणि त्यांच्या वाङ्मयात तत्कालीन इतिहासाचं प्रतिबिंब कसं दिसतं, ते शोधावं, त्यानंतर त्या लेखकांचं लेखन म्हणजे तेव्हाच्या काळाचा परिपाक असल्याचं दर्शवावं म्हणजे मग तो वाङ्मयेतिहास होईल. लेखकांनी तो काळ आपल्या कलाकृतीतून कसा साकार केला यावर वाङ्मयेतिहासात लक्ष केंद्रित करावं आणि त्याद्वारा वाङ्मयेतिहासाची संकल्पना विद्यार्थ्यांपुढे सोदाहरण उलगडून दाखवावी. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाविषयाचा प्रचंड आवाका दाखवणं आणि त्याच्याशी त्यांचा परिचय घडवणं हेच महाविद्यालयीन प्राध्यापकांचं कर्तव्य असतं. ते त्यांनी सुजाणपणानं करावं, एवढीच अपेक्षा आहे.

मराठीच्या अभ्यासक्रमात व्यावहारिक मराठीचा भाग महत्त्वाचा असतो. साहित्याच्या मूलभूत उपासनेपेक्षा दैनंदिन व्यवहारातील मराठी भाषा समजणं, समजून देणं–घेणं आणि समर्थपणानं वापरता येणं ही अधिक गरजेची गोष्ट आहे. विद्यार्थ्यांच्या अन्य विषयांचं माध्यम मराठी असलं तर, त्या त्या विषयांना चांगल्या मराठी भाषेत अभिव्यक्त करणं त्यांना जमायला हवं. त्याचप्रमाणे आकाशवाणी–दूरदर्शनवरील वृत्तनिवेदक, वार्ताहर, संपादक, पत्रकार, कार्यक्रमांचे सूत्रसंचालक या साऱ्यांनाच मराठी भाषेचं सम्यक् ज्ञान असावं लागतं, हे व्यावसायिक लोक मराठीच्या विद्यार्थ्यांतूनच पुढे येणारे असतात. त्यामुळे शब्दसिद्धी, वाक्यरचना, शुद्ध उच्चारण, निर्दोष प्रतिपादन, माहितीचं संकलन–विस्तृतीकरण–संक्षिप्तीकरण या मूलभूत प्रक्रियांचं ज्ञान विद्यार्थ्यांना अग्रक्रमाने करवून द्यावं. या साऱ्या दृष्टीने अभ्यासक्रमात

व्यावहारिक मराठीचं अध्यापन होणं आवश्यक आहे.

समृद्ध अभ्यासक्रम, विस्तीर्ण ग्रंथालय, संपन्न प्रयोगशाळा, भव्य दालनं, उत्तुंग इमारती, मनोरंजनगृह, क्रीडांगणं हे विद्यापीठाचं वैभव आहे. पण व्यासंगात गढून गेलेला प्राध्यापक हा विद्यापीठाचा आत्मा आहे, असं शिवाजीराव भोसले एकदा म्हणाले होते. हा आत्माच अलीकडे लोपलेला दिसतो. प्राध्यापक आपल्याला पावलोपावली दिसतात, पण व्यासंगात गढून गेलेला प्राध्यापक दिसणं मात्र दुर्मिळ आहे.

## मराठीचे प्राध्यापक

अन्य विषयांच्या प्राध्यापकांच्या तुलनेत मराठीच्या प्राध्यापकांवर अधिक जबाबदारी असते. ते विद्यार्थ्यांना सामाजिक सांस्कृतिक दर्शन प्रभावीपणे घडवू शकतात आणि म्हणून त्यांच्या मूलभूत गुणवत्तेचं चिंतन करणं आवश्यक वाटतं. मराठीच्या प्राध्यापकांचं विशेषेकरून पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाच्या सदस्यांचं साहित्याचं वाचन–चिंतन–मनन भरपूर अन् सखोल असणं अत्यावश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यांची स्वत:ची एक तटस्थ वस्तुनिष्ठ वाङ्मयदृष्टी सिद्ध होणं ही गरजेचं आहे. आपल्या अवतीभवतीच्या मित्रपरिवाराचे ग्रंथ अभ्यासक्रमात नेमताना वैयक्तिक पातळीवरील आत्मीयतेऐवजी गुणवत्तेची पारख करणारी समीक्षादृष्टी–वाङ्मयाच्या यथार्थ मूल्यमापनाची क्षमता–असावी लागते. आप्तस्वकीयांच्या प्रेमापेक्षा त्याचं आपल्या विषयाचं प्रेम अधिक सखोल असावं लागतं. वाङ्मयचिंतनाखेरीज ते जमू शकत नाही. चिंतनाकरता अगोदर वाचन असावं लागतं. वाङ्मयाचं वाचन–चिंतन–मनन हा भाषेच्या प्राध्यापकांचा स्थायी भाव असावा लागतो. तो त्यांनी जपावा, जोपासावा, बलसंपन्न करावा, म्हणजेच ते आपल्या पेशाला न्याय देऊ शकतील. ज्यांना वाचन–चिंतन–मनन यात रस नसेल आणि साहित्यात रुची नसेल, त्यांनी प्राध्यापकाचा पेशा स्वीकारू नये, असं माझं मत आहे.

आजवर समाजाला मौलिक विचार देणारे विचारवंत, सुरुवातीचे म्हणजे अगदी बिनीचे धर्मसुधारक आणि अक्षर कलाकृती निर्माण करणारे साहित्यिक हे सारे एका उच्च स्थानी विराजमान झालेले असतात. त्या उंचीवर त्यांना पाहणं मराठीच्या प्राध्यापकाला जमायला हवं. त्यांना त्यांच्या निसर्गदत्त उंचीवरून खाली खेचू नये, तर मराठीच्या प्राध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांसह

त्या विचारवंतांची उंची गाठावी. एकांगी दृष्टीनं कुणाचेही दोष काढता येतील. अशी दौषेक दृष्टी न ठेवता, विधायक दृष्टीनं कुणी काय दिलं—अन् ते काय मोलाचं आहे, हे पाहणं अधिक हिताचं असतं आणि म्हणून आवश्यक असतं. यथार्थ मूल्यमापनाची क्षमता प्राध्यापकांच्या ठायी असली, तरच हे शिवधनुष्य त्यांना पेलता येऊ शकतं !

मराठीच्या प्राध्यापकांनी साहित्याचं सामर्थ्य विद्यार्थ्यांपर्यंत पोचवणं हे त्यांचं कर्तव्य आहे. विज्ञानाची शास्त्रीय दृष्टी आपल्या बुद्धीला वळण लावते, तर साहित्य आपल्या भावनांना दिशा दाखवतं. साहित्यामुळे आपल्या संवेदना अधिक सुजाण होतात. आपल्या दैनंदिन व्यावहारिक जगात ज्या रागलोभांना अवसर मिळत नाही, त्याची अनुभूती बसल्या जागी साहित्य आपल्याला देतं. कुणाबरोबर आपण सत्पक्षाचा कैवार घेत राहतो. द्रौपदीबरोबर सात्त्विक संतापाचा प्रत्यय आपल्याला येत राहतो. राधा—मीरा यांच्याबरोबर आपणही मधुर भक्तीचा अनुभव घेतो. ईडिपसबरोबर आपणही नियतीची क्रूर लीला अनुभवतो. वाईट गोष्टींचा तिरस्कारही आपण साहित्यातून शिकतो. मंथरेची कुटीलता, शकुनीचं कपट आपल्याला तिरस्करणीय वाटतं. कलाकृतीतील पात्रांच्या सहानुभवाने आपण भावसमृद्ध होतो. जीवनात कसं वागावं नि कसं वागू नये, ते साहित्य नकळत शिकवत राहातं. साहित्यातील पात्रांशी सहानुभाव घेत राहिल्याने आपलं हृदय विकसित होतं. जीवनाचं दर्शन घडतं. त्यामुळे साहित्याचा उपासक हा जीवनाचाच उपासक होत असतो. प्राध्यापक झाल्यावरही ही उपासना खंडित होता कामा नये. ललित साहित्यातून जीवन समजून घेणारी उपासना ही निरंतर चालू राहणारी गोष्ट आहे. त्यामुळे साहित्याच्या उपासकांची जीवनानुभूती ही अन्य कुणापेक्षा अधिक असते. साहित्याच्या या सामर्थ्याची विद्यार्थ्यांना सोदाहरण ओळख करून देणं, हे मराठीच्या प्राध्यापकांचं आद्य कर्तव्य आहे. म्हणून त्यांनी त्याकडे विशेष अवधान द्यावं.

आज धर्म, भाषा, जाती, पंथ अशा अनेक अंगांनी सामाजिक एकात्मतेला खिंडारं पडली आहेत. परंपरेत दोष शिरले आहेत. त्यामुळे समाज विस्कळीत झाला आहे. नामदेव महाराजांची पुण्यतिथी शिंपी समाज साजरी करतो, ही घटना मला साहित्य विरोधी, ज्ञानविरोधी, मानवताविरोधी वाटते. आपण आज संतांचीही जातीनिहाय वाटणी करून टाकली आहे. सावता माळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार हे फक्त त्या त्या समाजाचे संत झाले आहेत. एकूणच आज समाजात कापाकापीचं वारं वाहत आहे. त्यामुळे समाजाचे तुकडे

तुकडे होत आहेत. अशा परिस्थितीत मराठीच्या प्राध्यापकाने सुई–दोरा हाती घेऊन ते तुकडे जोडण्याचं काम करायला हवं! कारण, मराठीचा प्राध्यापक सामाजिक, सांस्कृतिक परंपरांचा जाणकार असतो. विश्वात्मक भावाशी त्याचा परिचय असतो. त्यामुळे या विपरीत परिस्थितीचा मागोवा घेऊन समाजाला योग्य ते मार्गदर्शन तो सहजी करू शकतो. आपल्या विद्यार्थ्यांनाही ही दृष्टी तो देऊ शकतो.

साहित्य ही समन्वय प्रस्थापित करू शकणारी एक शक्ती आहे. ती विषमता दूर करू शकते. विसंवाद नाहीसे करून सुसंवाद निर्माण करण्याची क्षमता साहित्याच्या ठायी आहे. साहित्याद्वारा समाजातील फुटीरता दूर करता येते, हा साहित्याचा गुण मराठीच्या प्राध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांपुढे उलगडून दाखवावा.

आजची शिक्षण पद्धतीही सदोष वाटते. प्राध्यापकांची अवस्थाही समाधानकारक नाही. याचं मुख्य कारण म्हणजे आपली पुरातन पद्धती आपण गमावून बसलो आहोत. तिचं साधं स्मरणही आपणांस नाही. इंग्रजांनी एकोणविसाव्या शतकात विशिष्ट ध्येयधोरणांनी भारतीयांना शिक्षण देण्याचा उपक्रम राबवला. विसाव्या शतकात स्वातंत्र्य मिळाल्यावरही आपण इंग्रजांचंच शिक्षणविषयक धोरण आंधळेपणानं कायम ठेवलं. त्यांचे इंग्रजीतले नियम आपण मराठीत आणू शकलो नाही. त्यांचा शब्द अन् शब्द – त्याचा नीट अर्थबोध होत नसताही – आपण कायम ठेवला. १९८३ मध्ये अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. तेव्हा नागपूर विद्यापीठाचे सर्व कागदपत्रं आपण जसेच्या तसे – त्यातील मुद्रणदोषांसह स्वीकारले. निःसंकोचपणानं स्वीकारले. तरीही आज आपलं शिक्षणक्षेत्र बहरावर आहे. गल्लोगल्ली शिकवणी वर्ग आहेत. शाळा–महाविद्यालयांची संख्या तर वाढतेच आहे, पण विद्यापीठांचीही वाढते आहे. तळागाळातील विद्यार्थी बहुसंख्येनं शिकताहेत. हे चित्र वरवर आल्हादायक आहे. पण तरीही कुठेतरी काहीतरी महत्त्वाचं निसटलं आहे, आजच्या शिक्षणव्यवस्थेतला प्राण निघून गेला आहे. असं जाणवत आहे.

उपनिषद् काळापासून आपल्याकडे गुरुशिष्यपरंपरा चालत आली आहे. आपण आपल्या परंपरेपासून आज तुटलो आहोत. निखळलो आहोत. परकीय परंपरा आपल्याला आत्मसात करता आली नाही. आणि आपणांस आपली परंपरा राखता आली नाही वा नवी परंपरा निर्माणही करता आली नाही.

शिक्षक, गुरू, आचार्य हे तीनही शब्द आज आपण जवळपास

समानार्थीच मानतो आहोत. पण ते तसे नाहीत. जो शिकवतो तो शिक्षक असतो. सुईत दोरा घालायला शिकवणाराही शिक्षकच असतो. ज्याच्याजवळ ज्ञानाचा भरपूर साठा असतो, तो गुरू असतो. आणि आत्मसात केलेलं ज्ञान जो आचरणात आणतो, तो आचार्य असतो. आज आचार्य दुर्मिळ आहेत. प्राचीनकाळी गुरुकुलात आचार्य असत. तेच गुरू अन् शिक्षकही असत. ज्ञानदान हेच त्यांच जीवनध्येय असायचं. दुसरं कुठलंही उद्दिष्टच नव्हतं. त्यामुळे त्यांनी आपलं ज्ञान आर्थिक मोबदल्यात कधीही मापलं नव्हतं. त्यांना त्यांच्या उपजीविकेची चिंता नव्हती. त्यांना जगवणं हे राजाचं कर्तव्य होतं. राजाच्या उत्पन्नाचा सहावा भाग गुरुकुलाकडे जात असे. तेवढ्यात त्यांचा उदरनिर्वाह सहज होत असे. ज्ञानाच्या मोबदल्याची भाषाच तेव्हा नव्हती. ज्ञान अनुपम–अतुलनीय होतं. ज्ञानाला पर्याय नव्हता. अध्ययन आणि अध्यापन कधीही सोडू नये, हे त्या ज्ञानवंतांचं जीवनव्रत होतं. पण कधीतरी कुणीतरी गुरूने गुरुदक्षिणा मागितली. आणि पुढे तीच अनिष्ठ प्रवृत्ती फोफावत गेली. आज तिने डोनेशनचं विक्राळ रूप धारण केलं आहे. शिकायचं असेल तर आगाऊ देगणी दिलीच पाहिजे, अशी ही आजची गुरुदक्षिणा आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या ज्ञानपरंपरेत शिरलेली ही विकृती आपण वेळीच ओळखायला हवी होती, पण ती न ओळखता विकृतीचीच अधिकाधिक जोपासना होत गेली नि होत आहे. आपण ज्ञानपिपासू शिष्याच्या आणि निरपेक्ष पण उदारपणानं ज्ञानदान करणाऱ्या आचार्यांच्या मूळ गंगोत्रीजवळ पोचायला हवं. ज्ञानाच्या त्या मूळ प्रवृत्तीशी आपली नाळ जुळायला हवी. त्यानंतर आजच्या परिस्थितीला अनुसरून आजच्या विद्यार्थ्याने शिक्षण घ्यायला हवं. म्हणजे मध्यंतरीची शिक्षण क्षेत्रातील विकृती दूर होऊ शकेल. प्राध्यापक समाजातलं आपलं स्थानच आज विसरला आहे. त्याच्या स्वत्वाचं त्याला भान यावं, त्याची कर्तव्यबुद्धी जागी व्हावी, एवढीच अपेक्षा आहे.

एम.ए.च्या परीक्षेत पंचावन्न टक्के गुण आणि सेटनेट उत्तीर्ण ही प्राध्यापकपदाची किमान अपेक्षा असते. पण तेवढ्या बळावर लागलेला प्राध्यापक ती आपली कमाल गुणवत्ता समजतो. नियुक्तीने तृप्त–संतुष्ट होतो. आपण प्राध्यापक विद्वान–सर्वज्ञ–सर्वश्रेष्ठ असं तो स्वत:ला समजू लागतो. अशा अहंमन्य व्यक्तीला कुणाचीही उंची कळू शकत नाही. कारण तो स्वत:च त्याने मानलेल्या सर्वोच्च उंचीवर विराजमान झालेला असतो आणि तेथून तो सर्वांकडे तुच्छतेने पाहत असतो. विद्या विनयामुळे शोभून दिसते. (विद्या विनयेन शोभते) असं म्हणतात. विद्येविना असलेला विनय मात्र शोभून दिसत

नाही. विनयाला विद्येचा आधार असावाच लागतो. पण अहंकारी माणसाजवळ विद्याही नसते अन् विनयही नसतो. उग्र अहंकार तेवढा असतो. अहंकारासारखा माणसाचा दुसरा शत्रू नाही. त्या शत्रूला जिंकणं कठीण आहे. साधूसंतांनाही ते आव्हान पेलवत नाही. मग सामान्य माणसाची काय कथा? अहंकारापासून आपण सर्वांनी दूर राहावं, एवढंच सांगता येईल.

जातिवंत प्राध्यापकाच्या ठायी विनम्रता असतेच. कारण सारस्वताच्या महान सागराची खोली त्याने अनुभवलेली असते. त्यामुळे तो स्वत:ला सर्वश्रेष्ठ शाहणा समजूच शकत नाही. 'मानित्व' म्हणजे स्वत:ला श्रेष्टतम समजणं हा फार मोठा दोष आहे. म्हणून तर गीतेने अमानित्व— स्वत:ला न मानणं हे पहिलं ज्ञानलक्षण सांगितलं आहे. मराठीच्या प्रत्येक प्राध्यापकाने गीतेच्या तेराव्या अध्यायातील ज्ञानलक्षण आणि त्यावरील ज्ञानदेवांचं विस्तृत भाष्य अवश्य वाचावं—अभ्यासावं—त्याचं चिंतन मनन करावं. दीपस्तंभासारखं ते उपयुक्त ठरेल. कारण प्राध्यापक हा ज्ञानमार्गाचाच प्रवासी असतो.

मराठी प्राध्यापक परिषदेच्या निमित्ताने मराठीची सद्यस्थिती, पाठ्यपुस्तकं, अध्यापनपद्धती, आणि प्राध्यापक यांच्याविषयी बोलण्याची संधी आपण मला दिली. अध्यक्ष म्हणून माझा सन्मान केलात आणि आपण सर्वांनी माझे विचार अतिशय शांतपणे ऐकून घेतले, याबद्दल मी आपले मनापासून आभार मानते नि आपली रजा घेते.

❖❖❖

# २३ वे अधिवेशन
# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
# अकोला
# १५ फेब्रुवारी २०१०
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. रमेश अंधारे

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष आणि कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे, महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख आणि मराठीच्या प्राध्यापक बंधू भगिनींनो! सर्वप्रथम आपण माझी मराठी प्राध्यापक परिषदेच्या अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल मी आपण सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे. निवृत्तीच्या या पर्वावर आपण माझा असा हृद्य सत्कार व सन्मान करावा, ही बाब मला निश्चितच आनंद देणारी आहे.

प्रत्येक विभागाच्या प्राध्यापकांची वर्षातून एकदा तरी अशी परिषद भरविण्याची पद्धतच आहे. अशा परिषदांमधून त्या–त्या विभागाच्या शिक्षकांनी एकत्र येऊन सर्व प्रकारचं मुक्त चिंतन करावं. आपले प्रश्न आणि आपल्या व्यवसायातल्या अडचणी याविषयीचं आपलं मनोगत खुलेपणानं मांडण्याचं हे व्यासपीठ आहे. अशा मनमोकळ्या चर्चामधून आपलं अध्ययन आणि अध्यापन अधिक परिष्कृत होते; ते अधिक विद्यार्थ्यांभिमुख होतं.

आम्हा शिक्षकांचे प्रश्न शिक्षण पद्धतीपासून तर पाठ्यपुस्तकांपर्यंत अध्यापनापासून तर अभ्यासक्रमापर्यंत विविध प्रकारचे असू शकतात. अशा परिषदांमधून आपण त्या–त्या प्रश्नांची उत्तरं शोधू शकतो. परस्परांजवळच्या उत्तरांच एकत्रीकरण करून आपण आपले मार्ग सुलभ करू शकतो. यातून आपल्याला शिकण्या–शिकविण्याचे रस्ते सापडतात.

आपण सारेच मराठी भाषेचे व साहित्याचे अभ्यासक आहोत. साहित्यावरच्या अकृत्रिम प्रेमाने आपण साहित्याच्या अभ्यासाकडे वळलो. आपला अभ्यास अधिक समृद्ध व्हावा. याची वैचारिक बैठक भक्कम व्हावी, आपला भाषिक आणि साहित्यविषयक दृष्टिकोण समंजस आणि व्यापक असावा. त्याकरिता आपण आपल्याला भाषिक व साहित्यदृष्ट्या पारखून घेतले पाहिजे. आपण बहुतेक शिक्षक विदर्भातले, बहुजन समाजातले आहोत.

वऱ्हाडी बोलीचे आपल्यावर बालपणापासूनचे संस्कार आहे. वऱ्हाडी बोली आपल्या रक्तात भिनलेली, आपल्या श्वासाबरोबर खेळणारी, पण म्हणून आपण मध्यवर्ती प्रमाण मराठी भाषेकडे, तिच्या उच्चारशास्त्राकडे दुर्लक्ष करता कामा नये, कारण आपण बोलींसाठी कितीही आग्रह धरला आणि एका वेगळ्या भाषाशास्त्रीयदृष्टीने पाहिल्यास एखादी बोली प्रभावी होते आणि कालांतराने तिची प्रमाणभाषा बनते. शिवाय बोली बोलणाऱ्यांचा भाषिक समूहदेखील एखाद्या छोट्या भूभागावरचा असतो म्हणून समाजाच्या सामूहिक अभिव्यक्तीसाठी मध्यवर्ती मराठीची कास धरणेच अधिक योग्य वाटते.

दुसरीकडे, आपण बोलींचा साहित्यनिर्मितीसाठी वापर करूच शकतो, बोलींचा समृद्धी आणि श्रीमंती आपण जपलीच पाहिजे. वऱ्हाडी, अहिराणी, कोल्हापूरी, मालवणी ह्या बोलींमधील कथा, कादंबरी कविता ह्या मध्यवर्ती मराठीच्या टीपांसह विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात नेमल्यास भाषिक—साहित्यिक घुसळण होऊन बहुसांस्कृतिकता निर्माण होऊ शकेल.

मराठी भाषेचा केवळ प्रखर वाचिक अभिमानच बाळगून चालणार नाही. तो तर आवश्यक आहेच; पण मराठी भाषेच्या व साहित्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कोशांची निर्मिती होणे आवश्यक आहे. खरं ज्ञान कोशनिर्मितीतूनच सिद्ध होत असतं. ज्ञानकोश, विश्वकोश, चरित्रकोश, शब्दकोश विविध संज्ञा आणि वऱ्हाडी कोल्हापूरी, मालवणी अहिराणी इ. बोलींमधल्या वाक्प्रचार इ.म्हणींचे कोश, बोलीतल्या कोशांचे मध्यवर्ती मराठीत रूपांतर/भाषांतर इ. कोश पाहता येणे हेही महत्त्वाचं, म्हणून कोश पाहणे शिकावे.

भाषा ही एक काटेकोर व शास्त्रीय व्यवस्था आहे. तिचा गोळीबंदपणा, तिचा चिरेबंदी वाडा विस्कटू नये म्हणून तिचं व्याकरण व शुद्धलेखन याविषयी आपण शिक्षक म्हणून काटेकोर असलं पाहिजे. अशा प्रकारचे भाषिक भांडवल असलेल्या शिक्षकाला निदान प्राथमिक अवस्थेतील स्वतःची भाषाशैली विकसित करता येते; ह्याच धर्तीवर मग त्याला स्वतःची अशी व्याख्यानशैली ही विकसित करता यायला हवी. पण ही भाषाशैली आलंकारिक नसावी. कारण 'अलंकरणामुळे भाषेची सर्जकता लोप पावते व तिच्यावर तिच्या अंगाबाहेरचा अर्थ लादला जातो.' म्हणून निरलंकृत, साधी, सुबोधशैली अधिक प्रसन्न वाटते.

साहित्याचे अध्यापन करताना, साहित्याची परंपरा, त्या परंपरेची वैशिष्ट्ये, तिची शक्तीस्थळे व दुर्बलकेंद्रे यांची उत्तम माहिती असणे जसे

गरजेचे आहे तसेच समीक्षेच्या सर्व संप्रदायाचेही नीट ज्ञान शिक्षकानं मिळवावं आस्वादक समीक्षेपासून तर आदिबंधात्मक समीक्षेपर्यंत आणि रोमॅन्टिसिझमपासून रिॲलिझमपर्यंत. या दोन्ही आधारांवरच आपल्यामध्ये 'वाङ्मयाची उत्तम जाण' निर्माण होऊ शकते. प्रत्येक वाङ्मयप्रकाराचा आकृतीबंध, त्याचं मुख्य आशयसूत्र उलगडणें नाटकाचं नाट्यबीज, त्याचा विकास, नाटकाचं प्रमेय, त्याची संहिता आणि प्रयोग या अंगाने आपले आकलन स्पष्ट होत जाऊन आपलं अध्यापन प्रभावी होत जातं.

मराठीच्या अभ्यासकाला सर्वच वाङ्मयीन प्रवाहाविषयी प्रेम असले पाहिजे. मध्यवर्ती, दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लीम मराठी, ख्रिस्ती अशा सर्वच प्रवाहाचं तत्त्वज्ञान, त्याची भूमिका, त्यांचे समीक्षा—ग्रंथ अभ्यासून, त्यांच चिंतन करून हळूहळू आपली मतं तयार करावी.

आपण दलितेतर आहोत म्हणून दलित साहित्याचा, हिंदू आहोत म्हणून मुस्लिम मराठी साहित्याचा, शहरी आहोत म्हणून ग्रामीण साहित्याचा दुस्वास करता कामा नये. एक समधात, समन्यायी आणि विशुद्ध वाङ्मयीन दृष्टी आपण बाळगली पाहिजे.

या आपल्या कसदार वाङ्मयीन दृष्टीला जोड असावी. इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र या सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासाची विज्ञान—तंत्रज्ञानाची, शेती आणि सहकाराची, उद्योग आणि ग्रामीण जीवनाची आणि संगीत, नृत्यासारख्या ललितकलांची. इंग्रजी, हिंदी, संस्कृत, उर्दू या भाषांमधल्या साहित्यसाधनाशी आपला थोडाबहुत तरी परिचय असावा. आपलं शिकवणं त्यामुळे चौफेर आणि रसपूर्ण होतं. साहित्याचा प्राध्यापक हा एक लहानसा कलावंतच असतो.

शिक्षकाने विद्यार्थ्यांमधला 'स्पार्क' ओळखणे, आणि त्याला त्या दिशेने मार्गदर्शन करणे फार महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांमधला लेखनगुण, त्याचं वक्तृत्व, त्याचं नेतृत्व, अभिनय, संघटनकौशल्य, क्रीडाकौशल्य हेरून, त्याला प्रेरणा देऊन घडविण्याचं काम शिक्षकालाच करावं लागतं. एकप्रकारे शिक्षकाची भूमिका ही रोपवाटिकेसारखी असते. शिक्षक स्वत: महावृक्ष झाला नाही तरी चालेल पण त्याने ही 'माळ्याची भूमिका' पार पाडावी.

'पाठ्यपुस्तकांची निवड' हा आपल्या क्षेत्रातला एक कळीचा मुद्दा आहे. निवडलेली पाठ्यपुस्तके सर्व प्रदेशाचंच नव्हे तर प्रदेशनिष्ठ साहित्य आणि संस्कृतीचं प्रतिनिधित्व करणारी असावी. हे प्रतिनिधित्व संख्यात्मकच असावे असे नव्हे. तर त्यातून सर्व प्रकारच्या साहित्य संस्कृतीचा स्वरमेळ

साधला जाईल अशी असावीत. तशीच ती विद्यार्थ्यांची उच्च बुद्धिमत्ता आणि निम्न बुद्धिमत्ता यांचा सुवर्णमध्य साधणारी असावीत. या पुस्तकांमधून विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्य, व्यावहारिक भाषा, व्यावहारिक व सामान्य लेखन, प्रासंगिक लेखन अशी विविध कौशल्ये आत्मसात करता यावीत. यामधील काही भाग मौखिक प्रशिक्षण वजा प्रात्यक्षिकाचा असावा. ज्यामुळे विद्यार्थ्याला भाषेचा मौखिक व समुचित वापर करता येईल. उच्चारशुद्धी व वाणीची शुद्धी या बाबींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

पाठ्यपुस्तकांच्या चौकटीतच आपल्याला अभ्यासक्रमाची आखणी करावी लागते. ही आखणी काळ, काम वेगाच्या तत्त्वांवर झाली पाहिजे. अभ्यासक्रम परीक्षाधिष्ठित न ठेवता ज्ञानाधिष्ठित असले पाहिजे. त्यातही ज्ञानाच्या उपयोजनांसंबंधीचा भाग त्यात अधिक असावा. केवळ स्मरणशक्तीची परीक्षा असू नये. असा ज्ञानावर आधारलेला अभ्यासक्रम मूल्यशिक्षणाच्या चौकटीने घेरलेला असेल तर आपण ह्या मूल्यऱ्हासाच्या युगात किमान चांगले आचरण ठेवणारे विद्यार्थी घडवू शकू.

आजच्या काळाची गरज म्हणून, लैंगिक शिक्षणाची, तरुण पिढीला नितांत आवश्यकता आहे. शिक्षकांनी लैंगिक शिक्षणाला विरोध करणारे पुढारी, पक्ष यांच्या भूमिका तपासून पाहाव्या. काही स्वकथने, आत्मचरित्रे, कथा, कादंबऱ्या, कविता कामवासनाशरण वाटत असल्यास, त्यातला विवाद्य भाग आधीच गाळून, संपादित करून, त्याचा योग्य अर्थनिर्णय करून नेमावा. त्यासंबंधीच्या टीपा आणि स्पष्टीकरणे द्यावीत. पण बोर्ड ऑफ स्टडीजने नेमलेला अभ्यासक्रम विद्यापीठाने कोणत्याही दबावाखाली, आंदोलनामुळे मागे घेऊ नये. विद्यापीठबाह्य असं कोणतंही ज्ञाननिर्णयाचं सत्ताकेंद्र आपल्याला नमविते, ही गोष्ट आपल्या शिक्षकीय तात्त्विक भूमिकेला बट्टा लावणारी ठरते.

एम.ए.चा अभ्यासक्रम ठरविताना आपली दृष्टी अधिकच सूक्ष्म व व्यापक असली पाहिजे. कारण अभ्यासक्रमातून येणारी वाङ्मयदृष्टी व ‘साहित्याची जाण’ ही भावी शिक्षक घडविण्यासाठी खूप उपयुक्त ठरते. एखाद्या विशेष ग्रंथकार, वाङ्मयप्रकार, कालखंड, किंवा साहित्याचा प्रवाह विद्यार्थ्यांचं ‘वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व’ घडविण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते.

वाङ्मयेतिहास शिकविणे हे वाङ्मयेतिहास लिहिण्याइतकेच कठीण कर्म आहे. वाङ्मयाचा इतिहास ग्रंथ, ग्रंथकार, त्याचा काळ, त्यातले घटनाप्रसंग सरधोपट पद्धतीने सांगून टाकणे म्हणजे वाङ्मयेतिहास शिकविणे नव्हे. तर त्या

त्या लेखकाच्या लेखनामागच्या प्रेरणा व प्रवृत्ती ह्या काळातील 'वाङ्मयाची पर्यावरणीय स्थिती' लेखकाच्या काळातले लोकजीवन, समाजस्थिती, लेखकावरचे सांस्कृतिक आणि भाषिक संस्कार, त्याची जीवनदृष्टी आणि त्याची 'वाङ्मयीन भूमिका' या सर्व सूत्रांच्या गुंफणीतून एकेक वाङ्मयप्रकार कसा विकसित होत गेला, त्या वाङ्मयप्रकारात आकस्मिकदृष्ट्या आणि आशयदृष्ट्या कोणकोणती परिवर्तने होत आली आणि ती परिवर्तने एकूणच मराठी साहित्याच्या अभिवृद्धीला व वाङ्मयचरित्राला कितपत अपकारक ठरली; ह्याची जाणीव जागृती विद्यार्थ्यांमध्ये पेरणे म्हणजे वाङ्मयेइतिहासाचं अध्यापन.

आज साहित्य विस्कटलेल्या समाजाचं सेतूबंधनाचं काम करू शकतं. आपला आजचा समाज कधी नव्हे एवढा विकसित झाला आहे. जात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा ह्या भेदांनी तो शतखंडित होत आहे. ह्या समाजाला एकरस व एकपिंड करण्याचे उत्तरदायित्व साहित्याचे आहे. आपण सारे शिकलेले, विद्यावंत लोक आपल्या ज्ञानाच्या कैफात बुडून अहंकारग्रस्त झालो आहे. दोन ज्ञानी माणसे एकत्र येऊन काम करू शकतात हे समाजातले चित्र आज दुर्मिळ झाले आहे. आपल्या सामाजिक व सांस्कृतिकच नव्हे तर विद्यापीठीय व साहित्यिक संस्थानांही जाती–धर्माची व गटातटाची वाळवी लागली आहे. अनुदान संस्कृती व पारितोषिकांचे चतुर वाटप, साहित्य–संस्थांचे जुगुप्सादर्शक राजकारण, साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षाच्या निवडणुकीचा तमाशा, साहित्य व्यवहारांची राजकीय पुढाऱ्यांच्या हातात गेलेली सूत्रे, ह्या व अशा सर्व 'सांस्कृतिक अधोलोका'च्या कारवायाचं अंडरवर्ल्ड नामशेष करण्याची जबाबदारी तुमच्या माझ्यासारख्या साहित्याच्या शिक्षकाची आणि अभ्यासकांची आहे.

❖❖❖

# २४ वे अधिवेशन
# नेहरू महाविद्यालय, नेरपसोपंत, जि. यवतमाळ
# १४ फेब्रुवारी २०११
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. अुत्तम रुद्रावार

विश्वमोहिनी शारदा, थोर संत व महान कर्मयोगी, वैराग्यमूर्ती वं. गाडगे महाराज यांचे कृतज्ञ पुण्यस्मरण, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, मराठी प्राध्यापक परिषदेच्या २४ व्या अधिवेशनाचे उद्‌घाटक प्रतिभाशाली व प्रतिथायश कवी, म.रा. साहित्य संस्कृती मंडळाचे पूर्वाध्यक्ष डॉ. यशवंत मनोहर, या उद्‌घाटन सोहळ्याचे सन्माननीय अध्यक्ष, तथा या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. परमानंदजी अग्रवाल, परिषदेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष व या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचे ज्यांनी मला अतिशय सन्मानपूर्वक व अगत्यपूर्वक निमंत्रण दिले ते सन्मित्र प्राचार्य रा.गो.चवरे, उपाध्यक्ष, प्रा. मनोहर बनसोड, सचिव प्रा. रा.तु. आदे, कोषाध्यक्ष डॉ. पवन मांडवकर, सहसचिव डॉ. गजानन मुंधे, कार्यकारी मंडळाचे सन्माननीय सदस्य, अधिवेशनाचे आयोजक आणि या नेहरू महाविद्यालयाचे कार्यकुशल प्राचार्य डॉ. राजीव सदन, डॉ. प्रवीण बनसोड, प्रा.सागर गावंडे.

मराठी भाषा आणि साहित्याचे अध्यापन करणारे वाङ्‌मयप्रेमी प्राध्यापक बंधू–भगिनींनो, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या अध्यक्षपदी आपण माझी निवड केली, कृतज्ञापूर्वक धन्यवाद! वस्तुतः मी सेवानिवृत्त होऊन ४ वर्षे झालीत. तथापि सन्मित्र प्राचार्य डॉ. चवरे व मित्रवर्य प्राचार्य डॉ. सदन यांच्याशी असलेल्या अकृत्रिम, जू स्नेहामुळेच हे दायित्व मी पत्करले आहे.

भाषाप्रभू कै. पु.भा.भावे यांच्या अध्यक्षतेखाली १९६७ साली संपन्न झालेल्या वि.सा. संमेलनात कै. डॉ.मा.गो. देशमुख, कै. प्राचार्य राम शेवाळकर, कै. प्राचार्य डॉ. भाऊ मांडवकर आणि प्राचार्य डॉ. गोविंद देशपांडे यांच्या अनौपचारिक चर्चेतून मराठी प्राध्यापक परिषदेची कल्पना निर्माण झाली व या परिषदेचे पहिले अधिवेशन १९६८ साली वणी येथे थाटात संपन्न झाले. त्या अधिवेशनाला जेष्ठ समीक्षक कै. प्रा.वा.ल. कुळकर्णी, या परिषदेच्या कल्पनेचे जनक व्यासंगी विद्वान डॉ. मा.गो. देशमुख, महानुभाव साहित्याचे

गाढे अभ्यासक, आणि मराठी भाषेचे अभिमानी माजी कुलगुरू कै. डॉ. भाऊसाहेब कोलते आदी दिग्गज मंडळी उपस्थित होती. त्या घटनेला आता ४३ वर्षे उलटून गेलीत. मात्र, अशा अधिवेशनात त्यांची उत्कटपणे आठवण होते. ही परिषद या महानुभावांच्या विचारांच्या प्रकाशात आज आपल्या कृतीची पावले टाकीत आहे, हे प्रांजळपणे सांगावेसे वाटते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या दोन्ही विद्यापीठांत तेव्हापासून मराठी प्राध्यापक परिषदेची अधिवेशने सातत्याने सुरू आहेत, ही मोठी वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. अन्य विद्यापीठात मराठी प्राध्यापक परिषदेची स्थापना करून तिची नियमित अधिवेशने आयोजित करण्याचे प्रामाणिक प्रयत्न झाले. तथापि काही कारणवश अशी परिषद स्थापन करणे शक्य झाले नाही. आपण मात्र या बाबतीत भाग्यवान आहोत. आज या अधिवेशनांना छोट्या साहित्य संमेलनांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या सुदीर्घ कालखंडात झालेल्या अधिवेशनांना वारकऱ्यांच्या श्रद्धेने मी उपस्थित राहत आलो, पुढे प्राचार्य पदाच्या जबाबदारीमुळे, प्रशासकीय कारणास्तव परिस्थितीवश काही अधिवेशनांना मला उपस्थित राहता आले नाही, या बद्दल मला आजही मोठी खंत वाटते. उपस्थित राहता आलेल्या काही अधिवेशनांत यथामती सहभागी होता आले, याबद्दल मात्र आनंद वाटतो. मराठीचा प्राध्यापक म्हणून १९९२ साली आमच्या पुसदच्या फुलसिंग नाईक महाविद्यालयात आणि प्राचार्य म्हणून २००७ साली श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात पुढाकार घेऊन या परिषदेची अधिवेशने मला घेता आली. त्याचा आनंद आणि सार्थ अभिमान आहे. परिषदेच्या आयोजनासाठी करावे लागणारे प्रामाणिक प्रयत्न या निमित्ताने मला अनुभवता आले.

'मराठी' हा केवळ आपल्या अध्यापनाचा, व्यवसाय धर्माचा विषय नाही, तो अध्यापनाबरोबरच अध्ययनाचा, संशोधनाचा, लेखनाचा आणि मुख्य म्हणजे आत्यंतिक जिव्हाळ्याचाही विषय आहे. आपला श्वासोच्छ्वास आहे. मराठीचा प्राध्यापक म्हणून आपली जबाबदारीही मोठी आहे. हे मी कोणत्या अभिनिवेशाने बोलत नाही. मराठीच्या प्राध्यापकांकडून केवळ त्या महाविद्यालयाचीच नाही तर त्या परिसराची, गावांची मोठी अपेक्षा असते. 'सांस्कृतिक दूत' म्हणून आपणांकडे पाहिले जाते, आणि ते स्वाभाविकही आहे.

महाविद्यालयातील अभ्यासाचे विषय कोणतेही असोत त्याच्या

अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया भाषेच्या माध्यमातूनच होते. सुमारे ५० वर्षांपूर्वी नागपूर विद्यापीठात कला–वाणिज्य विद्याशाखांत मराठी माध्यमाची सुरुवात झाली. लोकभाषा ज्ञानभाषा झाली. कै. डॉ. भाऊसाहेब कोलत्यांच्या प्रेरणेमुळे अमरावती विद्यापीठात मराठी विभाग सुरू झाला. त्यांच्या या ऋणांचे आपणा सर्वांना सदैव भूषणच वाटेल. मराठी माध्यमामुळेच १९६० नंतर मोठ्या प्रमाणात सर्वसामान्यांना उच्च शिक्षणाची कवाडे उघडी झालीत. आपले महाविद्यालय आपल्या गावातील वाङ्मयीन सांस्कृतिक चळवळीचे केंद्र व्हावे, असा प्रयत्न मराठीच्या प्राध्यापकांनी करावयास हवा. अवतीभवती विविध संघटना, संस्था काही वाङ्मयीन उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करीत असतात, त्यांच्याशी आपला नाळ संबंध आपण जोडला पाहिजे, त्यात समरसून सहभागी झाले पाहिजे. यासाठी केवळ शिक्षक नाही तर विनोबा म्हणतात तसं लोकशिक्षण झालं पाहिजे.

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. 'सारस्वत भू' असलेला विदर्भ, संत–महतांची भूमी असलेला मराठवाडा, निसर्गरम्य असलेला कोकण, अध्यात्माचे मुक्त आकाश असलेली मुक्ताई, सरस्वती कन्या असलेली बहिणाबाई, मातृह्रदयी साने गुरूजी यांच्या वास्तव्याने पुनीत झालेला खानदेश, साखर कारखानदारीने समृद्ध व हरित झालेला प.महाराष्ट्र, संबंध देशाचे मायपोट असलेली मुंबई यासह निर्माण झालेल्या संयुक्त महाराष्ट्राचा अमृत कलश नवमहाराष्ट्राचे शिल्पकार असलेल्या कै. यशवंतराव चव्हाण यांनी आणला. मुख्यमंत्री झालेले यशवंतरावजी आपल्या पहिल्या भाषणात म्हणाले होते, 'हे राज्य मराठी असेल.' 'संयुक्त' या शब्दाचा अर्थ 'सुयोग्य' असाच आहे. १ मे हा कामगार दिन आहे. समता दिन आहे. आणखी एका कारणासाठी प्रसिद्ध आहे. साठोत्तरी मराठी साहित्य हा मराठी साहित्यातील मैलाचा दगड आहे. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होऊनही आता ५१ वर्षे पूर्ण होतील. गतवर्षी राज्याच्या सुवर्णमहोत्सव धुमधडाक्यात साजरा झाला. १९७८ साली शासनाने राजभाषा वर्ष साजरे केले. तरीदेखील भाषेची स्थिती समाधानकारक नाही. आजही मराठी अंग चोरून वळचणीला उभी असल्याचे विदारक दृष्य पाहायला मिळत आहे. मराठीचे अस्तित्व, भवितव्य, आरोग्य, संवर्धन हे विषय आता ऐन ऐरणीवर आले आहे.

भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नसते. तर ते कल्पनाशक्तीचे, विचारशक्तीचे, विकासाचे साधन आहे. भाषेच्या दारातून संस्कृतीच्या दालनात माणूस प्रवेश करतो. भाषा हे माणसाला एकत्र आणणारे प्रभावी व

परिणामकारक साधन आहे. विज्ञान हे सोय, सुविधा निर्माण करते. भाषा ही माणसाला घडवते. काही वेळा युक्तीवाद करताना माणसे म्हणतात, 'वॉटर—जल—नीर' हे पाण्याला पर्यायी शब्द आहेत, यापैकी कोणत्याही शब्दाचा उच्चार केला तर काय बिघडते? अर्थ समजला म्हणजे झाले. गुडमॉर्निंग म्हटले काय? नमस्कार म्हटले काय? आणि राम राम म्हटले काय? काय फरक पडतो? उपचार, कृत्रिमता वेगळी. जिव्हाळा, आत्मीयता आणि अनौपचारकता वेगळी. भाषेचा संस्कृतीशी असलेला संबंध आपण ध्यानात घेणे जरूरीचे आहे. आणि संस्कृतीची गर्भकल्पना असते संस्कार. भाषेच्या माध्यमातून संस्कार व्हावा ही अपेक्षा आहे.

मराठी भाषेचे अध्ययन करणाऱ्या, माध्यम म्हणून मराठी स्वीकारलेल्या विद्यार्थ्यांनी आणि मराठी भाषा—साहित्य यांचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांनी तरी मराठीत बोलण्याचा कटाक्ष ठेवला पाहिजे. आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, मंत्रालय, नगर पालिका, महानगर पालिका, महापौर हे शब्द आता रुजले आहेत. त्याच अर्थाचे असणारे इंग्रजी शब्द आता कमी वापरले जातात. आचार संहिता हा शब्द सामान्य माणूसही सहजपणे वापरतो. कोणत्याही कारणाने होईना पण 'भारनियमन' हा शब्द रूढ झाला आहे. जे आपण रुजवू ते रुजेल. स्वाईन फ्ल्यू, बर्ड फ्ल्यू या रोगाने मधल्या काळात थैमान घातले होते. प्रसार माध्यमांनी हाच शब्द सतत वापरून रूढ केला. वस्तुत: उच्चारायला कठीण असणारे हे शब्द सामान्य माणसेही सहजतेने वापरू लागतील. त्याऐवजी 'वराहज्वर' व 'कुकुटज्वर' हे मराठी शब्द वापरता आले असते. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या व संगणक विज्ञानाच्या काळात हार्डवेअर व सॉफ्टवेअर हे शब्द सर्रास वापरले जातात. त्याऐवजी संगणकाची यंत्रणा व मंत्रणा असे शब्द आपण वापरले तर ही अधिक अर्थपूर्ण होतील. प्रसार माध्यमांबरोबरच ते आपलेही दायित्व आहे, हे आपण जाणले पाहिजे. मच्छर, अंगुर, किचड या हिंदी शब्दांऐवजी डास, द्राक्षे, चिखल असे मराठीचेच शब्द आपण का वापरत नाहीत? समाज मूल्यातच जेथे भेसळ झाली तिथे भाषेत भेसळ झाल्यास काय नवल! विद्यापीठ, महाविद्यालय, तासिका, व्याख्याता किंवा प्राध्यापक, प्राचार्य, वेळापत्रक, अभ्यासक्रमिका हे शुद्ध मराठीचे शब्द वापरण्याऐवजी त्याच अर्थाचे इंग्रजी शब्द आपण सहजपणे वापरतो. आपल्या व्यवसायाचा धर्म म्हणून आपण मराठीबाबत आग्रही असले पाहिजे, असे मला प्रमाणिकपणे वाटते. अर्थात हे करताना दुर्बोधता टाळली पाहिजे. कै. पु.ल. देशपांडे एकदा म्हणाले होते, कुदळीला कुदळ म्हणावे,

कृषी कर्मातील आयुध म्हणू नये. यासाठी सोपी, सुबोध प्रासादिक भाषा, संतांची भाषा आम्ही आत्मसात केली पाहिजे. वं. गाडगे महाराज लोकांच्या भाषेत बोलत असत तेव्हा लोकांना वाटले हा खरा संत, हा खरा महात्मा. त्यांच्या भाषेने मधले अंतर केव्हाच पार केले व जनता आणि संत हा हृदयसंवाद घडून आला. लोकांच्या मध्ये व आपल्या मधले अंतर पार करण्यासाठी मध्ये आलेला विदेशी पोषाख म. गांधी यांनी फेकून दिला. अेक पंचा गुंडाळला, झोपडीत राहायला सुरुवात केली. पिण्यासाठी अेक मडके ठेवले आणि बॅ. मोहनदास करमचंद गांधी यांचा राष्ट्रपिता म. गांधी बनला. शिक्षक आणि विद्यार्थी यात असा संवाद घडला पाहिजे. अवघड बोलणे सोपे असते आणि सोपे बोलणे अवघड असते. याचा विपर्यास करून न घेता व्यावहारिक मराठीसाठी, उपयोजित मराठीसाठी सुंदर डौलदार, ऐटबाज, शैलीदार मराठी आम्हाला लिहिता आले पाहिजे. मराठी भाषेच्या प्रभातकाळी आईचे अंत:करण लाभलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी मराठी भाषेचे सौंदर्य, सामर्थ्य आणि श्रीमंती यांचा प्रत्यय आपल्या भावार्थ दीपिकेतून आणून दिला होता. अतिशय सार्थ अभिमानाने, आणि तितक्याच जबरदस्त आत्मविश्वासाने ते म्हणाले होते – "माझा मराठीचा बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजा जिंके । ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।". भाषेतील ही ताकद आम्ही ओळखली पाहिजे. लहान मुलांना वेड लावणाऱ्या फुलपाखरांसारखी भाषा आकर्षक व वेधक झाली पाहिजे. ग्रंथ हे संस्कृतीचे रूप असेल तर भाषा हे माणसाचे व्यक्त रूप आहे, हे मानावे लागेल. आपले विचार, आपल्या कल्पना व आपल्या भावना भाषेच्याच माध्यमातून प्रकट होतात. आणि भाषेला आलेले गोड फळ म्हणजे साहित्य. भाषेची श्रीमंती सौंदर्य आणि सामर्थ्य साहित्यातूनच प्रकट होते, भागवत धर्ममंदिराचे कळस ठरलेले तुकोबा म्हणाले होते, "आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।"

त्यादृष्टीने आम्ही आमच्या अभ्यासक्रमांची बांधणी केली पाहिजे. सामान्य विद्यार्थ्याला तो झेपला पाहिजे हे मान्य. पण तो बाळबोध आणि सुमार असू नये. काळाच्या इंद्रायणीवर तरून राहिलेले संत साहित्य, प्रबोधनाच्या चळवळीतून मोठ्या प्रमाणावर ज्या साहित्यांनी लोकशिक्षण केले ते महात्मा फुले, भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर, सुधारणावादी आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे साहित्य, ज्ञानपीठ, साहित्य अकादमी, राज्यशासनाचा पुरस्कार, प्रतिष्ठेचे मानले जाणारे वाङ्मयीन संस्थांचे पुरस्कार, प्राप्त झालेल्या वाङ्मयीन कलाकृती आम्ही अभ्यासक्रमात नेमल्या पाहिजेत. वाणिज्य–विज्ञान या

विद्याशाखांत पदवी स्तरापर्यंतच्या तिन्ही वर्गांसाठी आवश्यक मराठी ही १०० गुणांची पूर्ण विषयपत्रिका असली पाहिजे. ती ५० गुणांची केली की तिचे स्थान आपोआप गौण–दुय्यम ठरते. कला शाखेखेरीज अन्य विद्याशाखेतील 'मराठी' विषयाचे स्थान हस्तकला व्यवसायासारखे बनू नये. अभ्यासक्रमासाठी नेमलेली पुस्तके दर्जेदार, वेधक व आशयसंपन्न कशी राहतील याचा विचार व्हावा. कळंब येथे १९८६ साली संपन्न झालेल्या पहिल्या अधिवेशनात प्राचार्य राम डोके म्हणाले – "बी.ए.पेक्षा बारावीचे पुस्तक कठीण आहे असे सारे म्हणतात. इतका जुजबी, इतका सोपा, इतका थातुरमातुर अभ्यासक्रम आम्ही करून ठेवला." २५ वर्षानंतरदेखील हे चित्र फारसे बदलले नाही. अेखाद्या वाङ्मयसेवकाचे, त्याच्या वाङ्मयीन कलाकृतीचे कौतुक वेगळे आणि अभ्यासक्रमात त्या कलाकृतीची नेमणूक करताना तिचा आवाका केवढा याचे भान आणि अवधान आम्ही बाळगले पाहिजे. वादग्रस्त कलाकृती आम्ही टाळल्या पाहिजेत, स्नातकोत्तर वर्गांसाठी पुस्तके नेमताना आवृत्ती संपलेल्या, अनुपलब्ध असलेल्या, कालबाह्य विषयांवरील पुस्तके नेमण्याचे आम्ही टाळले पाहिजे. मायमराठीचे अेवढे वैभव असताना आम्हाला अेवढी हतबलता का जाणवते? काही वेळा प्रादेशिक अभिनिवेश बाजूला सारून उत्तम, संस्कारात संपन्न, अक्षर वाङ्मय कलाकृती अभ्यासक्रमात नेमण्याचा धारदार निर्धार आम्ही दाखविला पाहिजे. इतर विद्यापीठांच्या तुलनेत आमचा अभ्यासक्रम रतीभरदेखील कमी नाही असे वाटले पाहिजे. ज्ञान–रंजन आणि उद्‌बोधन यांचा सुरेख समन्वय साधणाऱ्या अभ्यासक्रमाची आखणी आपण केली पाहिजे.

शुद्धलेखनाच्या बाबतीतील घोळ अेकदाचा मिटला पाहिजे. मिटविला पाहिजे. मराठीखेरीज अन्य भाषेत शुद्धलेखनाच्याबाबत अेवढे अराजक असेल असे वाटत नाही. मराठीचे प्राध्यापक, साहित्यिक, पत्रकार यांच्याखेरीज अन्य कोणी शुद्धाशुद्धतेचा विवेक बाळगण्याची गरज नाही, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. इंग्रजी भाषेतील शुद्धलेखनाची प्रतिष्ठा मराठीतील शुद्धलेखनाला लाभली पाहिजे. शुद्ध–स्वच्छ लिहिले पाहिजे आणि बोलले पहिजे याबाबात दुमत असण्याचे काही कारण नाही.

आजच्या खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या काळात माहिती तंत्रज्ञान, संगणक विज्ञान, आणि परमाणू विद्युत हे परवलीचे शब्द बनले आहेत. माहितीचा विस्फोट झाला आहे. संगणकांच्या या महाजालाने सगळ्यांनाच वेड लावले आहे. आपले नाव, आपल्या संस्था, व्यापारी प्रतिष्ठाने हे संकेत स्थळावर येण्यासाठी सगळ्यांचीच धडपड सुरु आहे. इंग्रजी

हीच ज्ञानभाषा या उक्तीवर आम्ही शिक्कामोर्तब करून इंग्रजी भाषेचे महत्त्व जणू अधोरेखित करून टाकले आहे. इंग्रजीशिवाय पर्यायच नाही, अशी जी आपली धारणा झाली आहे. त्याबाबत अंतर्मुख होऊन एकदा विचार करण्याची गरज आहे. इंग्रजी भाषेबद्दलच्या आकसापोटी मी हे बोलत आहे, असा गैरसमज कृपा करून, करून घेऊ नका. आकस नाही. द्वेष तर मुळीच नाही. आम्ही इंग्रजीच नाही तर फ्रेंच, जर्मन, लॅटीन इ विदेशी भाषांचाही अभ्यास करून भाषाकोविद झाले पाहिजे, मात्र मराठीचा बळी देऊन नाही. जपान, जर्मनी, फ्रान्स या प्रगत देशांत त्यांचीच भाषा चालते. आपल्याही देशांत विशेषत: दक्षिण भारतात तेलगु, कानडी, तामिळ आणि मल्याळम या दाक्षिणात्य भाषांबाबत ते ते प्रांत आग्रही आहेत. इंग्रजी शिकण्याला आमचा विरोध नाही, विरोध इंग्रजी माध्यमाला आहे. वास्तविक मातृभाषा हेच सर्वोत्कृष्ट माध्यम आहे. ज्यांची जयंती आम्ही 'मराठी भाषा दिन' म्हणून दरवर्षी २७ फेब्रुवारीला साजरी करतो, ते मराठी कवितेचे शैलशिखर असलेले 'कुसुमाग्रज' या संदर्भात म्हणतात, "कोणत्याही समाजातील प्रतिभा त्या समाजाच्या मायभाषेत फुलू शकतात. वरून लादलेल्या भाषेत, मग ती कितीही प्रगत असो, बाजारी व्यवहार होऊ शकतील, राजकीय कामकाजही होऊ शकेल, पण समाजाची अस्मिता वा अंतरंग प्रकट करणारं साहित्य परस्थ वा दूरस्थ भाषेत कधी उगवत नाही वा विकसत नाही." यातील मर्म आम्ही जाणले पाहिजे. भाषेच्या दाराने मूल सुसंस्कृत माणसाच्या जगात प्रवेश करते. माय मराठीची ही खिडकी–कवाडच जर आम्ही बंदीस्त करून टाकले तर सगळे भावजीवन उद्‌ध्वस्त होईल. ते रूक्ष, गद्य, निरस होईल. अस्मिताच आपण गमावून बसू.

देवदत्त प्रतिभा लाभलेले आमचे सुरेश भट म्हणाले होते, "खातो मी साय मराठीच्या दुधावरची, आम्ही कोणाचा उंबरा झिजवू कशाला?"

परमकारुणिक भगवान गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माचे तत्वज्ञान 'पाली' या लोकभाषेत, भगवान वर्धमान महावीरांनी जैन धर्माचे तत्त्वज्ञान 'अर्धमागधीत', म. बसवेश्वरांनी वीरशैव लिंगायत पंथाचे तत्वज्ञान 'कानडीत', म. चक्रधरांनी महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान 'मराठीत', ज्ञानोबा ते तुकोबा या संत मालिकेतील संतांनी भागवत धर्माचे तत्त्वज्ञान 'मराठीत' म्हणजे लोकभाषेत मांडून लोकभाषेत ही ज्ञानभाषा व्हावी यासाठी सगळा आटापिटा केला. यादव काळात संस्कृत ही ज्ञानभाषा तर मराठी ही लोकभाषा, यावनी सत्तेच्या काळात अरबी–फारसी ही ज्ञानभाषा तर मराठी ही लोकभाषा आणि देशाला स्वातंत्र्य मिळून ६३–६४ व संयुक्त महाराष्ट्र निर्माण होऊन ५०–५१ वर्षे झाल्यानंतरही

जर इंग्रजी हीच ज्ञानभाषा राहणार असेल तर मराठीचे पांग आम्ही कसे फेडू? अन् तिच्या आरतीला सूर्य–चंद्र कसे आणू?

सुप्रसिद्ध विचारवंत फादर दिब्रेटोंचे याबाबतचे विचार अतिशय मननीय आहेत. “अेखादी भाषा अवगत करण्यासाठी बाल वर्गापासून सर्व विषयांचे माध्यम इंग्रजी करणे हा आत्मघाताचा प्रकार आहे.” इंग्रजी माध्यमातून शिक्षण न घेतलेल्या आमच्या बहुतेक महापुरुषांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व संपादन केले होते, हे आम्ही विसरता कामा नये.

भाषेचे अध्ययन–अध्यापन केवळ पाठ्यपुस्तकांचे नसते. त्यातील कथा–कविता–निबंध–अथवा ललित साहित्याचे नसते तर अेकूणच मानवी जीवनाचे, त्याच्या संस्कृतीचे असते. दलित साहित्यातील वेदना–विद्रोह–आक्रोश या मूल्यांतून संवेदनशीलता–संघर्षशीलता याची जाणीव प्रकर्षाने झाली पाहिजे. पायात काटा रुतला की डोळ्यातून खळकन पाणी आले पाहिजे, नाही आले की समजावे शरीरात बिघाड आहे. अवती–भवतीचे दुःख पाहून अंतःकरणात वेदनेची कळ उठली पाहिजे. चांगल्याला चांगले म्हणण्यासाठी संवेदनशीलता आणि वाईटाला वाईट ठरविण्यासाठी संघर्षशीलता आपल्या ठिकाणी निर्माण करण्याचे काम भाषेच्या माध्यमातून साहित्य करू शकते. साहित्य या शब्दाचा अेक अर्थ स+हित या अर्थाने जे हिताचे आणि दुसरा अर्थ सोबती. सावली सारखे सोबत करणारे. ‘जेथे जातो तेथे तू माझा सांगाती!’ वेगळ्या संदर्भात तुकोबांच्या वचनाचा आधार घेऊन साहित्याच्या बाबतीत आपणाला हे बोलता येईल.

शब्द पुस्तकात असतो. अर्थ जीवनात शोधावा लागतो. विनोबा म्हणाले होते “आजच्या शिक्षणपद्धतीने जीवन आणि शिक्षण अशी फारकत केली आहे. जगता जगता शिक्षण आणि शिकता शिकता जीवनाचा अनुभव घेता आला पाहिजे.” या संदर्भातील एक उद्‌बोधक कथा मला सांगाविशी वाटते. राजा भोज आणि महाकवी कालिदास वेश पालटून राज्याचा फेरफटका मारायला निघालेत, जंगलाचा भाग लागला आणि रस्ता चुकलेत. अेवढ्यात त्यांनाजवळच अेक झोपडी दिसली. तिथे जाऊन चौकशी करता येईल म्हणून तिथे ते गेलेत. समोरच अेक म्हातारी दिसली. तिला त्यांनी विचारले– हा रस्ता कोठे जातो ? म्हातारी म्हणाली “प्रवासी दोन, सूर्य आणि चंद्र.” हे म्हणाले, ‘आम्ही राजे आहोत.’ म्हातारी म्हणाली, ‘राजे दोन, यम आणि मेघ.’ हे म्हणाले, ‘आम्ही क्षणभंगूर माणसे आहोत.’ म्हातारी म्हणाली, ‘क्षणभंगूर दोन गोष्टी असतात, अेक तारुण्य आणि दुसरा पैसा.’ तिचा जीवनानुभव पाहून हे

म्हणाले, 'आम्ही हरलो.' म्हातारी म्हणाली, 'हरतात दोघे अेक पोरीचा बाप आणि दुसरा ॠणको.' जीवनात शोधाव्या लागणाऱ्या शब्दांचा अर्थ राजा भोज आणि कालिदास यांच्यासमोर म्हातारीने किती सहजपणे उलगडून दाखविला. तिला दोघांनी साष्टांग प्राणिपात केला आणि ते म्हणाले, 'तू सरस्वती कन्या आहेस.' आम्ही सरस्वतीचे औरस पुत्र आणि औरस कन्या व्हावेत हीच समाजाची अपेक्षा आहे.

मराठी बोलण्याबाबतची मनात असलेली न्यूनगंडाची भावना आम्हाला अगोदर झुरळासारखी झटकून टाकावी लागेल. मुंबई–पुणे–नागपूर –नाशिक–औरगांबाद इ. महानगरातील मुले अेकतर मराठी बोलत नाहीत. बोलली तरी संमिश्र मराठीत बोलतात. दूरदर्शन आणि चित्रपटातून आलेले सांस्कृतिक आक्रमण आम्ही थोपवू शकत नाही. निदान घरात आम्ही त्यांच्याशी शुद्ध–सुंदर–मराठीत बोलेले पाहिजे. देवघर, दिवाणखाणा, माजघर, स्वयंपाकघर या ठिकाणी जिव्हाळ्याने बोलल्या जाणाऱ्या बोलीशी अतूट नाते असलेली घरगुती मराठी, त्या मुलांमध्ये आत्मविश्वास जागा करेल. त्यांच्या मनात मराठी बद्दलची गोडी निर्माण होईल. ते जे इंग्रजाळलेली मराठी बोलतात, त्याला प्रतिबंध बसेल आणि मुख्य म्हणजे माय मराठीच्या अमृततुल्य दुधावर पोसला जाणारा त्यांचा पिंड आपोआपच संस्कृतीचा आधारस्तंभ बनेल. अेक विचारवंत अेकदा म्हणाला होता– "ज्या देशातील माणसे त्या देशांत निर्माण झालेले अन्न सेवन करीत नाहीत, तो देश भुकेकंगाल असतो. ज्या देशातील माणसे त्या देशांत निर्माण झालेले कापड परिधान करीत नाहीत, तो देश विवस्त्र असतो आणि ज्या देशातील माणसे त्या देशातील भाषांमध्ये आपले भाषिक व्यवहार करीत नाहीत, त्या देशाला अस्मिता नसते." आणि अस्मिता गमावून जर काही मिळत असेल तर त्याला काही अर्थ नाही. कधी न आटणारा स्वाभिमानाचा जिवंत झरा प्रज्ञाचक्षू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दैन्य, दुःख, दारिद्र्य आणि अज्ञानात खितपत पडलेल्या आपल्या समाज बांधवांना दिला आणि ही अस्मिता घेऊनच भूतकाळाच्या डोक्यावर पाय ठेवून, भविष्याचा वेध घेत, समर्थ वर्तमान ते आज जगत आहेत, हे आम्ही ध्यानात घेतले पाहिजे.

'राष्ट्र उभारणीत भाषा व संस्कृती यांची भूमिका' – या विषयावर मुंबई विद्यापीठाचा भाषा विभाग व अकॅडमी ऑण्ड सोशल स्टडी, पुणे यांनी तीन दिवसांचे चर्चासत्र नुकतेच आयोजित केले होते. त्यात सादर केल्या गेलेल्या निबंधातील काही भाग या परिषदेच्या निमित्ताने मी उद्धृत करतो.

'जुना मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात शहरांमध्ये राहणारा व उच्चवर्णीयांमधून निर्माण झाला होता. नवा मध्यमवर्ग केवळ शहरांपुरता मर्यादीत राहिलेला नाही. त्याचे अस्तित्व ग्रामीण भागांतही जाणवते. हा मध्यमवर्ग केवळ उच्चवर्णीयांपुरता मर्यादित राहिलेला आहे, असेही म्हणता येणार नाही. त्याचा व्याप बहुतेक जातींमध्ये विस्तारलेला आहे. महाराष्ट्रात सर्वदूर पोहचलेला आहे, अठरापगड जातींतून निर्माण झालेला व सांस्कृतिक व्यवहाराच्या केंद्रस्थानी आलेला हा नवा मध्यम वर्ग मराठी साहित्यातील जाणिवेचे भरण पोषण आजघडीला करतो आहे." हा लेखकाने काढलेला निष्कर्ष यथायोग्य आहे. मराठीच्या भवितव्याबाबत पडलेल्या प्रश्नचिन्हाचे उत्तर ह्या नव्या मध्यमवर्गाने परस्पर देऊन टाकले आहे. शिक्षणाने त्याच्या जाणिवा प्रगल्भ झाल्यात, विचारांच्या कक्षा रूंद झाल्या, त्याला आत्मभान गवसले. अविद्येचे अनर्थ त्याला कळून चुकले. मती–गती आणि नीती यांच्या संयोगातून होणाऱ्या समाज परिवर्तनाची आधारशिला शिक्षण आहे, ही शिक्षणातील ताकद त्याला उमगली.आपल्या अंगभूत गुणांनी व्यक्त होते ते व्यक्ती आणि व्यक्तीची ती अभिव्यक्ती. शिक्षणाचा एक अर्थ अभिव्यक्ती असाही आहे. या अभिव्यक्तीतूनच १९६० नंतरचे मराठी साहित्य निर्माण झाले आहे, त्यानंतर दुसरा टप्पा आहे १९७५ नंतरचा. याच दरम्यान झालेली नव्या मध्यम वर्गाची निर्मिती 'ग्रामीण साहित्य' आणि 'स्त्रीवादी साहित्या'ची. याच सुमारास आकाराला आलेली चळवळ, आणि त्यानंतरच्या पुढील दोन तपांच्या काळात विविध अस्मितादर्शक संज्ञा–संकल्पना यांचे स्प प्रतिबिंब मराठी साहित्यात उमटले आहे. त्याचा मूल्य वेध मराठीच्या अभ्यासकांना घ्यावा लागेल. असे म्हणतात, की माणसाने समोर पहावं, त्याला भविष्य कळतं, मागे पहावं त्याला भूतकाळ कळतो, अवती–भवती पहावं त्याला सत्य समजतं, स्वतःच्या आत डोकावून पाहावं त्याला, स्वतःचा परिचय होतो. बदलत्या काळाची चाहूल घेऊन जो समाज मार्गक्रमण करतो तोच समाज प्रगतीपथावर वाटचाल करतो. न वाहणारे पाणी जसे सडून जाते ते पिण्याच्या तर सोडा वापरण्याच्या योग्यतेचे राहत नाही. तसाच न बदलणारा समाज नामशेष होतो. आजच्या विज्ञान आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या काळात मराठीचे जतन–संवर्धन करण्याच्या हेतूने अध्यापनाचे तंत्रही विकसित करावे लागेल. पारंपरिक स्वरूपाच्या अध्यापनाबरोबरच नव्या तंत्रज्ञानाचा, ध्वनिफितीची, चित्रफितीची, उपग्रहावरून थेट ध्वनी लहरींच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या माहितीचा कसा उपयोग करून घेता येईल? याचा विचार होणे अगत्याचे आहे. त्या दृष्टीने 'मराठी अध्यापनात

नव्या तंत्रज्ञानावा अंतर्भाव : काळाची गरज' हा परिसंवाद उपयुक्त ठरू शकेल. सहभागी वक्त्यांच्या विचार मंथनातून काही दिशादर्शक असे निष्कर्षाचे नवनीत हाती लागू शकेल असा विश्वास आहे.

मी यापूर्वीच म्हटल्याप्रमाणे समाजमूल्यातच भेसळ झाली की काय? असा सर्वत्र मूल्यऱ्हास झाला आहे. शाश्वत, अपरिवर्तनीय मूल्ये प्रदूषित झाली आहेत. अगतिक–हतबल झालेला समाज आपल्या संवेदनाच हरवून बसला आहे. 'सारे कसे शांत–शांत, तरंग नाही तलावांत।' असे कविवर्य डॉ. विठ्ठल वाघ म्हणाले होते, ते खरे ठरल्याचा दुःसह प्रत्यय येत आहे. त्या दृष्टीने 'बदलत्या मूल्यव्यवस्थेत मराठीच्या अध्यापकाची जबाबदारी' ह्या विषयावरील परिसंवादही तितकाच महत्त्वाचा आहे. अध्यापकाचे दायित्व वाढले आहे.

अेकच अेक मुद्दा आरंभापासून मी घोळवत आणला. भाषा–साहित्य आणि संस्कृतीचा असलेला नाळसंबंध. मूल बोलायला लागलं आणि त्याच्यावर पहिला संस्कार भाषेचा होतो. संस्कार म्हणजे मनाची मशागत. भाषा हा त्या दृष्टीने मूलभूत घटक आहे. दैनंदिन व्यवहारात मराठीचा कटाक्षाने वापर, म्हणजे नकळत होणारा संस्कारच आहे. हिंदीच्या प्रचार–प्रसाराच्या संदर्भात. 'हिंदी की बात मत करो, हिंदी मे बात करो ।' अस म्हणतात. तसेच मराठीबद्दल खूप चर्चा झाली, आता मराठीला केंद्रस्थानी ठेवूनच सर्व भाषिक व्यवहार व्हावेत एतदर्थ प्रार्थना!

अेका महत्त्वाच्या मुद्याला स्पर्श करून मी अध्यक्षीय भाषणाचा समारोप करतो. 'राष्ट्रभाषा हिंदीचे' स्वतंत्र विद्यापीठ वर्धा येथे झाले. गीर्वाण भाषेचे संस्कृतचे विद्यापीठ रामटेक–नागपूर येथे झाले. आता राजभाषेचा दर्जा असलेल्या मराठीचे विद्यापीठ लवकरच निर्माण झाले पाहिजे. मग महाराष्ट्रात ते कोठेही होवो. आम्ही त्यासाठी भांडणार नाही. ठाणे येथे नुकत्याच झालेल्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनात मराठी विद्यापीठाच्या संदर्भातील ठराव पारीत झाल्याचे वाचनात आले. आता त्याचा पाठपुरावा करून तो सिद्धीस नेला पाहिजे. मायमराठीचा यथोचित गौरव कविश्रेष्ठ सुरेश भटांनी केला, त्या काव्यपंक्तीची उसनवारी करून मी माझ्या भाषणाला पूर्णविराम देतो.

"लाभले आम्हांस भाग्य, बोलतो मराठी ।
जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी ।
धर्म–पंथ–जात एक जाणतो मराठी ।
एवढ्या जगात माय मानतो एक मराठी ।।"

❖❖❖

# २५ वे अधिवेशन
## कला वाणिज्य महाविद्यालय, मारेगाव, जि.यवतमाळ
## १३ मार्च २०१२
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. एस. एम. कानडजे

या पंचविसाव्या अधिवेशनाचे उद्‌घाटक डॉ. भोजराजजी चौधरी, माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. रूद्रावार सर, स्वागताध्यक्ष मा. श्री. कापसे पाटील, प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. चवरे सर, परिषदेचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकारीणी सदस्य, संयोजक प्राचार्य डॉ. अविनाश घरडे आणि सर्व रसिक प्राध्यापक बंधुभगिनींनो,

मराठी प्राध्यापक परिषदेच्या या अधिवेशनाचे अध्यक्षपद देऊन आपण माझा जो सन्मान केला, त्याबद्दल परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे, संयोजकांचे आणि उपस्थितांचे मी मनापासून आभार मानतो. प्राचार्य डॉ. चवरे ह्यांनी माझ्यावर ही अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली, अतिशय आपुलकीने आणि आग्रहाने माझा गौरव केला, त्याबद्दल मी त्यांना व आपल्या सर्वांना मनापासून धन्यवाद देतो. प्राध्यापक परिषदेचे हे अध्यक्षपद स्वीकारताना आणि या अध्यक्षपदावरून भाषण करताना मला आनंद होणे स्वाभाविक आहे. पण त्याचे सर्व श्रेय माझ्या पात्रतेपेक्षाही आपल्या गुणग्राहकतेला अधिक आहे, याची मला नम्र जाणीव आहे.

### प्रतिनिधी आणि प्रतिध्वनी :

मित्रहो, मी काही साहित्यिक किंवा समीक्षक नाही, विचारवंत किंवा तत्त्वचिंतक असण्याचा तर प्रश्नच नाही. तरीही मला हे अध्यक्षपद देण्यात आले आणि मी ते स्वीकारले, याचे एकमेव कारण मी मराठी साहित्याचा विद्यार्थी आहे. मराठी भाषेचा एक सामान्य, प्रामाणिक कार्यकर्ता आहे. गेल्या चाळीस वर्षांपासून मी मराठी विषय शिकवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. पण आज मागे वळून पाहताना मला असे वाटते की, शाळा–कॉलेजमध्ये मराठी भाषा व साहित्याकडे फारसे आस्थेने पाहिले जात नाही. दुर्दैवाने असे आढळून येते की, लेखन–वाचन, अध्ययन–अध्यापन, संशोधन–उपाययोजना या बाबतीत मराठी भाषा व साहित्य याचा कोणी फारसा गांभीर्याने विचार करीत नाही. अर्थात याला काही सन्माननीय अपवाद आहेत. पण एक सोपा,

साधासुधा विषय समजून त्याकडे दुर्लक्ष केले जाते, हेही नाकारता येत नाही. कारणे कोणतीही असोत, पण हे एक कटू सत्य आहे. कठोर वास्तव आहे आणि आधी आपण ते मोकळ्या मनाने स्वीकारले पाहिजे. हे वास्तव स्वीकारून त्याबाबतीत आपण आत्मपरीक्षण केले पाहिजे. त्यासंबंधी विचार विनिमय करण्याकरिता आपल्या मतांची देवाणघेवाण करण्यासाठी आपण येथे उपस्थित झालो आहोत.

याप्रसंगी आपल्या प्राध्यापक मित्रांचे अधिकारवाणीने उद्‌बोधन करावे, त्यांना मार्गदर्शन करावे, त्यांच्यासमोर काही महत्त्वाचे विचार मांडावे, असा माझा हेतू नाही. तेवढा माझा व्यासंग आणि अधिकार आहे, असे मला वाटत नाही. या उलट, 'प्राध्यापक परिषदे'च्या निमित्ताने आपल्याशी संवाद साधावा, सद्य:स्थितीत मराठी प्राध्यापकांच्या एकूण भूमिकेवबद्दल मला जे काय वाटते, ते 'शेअर' करावे, त्यांची मांडणी करावी, यासाठी माझा हा सारा खटाटोप आहे. त्यामुळे येथे तुमचा एक प्रतिनिधी म्हणून तुमच्याच भावभावना व्यक्त करण्याचा ती प्रयत्न करणार आहे. 'करितो कवित्व म्हणाल हे कोणी, नव्हे माझी वाणी पदरीची' अशी माझी सध्याची स्थिती आहे. म्हणून माझे हे प्रतिपादन म्हणजे तुमच्याच भावकल्लोळाचा प्रतिध्वनी आहे, असे मी समजतो.

## आत्मसन्मानाकडे !

आज समाज प्राध्यापकांकडे एका विशिष्ट दृष्टिकोणातून पाहतो. त्यामुळे त्याचे समाजात एक खास, वेगळे आणि मुख्य म्हणजे व्यवसायबाह्य असे स्थान निर्माण होत आहे. ते प्राध्यापकाच्या पूर्वीच्या प्रतिमेला छेद देणारे आहे. १९८०–८५ पूर्वी म्हणजे चौथा वेतन आयोग वेतन लागू होण्यापूर्वी प्राध्यापकांची एकूण आर्थिक स्थिती फारशी समाधानकारक नसली तरी तेव्हा 'प्राध्यापक' या पदाला वलय होते, प्रतिष्ठा होती. प्राध्यापक म्हणून त्याला समाजात एक विशेष आदर होता. कारण व्यासंग, संशोधन, संघटन, विचारधारा, चळवळ, प्रबोधन याबाबतीत पूर्वीच्या प्राध्यापकांकडून मिळणारे योगदान महत्त्वाचे आहे, अशी समाजाची रास्त धारणा होती. आजच्या प्राध्यापकांची स्थिती काहीशी वेगळी आहे. विद्यापीठीय, शहरी, निमशहरी आणि ग्रामीण अशी प्राध्यापकांची स्थलपरत्वे वर्गवारी करता येते. त्यांच्या एकूण कामाचे आणि व्यासंगाचे स्वरूप कमी अधिक गुणवत्तेचे असू शकते. पण त्यात काही बाबी समान आढळतात. उदाहरणार्थ, मराठीच्या प्राध्यापकांना नोकरी मिळविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या खटपटी, मराठी भाषा व साहित्य

याविषयीचा त्याचा तुटपुंजा व्यासंग, त्याला करावी लागणारी अशैक्षणिक कामे, समाजामध्ये रूढ असलेला प्राध्यापकाकडे बघण्याचा विशिष्ट दृष्टिकोण ह्या बाबी आपल्या दृष्टीने स्पृहणीय नाहीत. त्यात दिवसेंदिवस आणखी काही जाचक आणि नाउमेद करणाऱ्या गोष्टींची भर पडत आहे.

प्रशासनाची निष्क्रीयता, विद्यार्थ्यांची उदासीनता, संस्थाचालकांच्या अवाजवी अपेक्षा आणि त्यांच्याकडून वेळीअवेळी पाजले जाणारे उपदेशांचे डोस, साधनसामग्रीची अनुपलब्धता, संदर्भग्रंथांची वानवा आणि एकूणच उत्साहवर्धक शैक्षणिक वातावरणाचा अभाव या साऱ्या बाबींचा विचार करता मराठीच्या प्राध्यापकांकडून कोणत्या अपेक्षा कराव्यात? आणि त्या का कराव्यात? असे वाटणे अपरिहार्य आहे. पण आपण सारेजण भारतीय लोकशाहीच्या एका विशिष्ट व्यवस्थेत काम करीत आहोत. त्यामुळे आपल्याला न आवडणाऱ्या, न पटणाऱ्या, गैरसोयीच्या असणाऱ्या, अनेक बाबींना सामोरे जावे लागत आहे. त्याचे आपल्या संवेदनशीलतेवर आघात होत आहेत. पण तरीही आपण आपल्या प्रगतीशील वाटेमध्ये अडसर ठरणाऱ्या ह्या बाबी केवळ सकारात्मक, विधायक, आशावादी आणि सृजनशील दृष्टिकोणातून स्वीकारल्या पाहिजे. कारण, आपण समग्रपणे व्यवस्था परिवर्तन करू शकत नाही, भोवतालचे वास्तव मनासारखे बदलू शकत नाही, अलीकडे तर फार मोठे मोल चुकवून या व्यवसायात यावे लागते. हे सारे खरे आहे पण तरीही 'आपणावर एक फार मोठी सांस्कृतिक जबाबदारी आहे', हे भान ठेवून काम केले तरच आपले व्यावसायिक जीवन सफळ–संपूर्ण होऊ शकेल, असे मला वाटते. कारण आपल्याला आपली स्वत:ची एक 'ओळख' निर्माण करायची आहे. आपल्या प्राध्यापकी व्यक्तिमत्त्वाचा मलीन झालेला 'चेहरा' 'उजळ' करायचा आहे. आपल्याला हव्या असलेल्या व्यावसायिक समाधातून (Job satisfaction) आत्मसन्मानाकडे (Self Esteem) अव्याहतपणे मार्गक्रमण करायचे आहे.

## मराठीची उपयुक्तता?

मित्रहो, आपण एक गोष्ट मोकळ्या मनाने आणि वस्तुनिष्ठपणे समजून घेऊ. मराठी विषयाकडे, भाषेकडे आणि मराठी साहित्याकडे शाळा कॉलेजांमध्ये काहीशा तुच्छतेने पाहिले जाते. त्याला 'गृहित' धरले जाते. आजच्या स्वार्थी, चंगळवादी आणि व्यवहारवादाच्या काळात प्रत्येक गोष्टीचेच मूल्य त्याच्या उपयुक्ततेवरून ठरविले जाते, त्याचाच हा परिणाम आहे.

जागतिकीकरणाच्या या काळात सामान्य वस्तूपासून माणसापर्यंत प्रत्येक गोष्टीलाच विक्रीच्या वस्तूचे रूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे समाजात एक प्रकारची आत्मकेंद्री, तुच्छतावादी वृत्ती वाढत चालली आहे. त्याचा परिणाम म्हणून साहित्य, कला, संस्कृती आणि एकूणच जीवनमूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. अशा या व्यवहारवादी, मतलबी दुनियेत स्वाभाविकपणेच जे शिक्षण, जी शाखा, जो विषय तुम्हाला उपजीविकेचे साधन मिळवून देण्यास उपयुक्त ठरत नाही, हातभार लावत नाही, ते शिक्षण, ती शाखा, तो विषय निरर्थक वाटू लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना मराठी शिकण्यात रस वाटत नाही. तसेच प्राध्यापकांनाही शिकवताना त्यात काही आव्हानात्मक आहे, असे वाटत नाही.

शिवाय आज तर जगण्याची संपूर्ण परिभाषाच बदलून गेली आहे. जणू आपण 'ग्लोबल मार्केट'मध्ये वापरली जाणारी 'कन्झ्युमर' भाषा स्वीकारू लागलो आहेत. १९९० नंतरच्या दशकापासून वाहू लागलेले जागतिकीकरणाचे वारे केवळ महानगरांपर्यंत–शहरांपर्यंत मर्यादित न राहता तो ते आता खेड्या–पाड्यांपर्यंत, इतकेच नव्हे तर डोंगर–दऱ्यांतील सुदूर भागांपर्यंत पोचले आहेत. त्यामुळे आपला समाज एका मोठ्या आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक संक्रमणावस्थेतून जात आहे. आर्थिक सुबत्ता हे त्या संक्रमणाचे उद्दिष्ट आहे. गरिबी आणि श्रीमंती यांच्यात वाढत चाललेली दरी, त्यातून निर्माण होणारी भयावह आर्थिक विषमता दिवसेंदिवस उग्ररूप धारण करीत आहे. तिच्यामुळे समाजातील माणुसकी, चांगुलपणा, प्रामाणिकपणा, जीवनमूल्ये संपुष्टात येऊ लागली आहेत.

अशा स्थितीत शिकण्यासाठी धडपडणाऱ्या तरूण वर्गाला मराठी भाषा आणि मराठी साहित्य हे विषय फारसे महत्त्वाचे वाटत नाही, त्यांच्या दृष्टीने ते निरर्थक, कालबाह्य आणि निरूपयोगी झाले आहे. त्याची ही अशी समजूत होण्यास आपले अभ्यासक्रम, आपली पाठ्यपुस्तके, आपली अध्यापनशैली आणि आपली परीक्षापद्धतीही हारभार लावीत आहे. म्हणूनच मराठी विषयाचे महत्त्व, त्याची व्यावहारिकदृष्ट्या असणारी उपयुक्तता, व्यक्तिमत्त्व विकासातील त्याचे स्थान, करिअर करण्यामध्ये त्याचा असणारा वाटा, अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी त्याचा होणारा लाभ इत्यादी बाबा आता आपल्याला नव्याने सिद्ध कराव्या लागणार आहेत, पटवून द्याव्या लागणार आहेत. त्यासाठी आपल्याला विशिष्ट भूमिकेतून, बांधिलकीतून डोळस व जबाबदार प्राध्यापक म्हणून गांभीर्याने काम करावे लागणार आहे. या प्राप्त

परिस्थितीत मराठीच्या प्राध्यापकांची भूमिका, त्यांची महत्त्वाकांक्षा आणि त्यांना एकूण विचारप्रणाली कशी असावी, याविषयी मी आपल्यासमोर मांडतो. आपण त्यांचा साधक—बाधक परामर्श घ्यावा, अशी अपेक्षा आहे.

१. आपण सारे मराठी भाषेचे आणि साहित्याचे प्राध्यापक आहोत. कोणतीही भाषा आणि त्या भाषेतील साहित्य हे जीवनस्पर्शी आणि समाजसापेक्ष असते. याचा अर्थ आपण आपल्या जीवनाचा आणि समाजाचा भाषा—साहित्याच्या माध्यमातून अभ्यास करणारे विद्यार्थी आहोत. आपल्या अवतीभवतीचा समाज आणि भाषा, साहित्य यांचा अविभाज्य संबंध असतो. समाजात, आपल्या आसपास ज्या गोष्टी घडत असतात त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. भाषेतून ते उमटत असते. म्हणून प्राध्यापकाने समकालीन प्रश्नांकडे पाठ फिरवू नये. त्याने प्रचलित सामाजिक समस्यांचा आस्थेने विचार करावा. त्याचे प्रतिबिंब भाषेत आणि साहित्यात कोठे व कसे आढळून येते, याचा गांभीर्याने शोध घेतला पाहिजे. तसेच आपण समजून घेतलेले जीवन आणि त्याला व्यापून असणारा समाज आपल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शिकवायचा असल्याने आपण त्याच्याकडे स्वतंत्र, पूर्वग्रहमुक्त, स्वागतशील, सकारात्मक तसेच विधायक दृष्टीने पाहिले पाहिजे. आपल्याला आज अनेक सामाजिक समस्या गंभीरपणे भेडसावत आहेत. त्यामुळे आपले समाजजीवन स्पर्धात्मक आणि संघर्षात्मक बनले आहे. ह्याच सामाजिक जीवनाच्या भूमीत आपल्या विद्यार्थ्याला घट्टपणे पाय रोवून उभे राहावयाचे आहे. त्याच्या वाट्याला येणाऱ्या जीवनसंघर्षावर मात करावयाची आहे. त्यासाठी मानसिक—बौद्धिकदृष्ट्या तो परिपक्व होणे आवश्यक आहे. ही परिपक्वता, प्रगल्भता यावी म्हणून आपले भाषा—साहित्याचे अध्यापन त्यांच्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरू शकेल, याची आपण पक्की खात्री बाळगली पाहिजे.

२. यासंदर्भात दुसरे असे की, प्राध्यापक पदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी आपली एक विशिष्ट अशी जडणघडण झालेली असू शकते. आपला एखादा पक्ष, संघ किंवा आपली एखादी संघटना, चळवळ किंवा विचारधाराही असू शकते. पण महाविद्यालयात आपल्याला विचारपिठावरून विषय प्रतिपादन करायचे असते, तेथे प्रचारपिठावरून कोणत्याही भूमिकेचे समर्थन करायचे नसते. तेथे आपली भूमिका संबंधित विषयाला, त्या विषयातील अभ्यासक्रमाला पुरेसा न्याय देणारी असली पाहिजे. ही खबरदारी आपण घेतली पाहिजे, जेव्हा आपण ती घेत नाही, तेव्हा आपल्या अध्यापनाला 'व्यावसायिक बेइमानी'चे स्वरूप प्राप्त होते. याचा अर्थ जीव ओतून, प्रामाणिकपणे, विषयाला धरून

शिकविणे हाच प्राध्यापकाचा खरा धर्म असतो. तसेच त्याने आपल्या विद्यार्थ्यांचा केवळ 'विद्यार्थी' म्हणूनच विचार केला पाहिजे. त्याचे विद्यार्थ्यांशी असलेले वर्तन माणुसकीचे, मनुष्यत्वाची प्रतिष्ठा जपणारे आणि जात–धर्म–लिंग–वंश निरपेक्ष असे असले पाहिजे. त्याने विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे, वस्तुनिष्ठ विचार करायला शिकवावे, त्यांना त्यांची मते बनवू द्यावीत, आपले विचार त्यांच्यावर लादू नये.

३. मराठीच्या प्राध्यापकाने आपल्या भाषेबद्दल, साहित्याविषयी अजिबात न्यूनगंड बाळगू नये. उलट

"लाभले आम्हांस भाग्य, बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी
धर्म–पंथ–जात एक, जाणतो मराठी
येवढ्या जगात माय, मानतो मराठी"

कवी सुरेश भटांनी शब्दांकित केलेली मनोधारणा हेच त्याने आपले प्रतिज्ञोत्तर मानले पाहिजे. त्यासाठी मराठी भाषेचे स्वरूप, तिचा विकास, तिच्या विकासातील टप्पे, तिच्या बोली, तिची समृद्धी, तिच्या अभिवृद्धीची सामाजिक दृष्टी, तिचा व्याप आणि विस्तार, तिची दुरवस्था आणि तिचे भवितव्य, तिची संरचना आणि तिच्यात होणारे परिवर्तन ह्या साऱ्या बाबी मराठीच्या प्राध्यापकांनी साक्षेपाने अभ्यासल्या पाहिजेत. त्याच्याजवळ सकारात्मक 'भाषाभान' असले पाहिजे. हे भाषाभान आणि मराठीचा 'साथ' अभिमान असल्याशिवाय मराठीचा प्राध्यापक खऱ्या अर्थाने अध्यापन करूच शकणार नाही.

४. प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम ठरविणे, त्याला अनुसरून पाठ्यपुस्तके तयार करणे किंवा त्यांना मान्यता देणे, त्या विषयीची मूल्यमापनप्रणाली निर्धारित करणे, त्याबाबतीत प्राध्यापकांचे उद्बोधन करणे, अभ्यासपूरक कार्यक्रमांच्या आयोजनाबाबत मार्गदर्शन करणे ही आणि इतर अनुषंगिक कामे अभ्यासमंडळामार्फत पार पाडली जातात. अभ्यासमंडळाला प्राध्यापकांकडून विधायक सूचना आणि उपयुक्त प्रतिसाद मिळाला तर मराठी विषयाचा अभ्यासक्रम तयार करताना तो कसा कालसंगत, उपयोजित, जीवनोपयोगी ठरू शकेल याचा विचार करता येतो. आपल्या अभ्यासमंडळाने आवश्यक मराठीच्या अभ्यासक्रमात सुधारणा करताना ह्या बाबी अवश्य विचारात घेतल्या आहेत. आपल्याला पुढील दोन शैक्षणिक वर्षांत त्याची चांगली प्रचिती आल्याशिवाय राहणार नाही, याची मी अभ्यासमंडळाचा सदस्य या नात्याने

ग्वाही देतो.

५. आपण मराठीचा विशेषत: मराठी साहित्याचा जो अभ्यासक्रम तयार करतो, तो प्रामुख्याने समीक्षाधार्जिणा असतो आणि समीक्षेच्याच अंगाने तो शिकविला जातो. तो आस्वादात्मक कमी आणि समीक्षणात्मक जास्त असतो. त्यामुळे एक कलाकृती म्हणून विद्यार्थ्यांना साहित्याचा आस्वाद, आनंद घ्यायला आपण शिकवतो का? हा मराठीच्या प्राध्यापकांनी आवर्जून विचार करावा असा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. जणू मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमातून आपल्याला फक्त समीक्षण निर्माण करावयाचे आहे, असे वाटते. गाणं, नृत्य, अभिनय, चित्रकला ह्या कलांप्रमाणेच लेखन हीसुद्धा एक कला आहे. पण हे कलाप्रकार शिकविण्याचे रीतसर अभ्यासक्रम आहेत. मराठी साहित्याच्या बाबतीत मात्र तसे अभ्यासक्रम असल्याचे आढळून येत नाही. यासंबंधी काही अडचणी असू शकतील, साहित्य हा एक वेगळा कलाप्रकार असल्यामुळे तशा मर्यादाही असतील. पण साहित्यकृतीचा आस्वाद आणि निर्मिती या अनुषंगानेही अभ्यासक्रमाची मांडणी येणे शक्य आहे. तसा प्रयत्न झाला तर मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमातून 'सृजनशील करिअर'ची वाट दाखविली जाऊ शकेल, असे वाटते. त्यादृष्टीने मराठीच्या प्राध्यापकांनी आपले विचार व्यक्त केले पाहिजे. प्रचलित अभ्यासक्रम शिकवितानाही तो दृष्टिकोण समोर ठेवला पाहिजे. डॉ. आनंद पाटील याचे 'सृजनात्मक लेखन' हे पुस्तक याबाबतीत निश्चितच उपयुक्त ठरू शकेल.

६. येथे एक वस्तुस्थिती आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी झगडणाऱ्या 'मराठी अभ्यासकेंद्रा'ने मराठीच्या व्यावसायिकरणाचा एक प्रस्ताव तयार केला आहे. महाविद्यालये आणि विद्यापीठ स्तरावरील मराठी विषयाच्या प्रचलित अभ्यासक्रमात कालोचित सुधारणा करणे, हा त्या प्रस्तावाचा उद्देश आहे. डॉ. प्रकाश परब ह्यांनी ह्या विषयावर 'मराठीच्या उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा' असे एक पुस्तकही प्रकाशित केले आहे. त्यात त्यांनी मराठी विषयाचा प्रचलित साहित्यलक्ष्यी आणि समीक्षाकेंद्री अभ्यासक्रम बदलून तो जास्तीत जास्त व्यवसायाभिमुख कसा होईल, मराठी विषयाचे व्यवसायीकरण कसे करता येईल, याची सविस्तर चर्चा केली आहे.

"महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावरील मराठी विषयाचे स्वरूप प्रामुख्याने साहित्यकेंद्री राहिले आहे. त्यात कलानुरूप बदल न झाल्याने या विषयाकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला आहे. हा विषय अभ्यासणारे विद्यार्थी प्रामुख्याने बहुजन समाजातील असतात. मराठी भाषेच्या व साहित्याच्या आवडीने ते ह्या

विषयाकडे वळत असले तरी त्यांच्यावर बेकार राहण्याची पाळी येते. मराठीच्या पारंपरिक अभ्यासक्रमाची उद्दिष्टे व स्वरूप आणि गेल्या दशकात बदललेले व्यवसाय रोजगारांचे जग यांच्यात विसंगती निर्माण झाल्यामुळे मराठीच्या प्रचलित पाठ्यक्रमांचा पुनर्विचार करून त्यात कालोचित सुधारणा करण्याची वेळ आली आहे' ही मराठी अभ्यासक्रेंद्राची भूमिका आपण सर्व मराठीच्या प्राध्यापकांनी समजून घेतली पाहिजे. तसेच वेळोवेळी आणि जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा तेव्हा तिचे समर्थन केले पाहिजे. 'मराठी भाषेची संवाद कौशल्ये' 'प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये', 'व्यावहारिक मराठी', 'सृजनात्मक लेखन' ह्या अनुषंगाने मराठी भाषेचा अभ्यासक्रम तयार करण्यावर अधिकाधिक भर दिला गेला पाहिजे आणि प्राध्यापकांनीही मराठीचे अध्यापन करताना ते जास्तीत जास्त उपयोजित, व्यावहारिक आणि व्यवसायाभिमुख कसे होईल, याची काळजी घेतली पाहिजे.

७. आजचा तरुण विद्यार्थी हा स्पर्धेच्या युगात वावरतो आहे. त्याचा जीवनसंघर्ष दिवसेंदिवस अधिक बिकट होत चालला आहे. या गतिमान युगात टिकून राहण्यासाठी त्याला आपली गुणवत्ता सिद्ध करावी लागत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये तशी काही ना काही तरी सुप्तक्षमता असतेच. फक्त ती ओळखणे, तिच्या संवर्धनासाठी प्रोत्साहन देणे हे काम मराठीचा प्राध्यापक राष्ट्रीय सेवा योजना किंवा इतर Extra Curricular Activities मधून चांगल्या प्रकारे करू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना निर्मितीची ऊर्मी आणि जगण्याचे बळ मिळू शकते. त्यातून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचीही चांगली जडणघडण होऊ शकते. त्यातूनच तो स्वत:चे करिअरही करू शकतो. हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना जबाबदारीची पाळंमुळं आणि कल्पनाशक्तीचे पंख बहाल करण्याचे काम करणे, हेच मराठीच्या प्राध्यापकाचे आद्यकर्तव्य आहे, यात शंका नाही.

८. मित्रहो, मानवी जीवन हे अत्यंत व्यामिश्र, अस्थिर, गतिमान आणि गुंतागुंतीचे झाले आहे. या गतिमान झालेल्या युगात, जगात आणि जीवनात जो तो वेगाने धावतो आहे. पण ही धावपळ कशासाठी करायची याचाच जणू आपल्याला विसर पडत आहे. परिणामत: माणूस दिवसेंदिवस अधिकाधिक एकाकी, भयग्रस्त होऊ लागला आहे. कारण, जीवनाचा तो साकल्याने विचार करीत नाही. जीवनाशी संबंधित प्रत्येक दृष्टिकोण तो भिन्न आणि सुट्या स्वरूपात समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. परिणामत: तो एक संदर्भशून्य, दिशाहीन जीवन जगत असल्यामुळे सैरभैर झाला आहे.

अशा स्थितीत आपला विद्यार्थी हा आत्मविश्वासाने जीवनाभिमुख कसा होईल, तो निर्भयपणे प्राप्त परिस्थितीला कसा सामोरा जाईल, स्वत:च्या क्षमतांचा तो कसा विकास करेल, याबाबतीत त्याला आपुलकीने आणि अधिकारवाणीने मार्गदर्शन हवे आहे. असे मार्गदर्शन की जे त्याच्या आयुष्यातील Turning Point ठरू शकेल. मात्र त्यासाठी फक्त 'पाठीवरती हात ठेवून नुस्ते लढ म्हणा' असे करून चालणार नाही. याउलट प्राध्यापकाला आपल्या विद्यार्थ्याची सृजनशीलता शोधावी लागेल, ती विकसित करण्यासाठी त्याला उभारी द्यावी लागेल. त्याशिवाय त्याच्या जगण्याला आशय आणि आकार प्राप्त होणार नाही. तो तसा प्राप्त करून देणे हे मराठीच्या प्राध्यापकाचे खरे कार्य आहे. जयराम खेडेकर यांच्या शब्दांत एका ठिकाणी बदल करून असे म्हणता येईल की,

"शोधून सापडत नाही सृजनशीलता
ती असते पेरणीसाठी
वापसावर आलेल्या
जमिनीची ओल
कचकन द्यावा लागतो
पाय तिफणीवर
तेव्हा कुठे पडतो
मुठीतला दाणा खोल......"

९. याठिकाणी मी माझे एक निरीक्षण आपणासमोर मांडतो. अखिल मानवी जीवनावर विलक्षण प्रभाव पाडणारे जे पाचजण होऊन गेले, ते पाचही ज्यू होते. 'ज्यू' हे 'यहुदी' या नावानेही ओळखले जातात. त्यांची एक प्राचीन संस्कृती आहे. कारण प्राचीन संस्कृतीचा मोठा वारसा या ज्यू लोकांकडे आहे. साऱ्या जगावर वर्चस्व गाजविणारे हे वेगवेगळ्या क्षेत्रातील थोर पुरुष मानले जातात. त्यातील पहिला महामानव म्हणजे मोझेस. इ.स.पूर्व चौदाव्या–तेराव्या शतकातला. तो अत्यंत बुद्धिमान होता. आपल्याला ईश्वरी साक्षात्कार झाला, असे तो मानते आणि सांगत असे. ईश्वराने त्याला दहा नीतिनियम सांगितले होते. म्हणून तो बायबलच्या जुन्या कराराचा नायक. त्याचा आपल्या बुद्धीवर प्रगाढ विश्वास. तो म्हणे 'माझे ऐका, माझ्यावर विश्वास ठेवा. तुमचे कुणीही वाकडे करू शकणार नाही.' त्याचा आपल्या बुद्धीवर अढख आणि उदंड विश्वास होता. 'बुद्धी हेच माझे सामर्थ्य आणि या बुद्धीनेच माणूस आपल्या समस्या सोडवू शकतो. सुखी संपन्न जीवन जगू शकतो. थोडक्यात, मानवी

जीवन जगताना बुद्धीशिवाय पर्याय नाही.' अशी त्याची धारणा होती.

दुसरा येशू ख्रिस्त. मोझेस स्वतःला परमेश्वराने निवडलेला नरोत्तम समजत असे. लोक येशूला साक्षात देवाचा पुत्र मानत. तो दयाघन आणि कारुण्यमूर्ती म्हणून मान्यता पावलेला आहे. येशू म्हणे "दया, क्षमा, शांती ही माझी शिकवण. अहिंसा आणि करुणा हे माझे दोन पंख. ही शिकवण आचरणात आणा. तुम्ही सुखी व्हाल." पण लोकांनी त्यालाच क्रुसावर चढविले. तो वेदनांनी तळमळला, पण त्याने वैऱ्यांना क्षमा केली. त्यानंतर कार्ल मार्क्सचा उदय झाला. त्याचा दृष्टिकोण व्यावहारिक आणि वास्तववादी होता. त्याने ठणकावून सांगितले, माणसाचे डोके आणि हृदय यापेक्षा त्याचे पोट महत्त्वाचे आहे. तेच माणसाची नियती घडवते. कारण, माणूस जे काही करतो ते सारे पोटासाठीच असते. भुकेल्या पोटी भजन करता येत नाही आणि दरिद्री लोकांच्या पोटातले कावळे एक सुराने बंड करून उठतात म्हणूनच तर क्रांती होते.

नंतर आलेला फ्राईड म्हणाला, "छे छे, तसे मुळीच नाही. माझा सिद्धांत वेगळा आहे. माणसाच्या पोटाखाली असलेला भाग खूप महत्त्वाचा आहे. माणसाच्या आयुष्यात कामजीवनाला फार महत्त्व आहे. त्याचाच माणसाच्या स्वभावावर व कर्मावर खरा परिणाम होतो. 'कामभाव' माणसाच्या वर्तनावर प्रभाव पाडतो. म्हणून कामजीवनाकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही." त्यांच्यानंतर जो पाचवा ज्यू आला, त्याने तर कमालच केली. तो होता आईनस्टाईन. त्यांने सांगितले, 'यापैकी एकही तंतोतत खरे नसून हे सगळे सापेक्ष असते.' कारण, ह्या सगळ्या बाबी परस्परांशी संबंधित आहेत आणि म्हणूनच त्या एकमेकांशी घनिष्टपणे निगडित आहेत. मानवी जीवन हे बहुढंगी, बहुरंगी आहे. त्यात मेंदू, मन, मनगट, भूक, लिंग इत्यादी बाबी कितीही महत्त्वाच्या असल्या तरी त्यात संतुलन असले पाहिजे, त्यात समन्वय आणि सुसंवाद असला पाहिजे.

तारुण्याच्या उंबरठ्यावरील विद्यार्थी हा जीवनाकडे असाच एकांगी दृष्टीने, अवखळ चंचलपणे पाहत असतो. त्यात तो कधी वाहून जाईल आणि विनाशाच्या भोवऱ्यात सापडेल याचा नेम नसतो. अशी दिशाहीन भरकटलेल्या तरुणाला आत्मभान देणे, त्याची तारतम्यबुद्धी जागी करणे, त्याला जीवनातील विविध घटकांची परस्परसापेक्षता समजून सांगणे, हे काम मराठीचा प्राध्यापक करू शकतो. कारण त्याचा दृष्टिकोण सकारात्मक आणि साकल्यात्मक असतो. संयम, सामर्थ्य, सहिष्णुता, संवेदनशीलता आणि सृजनशीलता यांच्या जोरावर

तो तरुणाईला मानसिक आधार आणि भवितव्याचे आश्वासन देऊ शकतो. म्हणून त्याने Next Generation ला बुद्धीची ताकद दाखवून द्यावी आणि तिच्या मर्यादाही अधोरेखित कराव्यात. मानवी मनाचे नाना तरंग उलगडून दाखवावेत आणि भावनांची स्खलनशीलताही दिग्दर्शित करावी, मानवी जीवनामध्ये पोटाचे म्हणजे भौतिक गोष्टींचे महत्त्व कितीही असले तरी त्यांची 'परिपूर्ती' हेच काही माणसाचे एकमेव प्रयोजन नाही, याचीही खात्री पटवून द्यावी. वंश सातत्यासाठी कामपूर्ती आवश्यक असली तरी केवळ तिच्यासाठी जीवनाचे रणांगण करणे, हे ध्येयवादी माणसाचे प्राप्तकर्म ठरू शकत नाही. हे आणि यासारखे जीवनातील अनेक घटक महत्त्वाचे असले तरी त्यात सुसूत्रता, तारतम्य आणि 'सिंफनी' निर्माण करणे अपरिहार्य आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे जीवनमूल्ये बदलली आहेत, माणुसकी लोप पावत आहे, माणसामाणसांतील संवाद हरवला आहे, त्याचे वस्तुकरण होत चालले आहे. अशा परिस्थितीत मराठीच्या प्राध्यापकाने आजच्या तरुणाला मानवी जीवनातील सर्व घटकांचे महत्त्व आणि मर्यादा, त्यांचे भिन्नत्व आणि साकल्य वडिलकीच्या अधिकाराने पटवून द्यावे. कारण तेच त्यांच्या जगण्याचे बळ आणि प्रगतीची ऊर्जा ठरू शकेल, यात शंका नाही.

१०. आजचा महाविद्यालयीन तरुण आपल्या आयुष्याचा दुर्दैवाने साकल्यात्मक आणि सकारात्मक विचार करताना फारसा आढळत नाही. केवळ नोकरीचे दिवास्वप्न घेऊन तो महाविद्यालयात प्रवेश करतो आणि पदवी मिळविण्यासाठी जीवाचा आटापिटा करतो. शिकण्याच्या या रूढ, सरधोपट प्रक्रियेतून जाता जाता कुणाला नोकरी, पद, हुद्दा किंवा जॉब मिळतोही. पण केवळ नोकरी मिळविणे हे शिक्षणाचे ध्येय असू नये, ते त्याने आपल्या जीवनाचे साध्य तर मुळीच मानू नये. आपल्या विद्यार्थ्यांना जीवनाचा एक एक पैलू उलगडून दाखविणे, त्यांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांना सृजनशील बनविणे हेच आपल्या अध्यापनाचे मुख्य प्रयोग असले पाहिजे. कारण, शिक्षणातून प्राप्त झालेली सृजनशीलता उपजीविकेचे मार्ग शोधून काढण्यात सक्षम असतेच; इतकेच नव्हे तर ते तरुणाला जगण्याचा मंत्र आणि खडतर परिस्थितीतही संकटांवर मात करण्याची उभारी देत असते. हा मंत्र, ही उभारी कार्यान्वित करण्याची दृष्टी मिळाली की तो, मोठ्या उमेदीने आणि आत्मविश्वासाने मळवाटा नाकारून (Off the beaten track) जगण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही.

मित्रहो, आपल्या पैलूदार व गतिमान व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेला

विद्यार्थी आनंदी, उत्साही, सक्रिय आणि सकारात्मक तर असेलच, पण त्याच बरोबर तो खंबीर, कल्पक आणि येणाऱ्या समस्यांचे आव्हान स्वीकारणाराही असेल. त्यामुळे त्याला भेडसावणारी कोणतीही समस्या ही त्याची एकूण व्यक्तिमत्त्व विकासासाठी एक उपयुक्त संधी असेल. आपण एकदा घेतलेल्या निर्णयाबद्दल तो कधीच पश्चाताप करणार नाही. नशिबाला मुळीच दोष द्यायचा नाही, हे त्याने ठरवून टाकलेले असेल. या संदर्भात एक उदाहरण देण्यात येते. एकदा पादत्राणाचे दोन विक्रेते एका दुर्गम भागातील गावात गेले. त्यापैकी एकाने आपल्या वरिष्ठाला फोन करून सांगितले की, 'मी परत येत आहे, कारण येथे कुणीच बुट वापरत नाही.' या उलट दुसऱ्याने सांगितले की, 'इथे कुणीच बुट वापरत नाही. मी प्रत्येकाला बुट खरेदी करून वापरायला सांगेन. त्यामुळे आपल्याला खूप संधी आहे.' याचा अर्थ एकाला विशिष्ट परिस्थितीत केवळ समस्या दिसली, तर दुसऱ्याला संधी. हा ज्याच्या त्याच्या दृष्टिकोणाचा प्रश्न आहे. येथे मुद्दा एवढाच की, आपल्या विद्यार्थ्यांचा असा प्रगल्भ, सृजनशील दृष्टिकोण घडविणे, हेच आपले खरेखुरे कार्य आहे, तेच आपले साध्य आहे. शिवाय सुदैवाने भाषेचे, साहित्याचे अध्यापन हे त्यासाठी आपल्याला लाभलेले संस्कारक्षम आणि परिणामकारक साधन आहे.

११. आज आपण सर्वजण जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडलो आहोत. जागतिकीकरणाच्या रेट्याखाली जगताना आपली घुसमट आणि गळचेपी होत आहे. आजच्या काळात प्रत्येक व्यक्तीची एक तर उपयुक्तता किंवा त्याचे उपद्रवमूल्य लक्षात घेऊनच संबंध ठेवण्याकडे आपला कल वाढत चालल्यामुळे माणसांमाणसातील संवाद हरवत चालला आहे. आजच्या गतिमान आणि स्वकेंद्री जीवनात पैशाला आलेल्या अवाजवी महत्त्वामुळे जणू तेच आपले जीवितध्येय ठरत आहे. त्याचा परिणाम कुटुंबव्यवस्थेवर आणि नातेसंबंधावर होऊ लागला आहे. फसवा बोलघेवडेपणा, कमावलेली दांभिकता, पराकोटीची आत्मलोलुपता, समूहभावनेचा अभाव, गमावलेली विश्वासार्हता ह्या साऱ्या बाबींमुळे माणसाचे व्यक्तिमत्त्व दुभंगत चालले आहे. "माणसाला फक्त 'मी कोण आहे?' इतकाच प्रश्न पडत नाही. 'मी कोणाचा आहे?' आणि 'कोणासाठी आहे?', हेही प्रश्न भेडसावत असतात. जेव्हा नाती निश्चित होती आणि विशेषत: त्यातील स्त्री–पुरुष संबंधांचा बाज नक्की होता, तेव्हा आपण 'कोणाचे' वा 'कोणासाठी' आहोत, या प्रश्नाचे उत्तर जन्माबरोबरच मिळत असे. गेल्या काही वर्षांत, पिढ्यानपिढ्या चालत आलेली ती नाती झपाट्याने कालबाह्य होऊ लागली आहेत. प्रत्येकाला आपल्या स्वायत्ततेची

जाणीव होऊ लागल्यामुळे आपण नक्की 'कोणाचे' आणि 'कोणासाठी' आहोत, हे समजेनासे झाले आहे. त्यामुळेच त्यांना जीवनाचा अर्थच आपल्याला कळत नाही, असे वाटू लागले आहे. मानसिकदृष्ट्या ही गुदमरून टाकणारी अवस्था आहे, या ताण–तणावांचा शोध घेण्यासाठी कुटुंबसंस्थेच्याही पलीकडे, बदलत्या सामाजिक जीवनाचा अर्थ आपल्याला लावावा लागणार आहे.'

या संदर्भात व्हिक्टर फ्रँकल ह्या जन्माने ज्यू असलेल्या सुप्रसिद्ध मनोविकार तज्ज्ञाचा 'अर्थपूर्ण जीवनाचा शोध' हा सिद्धांत आवर्जून ध्यानात घेतला पाहिजे. ह्या सिद्धांताच्या माध्यमातून फ्रँकलने केलेले कार्य फार तोलामोलाचे आणि मूलभूत स्वरूपाचे आहे. वास्तविक त्याचे वैयक्तिक आणि सामूहिक जीवन अतिशय क्लेशकारक आणि शोकजनक होते. केवळ जन्माने ज्यू असल्यामुळे या जीवनाव्रती, ज्ञानतपस्वी महापुरुषाला दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिटलरने तीन वर्षे आपल्या छळछावणीत डांबून ठेवले. इतकेच नव्हे तर त्याला शारीरिकदृष्ट्या न झेपणारे अत्यंत कष्टाचे काम करण्यास भाग पाडले. त्याचे सगेसोयरे त्याच्यासमोरच मृत्युमुखी पडले. त्याची पत्नी तिच्या पोटातील मुलासह मारली गेली. त्याच्या वृद्ध आईवडिलांचा छळामुळे झालेला मृत्यू त्याला उघड्या डोळ्यांनी पाहावा लागला. वास्तविक दुसरा कोणी असता तर ह्या बिकट, विपरीत परिस्थितीत खचून गेला असता. पण त्याच्यातील जिज्ञासू आणि सर्जक मानसशास्त्रज्ञाने पाहिले की, आपल्या आजूबाजूला छळ सहन करणारे काही जण आपले नीतीधैर्य गमावून बसले आहेत. त्यांना आता त्यांच्या जगण्यात राम वाटेनासा झाला आहे. असे अर्थशून्य जीवन जगण्यापेक्षा ते गळफास लावून आत्महत्या करीत आहेत.

फ्रँकलला असेही आढळून आले की, हिटलरच्या ह्या छळछावणीत मृत्यू उघड्या डोळ्यांनी दिसत असतानाही काही हसत होते, काही थट्टाविनोदात मश्गूल होते, काही गाणे म्हणत तर काहींनी धून वाजविण्याची नक्कल करण्यात आनंद वाटे. अवतीभवतीच्या ह्या निरीक्षणातून इतरांप्रमाणेच त्याच्याही चेहऱ्यावर स्मित उमलून येऊ लागले. काहींच्या हालचाली गतिशून्य व निरर्थक असूनही काहीजण कोणत्या ना कोणत्या तरी हेतूने जगत होते, 'आतला आवाज' ऐकत होते, आत्मसमाधानाच्या ऊर्मीतून भोवतालच्या समाजाला धीर देत होते. जगणे, अर्थपूर्ण जगण्यासाठी धडपड करणे, रसिकतेने जगणे आणि जीवनातील अर्थपूर्णतेचा शोध घेणे ह्या विचाराने तो प्रभावित झाला होता. त्याने प्रत्येक माणसाचे, भोवतालच्या परिस्थितीचे, त्यांच्या हालचालीचे निरीक्षण केले, विश्लेषण केले. तेव्हा त्याचा असे लक्षात आले

आहे की, परिस्थितीइतकाच परिस्थितीकडे पाहण्याचा दृष्टिकोणही महत्त्वाचा आहे. ह्या दृष्टिकोणावरच आपले जगणे, आपल्या जगण्याचा अर्थ आणि आपली सुखदु:खं अवलंबून आहेत. "माणसाने आपल्या जगण्यासाठी हेतू शोधला पाहिजे, आपल्या आयुष्याला अर्थ दिला पाहिजे, आपल्या जगण्याचे प्रयोजन निश्चित केले पाहिजे. विशेष म्हणजे आपणच आपली धडपड करून आपल्या निरर्थकतेमध्ये अर्थ शोधला पाहिजे, आपल्या वैफल्याग्रस्ततेमध्ये सकारात्मकता पेरली पाहिजे."

थोडक्यात, व्हिक्टर फ्रँकलच्या मते, मानवी जीवनातील अर्थाचा शोध घेणे हीच माणसाच्या जगण्याची खरी प्रेरणा आहे. इतरांशी प्रेमाने जोडून घेणे, संकटातही धैर्य शाबूत ठेवणे, प्रतिकूल परिस्थितीतही प्रेमाने प्रतिसाद देणे, तिचा उमद्या मनाने स्वीकार करून तिच्यावर मात करणे, ही 'अर्थाच्या शोधात'ली विचारसरणी फ्रँकलने मांडली आणि 'ज्याला कशासाठी जगायचे हे कळते त्याला कशाही परिस्थितीत जगता येते' ह्या सिद्धांताचा वस्तुपाठ त्याने साऱ्या जगाला दाखवून दिला. आजच्या तीव्र स्पर्धेच्या या युगात आपला विद्यार्थी 'अर्थपूर्ण जीवनाचा शोध' घेण्यासाठी कसा वळेल, याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. हे 'युगभान' आपण बाळगले पाहिजे, आपल्या सांस्कृतिक जबाबदारीला सामोरे गेले पाहिजे, असे माझे याप्रसंगी आपणांस कळकळीचे आवाहन आहे.

१२. या परिषदेत प्राध्यापकांच्या सामाजिक उत्तरदायित्वाचाही विचार करणे आवश्यक आहे. प्राध्यापकाला समाजात एक वेगळे स्थान आणि वलय असल्यामुळे तो आपल्या व्यावसायिक नीतीमूल्यांच्या बाबतीत सजग असला पाहिजे. व्यावसायिक नीतीमूल्यांचा विचार करताना प्राध्यापकांची जशी विद्यार्थ्यांशी बांधिलकी असते, त्याचप्रमाणे तो समाजातील उच्चविद्याविभूषित वर्गाचा प्रतिनिधी असल्यामुळे समाजाला दिशा देण्याचे काम त्यांनी करावे, अशी यु.जी.सी. आणि केंद्र सरकारची भूमिका असते. दर दहा वर्षांनी वेतनश्रेणी आणि सेवाशर्तीसंबंधी शिफारसी करताना संबंधित आयोगाकडून अशा प्रकारच्या अपेक्षा व्यक्त केल्या जातात आणि त्या रास्त, वाजवी आहेत, हेही कबूल करावे लागते. आजचा आपला तथाकथित ज्ञानधिष्ठित समाज, त्या समाजातील वैचारिकता, त्याची प्रगतिशीलता, त्या समाजातील साहित्य–कला–समीक्षा इत्यादी बाबींचा विचार केला तर, आपल्या पदरी निराशा आल्याशिवाय राहत नाही.

आपले बहुतांश लेखक हे मुळात प्राध्यापक आहेत. आपल्या

आजच्या प्राध्यापकांची व्यवसायनिष्ठा, त्यांचा व्यासंग, त्यांनी घेतलेली भूमिका, त्यांनी स्वीकारलेली सामाजिक जबाबदारी, त्यांचे चिंतन—मनन, त्यांचा सामाजिक चळवळीतील सहभाग, त्यांचे संशोधन यांविषयी काही ठोस विधान करणे धाडसाचेच ठरेल, इतके चित्र निराशाजनक आहे. आपण अंतर्मुख होऊन वस्तुनिष्ठपणे मतप्रतिपादन करावयाचे ठरवले तर असे म्हणता येईल की, लेखक—वक्ता—संशोधक असलेल्या प्राध्यापकांची आपल्या शब्दांवर निष्ठा नाही, तो ते फार जपून वापरतो असेही नाही. म्हणून आपलेच शब्द कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर ते मागे घ्यायला त्याला काहीही वाटत नाही. तो आपल्या लेखनाचा—संशोधनाचा, त्याच्या दर्जाचा परखडपणे स्वत:तर पुनर्विचार करीत नाही आणि कोणी तसे मत प्रकट केले ते त्याला रुचत नाही. चांगला लेख, चांगली कलाकृती, चांगले परीक्षण, चांगली समीक्षा म्हणजे काय असते, हेही आता आपल्याला जणू नव्याने समजून घेणे आवश्यक आहे. कारण आता परीक्षणे म्हणजे केवळ त्या साहित्यकृतीचा आणि लेखकाचा परिचय असे त्याला स्वरूप प्राप्त झाले आहे. कारण ग्रंथ परीक्षणाचा मुळात हेतूच आप्तस्वकीयांची किंवा गटा—तटातील साहित्यिकांची भलावण करणे एवढाच उरला आहे. अशाप्रकारे अप्रामाणिकपणावर, हितसंबंधावर आधारलेल्या ग्रंथव्यवहारात वैचारिकता आढळणार नाही, हे सांगायला कोण्या ज्योतिषाची गरज नाही.

## समारोप

सामाजिक परिवर्तन ही एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया समाजामध्ये सातत्याने चालू असते. या प्रक्रियेमुळे समाजात कधी अंशत: किंवा काही प्रमाणात संपूर्ण परिवर्तन घडून येते. परिवर्तनाला अनुकूल असणारे घटक प्रबळ असतील तर परिवर्तनाचा वेग मंद राहातो. समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वकही प्रयत्न केले जातात. त्यासाठी नियोजन कायदे, सुधारणा, चळवळी, क्रांती या साधनांचा वापर केला जातो. क्रांती हे साधन राजकीय परिवर्तनाच्या संदर्भात अधिक वापरले जाते. सुधारणा चळवळीमुळे समाजात जे परिवर्तन घडून येते त्याचा वेग मंद राहातो. ह्या क्षेत्रांतील परिवर्तनाचा मार्ग दीर्घकालीन आणि शांततामय असतो. ह्या मार्गक्रमणात समाजाला दिशा, गती आणि चैतन्य देण्याचे काम आपला मराठीचा प्राध्यापक वैचारिकता आणि सृजनशीलता ह्या दोन्ही पातळ्यांवर करू शकतो. ती त्याने आपली वैचारिक बांधिलकी आणि सामाजिक जबाबदारी मानली पाहिजे.

माणूस आपल्या जगण्याला अर्थ देण्यासाठी स्वत:तील सुप्त शक्तींचे प्रकटन करण्याकरिता धडपडत असतो. त्यासाठी त्याला स्वातंत्र्य हवे असते, समाजव्यवस्थाही पोषक असणे गरजेचे असते. म्हणूनच तर समाजपरिवर्तनाची आवश्यकता महत्त्वाची असते. याचा अर्थ माणसातील सुप्त शक्तींच्या प्रकटीकरणाच्या प्रयत्नात समाजाची जी जी अंगे अडसर बनतात, ती न करण्याचा आणि पोषक अंगांचा स्वीकार करण्यासाठी जे प्रयत्न करावे लागतात, ते प्रयत्नच चळवळीचे रूप धारण करतात आणि त्यातूनच पुढे समाजपरिवर्तन घडते. याचा अर्थ समाजपरिवर्तन ही मूल्यसापेक्ष, गुणात्मक अशी संकल्पना आहे. 'सामाजिक परिवर्तन' असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा आपल्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यास ह्या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून केलेले परिवर्तन अभिप्रेत असते. ही परिवर्तनाची मूलभूत संकल्पना प्राध्यापकांनी समजून घेतली पाहिजे. तसेच ती आपल्या आचार–विचारात प्रतिबिंबीत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ते त्याचे व्यवसायदत्त, नैतिक कर्तव्य आहे, अशी अपेक्षा करणे अवाजवी ठरणारी नाही. किंबहुना एकविसाव्या शतकातील गतिमानता आणि स्पर्धात्मकता ह्यांना त्याने सामोरे गेले पाहिजे. त्यांवर मात करण्यासाठी गुणवत्ता आणि सर्वोत्कृष्टता ह्या बाबी कशा महत्त्वाच्या आहेत, हे जाणून घेऊन त्या कृतीत आणल्या पाहिजे. आजच्या तरुणाईला जागतिकीकरणातील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कालभान, समाजभान आणि आत्मभान देणे हेच आपल्या प्राध्यापकाचे कर्तव्य आहे, यात शंका नाही. शेवटी प्राध्यापकांच्या एकूण व्यावसायिक जबाबदारीविषयी कविवर्य कुसुमाग्रजांच्या शब्दांत असे म्हणता येईल की,

"परभाषेतहि व्हा पारंगत ज्ञानसाधना करा, तरी ।
माय मराठी मरते इकडे परकीचे पद चेपू नका ।।
भाषा मरता देशहि मरतो संस्कृतिचाही दिवा विझे ।
गुलाम भाषिक होऊनि अपुल्या प्रगतीचे शिर कापू नका ।।"

असो. आपण माझे हे स्वैर प्रतिक्रियात्मक निवेदन ऐकून घेतले आणि ते सादर करण्याची मला संयोजकांनी संधी दिली, त्याबद्दल मी आपल्या सर्वांचा कृतज्ञ आहे, धन्यवाद!

❖❖❖

# २६ वे अधिवेशन
# लोकमान्य टिळक महाविद्यालय
# वणी, जि. यवतमाळ
# ९ मार्च २०१३
# अधिवेशनाध्यक्ष : प्रा. डॉ. सुखदेव ढाणके

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या २६ व्या अधिवेशनाचे उद्‌घाटक मा. ॲड. अनंतराव देशपांडे, अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, वणी, प्रमुख अतिथी मा. डॉ. मो. समीउल्लाह, अधिष्ठाता सं.गा.बा.वि. अमरावती, मा.डॉ. गजानन जाधव, अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ, स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. शशिकांतजी आस्वले, डॉ.रा.गो. चवरे, अध्यक्ष मराठी प्राध्यापक परिषद, समन्वयक डॉ. दिलीप अलोणे, उपस्थित मान्यवर, प्राध्यापक बंधू आणि भगिनी,

प्रत्येकाच्या काही ना काही मर्यादा असतातच. माझ्याही काही मर्यादा आहेत आणि या मर्यादांची मला पुरेपूर जाणीव आहे. भाषण न देता येणे ही माझी मर्यादा आहे. मी केवळ कवितेत रमणारा माणूस आहे. कविता ही मला जडलेली दुर्धर व्याधी आहे. कवितेशिवाय कुठल्याही गोष्टींचा विचार मी आजवर केलेला नाही. आणि ध्यानीमनी नसताना फारसे कर्तृत्व नसलेल्या एका साध्या कवीला या अधिवेशनाचे अध्यक्षपद आपण बहाल केले याने मी पुरता गोंधळून गेलो आहे.

भाषणासारख्या संकटाला मी कायम घाबरत आलेलो आहे. आणि नेमकं हेच संकट आज माझ्यावर चालून आलेलं आहे. हे संकट मी कागदावर लिहून आणल्यामुळे निभावून जाणार आहे. असो.

माझ्या मनातलं काही बोलण्याची संधी या निमित्ताने आपण मला दिलेली आहे. याबद्दल मी आपला आभारी आहे. 'अधिकार तैसा करू उपदेश' ही याप्रसंगी माझी भूमिका नाही. असलीच तर ती 'साही ओझे तेंचि द्यावे.' एवढी ती स्वच्छ व प्रामाणिक असणार आहे. आपणापेक्षा किंचित ज्येष्ठ या नात्याने थोडं हितगूज व संवाद साधणे एवढा हा साधा व्यवहार आहे. पांडित्य मिरवणे हा माझा हेतू अजिबात नाही. 'करावे गोमटे । बाळा माते ते उमटे ।' एवढाच शुद्ध हेतू या संवादामागे आहे.

मित्रहो,

या संवादात नवे काहीच असणार नाही. एखादा दुसरा मुद्दा असलाच तर तो असू शकेल. मी जे काही आता बोलणार आहे त्यात स्वागतपर काही गोष्टी असतील आणि थोडी आत्मटीकाही असणार आहे. सत्य आणि वास्तवाला सामोरे जाणे हे पुरुषार्थाचे खरे लक्षण आहे असे मी मानतो.

## जागतिकीकरण आणि मराठी भाषा

जागतिकीकरण आणि मराठी भाषा हा आजचा कळीचा मुद्दा झाला आहे. आज सर्वत्र जागतिकीकरणाच्या भयाची चर्चा सुरू आहे. तसाच तो सध्या परवलीचा शब्दही झालेला आहे. जागतिकीकरण ही अनाकलनीय स्वरूपाची संकल्पना अजूनही अभ्यासकांना बुचकळ्यात, गोंधळात टाकणारी आहे. आपापल्या परीने अर्थ लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मानवी जीवनावर त्याचा प्रत्यक्ष परिणाम कसा होतो हे अजूनही नीटसे उलगडलेले नाही. जागतिकीकरण म्हणजे मोठेच अरिष्ट अशीच सध्या ओरड आहे. खाजगीकरण, उदारीकरण हे दोन घटक जागतिकीकरणात मोडतात. या दोन गोष्टींच्या परिणामामुळे जीवनावी वेगवेगळी क्षेत्रे कशी प्रभावीत होतात, हे सांगितले जाते. एखाद्या चक्रीवादळाला जसे थोपवता येत नाही तसेच जागतिकीकरणाचे आहे. ते झपाट्याने, वेगाने वाढणारच आहे. त्यात काही गोष्टी न होतील, काही टिकतील व काहींची त्यात भर पडणार आहे. आजपर्यंत अस्मानी, सुलतानी संकटे आपण कमी झेलली? हे ही एकदा आपल्याला झेलावेच लागणार आहे.

जागतिकीकरणाविषयी एकवाक्यता कुठेच दिसत नाही. विचारवंतामध्ये मतेमतांतरे आहेत. आपापल्या आकलनानुसार जागतिकीकरणाच्या व्याख्या झालेल्या आहेत. युनिव्हर्सल व वैज्ञानिक स्वरूपाची एकमेव, एकसंध व्याख्या मला अजून तरी आढळलेली नाही. म्हणून ही चर्चा मला निष्फळ व विसंवादी वाटते.

आजच्या जागतिकीकरणात मराठी भाषा व एकूणच मूल्यव्यवस्था धोक्यात येत असल्याचा इशारा विचारवंतांनी दिलेला आहे. जागतिकीकरणामुळे मराठीचे अस्तित्व संपुात येण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. परंतु हे तितकेसे खरे नाही. भाषा कधीच मरत नसते. भाषा मरणपंथाला लागली ही हाकाटी मला तरी निरर्थक वाटते. फार तर भाषेची रूपे बदलतील, परंतु भाषा न होणार नाही.

जागतिकीकरण ही काही आज उदयास आलेली संकल्पना नाही.

वास्को–द–गामा भारतात आला. व्यापार व वसाहती सुरू झाल्या तेव्हापासून जागतिकीकरणाची सुरुवात आहे हे अनेकांना मान्य आहे. तेव्हाही मराठी जिवंत होती आणि आजही ती जिवंत आहे. उद्याही राहणार आहे असा मला विश्वास आहे. जगात दहाव्या क्रमांकावर बोलल्या जाणाऱ्या मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राज्याचा केंद्राकडे पाठपुरावा सुरू आहे, हे कशाचं लक्षण आहे.

परिवर्तन हा जगाचा नियम आहे. त्यात काही जुन्या गोष्टी न होतात व नव्या गोष्टींची पुन:स्थापना होते. इस्लाम राजवटीत व नंतर इंग्रजी राजवटीत मराठी जिवंतच होती. भाषिक आक्रमणामुळे मराठीत अनेक शब्दांची भर पडून ती समृद्धच झालेली आहे. अरबी, फारसी, इंग्रजी, पोर्तुगीज शब्दांची भर पडून मराठीने नवे रूप धारण केलेच ना. म्हणजे त्या त्या काळात मराठीने आपले रूप बदलले आहे. सध्या मराठी आज संगणकीय भाषा स्वीकारत आहे. संगणकाशी संबंधित शब्द व प्रतिमा आज मराठीत सर्रास वापरल्या जाऊ लागल्या आहेत आणि हे मराठीच्या समृद्धीचेच लक्षण होय असे मला वाटते. भाषा कधीच मरत नसते ती त्या त्या काळात अधिक उन्नत व टवटवीत झालेली असते. मर्ढेकरांनी कवितेत यंत्र प्रतिमा वापरून मराठी कवितेला नवेपणा दिला. १९९० नंतरच्या कवींनी संगणकीय प्रतिमा वापरून पुन्हा नवेपणा व ताजेपणा बहाल केला. काळानुसार ही परिवर्तने होतच राहणार. मर्ढेकरांच्या कवितेचे स्वागत आपण केलेच ना! याही कवितेचे तिच्या नवेपणासह स्वागत करायला काय हरकत आहे.

भाषा आणि संस्कृतीमध्ये परिवर्तने अपेक्षितच असतात. खेड्यातही मम्मी–पप्पा म्हटले तर बिघडले कुठे? गाव ग्लोबल होत असल्याची ही खूणच नव्हे काय? जागतिक स्तरावर ज्ञानभाषा ही इंग्रजीच आहे. तिला नाक मुरडून कसे चालेल?

आजचे युग हे माहीती तंत्रज्ञानाचे युग आहे. स्वागतशीलवृत्तीने या युगाचे आपण स्वागत केले पाहिजे. जगाची खिडकी सताड उघडी आहे. सर्वत्र माहिती व ज्ञानाचा स्फोट होतो आहे. या स्फोटाचे धक्के आपल्यालाही बसले पाहिजे. पुस्तकी ज्ञान व या माध्यमातून मिळणारे ज्ञान यांची सांगड घालून स्वत:ला अपडेट करीत राहिले पाहिजे.

## भाषाकौशल्य

माझा दुसरा मुद्दा भाषा कौशल्याविषयीचा आहे. भाषा कौशल्य आत्मसात

केल्याशिवाय भाषेवर प्रभुत्व मिळवता येत नाही. यासाठी व्याकरण व शुद्धलेखनाचा पाया मजबूत असला पाहिजे. याशिवाय आपलं वाचनही चौफेर असलं पाहिजे. सिलॅबसचं वर्तूळ भेदून विविध विषय व वाङ्मयप्रकारही वाचले पाहिजेत. घरी बोलतो त्या सवयीच्या व अध्यापनाच्या भाषेत फरक असला पाहिजे. चार चौघात वावरताना, बोलताना भाषेच्या संदर्भात आपण हास्यास्पद ठरू नये. मराठीचे प्राध्यापक व त्यातही लेखक असाल तर भाषा उत्तम प्रकारे अवगत असलीच पाहिजे असे माझे व्यक्तिगत मत आहे. भाषाकौशल्य ही प्रयत्नसाध्य कला आहे. त्यासाठी थोड्या प्रयत्नांची गरज आहे. थोड्या कष्टाची निकड आहे. कुठलेही संस्कार जादूसारखे होत नसतात. भाषेचेही तसेच आहे. मी ज्या सामाजिक स्तरातून आलो त्या स्तराची भाषा तरी कुठे शुद्ध आणि संस्कारित होती? कॉलेजमध्ये शिकत असताना मीही गावठीच बोलत होतो. शिकलो म्हणून मला कविता सापडली व कवितेची भाषाही सापडली. सापडली म्हणजे मला ती दिसली व ती मी उचलली असे नाही. सुदैवाने मला चांगले भाषासंस्कारित मित्र भेटले. त्यांच्या सहवासात मला माझ्या गावठी भाषेवर संस्कार करता आले. त्यांच्यामुळेच मला चांगली पुस्तके वाचण्याची सवय लागली. तत्कालीन ख्यातनाम वक्त्यांची भाषणे ऐकण्याची संधीही याच काळात मिळाली. याच काळात कवितेसारखे प्रकारही मी लिहिण्याचा प्रयत्न करीत होतो. त्यासाठी भाषा कशीही असून चालणार नव्हते. त्यासाठी चांगले बोलता व लिहता यावे यासाठी मी अट्टाहास धरत होतो. आणि ती शिकण्यासाठी धडपडत होतो.

शिकलो म्हणून कविता सापडली आणि कवितेची भाषाही. शिकलो नसतो तर काय झाले असते. शेकडो कवितांचे गर्भपात मेंदूतच झाले असते. शिकलो म्हणून बरे झाले. त्यामुळे भ्रूणहत्येचे महापातक तरी टळले.

मी आज थोडाबहूत यशस्वी शिक्षक व जरासा कवी आहे याला कारण माझेवरील भाषेचे संस्कार हेच आहे. ही प्रौढी नसून प्रांजळ निवेदन आहे. भाषाकौशल्याच्या संदर्भात आपणही विचार करावा अशी माझी आपणास विनंती राहील.

## अध्यापनाविषयी

अनेक कौशल्यांपैकी अध्यापन हेसुद्धा एक कौशल्यच आहे. तीही एक कलाच आहे. ज्याला ही कला साधली तो यशस्वी शिक्षक होतो. भरपूर ज्ञान असलेला, सर्वच वाङ्मय प्रकारांचे सखोल ज्ञान असलेला शिक्षक

अध्यापनात अयशस्वी असल्याची उदाहरणे आपणासही ठाऊक असतील. केवळ माहिती असणे उपयोगाचे नसते. माहितीचे उपयोजन तुम्ही कशा पद्धतीने करता याला महत्त्व आहे. वक्तृत्व, हजरजबाबीपणा, अचूक प्रतिपादन, माफक अभिनय शैली ही अध्यापनातील सूत्रे आत्मसात केल्याशिवाय अध्यापनात प्रभावीपणा आणता येत नाही. व्यासंग व अनुभव यातून हे आत्मसात करता येते. उत्तम अध्यापकाला आपले अध्यापन अधिक प्रभावी होण्यासाठी आधुनिक तंत्राचा यशस्वीपणे वापर करता आला पाहिजे. उदा. दृक–श्राव्य माध्यमे. विद्यापीठातील मराठी विभागामध्ये या माध्यमांचा उपयोग मुख्यत्वे केला जातो. नाटकांसारखा विषय सादरीकरणातून विद्यार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोचवता येतो. लोकसाहित्यातील लोककला व लोकसंगीत ह्या सादरीकृत कला आहेत. यासुद्धा सादरीकरणातूनच शक्य आहे. मान्यवर वक्त्यांची भाषणे, महत्त्वाच्या कवींवरील लघुचित्रपट अशा अनेक बाबी इंटरनेटवर उपलब्ध आहेत. यांचा अध्यापनात वापर करणे सहज शक्य आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी विभागात असे प्रयोग सातत्याने होत असतात. कविवर्य नारायण सुर्वे, दुर्गाबाई भागवत, पु.ल.देशपांडे यांच्या चित्रफिती व विविध नाटकांच्या सीडीज दृकश्राव्य माध्यमात मराठी विभागात उपलब्ध आहेत. विभागाने केलेल्या संशोधनाची दृकश्राव्य माध्यमातील सामग्रीही उपलब्ध आहे. ही केवळ विभागाची मालमत्ता नसून तीवर सर्वच महाविद्यालयांचा हक्क आहे. तेव्हा महाविद्यालयांनी या साधनांच्या उपयोगाकरिता मागणी केल्यास ती उपलब्ध होऊ शकतील.

प्रस्तुत साधनांचा प्राध्यापकांनी उपयोग केल्यास विद्यार्थ्यांचा मराठीकडे कल वाढेल. रुची वाढेल आणि अध्यापनाचे सार्थकही होईल. अध्यापनातील रूक्षता टाळण्यासाठी यासंदर्भात आपण जरूर विचार करावा आणि ही साधने उपलब्ध करून देण्यासाठी आपण आपल्या वरिष्ठांकडे आग्रह धरावा, आपण स्वत: प्रयत्न करावा. इंटरनेटचा उपयोग करावा असे नम्रतापूर्वक सूचवावेसे वाटते.

## पूरक उपक्रम

अध्यापनाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाची आवड व रुची निर्माण होण्यासाठी काही उपक्रम राबविल्यास त्याचा विद्यार्थ्यांना नक्की फायदा होईल. वाङ्मयीन नियतकालिके, दिवाळी अंक, वर्तमानपत्रांच्या रविवारीय पुरवण्या विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून देता येतील. त्यासाठी स्वतंत्र

वाचनकक्षाची निर्मिती महाविद्यालयांनी करावी. वादविवाद, चर्चा, लेखक आपल्या भेटीला, मुलाखती, विविध वक्त्यांची भाषणे आदी उपक्रम अध्यापनाला गतिमान करू शकतात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याकरिता त्यांना लिहिते करण्यासाठी हस्तलिखिते, भित्तिपत्रके, वार्षिकांक काढणे, वाङ्मय मंडळाची स्थापना करून वाङ्मयविषयक चर्चा घडवून आणणे, प्रादेशिक तथा अ. भा. साहित्य संमेलनांना भेटी देणे, यासाठी सहली आयोजित करणे, याद्वारे अभ्यासक्रमातील लेखक कवींना प्रत्यक्ष पाहता, भेटता येते. ग्रंथप्रदर्शनांना भेटी देऊन त्यांना पुस्तके हाताळता चाळता येतील, आवडीप्रमाणे पुस्तके खरेदी करता येईल.

महाविद्यालयांनी भाषा प्रयोगशाळा विकसित करावी. संगणक, इंटरनेट इ. सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. उपरोक्त सुविधांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडून त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतील. याचा महाविद्यालयांनी विचार करावा. या सुविधा थोड्या फार प्रमाणात काही मोजक्याच महाविद्यालयात मला पहावयास मिळाल्या. याचं सार्वत्रिकीकरण व्हावे असे वाटते.

प्रस्तुत उपक्रम हे वेळखाऊ नक्कीच आहे. तथापि वेळेचे नियोजन केल्यास हे उपक्रम राबविणे कठीण नाही. संबंधित उपक्रम आपण आपल्या महाविद्यालयांमध्ये राबवत असालच अशी मला खात्री आहे. या स्वरूपाचे उपक्रम आपण राबवता म्हणजे आपण आपल्या विद्यार्थ्यांची जीवनदृष्टी अधिक व्यापक करता, उन्नत करता, त्यांना बहुश्रुत, बहुआयामी करता. त्यांच्यात क्रियाशीलता जागवता, ज्ञानकक्षांचा विस्तार करता, नेतृत्त्व गुणांचा विकास करता. पूरक अभ्यासक्रम हे अध्यापन व अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थी घडविण्याची उन्नत प्रक्रियाच होय असे माझे मत आहे. आपण हे उपक्रम राबवता ही स्वागताचीच बाब होय.

## अभ्यासक्रमाविषयी

अभ्यासक्रमाविषयी थोडे सांगायचे आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ हे ग्रामीण भागातील विद्यापीठ आहे आणि या विद्यापीठात शिकणारी बहुतेक मुले ही ग्रामीण भागातूनच आलेली असतात. अनेक महाविद्यालयेही ग्रामीण भागातच आहेत. सर्व जाती जमातीच्या मुलांचा समावेश या शिकणाऱ्यांमध्ये असतो. तेव्हा हा विद्यार्थी वर्ग केंद्रस्थानी ठेवून अभ्यासक्रमाची आखणी झाली पाहिजे. अभ्यासमंडळातील तज्ञांना ही दृष्टी नक्कीच आहे. केवळ मराठीचे पदवीधर निर्माण करणे एवढीच जबाबदारी अभ्यासक्रमाची असू

नये. त्यात व्यवसायाभिमुखताही असली पाहिजे. मराठीला महत्त्व असणाऱ्या अनेक संधी उपलब्ध आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन, इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडिया यामध्ये मराठीला मागणी आहे. मराठी चित्रपटसृष्टी सध्या भरात आहे. वर्षाला शंभर तरी मराठी चित्रपटांची निर्मिती होत आहे. यांत कथा, पटकथा, संवाद लेखकांची आवश्यकता असते. यासाठी पुणे येथे फिल्म आणि टेलिव्हिजन ही राष्ट्रीय संस्था कार्यरत आहे. या ठिकाणी प्रशिक्षण घेऊन चित्रपट क्षेत्रात काम मिळू शकते. टीव्हीवरील विविध मराठी रियालिटी शोजचे अँकर होता येते. मराठीवर प्रभुत्व असलेल्यांना उत्तम व अस्खलित बोलणाऱ्यांना येथेही संधी उपलब्ध आहे. या संदर्भातील पूर्व प्रशिक्षण जर विद्यापीठांतून दिल्या गेले तर मराठीच्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. अशा रोजगारभिमुख अभ्यासक्रमाचा समावेश मराठीच्या अभ्यासक्रमात असावा असे वाटते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या २९ व्या दीक्षांत समारंभात डॉ. एस. एस. मंथा यांनी उच्च शिक्षणात मूल्याधिष्ठित शिक्षणावर विशेष भर देऊन मूल्याधिष्ठित शिक्षणातून भविष्यातील संधीचा उपयोग आणि आव्हानांचा मुकाबला करता येऊ शकेल असे प्रतिपादन केले आहे. तथापि, मूल्याधिष्ठित शिक्षणाकडेच अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचीही खंत त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी त्यांनी उच्चशिक्षणाची पंचसूत्रीही सांगितली.

१) सूचना व संवादवहनाच्या तंत्राचा नावीन्यपूर्ण वापर
२) लोकोपयोगी संशोधन
३) व्यावसायिक अभ्यासक्रम
४) प्रशिक्षणावर भर
५) आर्थिक सुबत्तेच्या क्षेत्रातील नावीन्य आणि नियमित परिश्रम

यासर्व बाबी वर्तमान पिढीला सक्षम व परिपूर्ण बनवू शकतात असे डॉ. मंथा यांचे मत आहे. या बाबी मराठीलाही लागू आहेत. तेव्हा या बाबींना अनुलक्षून अभ्यासक्रमाची यापुढे आखणी व्हावी असे वाटते. अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांसह काही सदस्य या ठिकाणी उपस्थित आहेत. ते नक्कीच या बाबींचा विचार करतील अशी मला आशा आहे.

## काही अभाव

सध्याच्या अध्यापनाच्या क्षेत्रातील तरुण पिढीमध्ये काही अपवाद वगळता अभावही जाणवतात.

१) वाङ्मय व्यवहाराकडे गांभिर्याने बघितले जात नाही.

वाङ्मय व्यवहाराची सद्यस्थिती काय आहे? विविध वाङ्मय प्रवाहांच्या दिशा आणि दशा कशा आहेत? आणि एकूणच या वाङ्मय व्यवहारात आपण कुठे आहोत, याची जाणीव मराठीच्या प्राध्यापकांना असलीच पाहिजे. विविध प्रवाही साहित्य संमेलने, चर्चासत्रे यांमधून वाङ्मयव्यवहारासंबंधी सातत्याने चर्चा होत असतात. यातूनच खऱ्याअर्थी या व्यवहारांची दिशा आणि दशा कळते तेव्हा या स्वरूपाच्या संमेलनांमध्ये, चर्चा सत्रांमध्ये मनापासून सहभागी होऊन वाङ्मय व्यवहार समजून घेतला पाहिजे ही आपल्या हिताचीच गोष्ट आहे.

२) गंभीरपणे लेखन करणाऱ्यांचा अभाव

मराठी वाङ्मयीन नियतकालिके चाळली तर गंभीर स्वरूपाचे लेखन अभावानेच आढळते. आजपर्यंत चावून चोथा झालेले विषयच पुन्हा पुन्हा चघळले जात आहेत. आव्हानात्मक विषयांकडे लक्ष वेधणारं लेखन अभावानेच आढळते. असे असले तरी काही आशा स्थळेही आहेत. पण ती बोटावर मोजता येतील इतकीच. ताकदीने पुढे येणारे काही लेखक, समीक्षक विदर्भात आहेत आणि त्यांचं लेखन लक्षवेधी आहे. मी स्वत: एक वाङ्मयीन नियतकालिक चालवत असल्यामुळे मला माहीत आहे. डॉ. मनोज तायडे, डॉ. मोना चिमोटे, डॉ. हेमंत खडके, डॉ. माधव पुटवाड, प्रा. अजय देशपांडे, प्रा. देवानंद सोनटक्के, डॉ. पुरुषोत्तम माळोदे, डॉ. भूषण रामटेके, डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. अनिल नितनवरे, प्रा. बाळाभाऊ कळसकर, डॉ. अशोक पळवेकर, प्रा. अशोक इंगळे, डॉ. अलका गायकवाड, डॉ. अण्णा वैद्य, भगवान फाळके ही ती काही महत्त्वाची नावे होत.

३) संशोधन निष्ठेचा अभाव

नव्या पिढीत संशोधन निष्ठेचाही मला अभाव आढळतो. UGC ने संशोधनाला प्राथमिकता दिलेली आहे. भरपूर शोधप्रबंधही सादर केले जात आहेत. परंतु समाधान देईल असे संशोधन हल्ली आढळत नाही. फार मोजके संशोधक, अभ्यासक हे कार्य गंभीरपणे करताना दिसतात. अलीकडेच विद्यापीठाला सादर झालेला प्रा. अशोक राणा यांचा मराठी कथा कवितेतील नागप्रतिमा हा प्रबंध अत्यंत अनोखा व नावीन्यपूर्ण आहे. अमरावती विद्यापीठ हे संशोधन प्रथम झालेले असून ते अन्य विद्यापीठात झालेले नसावे. अशा प्रकारचं वेगळ्या विषयांना हात घालणारं संशोधन अभ्यासकांकडून व्हावं ही अपेक्षा बाळगणे चुकीचे ठरू नये. संशोधन हे मानवी जीवनाला उपयोगी

पाडणारं असावं. मानवी विकासाचं ते स्वप्न असावं. आत्मविकास व मानवीकल्याण हे संशोधनाचं प्रयोजन असावं.

संशोधन म्हणजे काय असतं आणि त्यात झोकून कसं द्यायचं असतं हे मला मी विद्यापीठात आल्यावर कळलं. घरी बसून केलेल्या संशोधनापेक्षा प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन काम करणं हा विलक्षण अनुभव असतो. कोरकू आदिवासींमध्ये दोन वर्ष राहून संशोधनाचा प्रत्यक्ष अनुभव मी घेतलेला आहे. आणि हा अनुभव विलक्षण असाच होता.

संशोधनासाठी अमर्याद क्षेत्रे उपलब्ध आहेत. ती आपणास खुणावीत असतात. त्यांचा शोध घेतला पाहिजे. सातपुड्यातील मेळघाटात विविध आदिवासी जमाती वास्तव्य करून आहेत. त्यात प्रामुख्याने कोरकू आहेत. गोंड, बलई, गवलान, थाट्या, भिल्ल आहेत. यातील प्रत्येक जमातीची संस्कृती, लोकजीवन व लोकसंस्कृती परस्परांपासून भिन्न आहेत. कोरकूंच्या लोकजीवनाचे, संस्कृती व लोकसाहित्याचे संशोधन अमरावती विद्यापीठाच्या मराठी विभागात झालेले आहे. डॉ. मनोज तायडे यांनी ते परिश्रमपूर्वक केलेले आहे. सहाय्यक संशोधक म्हणून या प्रकल्पात मीही सहभागी होतो. त्याचे दस्तावेजीकरणही झालेले आहे. डॉ. के.व्ही. बऱ्हाटे यांनी कोरकू बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास संशोधनाच्या रूपात केलेला आहे. बलई जमातीच्या बोली व साहित्याचा अभ्यास डॉ. निशा शेंडे यांनी केलेला आहे. उर्वरित जमातीच्या बोली व साहित्याकडे अजून तरी कोणीही वळलेले दिसत नाही. त्यांच्याही संस्कृती व साहित्याचे दस्तावेजीकरण झाले पाहिजे.

नागर संस्कृतीच्या रेट्यामुळे आदिम लोकसंस्कृती लोप पावत चाललेली आहे. म्हणून मी जे काही आज त्यांच्यात शिल्लक आहे त्याचे जतन व संवर्धन झाले पाहिजे. यवतमाळ जिल्ह्यातही कोलाम ही जमात आहे. त्यावरही थोडेबहुत काम झालेले आहे.

अमूक व्यक्ती आणि वाङ्मय, १९६० नंतरचे अमूक, १९९० नंतरचे तमूक हे आता फार झाले. तेव्हा आपली संशोधनदृष्टी अधिक व्यापक व सजग केली पाहिजे. मराठी व्यतिरिक्त तेलगू, तामिळ, बंगाली, पंजाबी, आसामी वाङ्मय अत्यंत समृद्ध आहे. या वाङ्मयाचे मराठी अनुवाद उपलब्ध आहेत. मराठी आणि संबंधित अनुवादित साहित्य याचा तौलनिक अभ्यास होऊ शकतो. तेव्हा अभ्यासकांनी तौलनिक साहित्याभ्यासाकडे लक्ष घालावे त्याच बरोबर विविध विद्याशाखांचा सखोल व्यासंग असणे आवश्यक आहे. असे नम्रपणे सूचवावेसे वाटते.

४) वाचनाबद्दल उदासीनता

मराठीचा प्राध्यापक हा कायम वाचनरत असला पाहिजे. वैविध्यपूर्ण वाचनामुळे ज्ञानात भर तर पडतेच शिवाय त्यामुळे बहुश्रुतता व बौद्धिक तरलताही येते. वाचनाचा व्यासंग जडला पाहिजे. ते व्यसनच असले पाहिजे. ही व्यसनाधीनता आपणास उन्नत व सुसंस्कृत करणारी आहे. वाचनामुळे कुणी बिघडला असे ऐकिवात नाही. वाचनाच्या वेडापायी कुणी वाया गेला असेही ऐकले नाही. तेव्हा वाचनाबद्दलही उदासीनता झटकून टाका. भरपूर वाचन करा. ग्रंथांची संगत जोडा. गाड्या घ्या, घोड्या घ्या, बंगले बांधा. ती आपली मूलभूत गरजपण आहे. वाचनही मूलभूत गरजेचे आहे. मात्र बंगल्यातील एक दालन तरी ग्रंथांसाठी राखून ठेवा. ते सुसज्ज करा. भौतिक संपत्तीपेक्षा अक्षर संपत्ती मला अधिक मोलाची वाटते. तिला वाढवा, जतन करा, संवर्धन करा. मित्र हो, हा उपदेश नसून ही माझी आंतरिक इच्छा आहे. असो.

५) मराठी वाङ्मयीन नियतकालिकांबद्दल

नियतकालिक वाचणे, अभ्यासणे, आपणाकडे असणे यांसदर्भातही प्राध्यापकांमध्ये उदासीनता आढळून आली आहे. वाङ्मयीन नियतकालिके ही अध्यापनाची पूरक साधने होत. नियतकालिकांतून बदलत्या प्रवाहांचे, त्यांच्या स्थिती गतीचे संसूचन होते. वाङ्मयप्रवाह रूजविण्याचे काम नियतकालिके करीत असतात. सध्या अनुष्टभ, कविता—रती, युगवाणी, प्रतिष्ठान, ऊर्मी, अस्मितादर्श, खेळ, दर्शन, ऐवजी, अतिरिक्त, सर्वधारा इत्यादी सकस वाङ्मयीन नियतकालिके महाराष्ट्रात आहेत. मात्र बऱ्याच महाविद्यालयांमध्येही नियतकालिकांचा अभाव आहे. प्राध्यापक मंडळीही फारशी उत्सुक दिसत नाही. स्वत: वर्गणीदार होण्यासाठी आग्रह नाही. किमान महाविद्यालयांच्या ग्रंथालयांसाठी तरी आग्रह धरावा. मात्र तेही होत नाही. आपण स्वत: वर्गणीदार होता म्हणजे एखाद्या वाङ्मयीन चळवळीला प्रोत्साहनच देता.

मराठी वाङ्मयीन नियतकालिकांच्या सद्यस्थितीवर दि १२—२—२०१३ रोजी मुंबई दूरदर्शनवर एका चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चेत मी आणि प्रा. अजय देशपांडे सर्वधारा व युगवाणीचे प्रतिनिधी म्हणून सहभागी होतो. वाङ्मयीन नियतकालिकांच्या सद्यस्थिती वाईटच असल्याचा या चर्चेचा सूर होता आणि त्याची कारणेही अधोरेखित करण्यात आली होती. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे कारण होते आर्थिक. आणि याच कारणांमुळे वाङ्मयीन नियतकालिके डबघाईस आलेली आहेत. याचमुळे ती रखडत चालतात किंवा बंद पडतात. अर्थकारणाबरोबरच सर्व स्तरातील उदासीनता हेसुद्धा एक कारण

आहे. तुटपुंजे सरकारी अनुदान, वर्गणीदार होण्याबद्दल उदासीनता, यामुळे नियतकालिके चालविणे कठीण होत आहे. शासन ज्या अर्थी अनुदान देते त्या अर्थी ही नियतकालिके त्यांच्या अखत्यारीत ग्रंथालयांना सक्तीची का करू नये? विद्यापीठांनाही हा अधिकार असला पाहिजे. त्यामुळे आर्थिक भार सुसह्य होईल, नियतकालिके टिकतील. वाङ्मय व्यवहार अधिक वाढीस लागेल. वाङ्मयीन नियतकालिके मराठीच्या प्राध्यापकांकडे असणे हे प्रतिष्ठेचेच लक्षण होय.

बरंच बोलून झालेलं आहे. आपणास ते कितपत रुचलं हे सांगता येणार नाही. यातील काय घ्यावं, काय नाही हा निर्णय आपणावर सोडून मी इथेच थांबतो. धन्यवाद!

❖❖❖

# २७ वे अधिवेशन
# जनता कला-वाणिज्य महाविद्यालय
# मलकापूर, जि. बुलडाणा
# ३० जानेवारी २०१४
# अधिवेशनाध्यक्ष : प्रा. सतेश्वर मोरे

क्रांतिमा सावित्री, क्रांतिबा फुले, ताराबाई शिंदे

बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, संत गाडगेबाबा आणि ज्यांनी समाजाच्या कल्याणासाठी आणि आधुनिक समाजाच्या निर्मितीसाठी आपले आयुष्य झिजविले त्या सर्व महान माणसांना मी या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या सत्ताविसाव्या अधिवेशनाचा अध्यक्ष म्हणून माझ्या आणि आपणा सर्वांच्या वतीने या मंचावरून विनम्र अभिवादन करतो!

लोकसेवा शिक्षण बहुउद्देशीय मंडळ द्वारा संचालित जनता कला–वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर, जि.बुलडाणा येथे आज दिनांक ३० जानेवारी २०१४ रोजी आयोजित या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या सत्ताविसाव्या अधिवेशनाचे उद्‌घाटक मराठीचे जेष्ठ प्राध्यापक, ग्रामीण साहित्याचे अभ्यासक डॉ. एस. एम. कानडजे, पूर्वाध्यक्ष आमचे जेष्ठ बंधू डॉ. सुखदेव ढाणके, प्रमुख अतिथी डॉ. अरविंद कोलते, प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष प्रा. मनोहर बनसोड, या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद दत्तात्रय भोसले, मराठी विभाग प्रमुख आमचे मित्र डॉ. राजकुमारजी खर्चे, विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. कशिनाथ बऱ्हाटे आणि उपस्थित चर्चासत्राचे अध्यक्ष, सहभागी चर्चक, प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक आणि रसिक बांधवांनो!

माणसाचे आयुष्य त्याचे एकट्याचे असते हे सत्य एकवेळ मान्य केले तरी, त्याला सामाजिकतेच्या पातळीवर फारसा अर्थ उरत नाही. ज्या समाजात आपण ते आयुष्य रचत गेलेले असतो त्या समाजाच्या सामूहिक दायित्वाशी आपले नाते असते. अशावेळी आपली इच्छा असो अथवा नसो आयुष्यात अपरिहार्यपणे येणाऱ्या अनेक जबाबदाऱ्या आपल्याला स्वीकाराव्याच लागतात. अशाच एका अपरिहार्यतेतून हा मलकापूरांनी बहाल केलेला या संत

गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या सत्ताविसाच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान मला स्वीकारावा लागला. ही जबाबदारी पेलण्याची सक्षमता माझ्यामध्ये आहे किंवा नाही याचे उत्तम मी काळाच्या कसोटीवर सोपवितो आणि त्या निमित्ताने लाभलेल्या संवादाच्या संधीचा लाभ घेतो.

बांधवांनो! गेल्या अडीच दशकांपासून अमरावती महानगरपालिकेत विलीन झालेल्या आणि ग्रामीण परिसराशी जवळीक असलेल्या बडनेरा येथील बॅरि. रामराव देशमुख कला, श्रीमती इंदिराजी कापडिया वाणिज्य आणि न्यायमूर्ती कृष्णराव देशमुख विज्ञान महाविद्यालयात मी मराठी भाषा आणि साहित्याचे अध्यापन करत आहे. सोबतच गेल्या तीन दशकांपासून वाङ्मयीन शाळेचा विद्यार्थी म्हणून साहित्याचे आणि त्या अनुषंगाने घडणाऱ्या वाङ्मयीन चिंतनाचे अध्ययन करीत आहे. या दुहेरी अनुभवातून आलेल्या आकलनातून आज पन्नाशीच्या नंतर जे मला उमजले आहे त्याचे हितगुज करण्याची संधी मला या महाविद्यालयाने आणि मराठी प्राध्यापक परिषदेने दिली त्याबद्दल मी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

।१ ।।

अत्यंत संक्रमणावस्थेत आज आपण या मलकापूर येथे एकत्रित झालो आहोत. दरवर्षी महाविद्यालयात आशेने प्रवेश घेणारे विद्यार्थ्यांचे लोंढे आणि केवळ पदवीचे भेंडोळे त्यांच्या हातात सोपवून त्याला निरोप देणारे आपण, जगातल्या उन्नत शैक्षणिक अवस्थेच्या तुलनेत अत्यंत विदारक अवस्थेत असलेल्या आपल्या शैक्षणिक व्यवस्थेत अध्यापनकार्य करीत आहोत. आपल्या शैक्षणिक व्यवस्थापनेची झालेली ही विदारक अवस्था शिक्षणाच्या उद्दिष्टांपासून ढळलेल्या आपल्या धुरिणांच्या निष्ठा आणि एकंदर शिक्षणाप्रती असणारे त्यांचे औदासिन्य याची परिणिती असली, तरी हे एकाच दिवशी घडलेले नाही हे वास्तव आहे. गेल्या अनेक वर्षापासून तुटलेले आपले सामाजिक नाते आणि स्थितीशीलतेचा हव्यास याचे हे फलित आहे. शिक्षण हे संस्काराचे एक साधन म्हणून आपण शिक्षणाकडे पाहत होतो. आजही त्यापासून आपण वेगळे झालेलो नाही. माणसाला उन्नत करणारी आणि त्याच्या कल्याणाचे नव्हे; तर त्याच्या सामाजिक असण्याच्या सगळ्याच निकषांना उजागर करणारी एक व्यवस्था म्हणून शिक्षणाने आपली जबाबदारी निभवली आहे. याच हेतूने आज आपण या शैक्षणिक व्यवस्थेकडे पाहू लागलो तर नेमके शैक्षणिक उद्दिष्ट निश्चित करण्यासाठी नेमलेल्या विविध आयोगांचे

अहवाल गुंडाळून त्यावर ठाण मांडून बसलेली ही व्यवस्था हजारो विद्यार्थ्यांचे पतन होताना निमुटपणे पाहत आहे. अशावेळी शिक्षक म्हणून आपल्या वाट्याला येणाऱ्या जबाबदारीचे अवलोकन करणे; आणि ती सक्षमपणे पेलण्याची तयारी ठेवणे गरजेचे आहे. असे मला मनापासून वाटते. त्या संदर्भात आजचे हे औचित्य साधून आपण थोडे मोकळेपणानं संवादी होणार आहोत. अर्थात माझी क्षमता मला माहिती आहे. आपण मला सोबत करावी आणि पुढे न्यावे एवढी अपेक्षा ठेवतो आणि या संवादाला सुरुवात करतो.

।।२।।

माणूस समाजशील प्राणी आहेच यात दुमत असण्याचे कारण नाही. परंतु त्याचे प्राणीत्व मनुषत्वाच्या दिशेने परावर्तीत होण्यासाठी धडपडते, ते त्याचे धडपडणे ज्या प्रवासाचा मार्ग अवलंबतो तो प्रवास शिक्षणाच्या बेटाला वळसा घालून नव्या संस्कार आणि संस्कृती निर्माणाच्या दिशेने अग्रेसर होतो. हा प्रवास जसा प्राणीत्वापासून माणसाला मोकळे करीत नेतो तर, हे मानवी जग आणि जीवन याला सौंदर्य बहाल करणाऱ्या नव्या दुनियेच्या रचनेच्या सुसूत्र प्रतिक्रियेचा तो अभिन्न भाग असतो. माणूस जसा त्याला जोखतो तसे त्याचे पडसाद त्याच्या वाट्याला येत जातात; आणि त्याच्या जगण्याच्या जीवनाच्या दिशा अधिक प्रशस्त होत जातात. यातून माणूस जरी प्राणीत्वापासून मुक्त होत असला तरी प्राण्याला ज्या गरजा असतात त्या माणसालाही असतात. पण, त्याशिवाय अधिक वेगळे त्याला हवे असते. कारण त्याने जन्मणे हे केवळ आईच्या कुशीतून मोकळे होणे एवढ्यापुरते मर्यादित नसते, तर त्यापुढे त्याला स्वतःच स्वतःला माणूस म्हणून जन्म घ्यावा लागतो. यासाठीच त्याने संस्कृतीला जन्म दिला आणि भाषा, साहित्य, शिक्षण हा तिचा अभिन्न भाग झाला. माणसाचे स्वतःच स्वतःमधून जन्म घेणे म्हणजे त्याच्यातील सुक्त शक्ती उजागर होणे. यासाठी त्याला अध्ययन आणि अध्यापनाची गरज असते. किंबहुना माणसाच्या सुप्त शक्तींना उजागर करणे हेच शिक्षणाचे प्रयोजन असते. हे प्रयोजन भाषा आणि साहित्य यातून साकार होते. म्हणूनच भाषा आणि साहित्याचे अध्यापन अत्यंत महत्त्वाचे ठरते.

।।३।.

अलीकडे भाषेच्या अभ्यासाची नव–नवी अभ्यासक्षेत्रे पुढे येत आहेत. अक्षर–शब्द–वाक्य यातील व्याकरणिक आंतरिक रचनेशिवाय भाषाविज्ञान–समाजविज्ञान–वर्णनात्मक भाषाविज्ञान, उपयोजित भाषा अशा विविध संदर्भात भाषेच्या अध्ययनाला आज सुरुवात झालेली आहे. अतिशय व्यापक स्वरूपात

होणारे भाषिक व्यवहार आणि त्या व्यवहारातील सामाजिकता आज काळजीपूर्वक अभ्यासली जात आहे. भाषा ही केवळ लेखनाच्या आणि व्यवहाराच्या पातळीवर अभ्यासली जात नसून भाषिक वर्तनाच्या स्वरूपातही तिचा अभ्यास केला जातो आहे. समाजाशी असणारे तिचे अभिन्नत्व आणि मानवी वर्तनाशी असणारा तिच्या व्यापक संबंधाने अध्ययन करताना बदलणारी तिची भाषिक रूपे हा भाषेचा नव्हे तर व्यापक समूह भावनेचा परिपाक आहे हे आता लक्षात येत आहे.

मानवंशशास्त्रज्ञांच्या मते सुमारे ४० लक्ष वर्षांपूर्वी माणूस द्विपाद झाला. तेव्हापासून २० लक्ष वर्षे मानवी मेंदूमध्ये भाषेचे केंद्र एक जीवशास्त्रीय गरज म्हणून विकसित होत गेले. त्यानंतर भाषेला अनुसरून मानवी संवेदनशीलता घडत गेली. सुमारे ५० हजार वर्षापूर्वी मानवाची समृद्ध संवेदनशीलता घडत गेली. त्याच सुमारास जगभराच्या सर्व मानवी समूहाच्या भाषा घडू लागल्या. साधारणत: १० हजार वर्षापूर्वी ह्या सर्व भाषा संदेशवहनाच्या लवचिक, सक्षम व समृद्ध व्यवस्था म्हणून वापरल्या जाऊ लागल्या असाव्यात. पुढे भाषेच्या लेखनासाठी लागणाऱ्या लिपीचित्राच्या स्वरूपापासून तर अक्षरांपर्यंत प्रवास घडला. भाषा माणसाच्या घडणीतल्या प्रक्रियेतील महत्वाची निर्मिती आहे. आदिम अवस्थेतील माणसाला त्याच्या अभिव्यक्तीचे साधन भाषेच्या रूपात सापडले आणि त्याच्या विकासाच्या अर्थात मनुषत्वाची प्रक्रिया अधिक गतिशील झाली. सामूहिक संवादाचे माध्यम असणारी भाषा माणसांच्या क्षमतांना आणि सुप्त शुक्तींना अधिकाधिक उजागर करीत गेली. भाषेचे हे साधन म्हणून वापरले जाणे सामाजिक नियंत्रणाचा भाग बनले. त्यामुळे भाषेला पायाभूत सामाजिक संस्था म्हटले गेले.

।।४।।

भाषा स्थिर आणि अस्थिर अशा दोन्ही स्वरूपात वापरली जाते. सर्वसामान्य व्यापक संदेशवहनाच्या नियमांचा समूह याला आपण स्थिर भाषा म्हणतो जी लिखित आणि लेखननियमांशी प्रतिबद्ध असते. तर मर्यादित स्वरूपातील व्यक्तिसापेक्ष भाषिक वर्तन हे अस्थिर स्वरूपाचे असते, जे त्या त्या प्रदेशातल्या बोलीच्या स्वरूपात असते. ही भाषा लेखननियमांशी बांधील नसते. स्थिर भाषा ही सामूहिक व्यवस्था असते. तिच्यात समूहमानस व्यापक प्रमाणात प्रगट होते. या उलट अस्थिर भाषा प्रयोगशील आणि प्रवाही असते. ही व्यक्तिसापेक्ष असते. तिचा वापरही सहेतुक असतो. गरजेप्रमाणे आणि आपल्या व्यवसाय व प्रदेशानुसार तिचा वापर होतो. मराठी भाषक म्हणून

वऱ्हाडी शेतकरी आणि खान्देशी शेतकरी यांच्या वापरातील भाषिक रूपे ही वेगवेगळी असली तरी ती व्यापक स्थिर मराठीची अस्थिर रूपे आहेत, सगळे मराठीचे शब्द आणि व्याकरणिक रूपे आपण कधीच वापरत नसलो तरीही ती व्यापक स्थिर मराठीची अस्थिर रूपे आहेत. सगळे मराठीचे शब्द आणि व्याकरणिक रूपे आपण कधीच वापरत नसतो, तरीही ते या स्थिर भाषेचे घटक आहेत. गरजेनुसार ही रूपे मराठी भाषक म्हणून आपणास उपलब्ध होऊ शकतात. हे एक आणि दुसरे असे की, भाषा केवळ प्रदेश आणि व्यवसाय यानुसारच बदलत नसते तर जाती–जमाती, लिंग, व्यक्ती त्याशिवाय कालगणिक ती बदलत असते. हे सर्व बदल तिचे अंगभूत भाग असतात. भाषा कधीच एकसारखी, एकठोक किंवा एकपदरी नसते.

भाषेतील प्रत्येक शब्दाला ध्वनीचे एक आणि अर्थाचे दुसरे अंग असते. या दोन्ही अंगानी मिळून भाषिक चिन्ह तयार होते. या चिन्हाना परंपरेने अर्थ बहाल केलेले असते. तेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्ते परहस्ते जात असते. भाषा अशुद्ध अथवा शुद्ध मानणे हे अशास्त्रीय आणि अडाणीपणाचे लक्षण आहे. भाषेच्या वापराचे प्रकार समाजातल्या विविध गरजा, प्रथा, संदर्भानुसार बदलत असतात. साहित्यातून याचा प्रत्यय आपणास येतो. भाषेत प्रादेशिक–ग्रामीण–शहरी, सुशिक्षितांची–अशिक्षितांची भाषा हे भेद नैसर्गिक आहेत. तरीदेखील बोलींची अथवा पोटभाषांचे स्वातंत्र्य संकुचित करण्याकडे समाजाचा कल असतो. यावर मात करायची असेल तर त्या त्या प्रदेशातील बोली किंवा पोटभाषा शिक्षण किंवा ग्रंथलेखन अथवा साहित्याच्या निर्मितीसाठी अर्थात सार्वजनिक क्षेत्रात या भाषेचा उपयोग करणे हे भाषिक समूहाच्या प्रगतीसाठीच नव्हे तर एकजिनसीपणासाठी आवश्यक असते. महाराष्ट्रात पुणेरी भाषेला प्रमाणभाषेचा मान मिळाला तो केवळ पुणेरी बोलींचा मोठेपणा नाही तर इतर बोलीभाषिकांचा तो सामंजस्यपणा आहे. कारण सामंजस्यामुळेच आजही मराठी भाषकांचा एकजिनसीपणा टिकून आहे. तो टिकून राहणे गरजेचे असते. कारण भाषिक बेबनाव वाढला तर राष्ट्रीयतेला तडा जातो. अनेक बोलीपैकी एखादीच भाषा प्रमाण भाषा ठरते. त्याला ऐतिहासिक, भौगोलिक, पारंपरिक, व्यापारी अशी अनेक कारणे असली तरी त्या बोलींचे नियम होणे अर्थात त्याचे व्याकरण येणे गरजेचे आहे. पुणेरी बोलीला तो तर्खडकरांच्या रूपाने लाभला, म्हणून आज प्रमाणभाषा म्हणून पुढे आली.

।।५।।

भाषेमुळेच आपण भूतकाळातील आणि भविष्यातील घटनांचे वर्णन वर्तमानात करू शकतो. की भाषेची स्थलांतराची आणि कालांतराची क्षमता साहित्याला पायाभूत ठरली आहे. मूर्त आणि अमूर्ताला समूर्त करण्याची तिच्या सामर्थ्यामुळेच आपण कल्पना, विचार, वस्तू याच्या संदर्भात सहजपणे चर्चा करू शकतो. इतकेच नव्हे तर तिच्या अचूकपणा आणि नेमकेपणा आणि विशिष्टपणा यामुळे आपल्याला गहन विचार करणे, शास्त्रीय मीमांसा करणे शक्य होते. भाषेमुळेच सांस्कृतिक वारसा पुढील पिढीला हस्तांतरित करता येते. मूल्ये, विचार, परंपरा, धर्म जतन करून ठेवता येतो. एवढेच नव्हे तर त्यात अचूकपणा आणि नेमकेपणा आणि विशिष्टपणा यामुळे आपल्याला गहन विचार करणे, शास्त्रीय मीमांसा करणे शक्य होते. भाषेमुळेच सांस्कृतिक वारसा पुढील पिढीला हस्तांतरित करता येणे, मूल्ये, विचार, परंपरा, धर्म जतन करू ठेवता येणे एवढेच नव्हे तर भाषेबद्दल बोलतानाही आपल्याला भाषेचाच उपयोग करावा लागतो. ती सर्जनशील असते म्हणूनच साहित्याला सौंदर्याचे वैभव तिच्या आधारे प्राप्त होते. सौंदर्यनिर्मिती किंवा साहित्यनिर्मिती हे भाषेचे मूलभूत प्रयोजन नाही तो तिच्या इतर व्यवहारातील भाग आहे. हे भाषेबाबत मी नव्याने बोलत नाही. मराठी भाषेचे अध्यापक म्हणून तुम्हाला हे सगळे माहिती आहे. मुद्दा भाषेच्या अध्यापनाचा आणि तिच्या अध्ययनाचा आहे. मी ज्या परिसरात अध्यापन करीत आहे त्या परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे वाक्यरचना आणि प्रमाणभाषा लेखनाशी अजिबात नाते नाही, असे विद्यार्थी मराठी वाङ्मय हा विषय घेऊन वर्गात बसले आहेत. मुळात दोष कुणाचा? याबाबत चर्चा करण्यापेक्षा जे वास्तव तुमच्या समोर आहे ते स्वीकारणे आणि कृतिशील होणे एवढाच पर्याय समोर आहे. अशावेळी अध्यापनाचे कोणते तंत्र आणि मंत्र आपण वापरणार आहोत हे मान्य आहे की अध्यापन हा ज्याच्या त्याच्या शैलीचा आणि कौशल्याचा भाग असतो. परंतु जेव्हा तुमच्यासमोर तुमच्या शैली आणि कौशल्याचा पूरक वर्गच नाही अशावेळी कोणती शैली आणि कोणते कौशल्य आपण वापरणार आहोत? विशेषत: भाषा आणि साहित्याच्या संदर्भात हा प्रश्न का पडतो? कारण इतर विषयाप्रमाणे केवळ माहिती देणे एवढेच काम भाषा अध्यापकांचे नसते. त्याला त्या विद्यार्थ्यांची अभिरुची, त्याचे व्यक्तिमत्त्व आणि त्याची आस्वादक क्षमता विकसित करून भाषेचे सामर्थ्य आणि साहित्याची सामाजिक आणि कलात्मक मूल्ये अधोरेखित करणे आवश्यक आहे.

हे भाषेचे सामर्थ्य आणि या सामर्थ्याला सिद्ध करणारी तिची वैशिष्ट्ये नेमकेपणाने उजागर करून ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होणे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असते. कारण, भाषा ही केवळ व्यवहाराचा किंवा संदेशवहनाचे साधन नाही तर माणसाच्या व्यक्तित्वाला आकार देणारी आणि त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेला प्रभावित करणारी उर्जा आहे. याचे भान विद्यार्थ्यांच्या मनात रूजविण्यासाठी भाषेचे अध्ययन आणि अध्यापन असते. यामुळे आपण हतबल आहोत. याची जाण केव्हा आपल्या धुरिणांना येईल याची तुम्हाला आणि मला वाट पहावी लागणार आहे.

।।६।।

भाषेचे सामाजिक व्यवहाराचे किंवा संदेशवहनाचे साधन म्हणून अभ्यास करणे आणि साहित्याची भाषा म्हणून अभ्यास करणे यात मूलभूत फरक आहे. सामाजिक व्यवहारासाठी जो नेमकेपणा भाषेत असावा लागतो तो साहित्याच्या संदर्भात संभवत नाही. साहित्याच्या अध्ययनात भाषा केवळ माध्यम म्हणून पुढे येते. त्या अनुषंगाने तिने घेतलेली सौंदर्यपूर्ण रूपे साहित्याचे सौंदर्य म्हणून अभ्यासली जातात. त्याचे स्वरूप वृत्त, अलंकार, उपमा, प्रतीके, प्रतिमा, रूपके, मिथके अशा विविध रूपात असते. परंतु, साहित्याच्या सामाजिकतेच्या संदर्भात विचार करताना साहित्याच्या संस्कार क्षमतेचे अध्यापन करावे लागते. त्यासाठी त्याचा आशय आणि त्या अनुषंगाने त्यास निर्माण झालेली व्यक्तिचित्रे, स्वभावचित्रे, त्यातील सामाजिक पर्यावरण, प्रदेश, व्यवसाय अशा विविध रूपात याचे अध्ययन आणि अध्यापन करावे लागते. साहित्याचे अध्यापन विद्यार्थ्याला केवळ साहित्यकृतीतील पात्रांची, त्याच्या नातेसंबंधांची, व्यवसायाची आणि वर्तनाची माहिती देण्यासाठी नसते तर त्यातून विद्यार्थ्यांच्या जाणिवेच्या कक्षा अधिक विस्तारित आणि समृद्ध करणे हे साहित्याच्या अध्यापनाचे प्रयोजन असते. हे प्रयोजन घेऊन मराठी वाङ्मय हा विषय आपण का घेतला हेच ज्यांना माहिती नसते अशा विद्यार्थ्यांच्या वर्गात आपण जातो ही आपली खरी शोकांतिका आहे. या वास्तवात बदल करण्यासाठी कोणते उपाय योजावे ही चिंता आहे. असे असले तरी या वास्तवाला सामोरे जाणे भाग आहे. अशावेळी पारंपरिक पद्धतीने अध्यापन करून भागणार नाही तर त्यासाठी नव्या आणि परिणामकारक अध्यापन पद्धतीचा कसा वापर करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. ज्यांना वाक्यरचना माहिती नाही, त्यांना व्याकरणाचे नियम सांगणे आणि ज्यांना प्रमाण भाषा लेखन जमत नाही त्यांना प्रमाणभाषेचे

पाठ्यपुस्तकाच्या मागच्या पानावर असलेले नियम पाठ करायला लावणे यावेळी अशक्य आहे. अशा परिस्थितीत तुमची कल्पकता आणि कौशल्य यातून काही नवे शोधणे आणि त्याची अंमलबजावणी करणे इथेच आपली अध्यापक म्हणून कसोटी असते. यातून आपण प्रत्येकजण गेला आहात याची मला जाण आहे.

।।७।।

साहित्य हे आपले सांस्कृतिक संचित आहे. संस्कार आणि संस्कृतीच्या विकासाचे, समाजाच्या सांस्कृतिक उन्नयनाचे साधन म्हणून साहित्याचे महत्त्व आपण जाणतो. साहित्य आहे म्हणूनच आपल्या संस्काराचा सांस्कृतिक ठेवा कायम आहे. साहित्याशिवाय समाज ही कल्पना जशी दुरापास्त आहे, तशीच समाजाशिवाय साहित्य ही कल्पनाही अप्रस्तुत आहे. मूलतः साहित्याने जेवढे सांस्कृतिक असणे महत्त्वाचे आहे तेवढेच ते सामाजिक असणेही गरजेचे आहे. अध्यापन प्रक्रियेच्या संदर्भात साहित्याचा विचार करणे म्हणजे साहित्याचे प्रकार आणि प्रवाहाचे नेमकेपण उद्धृत करणे नव्हे किंवा साहित्याचा केवळ इतिहास आणि परंपरा अधोरेखित करणे नव्हे तर उपलब्ध असणाऱ्या पाठ्यक्रमातील संहितेचा आशय, त्याची अभिव्यक्ती, प्रयोजन यासोबतच त्याचा आस्वाद आणि चिकित्सा करणे यातून विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड निर्माण करून त्याची आकलन क्षमता वाढविणे हे एक आणि दुसरे असे की, साहित्य हा केवळ परीक्षेच्या तयारीसाठी आणि विद्याशाखांशी असणारे साहित्याचे नाते आणि इतर विद्याशाखांमध्ये असणारी गरज विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देणेही तेवढेच महत्वाचे आहे. यातून आपण मराठीचे विद्यार्थी आहोत यामुळे त्यांच्यात इतर विषय अथवा विद्याशाखांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तुलनेत असणारा न्यूनगंड कमी करून त्याच्यामध्ये मराठीचे विद्यार्थी म्हणून आपल्या विषयाच्या संदर्भांत अभिमान निर्माण होणे गरजचे आहे. आपल्या अध्यापनातून तो त्यांच्यामध्ये निर्माण व्हावा.

भाषेच्या माध्यमातून होणारी साहित्याची निर्मिती आणि प्रयोगांच्या द्वारा होणारी नवी निर्मिती यातील फरक आपण समजून घेतला पाहिजे. भाषा हे अमूर्त माध्यम आणि साहित्यातून उजागर होणारे विश्वपण अमूर्त आहे. भाषेच्या माध्यमातून होणारी साहित्याची निर्मिती म्हणजे अमूर्ताकडून अमूर्ताची निर्मिती आहे तरी मानवी जगाला त्याच्या भावभावनांना प्रभावित करणारी आहे. त्याचबरोबर विज्ञानामध्ये होणारे प्रयोग हे मूर्ताकडून मूर्ताची निर्मिती करणारे आहेत. वस्तू प्रत्यक्षात आहे आणि त्यातून जे निर्माण होणारे आहे ते प्रत्यक्षात

असणार आहे त्याचा सामाजिक उपयोग आहेच; परंतु अमूर्तातून नवे अमूर्त जग निर्माण करणे आणि मूर्तामधून नवी निर्मिती करणे हे जर आपण लक्षात घेतले तर मला वाटते मूर्तामधून नवी निर्मिती करणाऱ्यांपेक्षा अमूर्तातून नवीन निर्मिती करणाऱ्या समाजामध्ये आदरणीय ठरावा. माझ्यामते तो आदरणीय आहे. ही जाणीव साहित्याचे अध्यापन करताना आपण बाळगली तर त्याचा निश्चित उपयोग होईल. इतकेच नव्हे तर जे जग प्रत्यक्षात नसते त्या जगाचे भान देणारे आपण आहोत जे समाजावर आपला प्रभाव गाजवतो ज्याची गरज समाजाला आहे.

॥८॥

साहित्य, कला आणि शास्त्र हे समाजाच्या सांस्कृतिक धारणा आणि विचार यावर प्रभाव टाकतात. समाजासमोरचे आदर्श आणि प्रेरणा निश्चित करतात. समाजाला सतत नियंत्रित ठेवण्याचे काम हे तीन घटक करीत असतात. आम्ही साहित्याचे अध्यापक आहोत याचा अर्थ आपले कलांशी कुठलेही देणे घेणे नसते असे नाही किंवा साहित्याला आपण कला मानतो म्हणून साहित्य आणि कला याशिवाय शास्त्रांशी आपले काही देणे घेणे नसते असे नाही. अध्यापक हा सर्वश्रूत असला पाहिजे. साहित्याशिवाय कला आणि शास्त्र हे त्याच्या अध्यापनाचे विषय जरी नसले; तरी त्याची जाण त्याला असली पाहिजे. त्याशिवाय साहित्याचे अध्यापन करताना त्याला जो आनंद प्राप्त होतो तो त्याला मिळणार नाही, कलेचा आस्वाद घेता येणार नाही. रसिकत्वाला मर्यादा पडेल. साहित्याचे अध्यापन करताना त्याला जो आनंद प्राप्त होतो तो त्याला मिळणार नाही, कलेचा आस्वाद घेता येणारी नाही. रसिकत्त्वाला मर्यादा पडेल. साहित्याच्या अध्यापकांना अशा मर्यादा पडणे परवडणारे नसते, कारण मूलतः साहित्याचे अध्यापन हे इतर विषयांप्रमाणे माहिती देण्याच्या पातळीवरचे नसते तर विद्यार्थ्यांच्या जाणिवांच्या कक्षा रुंदावून त्याच्या सांस्कृतिक चेतनेला उजागर करण्यासाठी असते, त्याला त्याच्या जगण्याला आनंद आणि जीवनाचे नवे भान प्राप्त व्हावे यासाठी साहित्याचे अध्यापन असते. कला आणि शास्त्रे हे त्याला पूरक आहे.

समोर बसलेला प्रत्येक विद्यार्थी वेगवेगळ्या सामाजिक, घटकातील, जातीधर्मातील आणि वेगवेगळ्या पंथातील असतो. मुळात समाजाचा चेहरा अस आहे, त्यामुळे हे अपरिहार्यच आहे. अशा सगळ्या घटकांशी आपल्याला संवाद साधायचा असतो. ज्या वैविध्यासमोर तुम्ही उभे असता त्या सगळ्याचे तुम्ही आदरणीय आहात हे लक्षात घ्या आणि या सगळ्याच्या जाणिवांशी

तुम्हाला भिडायचे आहे तुमचे भिडणे तेवढेच संयमी आणि तेवढे टोकदार असणे गरजेचे आहे. तुमची भूमिका तेवढीच तटस्थ आणि तेवढीच कठोर असणे गरजेचे आहे. तुमची मांडणी तेवढीच सुलभ आणि तेवढीच वास्तवाशी भिडणारी असली पाहिजे. आपण शिक्षक आहोत आपली स्वतःची एक निश्चित भूमिका आहे. ती भूमिकेचे पालन करण्याचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे. पण त्याचे पालन करताना आपण आततायीपणा तर करीत नाही ना, याचे भान असणे गरजेचे आहे. कारण ज्या विविध संस्कारातून आलेल्या विद्यार्थ्यांसमोर आपण उभे असतो त्याचे संस्कार आणि ज्या मानवी मूल्याधिष्ठित संस्काराचे कलम तुम्हाला करायचे आहे ते कलम त्या संस्कारावर खोचून रुजणार नाही, तर ते रुजविण्यासाठी तेवढ्याच मशागतीची गरज आहे. ती करण्याची आपली तयारी असली पाहिजे साहित्याचे अध्यापन करताना ती मशागत निश्चितपणे होत जाते.

॥९॥

अलीकडे विविध वाङ्मय प्रवाहातील लेखन पुढे येत आहे. सामाजिक जाणिवेने प्रेरित झालेले आणि विशिष्ट विचार आणि प्रेरणा समोर ठेवून निर्माण झालेले आजपर्यंत मराठी साहित्याशी त्याचे नाते नसलेले हे सगळे प्रवाह मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहातले नसले; तरी त्यांनी आपले स्वतःचे स्थान निर्माण केले आहे, त्यामुळे त्याचा अभ्यासक्रमात समावेश होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे त्या प्रवाहांतील साहित्याचे अध्यापन करताना अनेक अडचणी आपल्यासमोर येतात. सामान्यत: त्यातली भाषा, त्यातले व्यवहार, त्यातले वर्तन, त्यातल्या रूढी परंपरा, त्यातले जीवन, त्यातले व्यवसाय जे आपल्याला अपरिचित असते; नव्हे आपल्यालाही कल्पनेबाहेरचे ते जग असते. अशा जगाचे अध्यापन करताना निश्चितच अडचणी येणार, खरं म्हणजे आतापर्यंत आपण जे शिकवित होतो ते आपल्या परिचयाचे होतेच असे नाही. पण आपणही ते शिकलो आणि तेच शिकवित आहोत, त्याचा आपल्या परिचयाशी तसा संबंध नव्हताच पण अडचण मात्र आली नाही. आता तिचे येणे यासाठी अपरिहार्य आहे की एकतर हे लेखन ज्या वास्तवाला भिडून केले गेले ते वास्तव आणि समोरचा विद्यार्थी यातील तफावत खूप मोठी आहे आणि हे वास्तव ज्या आस्वादाच्या पातळीवर नेऊन शिकवायचे आहे त्यासाठी ही मने तयार आहेत का, हाच खरा प्रश्न आहे. यावर मात करून हे सगळे प्रवाह आपल्याला शिकवायचे आहेत.

या सगळ्या प्रवाहाची निर्मिती स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय

राज्यघटनेने सर्वांना जे मूलभूत अधिकार दिले त्यातून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा जोरकसपणे पुरस्कार करण्यात आला, हे एक आणि दुसरे असे की, १४ ऑक्टोबर छप्पनला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयांनासह बौद्ध धम्मस्वीकार केला त्यातून आंबेडकरी साहित्याचा प्रवाह ज्या वेगाने पुढे आला त्याची मांडणी झाली आणि त्याच्या सोबतच दलित–अस्पृश्य, भटके–विमुक्त, ग्रामीण–आदिवासी, स्त्रिया इतर मागासवर्ग ज्याला बहुजन असे म्हणतो आणि मराठा आदीही वाङ्मयीन झाले आहेत. केवलानंदासाठी नवे तर स्वतःच्या सामाजिक दुखण्याचे आणि त्यासाठी जबाबदार असलेल्या या समाजव्यवस्थेतील उणिवांमुळे हरवून बसलेल्या जगण्याचे वास्तव मांडण्यासाठी हे सगळे समूह साहित्यांच्या प्रांतात आले आहे. याला समीक्षक साठोत्तरी साहित्य म्हणतात. ते साठोत्तर का म्हणतात हेच माझ्या समोरचे कोडे आहे. कारण वाङ्मयीन क्षेत्राला प्रभावित करणारी वाङ्यमीन अथवा सामाजिक अशी कोणतीही घटना यानंतरच्या कालखंडात किमान नव्वदच्या दशकापर्यंत तरी घडलेली दिसत नाही. या उलट ज्या घटनेच्या प्रभावातून आंबेडकरी साहित्य निर्माण झाले त्याला आम्ही मूल्य बदलाचा सोहळा मानतो. म्हणून मूल्यांतर म्हणतो हे लक्षात घेतले तर आधुनिक वाङ्मयाचे दोन पट स्पष्टपणे लक्षात येतात. एक मूल्यांतरपूर्व आणि दूसरा मूल्यांतरोत्तर याची मांडणी विस्तृतपणे करता येईल. इथे ती अप्रस्तुत ठरेल. मुद्दा असा आहे की हे सगळे प्रवाह ज्या सामाजिक प्रेरणा आणि विचार घेऊन पुढे आले आहेत, त्या वाङ्मयाचे प्रयोजन आपल्याला नेमकेपणाने मांडण्यासाठी हा सगळ्या सामाजिक घटनांचे आणि सामाजिक चळवळीचे संदर्भ लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यातून समकालाशी सुसंगत असा विद्यार्थी आपण निर्माण करू शकतो.

॥१०॥

अध्यापन हे जसे शास्त्रशुद्ध तंत्र आहे तशीच ती कला आहे असे मानले जाते. अध्यापन तंत्राच्या संदर्भात मांडणी झालेली आहे परंतु अध्यापन कलेच्या संदर्भात अजून पुरतेपणाने बोलल्या केले नाही. मुळात कौशल्य आणि कला यात अनेकदा गल्लत होते. कौशल्य हे कामातील सफाईदारपणाचे दर्शक आहे मग ते अध्यापनाचे काम असले तरी चालेल. पण कला ही आनंद प्राप्ती आणि निर्मितीशी संबंधित आहे. वाङ्मयाच्या अध्यापनात हा आनंद आपण घेऊ शकतो आणि इतरांनापण तो देऊ शकतो. याही पुढे जाऊन वाङ्मयीन अध्यापनातले नवे असते ती अध्यापनातील नवनिर्मिती असते इतर विषयाच्या अध्यापनात अभावानेच संभवणारी ही घटना वाङ्मयीन अध्यापनात सहज

संभवू शकते कलेशी सुसंगत असणारी ही जाणीवनिर्मिती अध्यापनाला कलेच्या पातळीवर घेऊन जाते. अर्थात हे क्षण अध्यापकांच्या वाट्याला नेहमीच येतात असे नाही. पण ज्यावेळी हा क्षण अध्यापकाच्या वाट्याला येतो, त्यावेळी अध्यापक हा कलावंत म्हणून पुढे येतो आणि त्यावेळचे त्याचे अध्यापन हे कलेच्या रांगेत जाऊन उभे राहते.

अध्यापनातील तटस्थता म्हणजे नेमके काय? याचा विस्तृतपणे विचार होणे गरजेचे आहे. तसेच वाङ्मयाच्या अध्यापनात ती संभवू शकते काय? हेही समजून घेणे गरजेचे आहे. इतर विषयाचे अध्यापन करताना केवळ अभ्यासक्रमातील उपलब्ध माहितीची चर्चा करणे आणि गरज असल्यास समकालाशी त्याच्या सुसंगतीचे विवेचन करून त्या विषयाची समकालिकता सिद्ध करणे, अशी विषयाची मांडणी केली जाते. वाङ्मयेतर विषयाची माहिती नेमकी आणि काटेकोर असते. त्यामुळे त्याचे विवेचन पण नेमके आणि काटेकोर असणे अपरिहार्य असते. त्या विषयाच्या अध्यापनाच्या वेळी ही तटस्थता कायम राहू शकते. परंतु वाङ्मयीन घटनांचे तपशील असे नेमके आणि काटेकोर नसतात, त्याचे संबंध ज्या सामाजिकतेशी असते ती सामाजिकताही एकजिनसी नसते. याहीपुढे जाऊन ज्या वर्गात तुम्ही उभे असता तो वर्ग विविध जाती–धर्म–पंथ आणि समाजातून आणि कलाकृतीचे तर वेगळे काय असते? तीही याच मातीतली, याच माणसातली, इथल्याच संस्काराने संस्कारित झालेली. त्यामुळे ती कोणत्या ना कोणत्या मानवी समूहाचे प्रतिनिधित्व करणार हे निश्चित. अशावेळी अभ्यासक्रमातील उपलब्ध वाङ्मयीन कलाकृतीचे आस्वाद्य आणि आकलनात्मक पदर उलगडताना कोणतीही तटस्थता पाळायची ठरविले तरी ती कोणाच्या तरी भावनांना दुखावल्याशिवाय राहणार नाही त्याची नेमकी कोणती तटस्थता आपण पाळायची? आशयाच्या संदर्भातील, वर्गाच्या संदर्भातील, वर्गाच्या संदर्भातील की समाजाच्या संदर्भातील त्याही पुढे जाऊन आपण आध्यापक म्हणून आपली कुठलीतरी एक बाजू असतेच त्याचे काय? मुद्दा केवळ अध्यापनातील तटस्थतेचा नसतोच! तो मूल्यात्मक मांडणीचा असतो. आपण कोणती मूल्ये वर्गासमोर ठेवली पाहिजे? म्हणजे हा माणूस, हा समाज, आणि हर देश उन्नत होईल हा देश, देश म्हणून उभा राहील; आणि जग त्याच्याकडे सन्मानाने पाहील ती मूल्ये आहेत आपल्या संविधानाच्या प्रास्ताविकतेतली. संविधानिक मूल्ये ती आपली बाजू असेल! तीच आपली तटस्थता असेल !

।।११।।

अलीकडे जग बदलते आहे. जागतिकिकरणाच्या आणि संगणकीकरणाच्या रेट्याने मानवी समाजाच्या जीवनविषक धारणांच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. हे बदली भाषा आणि साहित्यातून आता पुढे येत आहे. मुद्रणाचा शोध नव्हता तेव्हा निर्माण होणारे हस्तलिखित साहित्य आणि मुद्रणाच्या शोधानंतर प्रकाशनात कमालीचा बदल झाला. निर्माण होणारे मुद्रित साहित्य मोठ्या प्रमाणात पुढे येत होते. आज संगणकीकृत अक्षरजुळणी आणि मुद्रण व्यवस्था आली आणि निर्मितीच्या प्रक्रियेला प्रचंड वेग आला आहे. हजारो पुस्तकांची निर्मिती अगदी सहज आणि सुलभ आणि तेवढीच आकर्षक झाली आहे. असे असताना अगदी अलीकडे ई–बुक्स् आणि ई–नियतकालिकांची सुरुवात आता संगणकावर झाली आहे. पुस्तकांचे मुद्रण न होता पुस्तक वाचकांच्या समोर जात आहे. ते कपाटात जपून ठेवायची गरज नाही. कपाटाची आणि कपाटामुळे घरातली जागा व्यापलेल्या विश्वकोषाने संगणकावर जागा घेतली आणि गेल्या अनेक दिवसापासून सुरक्षित जतन केलेले विश्वकोषाचे मौलिक खंड आता जागा अडवून बसल्यासारखे वाटत आहे. ई–लायब्ररीने तर जगातले सगळे ज्ञान आणि माहिती आता माझ्या घरात एका इवल्याशा पडद्यावर आली आहे. पुस्तकांचे वाचन, चिंतन आणि जतन याचे पुढे काय होणार आहे? याकडे आपण मराठीचे अध्यापक म्हणून लक्ष देणे गरजेचे आहे. उद्या अभ्यासक्रमात जर एखादे ई–बुक लागले तर, आपण त्या प्रिंट आऊट काढून वर्गात जाणार आहोत का, याचा विचार आपण केला पाहिजे. उद्या पाठ्यपुस्तकांऐवजी संगणक वर्गात घेऊन जावा लागणार आहे, तशी आपली तयारी असली पाहिजे.

संगणकावर मराठी लिहिणे आणि वाचणे आता अतिशय सोपे झाले आहे. युनिकोड किंवा इतर सॉफ्टवेअरच्या सहाय्याने ते आपण करू शकतो. पण त्याचबरोबर सोशल साईट, मराठी संकेतस्थळे आणि ब्लॉग्ज यातून होणारे लेखन अलीकडचे वर्तमानपत्र व नियतकालिकापेक्षा अधिक गाजते आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांत तर ही मोठ्या चर्चेची आणि राजकीय उलथापालथीची केंद्रे झाली आहेत. अशा अलीकडे भारतातही त्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. दिल्लीमध्ये महाराष्ट्राच्या व्यक्तित्वाची गांधींच्या प्रतिमेशी तुलना करून जे आंदोलन युवकांपर्यंत पोचविले गेले आणि त्यातून दिल्लीचे सरकार बदलले. ही सगळी किमया संगणकावरील सोशल साईटची आहे. उद्या मराठीच्या अभ्यासक्रमासाठी एक जवळची शाखा म्हणून तिचा अंतर्भाव

होण्यास वेळ लागणार नाही.

।।१२।।

आपण आज ज्या जगाचे रहिवासी आहेत ते जग प्रचंड वेगवान आहे. इथे संदेशवहनाला महत्त्व आहे. सोबतच विविध प्रकारचे दस्तऐवजीकरण, प्रसार माध्यमे, विविध कार्यालये आणि प्रतिष्ठांसाठी करावयाच्या पत्रव्यवहाराच्या स्वरूपाचे नमुने, दूरदर्शन वृत्तपत्रातील जाहिराती आणि बातम्यांच्या लेखनाचे नमुने, संगणकीकृत संदेशवहनाचे नमुने असा सगळा मजकूर आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञात व्हावा आणि आपला विद्यार्थी काळाशी सुसंगत असावा अशी रास्त अपेक्षा करणे गैर नाही. विशेषत: पदवी प्राप्त केल्यानंतर त्याच्या रोजगाराची सोय व्हावी अशी स्थिती आज नसली; तरी किमान त्याने मिळविलेल्या कौशल्याच्या आधारे वृत्तपत्र अथवा उपनिबंधकाच्या कार्यालयात दस्तऐवजीकरणाचे काम करू शकेल एवढी तरी किमान पात्रता त्याच्या अंगी यावी. अशी अपेक्षा आहे.

आज मराठी भाषा आणि साहित्याच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणारे क्षेत्र हे मर्यादित असले तरी ते खूपच मर्यादित आहे असे नाही. सुमारे एकशे चाळीस कोटी लोकसंख्येच्या या देशात केवळ दहा कोटी लोक मराठी भाषक आहेत त्या तुलनेत उपलब्ध असणाऱ्या संधी फारशा कमी नाहीत, असे मला वाटते. या उलट भारतीय प्रशासन सेवेत कला शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील विद्यार्थी 'मराठी' हा विषय घेऊन या सर्वोच्च सेवेत दाखल होतात याकडे 'मराठी' हा विषय घेणारे आणि त्याला तो विषय शिकविणाऱ्या अध्यापकाने लक्ष दिले पाहिजे. गेल्या पन्नास वर्षात आपल्या विदर्भातून किती विद्यार्थी या सेवेत दाखल झाले, हेही आपण गंभीरतेने घेतले पाहिजे. हे एक आणि दुसरे असे की, महाराष्ट्रातल्या ज्या विद्यार्थ्यांनी 'मराठी' हा विषय भारतीय प्रशासन सेवेत दाखल होण्यासाठी घेतला, बहुसंख्येने त्यांच्या वाट्याला यश आले आहे आणि त्यातले बहुसंख्य कला शाखेतले आणि मराठीचे विद्यार्थी नव्हते. जे मराठीला दुय्यम लेखतात त्यांनी ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे.

।।१३।।

'भाषा' हे संदेशवहनाचे आणि संपर्काचे साधन आहे तर 'साहित्य' हे संस्काराचे आणि नव्या मानवी समूहाच्या पूनर्रचनेचे साधन आहे. याचे आपण अध्यापक आहोत. समाजात प्राध्यापक म्हणून वावरताना जो काही सन्मान मला मिळतो तो माझ्या अध्यापनाचा सन्मान आहे आणि त्यातही मी भाषा आणि

साहित्याचा अध्यापक आहे याचा मला अभिमान आहे. ज्या भाषेत मी संस्कारित झालो आणि ज्या मातीत मी घडलो ती भाषा मराठी आहे. मराठी, ही महाराष्ट्राची भाषा आहे. त्या 'महाराष्ट्र' या शब्दाची व्युत्पत्ती डॉ. वसंत खोकले यांनी माडली; ती तुमच्यासमोर ठेवतो.

ते म्हणतात 'महाराष्ट्र' या शब्दाची व्यत्पत्ती झाडी मंडळात भरणाऱ्या बाजाराशी आहे त्या विचाराचा सारांश असा....

१) जंगलातील बाजारपेठ – मरहट्ट = मर(झाडी) + हट्ट (मंडळ/प्रदेश)

२) महाराजांची बाजारपेठ – मरहट्ट = मर (महार) + हट्ट (बाजार)

'मर' हा शब्द कानडी असून, तो प्रदेश वाचक तसाच मरमहार असा समाजवाचकही आहे. गाव तेथे 'महारवाडा' या म्हणीतून सूचित होणारा आशय असा की महाराजांचा प्रदेश तो 'महाराष्ट्र', 'हट्ट', शब्दाचा अर्थ हाट=बाजार पूर्वी आर्य–द्रविड संपर्क काळात वस्तूच्या देव–घेवींसाठी बाजार भरत असे. त्यातून रोटी–बेटी व्यवहार झाले. त्याच्या भाषिक देवघेवीतून एकजिनसी मराठी भाषक समाज अस्तित्वात आला. विविध भाषक गट किंवा समूह स्थलांतर आणि व्यापार विषयक देव–घेवीतून भाषाविषयक देव–घेव होते. प्रतिष्ठितांची भाषा अप्रतिष्ठित स्वीकारतात. त्यातून दोन्ही समूहाची देवघेव अर्थात, वाणिज्य भाषा निर्माण होते, ज्याला 'पिजिन भाषा' म्हणतात. द्रविड आणि आर्य यांच्या देवीघेवीतून ही प्रक्रिया मराठीच्या संदर्भात कशी घडली हे वरीलप्रमाणे डॉ. खोकले यांनी विशद केले आहे. याविषयी अधिक संशोधन झाले तर ह्या प्रक्रियेचे स्वरूप नेमकेपणाने पुढे येऊ शकेल. माझी मातृभाषा मराठीच्या निर्मितीतून हे प्रकरण माझ्या हाती आले. अर्थात त्याचेशी माझाही संबंध आहे, हे लक्षात आले आणि तुमच्यासमोर ठेवले हे एक आणि दुसरे असे की, ज्याने भारताला आपल्या विद्वत्तेचे अत्युच्च लेणे संविधानाच्या रूपात बहाल केले ते बाबासाहेब, प्रा.हुदलीकरांना मुलाखत देताना प्राध्यापकांच्या संदर्भात म्हणाले होते, "मला वाटते की, थोडेसे रुपये मिळावेत व आपली सुखाने कालक्रमणा करावी या पलीकडे आपल्या प्रोफेसरांना आयुष्यात काही महत्वाकांक्षाच नाही. या महत्वाकांक्षेच्या अभावामुळेच त्यांच्या हातून काहीही भरीव कार्य होत नसावे. ते अधूनमधून काही पाठ्यपुस्तकांवर टिपणे लिहितात. टिपणे लिहिण्यापलीकडे काही महत्त्वाचे कार्य आहे याची माहिती त्यांना आहे की नाही कोण जाणे!" आपली जबाबदारी टाळणाऱ्या प्राध्यापकांच्या संदर्भातील हे त्यांचे विधान आजही अनुचित वाटत नाही, तर त्या प्राध्यापकाने काय करावे? यासंबंधी ते म्हणतात, "प्राध्यापकांनी अध्यापन

आणि अध्ययनात स्वत:ला इतके गुंतवून घ्यावे की, आपल्या घराकडे बघण्याची सवड त्यांना मिळू नये. ते काम त्याने त्यांच्या पत्नीकडे संपूर्णपणे सोपवावे. अध्ययन, अध्यापन यांत संशोधनही आले. या तीन गोष्टींकडे प्राध्यापकांनी विशेष ध्यान घ्यावे. त्यांनी दुसरी इतर कामे करू नयेत. त्याचप्रमाणे 'प्राध्यापक' हा नुसताच विद्वान असून चालत नाही. तो सर्वश्रूत असला पाहिजे. तो स्वत: अत्यंत उत्साही असला पाहिजे. आपला विषय आपण अधिकाधिक माहितीपूर्ण आणि मनोरंजक करू अशी त्यांच्यात धमक असली पाहिजे"

मराठीच्या समृद्धीसाठी आणि तिच्या संवर्धनासाठी प्राध्यापकांनी हा बाबासाहेबांचा विचार गांभीर्याने घेतला तर निश्चितच आपली भाषा, आपले साहित्य आणि आपली संस्कृती निश्चित नव्या सुसंपन्न माणसाची, नव्या उणीवांसहित समाजाची आणि एका समृद्ध राष्ट्राची निर्मिती ही आपल्या अध्यापनाची फलश्रुती ठरेल याबद्दल मला तिळमात्रही शंका नाही. आपण जाणते आहात यातील काय घ्यावे आणि काय सोडून द्यावे याची जाण आपणास आहे. मी जे आज आपल्यासमोर पाखडित बसलो आहे यातील टरफले माझ्यासाठी ठेवा, जे काही सत्त्व असेल ते आपण घ्या, अशी नम्र विनंती आपणास करतो आणि आपण मला हा अध्यक्षपदाचा सन्मान बहाल केला, त्याबद्दल आणि हे सगळे ऐकून घेतले त्याबद्दल आपले मन:पूर्वक आभार मानतो आणि थांबतो. धन्यवाद!

❖❖❖

# २८ वे अधिवेशन
# स्वा.सै.श्री. कन्हैय्यालालजी रामचंद्र इन्नानी महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशिम
# २६ मार्च २०१५
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. रविकिरण पंडित

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या अठ्ठाविसाव्या अधिवेशनाचं अध्यक्षपद मला देऊन आपण मला सन्मानित केल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. या अधिवेशनाचं अध्यक्षपद मला मिळण्याच्या कारणाचा जेव्हा मी शोध घ्यायला लागलो त्यावेळी मला असं जाणवलं की माझं वय सेवानिवृत्तीच्या आसपास आलं म्हणून माझ्या वयाचा मान राखण्यासाठी कदाचित मला हा बहुमान देण्यात आला असावा किंवा आजवरच्या प्राध्यापकी कारकिर्दीत आपल्या मराठी विषयाच्या विविध व्यासपीठांवरून भाषणबाजी करण्याचा खटाटोप मी वांरवार केला त्याचं फळ म्हणून मला हे अध्यक्षपद देण्यात आलं असावं, पण त्याहीपेक्षा माझ्याप्रती आपल्या सर्वांच्या मनात असलेलं प्रेम, जिव्हाळा हे कारण अधिक संयुक्तिक वाटतं. कारण माझ्यापेक्षा वयाने मोठी असणारी मंडळी आपल्यामध्ये नक्कीच आहे. शिवाय श्रोत्यांना आपल्या भाषणानं मंत्रमुग्ध करणारे उत्कृष्ट वक्तेही आपल्यात विपुल संख्येनं आहेत. अशा परिस्थितीत या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर टाकून जे प्रेम आणि जो विश्वास आपण व्यक्त केलात त्या प्रेमाला आणि विश्वासाला पात्र ठरण्याचा प्रयत्न मी माझ्या अध्यक्षीय भाषणातून करतो.

अमृताते पैजा जिंकणारी मराठी भाषा कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जावा असं शासनाकडून महाविद्यालयांना पत्र आलं. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पातळीकवरून प्रयत्न केले गेले. या प्रयत्नांना आपण पाठवलेल्या पत्र वा संदेशातून पाठबळ मिळालं. २१ फेब्रुवारी हा 'आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन' म्हणून या दिवसाचे औचित्य साधून मातृभाषेचे महत्त्व वृद्धिंगत होईल असे वर्षभर कार्यक्रम आयोजित केले जावे अशा आशयाचं यु.जी.सी.चं पत्रही एवढ्यातच महाविद्यालयाला आलं. अशा

दिनविशेषांच्या निमित्ताने जेव्हा कार्यक्रम आयोजित केले जातात तेव्हा अशा कार्यक्रमांत इंग्रजी, हिंदी या भाषांचे सध्या मराठीवर आक्रमण होत असल्यानं मराठी भाषेच्या भवितव्याविषयी आपले विचारवंत भाषणातून आणि लेखनातून काळजी व्यक्त करताना दिसतात. आपल्यापैकी बहुतेक सुशिक्षितांची मुलं इंग्रजी माध्यमातून शिकत असल्यामुळं कॉन्व्हेंट संस्कृतीतून घडलेली ही नवी पिढी मराठी भाषा बोलेल की नाही या शंकेपोटी भविष्यात मराठीचं अस्तित्वच न होईल अशी बोंबाबोंबही काही मराठी भाषाप्रेमींकडून केली जाते. पण मराठी भाषेच्या अस्तित्वाविषयी व्यक्त केल्या जाणाऱ्या या भितीमुळे काही तथ्य आहे असं मला वाटत नाही. प्राचीन काळापासून बोलल्या व लिहिल्या जाणाऱ्या आपल्या मराठी भाषेनं आजवर परभाषांची कितीतरी आक्रमणं पचवून ती जिवंत राहिली आहे. आज सहा कोटींपेक्षा जास्त लोक मराठी बोलतात. विशेष म्हणजे पाच हजार मानवी भाषांपैकी जास्तीत जास्त बोलल्या जाणाऱ्या मराठीचं अस्तित्व न होऊ शकेल, ही कल्पनाच हास्यास्पद आहे. मायबोली मराठी विषयी 'अमृताते पैजा' जिंकण्याची भाषा ज्ञानेश्वर उगीचंच बोलत नाहीत. मराठीच्या सामर्थ्याची जी सार्थ जाणीव ज्ञानेश्वरांना होती तीच जाणीव उरात बाळगून आपण मराठीच्या उपासकांनी— 'साय मी खातो मराठीच्या दुधाची मी कुणाचा उंबरा झिजवू कशाला?' असं अभिमानानं म्हणायला काहीच हरकत नाही. मात्र, आपल्या मायबोलीचा अभिमान बाळगण्याच्या व्यर्थ भाषाभिनिवेशापासून दूर राहायला आपण शिकलं पाहिजे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीनं आज जग फार लहान झालं आहे. परिणामी वेगवेगळ्या भाषांपासून आणि संस्कृतीपासून दूर राहाणं माणसाला आज शक्य नाही. इंग्रजीच्या संपर्कामुळे अनेक इंग्रजी शब्द आपल्या मराठी भाषेत आले तर त्यामुळं फारसं बिघडतं असं मला वाटत नाही. आपल्यापैकी मराठीचे काही प्राध्यापक 'मोबाईल'साठी 'भ्रमणध्वनी' हा शब्द वापरतात. भाषा प्रेमातून असं करायलाही हरकत नाही. पण मग मोबाईलशी संबंधित 'चार्जिंग', 'कॉल', 'बॅलन्स', अशा कितीतरी इंग्रजी शब्दांसाठी मराठी प्रतिशब्द आपल्याला तयार करावे लागतील आणि तो सगळा 'द्राविडी प्राणायाम' ठरेल. तेव्हा सहजतेनं मराठीत रुळलेल्या इंग्रजी शब्दांना विरोध करू नये. फक्त लोकांवर छाप पाडण्याच्या भ्रामक कल्पनेतून 'मी सकाळी उठून मॉर्निंग वॉकला गेलो' असं इंग्रजाळलेलं केविलवाणं मराठी बोलू नये इतकंच. आपल्या बोलण्याचा आत्मा मराठी असला पाहिजे हे पथ्य प्रत्येकानं पाळावं. तुम्ही बघा, अनिल बर्व्यांचं 'थँक्यू मिस्टर ग्लाड' हे नाटक किंवा पुरुषोत्तम बोरकरांची 'मेड इन इंडिया' ही कादंबरी, या साहित्यकृतींची

नावं इंग्रजीत आहेत. पण या मराठीतल्या गाजलेल्या साहित्यकृती आहेत हेही तितकचं खरं आहे. 'मेड इन इंडिया' या कादंबरीतल्या संवादामध्ये तर कितीतरी इंग्रजी शब्द येतात. पण कादंबरीच्या कथानकाचा निवेदक हा अस्सल मराठमोळा आहे, याची जाणीव कादंबरी वाचकांना सातत्यानं होत राहते. साहित्यिकाला आपल्या साहित्यकृतीचं असं मराठीपण जपता आलं की त्यानं आपल्या लेखनात परभाषेतील कितीही शब्द वापरले तरी काळजीचं कारण उरत नाही. उलटपक्षी भाषेमध्ये इतर भाषांचं प्रदूषण जितकं जास्त होईल तितकी ती भाषा समृद्ध होत जाते या मताशी मी सहमत आहे. 'भाषाभिवृद्धीची समाजिक दृष्टी' या आपल्या लेखात श्री. म. माटे यांनी विविध व्यवसायातले लोक लेखनाच्या क्षेत्रात उतरले म्हणजे त्यांच्या व्यवसायातले शब्द भाषेत येऊन भाषा समृद्ध होत जाते अशा आशयाचं विधान केलं आहे. या विधानाला पुष्टी जोडून परभाषी आलेल्या संपर्कामुळे परभाषेतून आलेल्या नव्या नव्या शब्दांनीही भाषा समृद्ध होते, असं विधान मी करू इच्छितो.

## मराठीचा प्राध्यापक कसा असावा?

मराठी प्राध्यापक परिषदेचं हे अधिवेशन असल्यामुळे मराठीचा 'प्राध्यापक कसा असावा?' या विषयाच्या अपेक्षा बोलून दाखवणं गैर ठरणार नाही, असं मला वाटतं. 'मराठीचा प्राध्यापक' आणि इतर विषयांचा प्राध्यापक यांच्यामध्ये एक मोठा फरक मला असा जाणवतो की, जसे भौतिकशास्त्राच्या प्राध्यापकाला न्यूटनसारख्या शास्त्रज्ञांनी काय सांगितले तेवढंच सांगता येतं, राज्यशास्त्र, मानसशास्त्र यांसारख्या कोणत्याही शास्त्राच्या प्राध्यापकालाही त्या विषयाच्या मान्यताप्राप्त तज्ञांनी सांगितलेली तत्त्वेच विद्यार्थ्यांना सांगता येतात. 'मला काही सांगायचं आहे' असं म्हणून स्वतःची स्वतंत्र मतं मांडण्याचं फारसं स्वातंत्र्य या प्राध्यापकांना नाही. याउलट प्रत्येक साहित्यकृतीविषयी 'मला काय वाटतं?' हे सांगण्याचं पूर्ण स्वातंत्र्य मराठीच्या प्राध्यापकाला पर्यायानं भाषेच्या प्राध्यापकाला आहे. नव्हे तर तेच त्यांच्या अध्यापनाचं इप्सित आहे. भाषेतील शब्दांचे अर्थ माहीत असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला अभ्यासक्रमातील कथाकवितांचा अर्थ नक्कीच समजतो. त्यासाठी त्याला मराठीच्या प्राध्यापकाची गरज नसते. पण केवळ वाच्यार्थ समजून कोणत्याही साहित्यकृतीचं पूर्ण आकलन होत नाही. त्यासाठी मराठीच्या प्राध्यापकाचं आकलन हे अध्यापन

म्हणजे दोन ओळींच्या मध्ये न लिहलेला मजकूर वाचणं, या जातीचं असावं लागतं. कथाकवितेचा केवळ वाच्यार्थ न सांगाता त्या साहित्यकृतीतील अनुभवांशी सुसंगत असे जीवनानुभव सांगून साहित्यकृतीचा मथितार्थ विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणं, हे मराठीच्या प्राध्यापकांचं कार्य आहे. यासाठी मराठीच्या प्राध्यापकांनी ज्ञानोबा आणि तुकोबा यांचे आदर्श डोळ्यांसमोर ठेवावेत. ज्ञानेश्वर आणि तुकाराम हे श्रेष्ठ साहित्यिक तर होतेच. पण माझ्या मते ते आदर्श समाजशिक्षक होते. आपलं म्हणणं लोकांना पटवून देण्यासाठी त्यांनी दिलेले दैनंदिन जीवनातील परिचित दाखले अप्रतिम आहेत. मराठीच्या प्राध्यापकांनी अध्यापन करताना विद्यार्थ्यांना सांगितलेले जीवनानुभव ज्ञानोबा–तुकोबांप्रमाणेच समाजाच्या सूक्ष्म निरीक्षणातून आलेले वजनदार, समर्पक असले पाहिजेत. हे ज्या प्राध्यापकाला जमलं, तो मराठीचा उत्कृष्ट प्राध्यापक होय. इतर प्राध्यापकांहून मराठीच्या प्रध्यापकांचं आणखी वेगळेपण म्हणजे इतर विषयाचे प्राध्यापक विद्यार्थ्यांना त्या त्या विषयाचं केवळ ज्ञान देत असतात. पण मराठीच्या किंवा भाषेच्या प्राध्यापकांचं कार्य एवढ्यावर थांबत नाही. प्रत्येक साहित्यकृतीतून कोणती ना कोणती जीवनमूल्ये, नैतिक मूल्ये व्यक्त होत असतात. ज्ञानासोबतच ही आदर्श मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणं हेही मराठीच्या प्राध्यापकांचं कर्तव्य ठरतं. गांधीजींनी शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये वर्तनबदल अपेक्षित होता. विद्यार्थ्यांमध्ये नैतिकमूल्ये रुजून वर्तनबदल घडून येण्यासाठी मुळात शिक्षक नीतिमान असायला हवा. शिक्षणाच्या क्षेत्रातील ज्ञानाची देवाणघेवाण ही शिक्षकांप्रती विद्यार्थ्यांच्या मनात असणाऱ्या आदराच्या भांडवलावर चालते. ज्या शिक्षकाप्रती विद्यार्थ्यांच्या मनात अजिबात आदर नाही, तो शिक्षक कितीही ज्ञानी असला तरी त्यानं दिलेलं ज्ञान विद्यार्थ्यांच्या पचनी पडत नाही. जी नैतिक मूल्ये एखाद्या साहित्यकृतीच्या अध्यापनातून मराठीचा प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या मनात बिंबवू पाहात असेल ती नैतिक मूल्ये जर तो प्राध्यापक स्वत:च्या खाजगी जीवनात पाळताना विद्यार्थ्यांना दिसत नसेल तर विद्यार्थ्यांवर त्याच्या अध्यापनाचा प्रभावच पडणार नाही. म्हणून स्वत:च्या जीवनात नैतिक मूल्ये जोपासण्याची जबाबदारी इतर प्राध्यापकांच्या तुलनेत मराठीच्या प्राध्यापकांवर अधिक येते. मराठीच्या प्राध्यापकांकडून आणखी काही अपेक्षा म्हणजे त्याच्या अंगी अभिनय गुण असला पाहिजे. तो अभिनयसम्राट नसला तरी अभ्यासातील एखाद्या नाटकाचं अध्यापन करताना सर्व पात्रांच्या संवादातून त्याला वर्गात ते नाटक चालू आहे असा आभास निर्माण करता आला पाहिजे. अभ्यासक्रमामध्ये काही कविता

तालबद्ध, गेयतापूर्ण असतात. मराठीचा प्राध्यापक पट्टीचा गायक जरी नसला तरी अध्ययन प्रभावी होण्याच्या दृष्टीनं त्याला त्या कविता किमान तालासुरात सादर करता आल्या पाहिजेत. मराठीच्या प्राध्यापकाच्या ठिकाणी अपेक्षित असणारा सर्वात मोठा गुण म्हणजे तो ज्ञानोपासक असला पाहिजे. मराठी विषयातील अभ्यासक्रमाचा इतर विषयांशी आणि समाजातील घडामोडींशी वारंवार संबंध येतो. त्यामुळे मराठीच्या प्राध्यापकांचं ज्ञान चौफेर असणं आवश्यक आहे. अन्यथा आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार? या न्यायाने तो विद्यार्थ्यांना प्रभावीरीत्या ज्ञानदान करू शकणार नाही. मराठीच्या प्राध्यापकाच्या अंगी अपेक्षित असणाऱ्या गुणांची ही जंत्री आणखीही लांबवता येण्यासारखी आहे. पण आज शिक्षणक्षेत्रात दुर्दैवानं काही मोजक्या महाविद्यालयांचे अपवाद वगळता प्राध्यापक निवडीचे निकषच बदलले आहेत. प्राध्यापक निवडीची प्रक्रिया अर्थपूर्ण झाली आहे. त्यामुळे जंगलात जशी वाघांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली तशी शिक्षण क्षेत्रात आदर्श प्राध्यापकांची संख्या झपाट्यानं कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

## विद्यार्थ्यांचा घसरता बौद्धिक दर्जा आणि मराठी साहित्याविषयीची अनास्था

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमोर उभं राहिलं की निर्गुण, निराकार परब्रह्मासमोर उभं राहिल्यासारखं वाटतं हे कुण्या विचारवंताचं विधान हल्ली खरं वाटू लागलं आहे. माझी शाळेवरील अध्यापनाची सुरुवातीची दहा वर्ष वगळली तरी मागील सत्तावीस वर्षांपासून मी वरिष्ठ महाविद्यालयात मराठी आणि मराठी साहित्य या विषयाचं अध्यापन करतो. त्यात अलीकडच्या काही वर्षांमध्ये कलाशाखेतील विद्यार्थ्यांचा बौद्धिक दर्जाच घसरलासारखा वाटतो. आपल्या भाषेच्या अध्यापनात अनेक पौराणिक संदर्भ, ऐतिहासिक संदर्भ, सामाजिक संदर्भ येतात. त्याबाबत विद्यार्थ्यांशी वर्गात चर्चा करताना त्यांना कुठलंही पूर्वज्ञान नसल्याचं जाणवतं. त्याला कारण विद्यार्थ्यांमधील वाचन संस्कृती लोप पावत चालली हे जसं आहे तसं लहानपणी पौराणिक गोष्टी सांगणारे आजीआजोबा विभक्त कुटुंब पद्धतीत कमी होत चालले हेही असावं. ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना 'जावे त्यांच्या वंशा' या प्रवासवर्णनातील अभिजात विनोद कळायला थोडं अवघडं जातं. एवढं मात्र खरं की, उत्कृष्ट अध्यापन असलेल्या मराठीच्या प्राध्यापकांच्या अध्यापनाबाबत पसंतीची पावती

अशाही विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटताना दिसते. कलाशाखेतील विद्यार्थ्यांचा बौद्धिक दर्जा अलीकडच्या काळात घसरण्याचे कारण काय? या प्रश्नाचं उत्तर असं आढळून येतं की, समाजातील सर्वात हुशार विद्यार्थी चांगल्या इंजिनिअरिंग किंवा मेडिकल कॉलेजमध्ये जातात. इंजिनियरिंग कॉलेजची संख्या आता खूप वाढल्यानं थोड्या कमी हुशार विद्यार्थ्यांनाही इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळतो. काही हुशार विद्यार्थी रोजगार देणाऱ्या छोट्या मोठ्या कोर्सेसला जातात. सर्व साधारण प्रतीचे विद्यार्थी बी.एस्सी.कडे आणि वाणिज्य शाखेत कॉम्प्युटर विषय सुरू झाल्यापासून बी.कॉम. कडे जायला लागले आणि ज्यांना कुठेच प्रवेश मिळत नाही असे सगळे प्रज्ञावंत कला शाखेत प्रवेश घेतात. पण ओढवलेल्या या परिस्थितीला सामोरं जाऊन अशाही विद्यार्थ्यांमधून मराठीचे चांगले अभ्यासक निर्माण करण्याचं आव्हान स्वीकारण्याशिवाय आपल्यापुढे दुसरा पर्याय नाही. आणखी एक चिंतेची बाब म्हणजे मराठी साहित्य हा विषय घेण्याकडे हल्ली विद्यार्थ्यांचा कल कमी होत चाललेला दिसतो. बारावीत मराठी साहित्य हा विषय नसल्यामुळं बी.ए. पार्ट वन ला या विषयाविषयी विद्यार्थी पूर्णत: अनभिज्ञ असणं ही तर आपली पूर्वापार चालत आलेली अडचण आपल्यापुढे आहेच; पण तिच्या जोडीला एम.पी.एस.सी., यु. पी.एस.सी. यांसारख्या स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्याच्या दृष्टीनं मराठी साहित्यापेक्षा अर्थशास्त्र, राजशास्त्र, इतिहास यासारखे विषय निवडणं चांगलं असतं असाही एक विषारी प्रचार होताना दिसत आहे. शिवाय 'मराठी साहित्य' या विषयात चांगले गुण मिळत नाहीत अशीही हाकाटी केली जाते. तेव्हा या गंभीर समस्येबाबत यानंतरच्या सत्रात विचारमंथन केलं जावं अशी एक अपेक्षा व्यक्त करतो.

## अभ्यासक्रमांची बलस्थाने आणि शबलस्थाने

शिक्षण प्रक्रियेमध्ये अभ्यासक्रम हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपल्या विषयाचा नेमून दिलेला अभ्यासक्रम कसा आहे आणि तो कसा असावा याबाबतीत मराठी प्राध्यापक परिषदेच्या प्रत्येक अधिवेशनात चिंतन होणं अत्यंत गरजेचं आहे असं मला वाटतं. पदवीस्तरावर मराठी विषयाच्या आपल्या विद्यापीठातल्या अभ्यासक्रमाकडे नजर टाकली असता तो समाधानकारक आहे, अशी पसंतीची पावती द्यायला मला वाटतं आपलीही हरकत नसावी. मराठी विषयासाठी कला शाखेत वैखरी, वाणिज्य शाखेत

ज्ञानदीप आणि विज्ञान शाखेत शलाका या पाठ्यपुस्तकांची निर्मिती करताना तीनही संपादक मंडळांनी निश्चितच खूप मेहनत घेतल्याचे जाणवते. या पाठ्यपुस्तकांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील साहित्यात सर्व समावेशकता जाणवते. संत साहित्यापासून ते आदिवासी साहित्यापर्यंत सर्व प्रवाहांना सामावून घेतलेले दिसते. एकांगीपणा किंवा एकसुरीपणा अभ्यासक्रमात येऊ दिला नाही. पाठ्यपुस्तकांत समाविष्ट साहित्यिकांच्या बाबतीतही जात—पात—धर्म असा कुठलाही भेदाभेद न करता, कोणाविषयी आकसबुद्धी न ठेवता सर्व स्तरातील बहुसंख्य प्रतिभावंत जुन्या सर्व साहित्यिकांना त्यांच्या साहित्यातील गुणवत्तेच्या आधारावर पाठ्यपुस्तकात स्थान दिलं गेलं आहे. सावरकरांच्या भाषेत बोलायचं झालं तर जे जे उत्तम उदात्त उन्नत महन मधुर ते ते सर्व आपल्या पाठ्यपुस्तकांत सामाविष्ट करण्याचा प्रयत्न पाठ्यपुस्तक संपादक मंडळानं केला आहे यात वाद नाही. त्यामध्ये काही साहित्यकृती दोन शाखांच्या पुस्तकात आल्या. तर पूर्वीच्या अभ्यासक्रमात असलेल्या काही चांगल्या साहित्यकृती या नवीन पाठ्यपुस्तकात पुन्हा समाविष्ट करण्यात आल्या. पण त्यात काही गैर नाही. विद्यार्थ्यांना चांगले संस्कारक्षम साहित्य अभ्यासावयास मिळाले म्हणजे पुरे. वैखरी भाग २ या पुस्तकातील व. पु. काळे यांच्या 'पंगू' या कथेबाबत मात्र मला चांगलं मत देववत नाही. या कथेतला साठे आपली मैत्रीण सुमित्रा हिच्यासोबत शरीरसुख घेतो. त्यातून तिला दिवस गेले असता तिच्याशी लग्न करण्यास मात्र नकार देतो. त्यामुळे तिला बिचारीला आत्महत्या करावी लागते. असा साठे, त्यानं आपण केलेला हा प्रताप आपली होणारी पत्नी मोहिनी हिला लग्नाआधी सांगितला म्हणून लेखकानं त्याला प्रामाणिक, मानसिकदृष्ट्या सक्षम आणि आदर्श ठरवलं. कथेचा हिरो ठरवल्या गेलेल्या अशा चारित्र्यहीन साठेचा आदर्श आपण कॉलेज तरुणांसमोर ठेवणार आहोत का? हा माझा प्रश्न आहे. स्वत:च्या अध:पतनाचं समर्थन करताना हा साठे म्हणतो, मोह मला एकट्यालाच नाही झाला, तिलाही झाला. ज्या माणसाला पावसात भिजायची हौस आहे, त्यानं नंतर होणारी सर्दी भोगायलाच हवी या साठेसारखीच कॉलेज मैत्रिणीशी मजा मारायची आणि त्यातून काही विपरीत घडताच परिणामाची जबाबदारी तिच्यावर थोपवून स्वत: नामानिराळं राहायचं हे आम्ही विद्यार्थ्यांना शिकवणार आहोत का? केवळ पुरुषप्रधान मानसिकतेतून ही कथा आलेली आहे. पुरुषानं लग्नाआधी अनैतिक लफडी करावीत, होणाऱ्या बायकोला ती सांगावीत आणि तिने त्याच्या या प्रामाणिकपणाचा उदोउदो करावा ही स्वार्थी, निर्लज्ज पुरुषी अपेक्षा या कथेतून

व्यक्त होते. अपंग मोहिनी लग्नाआधी आपल्याया पसंत आहे, हे वडिलांना सांगू न शकणारा कानेटकर या कथेतल्या मोहिनीला मानसिक पंगू वाटतो आणि चारित्र्यहीन साठेबाबत मात्र ती आज माझ्या आयुष्यात खरा पुरुष आला आहे असे गौरवोद्गार काढते. यातून स्त्रियांना मानसिक पंगू पुरुष आवडत नाहीत पण चारित्र्यविषयक पंगू पुरुष आवडतो असा संदेश आपण युवा पिढीला द्यायचा का? ही कथा स्त्री—पुरुष समानतेच्या विचारावर आघात करणारी आहे. स्त्री मुक्तीच्या लढ्याला छेद देणारी आहे. मराठीचा प्राध्यापक कसा असावा हे सांगताना मघाशी मी म्हणालो होतो की, विद्यार्थ्यांमध्ये चांगली नैतिक मूल्ये रुजवणं मराठीच्या प्राध्यापकांचं काम आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या मते शिक्षणाचं प्रमुख कार्य म्हणजे चारित्र्यनिर्मिती आहे. त्यामुळे असे चारित्र्यहीनतेचे धडे देणारी कथा अभ्यासक्रमात नसती तर बरे झाले असते असे मला वाटते. मंडळी, एखाद्या पाठ्यपुस्तकाची निर्मिती करणं किती अवघड काम आहे याची मला जाणीव आहे. संपादक मंडळातल्या सदस्यांनी अगोदर साहित्य संकलनाचं त्रासदायक काम करायचं. संपादक मंडळाच्या दोन चार सभांमध्ये त्यातल्या चांगल्या साहित्याची निवड करायची. त्याची वैचारिक, ललित, कविता अशी विभागणी करायची. तीन वर्षांच्या तीन पुस्तकांसाठी असं निवडक दर्जेदार पुरेसं साहित्य गोळा करता करताच संपादक मंडळाची दमछाक होते. ज्याचं साहित्य छापायचं त्यांची परवानगी मिळवायची. त्यात पुन्हा पर्यावरण संरक्षणावर काहीतरी अभ्यासक्रमात असलं पाहिजे असे पाठ्यपुस्तक निर्मितीचे जाचक नियम पाळायचे. त्यात पुन्हा संपादक मंडळातल्या एखाद्या वजनदार मोठ्या माणसाने एखादी साहित्यकृती आणली तर त्याला नाही म्हणता येत नाही म्हणून इतरांना ती पसंत नसतानाही टाकावी लागणे अशी सगळी अवघड जागची दुखणी सांभाळत मग प्रुफ करेक्शन, छपाई या सोपस्कारांच्या अग्निदिव्यातून बाहेर पडल्यावर पाठ्यपुस्तक निर्माण होते. या धावपळीत पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलं जाणारं सर्वच साहित्य संपादक मंडळाच्या सर्व सदस्यांनी वाचणंही शक्य नसतं. त्यामुळे छोट्या मोठ्या त्रुटी पुस्तकात राहूनच जातात, ते पाठ्यपुस्तक कोणीही संपादित केलं तरी. तुलनेत तीनही शाखांतील पाठ्यपुस्तक संपादक मंडळाची ही पुस्तकं प्रशंसनीय आहेत. तेव्हा माझा उद्देश इथे काही दोष वा त्रुटी दाखवणे हा नाही तर या अधिवेशनाच्या निमित्तानं आपल्यामध्ये सध्याच्या अभ्यासक्रमावर विचारमंथन व्हावं असं वाटतं. जेणेकरून या विचारमंथनातून पुढील काळात आणखी दर्जेदार पाठ्यपुस्तकांचं नवनीत बाहेर पडेल. तेव्हा

अभ्यासक्रमाच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने विधायक सूचना यानंतरच्या सत्रात आपण जरूर मांडाव्यात असं आवाहन मी करतो. आपला मराठी साहित्याचा अभ्यासक्रम खरोखर चांगला आहे. सोप्याकडून कठीणाकडे या आदर्शनियमानुसार बी.ए. पार्ट वन ला विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड निर्माण होईल. तसेच कादंबरी, नाटक, कविता या साहित्य प्रकारांची तोंडओळख होईल या हेतूने अभ्यासासाठी नेमलेली तीनही पुस्तकं चांगली आहेत. त्यांचं अध्यापन करताना प्राध्यापकाला आनंद वाटतो. विद्यार्थ्यांचा प्रतिसादही चांगला मिळतो हा माझा अनुभव आहे. बी.ए.च्या दुसऱ्या वर्षाला विद्यार्थ्यांना समीक्षेच्या प्रांताची ओळख व्हावी या हेतूने साहित्यविचार, महानुभाव पंथाच्या साहित्याचा परिचय व्हावा यासाठी लीळाचरित्र (एकांक) आणि विद्यार्थ्यांमध्ये नैतिकमूल्ये रुजविण्याच्या हेतूने ग्रामगीतेचा अध्याय नेमण्यात आला. ही अभ्यासक्रमाची आखणी उचित वाटते. मला सर्वात जास्त आनंद होतो तो बी. ए.च्या अंतिम वर्षाला भाषाविज्ञान शिकविताना. एकदम कसं विज्ञान शाखेतला प्राध्यापक झाल्यासारखं वाटतं. सगळं कसं मुद्देसुद बोलताना अध्यापनाची उंची वाढून गेल्यासारखं वाटतं. तळागाळातल्या उपेक्षितांचं दाहक दुःख विद्यार्थ्यांना कळावं यासाठी नेमलेलं आत्मकथन 'बिराड' आणि अभिजात विनोदाची गोडी विद्यार्थ्यांना लागावी यासाठी नेमलेलं प्रवासवर्णन 'जावे त्यांच्या देशा' ही पुस्तकंही उत्तम आहेत. एम.ए. च्या दोन्ही वर्षांना नेमेलेला अभ्यासक्रमही दर्जेदार आहे यात शंका नाही.

## साहित्यानं समाजाला काय दिलं?

मराठी साहित्य हा विषय शिकवताना कधी कधी माझ्या मनात विचार येतो, या साहित्याचा समाजाला काय उपयोग आहे? साहित्यानं समाजाला काय दिलं? जसं राईट बंधूंनी विमानाचा शोध लावला. विमानाकडे बोट दाखवून आपण म्हणू शकतो की, ही राईट बंधूंची म्हणजे पर्यायानं विज्ञानाची देण आहे. पंखा, रेडिओ, टी.व्ही, फ्रीज, कार या सगळ्या वस्तू विज्ञानाची देण आहेत. तसं अवतीभवतीच्या एखाद्या वस्तूकडे बोट दाखवून आपल्याला असं म्हणता येतं का की ही साहित्यानं समाजाला दिली. या प्रश्नाचं उत्तर नकारार्थीच येतं. मग याचा अर्थ साहित्य निरुपयोगी आहे का? मुळीच नाही, तुम्ही पहा टी.व्ही. विज्ञानाची देण आहे. पण त्या टी.व्ही.वर ज्या मालिका येतात त्यांचं कथानक कुण्यातरी लेखकानं लिहलेलं असतं. हे लेखक

नसते तर ते टी.व्ही.च डबडं आपल्या काय कामाचं होतं? चित्रपटाचे पटकथा लेखक आहे म्हणून चित्रपटाचे नायक—नायिका आहेत, दिग्दर्शक आहेत, निर्माते आहेत, अहो, गीतकार आहे म्हणून गायक आहे. गीतकार आहेत म्हणून संगीतकार आहेत. साहित्य हे असं जीवनात अदृश्य रूपानं भरून राहिलं आहे. साहित्य हा समाजाचा आरसा आहे. समाज जसा असेल तसा साहित्यात प्रतिबिंबित होतो. म्हणून पूर्वीपासून आतापर्यंत समाज जसजसा बदलत गेला तसंतस साहित्यही बदलत गेलं. वाढत्या औद्योगिकीकरणानं शेती करण्याची पद्धत बदलली. ग्रामीण संस्कृती ढवळून निघाली. त्याचं प्रतिबिंब 'गोतावळा'सारख्या कादंबरीतून लगेच उमटलं. अलीकडच्या काळात जागतिकीकरणाचा जसा रेटा आला तसे त्याच्यामुळे समाजजीवनात आलेले ताणतणाव लगेच जागतिकीकरणाच्या कवितेतून उमटले. समाजाच्या दुःखाला वाचा फोडण्याचं महान कार्य साहित्यानंच केलं. 'पण लक्षात कोण घेतो?' या कांदबरीतलं यमूचं दुःख हे तिचं एकटीचं नाही तर तत्कालीन ब्राह्मण समाजातल्या सर्व विधवांचं ते दुःख आहे. 'एकच प्याला' हे नाटक केवळ सिंधू—सुधाकराचा सुखी संसार दारूच्या व्यसनापायी कसा उद्ध्वस्त होतो हे दाखविण्यासाठी नाही तर या समाजातील तमाम दारूबाजांच्या उद्ध्वस्त संसाराचे ते एक प्रातिनिधिक चित्र आहे. 'उपरा', 'उचल्या', 'बिराड' यांसारख्या आत्मकथांची रांगच्या रांग केवळ एका व्यक्तीचं दुःख रेखाटण्यासाठी अवतरत नाही तर या आत्मकथनांतून त्या त्या संपूर्ण जाती जमातीचं दुःख वाचकांसमोर उभं राहातं. साहित्याच्या या शक्तीमुळेच कविता करण्याऐवजी रद्दी विकली असती तर बरे झाले असते असा सवाल करताना नारायण सुर्वे त्याच कवितेच्या शेवटी पण बापहो तुमच्या दुःखाला कवितेत कोणी अजरामर केले असते? असा सवाल करताना दिसतात. याशिवाय आनंदप्राप्ती, उद्बोधन अशी साहित्याची कितीतरी प्रयोजनं आहेत. जीवनातून साहित्य वगळलं तर जीवन नीरस होईल. बेचव होईल. जेवणात मिठाचं जे स्थान आहे तेच जीवनात साहित्याचं आहे. प्राध्यापकांचे साहित्यलेखन ही बाब आपल्यासाठी निश्चितच अभिमानाची ठरेल. आपल्या पेशरलाही ती पुरक आहे. कारण जो साहित्याची निर्मिती करू शकतो तो साहित्याची समीक्षाही चांगली करू शकतो आणि साहित्य समीक्षा ही आपल्या अध्यापनातला एक भाग आहे. मात्र प्राध्यापकांच्या साहित्यलेखनाविषयी एक अपेक्षा निश्चित आहे. ती म्हणजे त्यांचं साहित्य सकस असावं, दर्जेदार असावं, आपल्या पेशाला साजेसं असावं. विशेष म्हणजे ते निव्वळ अनुकरणातून आलेलं नसावं. उदाहरण द्यायचं झाल्यास

कविवर्य सुरेश भटांच्या मराठी गझलांना लोकप्रियता मिळताच साहित्यप्रांतात सत्त्वहीन गझलांचं अमाप पीक आलं होतं. अलीकडच्या काळात चारोळी हा प्रकार कवितेच्या क्षेत्रात प्रसिद्धी पावताच अनेक चारोळीसंग्रह बाजारात यायला लागले. अनुकरणाच्या या लाटेत किमान मराठीचा प्राध्यापक तरी वाहून जायला नको. अनुकरणातून आलेल्या साहित्याचा सर्वात मोठा दोष म्हणजे त्यात आत्मनिष्ठा नसते आणि जबर आत्मनिष्ठा असल्याशिवाय कसदार साहित्य निर्माण होत नाही. तेव्हा साहित्यलेखनाचा आपला पीड आपण ओळखला पाहिजे. त्याला अनुरूप असा साहित्यप्रकार लेखनासाठी निवडला पाहिजे. साहित्य लेखन करताना अनुभवे आले अंगा ते या जगा देतसे हे मार्गदर्शक तत्त्व नेहमी लक्षात ठेवलं पाहिजे. आपल्या साहित्य लेखनाला स्वानुभावाचं अधिष्ठान असल्याशिवाय ते दर्जेदार होत नाही. जे आपण जगलोच नाही ते आपल्या साहित्यातून अवतरते तेव्हा ते साहित्य कृत्रिम आणि बेगडी असण्याचीच शक्यता अधिक असते. कविवर्य विठ्ठल वाघ साहित्याची तुलना शेणाच्या पोवट्याशी करतात. शेणाचा पोवटा ज्या मातीवर पडला असेल त्या मातीचा रंग—गंध त्या पोवट्याला चिकटून येतो. तसे साहित्य ज्या मातीत निर्माण झाले, त्या मातीचा रंग—रूप—गंध घेऊन ते अवतरलं पाहिजे. तेव्हाच त्यातून प्रभावी जीवनदर्शन घडू शकेल. चांगल्या साहित्यकृतींचा परभाषेत अनुवाद होण्यातून त्या भाषेचे वैभव वाढत असते. पण या बाबतीत आपली मराठी भाषा करंटी ठरते असं माझं मत आहे. तुम्ही बघा ज्ञानेश्वरांनी संस्कृतमधल्या भगवत्‌गीतेचा ज्ञानेश्वरीच्या निमित्तानं मराठीत अनुवाद केला. पण कोण्या एखाद्या पंडितानं त्या काळात किंवा त्याच्या नंतरही मराठीतल्या ग्रंथाचा संस्कृतमध्ये अनुवाद केल्याचं माझ्या ऐकीवात नाही. पुढे इंग्रजी राजवटीच्या काळात तर भाषांतर युग अवतरलं. पण या युगात फक्त इंग्रजी ग्रंथांचा मराठीत अनुवाद होत गेला. मराठीतल्या चांगल्या साहित्यकृतीचं इंग्रजीत भाषांतर अनुवाद करून प्रवाहाच्या उलट दिशेनं पोहण्याची हिंमत कोणी दाखविली नाही. पण आता आपल्या मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याचे चांगले दिवस आले. तेव्हा आतातरी मराठी भाषेतल्या चांगल्या साहित्यकृतींचा अनुवाद इतर भाषांमध्ये केला जावा. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यावर महाराष्ट्र शासनाला या भाषेच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून कोट्यवधी रुपये मिळणार आहेत म्हणे. त्या पैशांतून महाराष्ट्र शासनही मराठीतल्या चांगल्या ग्रंथांचा इतर भाषांमध्ये अनुवाद करण्यासाठी साहित्यिकांना पुरस्कार द्यावेत, अनुदान द्यावेत अशी अपेक्षा महाराष्ट्र

शासनाकडून करायला हरकत नाही आणि आपल्या साहित्यिक प्राध्यापकांपैकी ज्यांचं मराठीशिवाय इतर एखाद्या दुसऱ्या भाषेवर प्रभुत्व असेल त्यांनी मराठीतल्या उत्तम साहित्यकृतींचा त्यांना अवगत असलेल्या इतर भाषेत अनुवाद करून मराठीचा महिमा वाढवावा असं आवाहन मी करतो. साहित्याचं लेखन आणि साहित्याचं प्रकाशन ही दोन भिन्नं क्षेत्र आहेत. आज शेतात धान्यनिर्मिती करणाऱ्या शेतकऱ्याला जसे त्याच्या शेत मालाची विक्री करता येत नसल्यामुळं त्याचं व्यापाऱ्यांकडून शोषण होतं तसे साहित्य निर्मितीची कला अवगत असलेल्या साहित्यिकांना आपलं साहित्य प्रकाशित करून बाजारात खपवण्याची कला अवगत नसल्यामुळं त्यांचं प्रकाशकाकडून शोषण होतं. बरेचसे प्रकाशक साहित्यिकाकडून पुस्तक प्रकाशनासाठी पैसे घेऊन त्याच पैशातून छापलेल्या पुस्तकांच्या केवळ पाचपन्नास प्रती त्या लेखकाला देऊन बाकीच्या प्रती बाजारात विकून सर्व नफा स्वतःच लाटताना दिसतात. एखाद्या लेखकानं प्रकाशकाकडून केवळ पुस्तक छापून घेऊन वितरणाची जबाबदारी स्वतःकडे घेतली तर पुस्तक विक्रीची कला त्याला अवगत नसल्यामुळे त्याच्या पुस्तकांची नुसती थप्पी त्याच्याकडे पडून राहते किंवा पुस्तक विक्रेते त्याचं कमालीचं शोषण करतात. तेव्हा आपल्यातला साहित्यिक प्राध्यापकांचं हे शोषण थांबवण्यासाठी आपल्यातल्या व्यवहारचतुर प्राध्यापकांनी या व्यवसायात उतरून आपल्या साहित्यिक प्राध्यापक मित्रांना मदतीचा हात दिला पाहिजे असं मला वाटतं.

## समारोप

आपल्या मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनाचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी हे अधिवेशन घेण्यात साधलेलं सातत्य होय. मागील सत्तावीस वर्षांपासून अजिबात खंड पडू न देता दरवर्षी मराठी प्राध्यापक परिषदेचं अधिवेशन घेण्यात आलं. अधिवेशनातल्या या सातत्याचं श्रेय बहुतांशी स्व. डॉ. भाऊसाहेब मांडवकरांना जातं. ते हयात असताना इतर कोणते महाविद्यालय अधिवेशन घेण्यास तयार नसले तर ते स्वतःच्या महाविद्यालयात अधिवेशनाचं आयोजन करीत, पण त्यांनी अधिवेशनाचं सातत्य भंग पावू दिलं नाही आणि सुदैवानं मराठी प्राध्यापक परिषदेच्या नंतरच्या पदाधिकाऱ्यांनीही भाऊसाहेबांनी घालून दिलेल्या शिस्तीचा हा वारसा जपला त्याबद्दल ते निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. मराठी प्राध्यापक परिषदेचं हे

अठ्ठाविसावं अधिवेशन या सत्रात थोडं उशिराच म्हणजे विद्यापीठाची परीक्षा सुरू झाल्यावर होत आहे. पण ते होत आहे याचं जास्त समाधान आहे. या अधिवेशनाचं अध्यक्षपद मला मिळण्यात मित्रवर्य उत्साही प्रा. अनुप नांदगावकर यांचं मित्रप्रेम बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. पण त्यांनी हा सन्मान मला दिल्याबद्दल त्यांचे आभार मी मानणार नाही. कारण मैत्रीमध्ये अंत:करणाच्या तारा जुळल्यावर औपचारिकतेच्या सुराला अर्थ नसतो! आपल्या प्राध्यापक मंडळींपैकी बरीच मंडळी पंढरपूरला वारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या श्रद्धेनं दरवर्षी मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनाला हजेरी लावतात. अशा आपण सर्व मराठीच्या उपासकांनी माझं भाषण शांततेनं ऐकलं त्याबद्दल ती कृतज्ञता व्यक्त करतो. या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आणि मराठी प्राध्यापक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी या अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी माझ्या नावाला संमती दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो आणि स्वत:ची मातृभाषा मराठी नसतानांही मराठीचा महीमा गाणाऱ्या फादर स्टीफन्सच्या ‘जैसे दीपांमाजी दिवटी । कां तिथीमाजी पूर्णिमा गोमटी । तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी । सर्वोत्तम’ या काव्यपंक्तींनी माझ्या भाषणाला पूर्णविराम देतो. नमस्कार.

❖❖❖

# २९ वे अधिवेशन
# श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय
# अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती
# ५ फेब्रुवारी २०१६
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. विजया डबीर

मराठी प्राध्यापक परिषदेच्या २९ व्या संमेलनात उपस्थित असलेल्या प्राध्यापक मित्र मैत्रिणींनो, आपण सर्व एकाच कर्मकुलाचे बांधव आहोत. हे कुल वर्ग, वर्ण, धर्म आणि लिंगभेद यापलीकडचे आहे. आपल्या विद्यार्थ्यांची मराठी भाषेविषयीची जाण विकसित करावी, त्यांच्या साहित्यविषयक रुचीला योग्य वळण लागावे हे आपले कार्य आहे. त्यासाठी अर्थात प्रथम आपल्या मनात मराठी भाषेविषयी आस्था असायला हवी आणि मराठीच्या सामर्थ्यावर आपला विश्वास असायला हवा. आपली व्यासंगनिष्ठा अशी असावी की, 'नित्य नवा दिस जागृतीचा' असे आपल्याला वाटावे.

मित्रांनो, आजची मराठीची अवस्था बघता आपली जबाबदारी अधिकच वाढलेली आहे. आपली सर्व प्राध्यापकीय आयुधे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कशी वापरता येतील, याचा आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. चर्चा सत्रासाठी आपण त्यादृष्टीने विषय निवडले, याबद्दल मी आयोजकांचे अभिनंदन करते. याच भाषा संवर्धनाच्या विषयावर तज्ज्ञांची मते लक्षात घेत मी आपले मनोगत आपल्यासमोर व्यक्त करणार आहे.

सध्या संपूर्ण जगभर मिळून सहा हजार भाषा बोलल्या जातात. पण गेल्या दोन दशकात जगभर विविध भाषकांच्या संख्येत घट होत चालली आहे. युनेस्कोने जगातील नष्ट होणाऱ्या भाषांची यादीच तयार केली आहे. निरनिराळ्या देशांतील तज्ज्ञांनी केलेल्या पाहणीतून असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, येत्या तीन–चार दशकात जगातील दोन तृतीयांश भाषा नष्ट होतील. यात आपली मराठी असेल काय? दहा–बारा कोटी लोक जी भाषा बोलतात, हजारो शिक्षक–प्राध्यापक जिचे अध्यापन करतात ती मराठी भाषा लोप पावणे शक्य नाही असे काही लोक ठामपणे म्हणत असले तरी जाणकारांची मने मात्र मराठीच्या भवितव्याविषयी चिंताग्रस्त झालेली आहेत. सभा संमेलनातून या विषयावर भाषणे होत असतात, लेख प्रसिद्ध होत

असतात. शासनाचे उपक्रम चालू असतात. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास परिषद यासारख्या संस्था शासनाने उभारलेल्या आहेत.

सरकारच्या समित्या आपले अहवाल सादर करीत आहेत. सरकारचे भाषाविषयक धोरण सतत घोषित केले जात आहे. तरीही 'भय इथले संपत नाही' अशी एकूण परिस्थिती आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी मारलेली मुसंडी आणि तिथे मराठी विषयाला मिळत असलेल्या सापत्नभाव यामुळे हे भय अधिकच तीव्र झाले आहे. या शाळांमुळे मुलांची मातृभाषेची जुळलेली नाळ लहानपणापासून उडून जाते. पालकांना त्याची कोणतीही खंत वाटत नाही. या वृत्तीमुळे मराठीचे भविष्य डळमळीत होऊ लागले आहे. तसे म्हटले तर मराठी भाषेविषयीची चिंता अव्वल इंग्रजीपासून सुरू झालेली दिसून येते. चिपळूणकरांच्या निबंधमालेची सुरुवात 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती' या निबंधाने झाली होती. निबंधात मराठीविषयीची काळजी व्यक्त झालेली दिसून येते. पुढे इतिहासचार्य राजवाडे यांनी मराठी ही मुमूर्ष होत चाललेली भाषा आहे, असे जाहीर करून टाकले. आज मराठी माध्यमांच्या शाळा पटसंख्येअभावी बंद पडत आहेत, नव्या शाळांना शासन परवानगी देत नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळा मात्र गवतासारख्या भराभरा वाढत आहेत, मुलांचे पालक तिकडे धाव घेत आहेत, हे सारे बघता राजवाड्यांनी केलेले भाकित खरोखरच प्रत्यक्षात उतरणार असे भय अनेकांना वाटू लागले आहे. मराठी माध्यमाच्या शाळा या महाविद्यालयातील मराठी भाषा व मराठी साहित्य या विषयांवर पुरवठादार असतात. हा पुरवठा रोडावत गेला तर त्याचे मराठीवर किती विपरीत परिणाम होतील याची आपण सहज कल्पना करू शकता.

अशा वातावरणात भाषा संवर्धनाच्या संदर्भात आपण काय करू शकतो? पहिली गोष्ट आपण करायला हवी ती म्हणजे सरकारवर सारे सोपूवन आपण निष्क्रीय राहणे ही वृत्ती सोडून दिली पाहिजे. सरकारचे उपक्रम सुरू आहेतच. विश्वकोशाचे खंड तयार झालेले आहेत. पदनामकोष तयार होऊन त्यातले शासकीय पदांसाठी असलेले शब्द रुळत चाललेले आहेत. विज्ञान विषयांसाठी पारिभाषिक शब्दांचे कोश होत आहेत. तरीही असे दिसून येते की, इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे आक्रमण थोपवणे आणि मराठी माध्यमाच्या सरकारी शाळा दर्जेदार करणे सरकारला जमलेले नाही. या संदर्भात 'उद्धरेत् आत्मनात्मानम्' हे तत्त्व स्वीकारून मराठी भाषक समाजाने कामाला लागले पाहिजे. आपल्या भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे, मराठीविषयीचा न्यूनगंड

टाकून देऊन दैनंदिन व्यवहारातल्या सर्व क्षेत्रांत मराठीचा जिद्दीने वापर केला पाहिजे. दर्जेदार साप्ताहिके, मासिके काढली पाहिजेत. अलीकडे गिरीश कुबेर यांनी 'वाचनाचा उत्सव' या लेखात प्रचंड खपाच्या 'न्यूयार्कर' या साप्ताहिकाचे दहा—दहा हजार शब्दांचे लेख वाचक कसे आनंदाने वाचतात ते सांगितले आहे. या नियतकालिकाचे लाखो ग्राहक असून एका अंकाची किंमत आपल्या चलनात साडेपाचशे रुपये आहे. याचा अर्थ चांगले, दर्जेदार वाचनीय लेखन लोक वाचतात. त्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे बुद्धिवान आणि संवेदनशील तरुण शोधून त्यांना लिहिते करण्याचे काम केले पाहिजे. आपली लिहिण्या—बोलण्याची भाषा प्रदूषित होणार नाही, याबाबत आपण कटाक्ष बाळगला पाहिजे. आजचे वातावरण हवा, पाणी, प्रकाश, ध्वनी यांच्या प्रदूषणाने व्यापलेले आहे. सांस्कृतिक वातावरणात आपल्या बेफिकिरीमुळे आणि उदासीनतेमुळे भाषा प्रदूषणाची भर पडलेली आहे.

आवश्यकता नसताना असंख्य इंग्रजी व हिंदी शब्दांची भेसळ आपण आपल्या भाषेत प्रत्यही करीत असतो. याची वाटेल तितकी उदाहरणे देता येतील. श्याम मनोहर यांच्या 'हृदय' या नाटकात उच्चवर्गातल्या ओल्या पार्टीचे एक दृश्य आह. या दृश्यातली सर्व स्त्री—पुरुष पात्रे इंग्लिश भाषेतून संभाषण करीत असताना त्यांना एकाएकी झटका येतो व आपण मराठी माणसे आहोत, आपण मराठीत बोलले पाहिजे असे त्यांना वाटते. मग या दृश्यातल्या सौ. दिंडे म्हणतात "आय नो वसू, तारा तुझी सिन्स स्कूलडेज मैत्रीण आहे अॅन्ड ताराबद्दल तुला सॉफ्ट कॉर्नर आहे." उच्च वर्ग मराठीचे कसे हाल करतो ते श्याम मनोहर यांना दाखवायचे आहे, म्हणून सौ. दिंडेचा नवरा तिला म्हणतो "तू आता सेमीमराठीत बोलतेयस." ह. मो. मराठे यांच्या 'उद्योग जगाविषयीच्या' कथा, संजय भास्कर जोशी यांची 'नचिकेताचे उपाख्यान' ही कादंबरी, गणेश मतकरी यांच्या खिडक्या—अर्ध्या उघड्या' हा कथासंग्रह यात भरपूर इंग्रजी शब्द असलेली वाक्य त्यांतली पात्रे आपल्या संभाषणात वापरतात. या सर्व साहित्यकृती चांगल्याच आहेत, कारण त्या वास्तवाला थेट भिडणाऱ्या आहेत. गणेश मतकरींच्या मते त्यांच्या पिढीच्या लेखनात पात्रांच्या तोंडी येणारी संमिश्र मराठी ही फंक्शनल मराठी आहे. ही मराठीची एक बोली समजावी असेही ते म्हणतात. ही बोली वापरली नसती तर पात्रे जिवंतच वाटली नसती, हे त्यांचे म्हणणे खरेच आहे. याचा अर्थ पुन्हा हाच होतो की आपण व्यवहाराच्या कोणत्याही क्षेत्रात मराठीचा वापर करीत नाही. केला तर इंग्रजी शब्दांचा त्यात भरणा करतो. साधे, सोपे मराठीच्या प्रकृतीशी जुळणारे

पर्यायी शब्द घडवण्याचा उत्साह आपण दाखवत नाही. या संदर्भात आपण तमिळ, तेलगु, मल्याळम या दक्षिणेकडील समाजाच्या भाषा वापराकडे पाहावे. आपल्या भाषेचा अभिमान कसा असतो ते त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. त्यांचा प्रचंड चित्रपट उद्योग त्यांच्या आपआपल्या भाषांमधून भरभराटलेला आहे. आपले वर्तन नेमके या उलट आहे. आपण भाषेबाबत उदासीन आणि तटस्थ राहिलो तर अन्य भाषा घुसखोरी करणारच. या संदर्भात आपण आपल्या आधीच्या पिढ्यापासून बरेच शिकण्यासारखे आहे. लो. टिळकांनी ब्युरोक्रसीसाठी सहजपणे वापरलेला नोकरशाही हा शब्द मराठीत रूळून गेला आहे. सावरकरांनी घडवलेले चित्रपट, बोलपट, मुकपट, छायाचित्रण यासारखे शब्द चलनात आलेले आहेत. क्रिकेट या खेळातले फलंदाज, गोलंदाज, त्रिफळा, यरिक्षक, क्षेत्ररक्षक असे छान शब्द तयार झालेले आहेत. विश्वोत्पत्ती कशी झाली असावी या संदर्भातल्या प्रचंड वैज्ञानिक संशोधनात जो मूळकण वैचारिकांना गवसला त्याला विज्ञानात हिग्जबोसॉन्ट म्हणतात. लोकांनी त्याल गॉडस्‌पार्टिकल म्हटले. मराठीत त्याचा देवकण हा सुंदर अनुवाद झाला. लोकसत्तातील एका लेखात डिझाइनसाठी अभिकल्प हा शब्द घडवून अभियांत्रिकीच्या चालीवर अभिकल्पिकी असे डिझाईनच्या शास्त्राला दिलेले नाव अलीकडे वाचण्यात आले. परिचित आणि अर्थोचित संस्कृत शब्दांना उपसर्ग वा प्रत्यय लावून नवनवे शब्द घडवता येतात. ते नित्याच्या व्यवहारात वापरून भाषा संपन्न करता येते. आपले वैशिष्ट्य हे की आपण अशा शब्दवापराचा आग्रह धरत नाही. मूळ इंग्रजी शब्दच वापरतो. सुप्रभात, शुभरात्री म्हणणाऱ्यांची तर अनेकदा थट्टाही केली जाते. इथे मराठीच्या प्राध्यापकांना काम करता येईल. अगदी अपरिचित नव्या संकल्पना ज्या शब्दांतून व्यक्त होतात ते शब्द वगळून अन्यत्र मराठी शब्दांचाच वापर प्राध्यापकांनी केला पाहिजे. समीक्षा व्यवहारात अनेकदा उगाचच प्रतिष्ठा वाढवण्यासाठी इंग्रजी संज्ञा वापरण्याची काहींना सवय असते. मराठीच्या प्राध्यापकांनी मराठीचा आग्रह धरायचा नाही, तर मग कोणी धरायचा? संगणक, भ्रमणध्वनी, ध्वनिक्षेपक असे कित्येक शब्द सहज रुळण्यासारखे आहेत.

किंबहुना रुळलेले आहेत. मराठीच्या प्राध्यापकांवर आणखी एक जबाबदारी येते, लहान लहान तालुक्यांच्या गावात, निमशहरात आजूबाजूच्या खेड्यांमधल्या शाळांमधून मुले महाविद्यालयात प्रवेश घेतात. अशा मुलांच्या घरांत बोलींचे चलन असते. या बोली बोलणाऱ्या मुलांना जास्तीत जास्त प्रयत्न करून त्यांच्या बोली रूपाची कुचेष्टा न करता प्रमाणभाषा प्राध्यापकांनी

शिकवली पाहिजे. त्यासाठी आपण स्वत: कसे बोलतो याचेही परीक्षण करीत गेले पाहिजे. मुलांना बोली आणि प्रमाणभाषा यांचे नाते समजावून सांगितले पाहिजे. प्रमाणभाषेची गरज का असते ते सांगितले पाहिजे. बोली तुच्छ, अशुद्ध आणि प्रमाणभाषा श्रेष्ठ, शुद्ध असे काही नसते. प्रमाणभाषा असो वा तिच्या बोली साऱ्यांचीच आपापली व्याकरण व्यवस्था असते. आपापल्या क्षेत्रात संप्रेषणाचे कार्य बोली उत्तम प्रकारे पार पाडत असतात. बोलींमध्ये पिढ्यान्‌पिढ्यांचे अनुभव आणि ज्ञान साठवलेले असते. भारतातल्या बोलींची गणना करून डॉ. गणेश देवी यांनी मौलिक विवेचन आहे. ते आपण आणत असालच. जगातील निरनिराळ्या भाषा, बोली का जगवल्या पाहिजेत याचे मौलिक विवेचन त्यांनी केले आहे. ते म्हणतात, उत्क्रांतिप्रक्रिया सर्व बाबतीत विविधतेवर अवलंबून असते. विविधता संपली की या प्रक्रियेला शिथिलता येते. विविधता जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जैविक, सांस्कृतिक वगैरे सर्व क्षेत्रात आवश्यक असते. सपाटीकरण नाशाकडे नेणारे असते. निरनिराळ्या बोलींमधले अनुभवांचे भाषिक वैविध्य उत्क्रांत मेंदूसमोर असले तरच मानवी अस्तित्वाचे सातत्य राहील. वैविध्य—सर्व क्षेत्रीय वैविध्य असले तरच निसर्ग आपले काम योग्य रीतीने करू शकतो. गणेश देवी यांचा हा विचार महत्त्वाचा आहे. बोलींचे वैविध्यपूर्ण अस्तित्व आणि मानवाचे अस्तित्व यांचा संबंध त्यातून प्रगट झाला आहे. एका भाषेच्या अनेक बोली असल्या तरी त्या जगवल्या पाहिजे. हे खरे असले तरी आपल्याला आपल्या समान व्यापक व्यवहारांसाठी एका प्रमाणभाषेची गरज असते. प्रमाणभाषादेखील मुळात एक बोलीच असते. तिचे जतन करणे, तिचा विकास करणे, बोलींमधील शब्द, म्हणी घेऊन तिचे चैतन्य वाढवणे हे आपले कर्तव्य ठरते. प्रमाणभाषेची पिछेहाट झाली वा तिचा लोप झाला तर काय झाले? बोली तर नांदत आहेत ना? असा प्रश्न करणे चुकीचे ठरेल. कारण आजच्या काळात मर्यादित भूप्रदेशात बोलली जाणारी बोली प्रमाणभाषेचा व्यापक प्रसार नव्हता, त्याकाळात प्रमाणभाषा काही बाह्यघटकांच्या प्रभावाने लुप्त होत वा एखाद्या बोलीला प्रमाणभाषेचा दर्जा लाभणे शक्य असेल. आज प्रमाणभाषेची दुर्दशा आणि उपेक्षा आपल्याला परवडणारी नाही. प्रमाणभाषेविषयीचा आग्रह हा उच्चवर्णीयांचा कावा आहे, अशी समजूत करून घेणे चुकीचे आहे. प्रमाणभाषा ही सार्वज़निक व्यवहारासाठी आपल्या सर्वांची गरज आहे.

मराठी संवर्धनासाठी ती ज्ञानभाषा झाली पाहिजे आणि तसे स्वरूप तिला देणे सहज शक्य आहे असा विचार विजय भटकर, जयंत नारळीकर,

प्रा. चंद्रकांत पाटील इत्यादींनी मांडलेला आहे. जयंत नारळीकर, निरंजन घाटे, सुबोध जावडेकर, अच्युत गोडबोले, बाळ फोंडके इत्यादींनी विज्ञानविषयक माहितीपर तसेच कथात्म लेखन केलेले आहे. पण त्याचवेळी मराठीला ज्ञानभाषा बनवणे हे एक स्वप्नरंजन आहे असेही मानणारे विचारवंत आहेत. भौतिक जीवनाच्या हरेक रंगात आज इतक्या झपाट्याने ज्ञान वाढत आहे की ते सर्व अनुवादाद्वारे मराठीत आणणे अशक्य आहे असे त्यांना वाटते. आज ज्ञानाचा साठा करणाऱ्या जर्मनांना, फ्रेंचांना, जपानी लोकांना त्यामुळे एक प्रकारची असुरक्षितता आता जाणवू लागलेली आहे. भानू काळे यांच्या मते सर्वच भारतीय भाषांनी इंग्रजीशी जुळवून घ्यावे, इंग्रजीसह भारतीय भाषांनी इंग्रजीशी जुळवून घ्यावे, इंग्रजीसह भारतीय भाषा ही भूमिका स्वीकारावी. आपण वास्तववादी असावे. ढोंगीपणा संपवून विज्ञान तंत्रज्ञान यासाठी इंग्रजी आणि सांस्कृतिक समृद्धीसाठी मातृभाषा हे धोरण स्वीकारून संस्कृतीचा पाया रचणाऱ्या स्वभाषेला समृद्ध करावे आणि समृद्ध झालेल्या आपल्या भाषेतून स्वतःला सातत्याने अभिव्यक्त करावे. 'भाषेचे दारिद्र्य हे अखेर ती भाषा बोलणाऱ्यांचे सांस्कृतिक दारिद्र्य हे असते' असे अशोक केळकर यांनी म्हटले आहे. याबाबतीत ठाम मत देण्याची क्षमता माझ्यापाशी नाही. परंतु एवढे मात्र खचित जाणवते की मराठीला ज्ञानभाषा करण्याचे यशस्वी प्रयत्न गतकाळात झालेले आहेत. पण आपण यात सातत्य राखले नाही. संस्कृतात दडलेले ज्ञान एकेकाळी संतमंडळाने मराठीतून जनसामान्यांमध्ये प्रसूत केले. तत्कालीन संकेतानुसार ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान, पारमार्थिक ज्ञान ही धारणा होती. ज्ञानप्रसाराच्या या संतचळवळीला जनाधार लाभला होता. आज मराठीतून सर्व आधुनिक ज्ञान ही धारणा होती. ज्ञानप्रसाराच्या या संतचळवळीला जनाधार लाभला होता. आज मराठीतून सर्व आधुनिक ज्ञान आणायचे म्हटले तर आजच्या अभिजन, बहुजन वर्गांची धाव इंग्लिशकडे आहे. संधीची उपलब्धता इंग्रजीतून लाभते असा त्यांचा ठाम विश्वास आहे. त्यामुळे इंग्रज माध्यमांच्या शाळांकडे सर्वांचा ओढा आहे. आंग्ल राजवट झाल्यानंतर लवकरच उत्साहाने काही मंडळींनी विज्ञानलेखनाचे, परिभाषा घडवण्याचे प्रयत्न केले होते. इ.स. १८३३ मध्ये हरिकेशवजी पाठारे यांनी वैज्ञानिक परिभाषा घडवण्याचा उद्योग केला होता व त्यांच्या प्रयत्नांची दादोबा पांडुरंग तर्खडकरांनी प्रशंसाही केली होती. बाळशास्त्री जांभेकर हे बहुभाषाकोविद विद्वान होते. त्यांनी तयार केलेली परिभाषा दिग्दर्शन आणि ज्ञानदर्शन या नियतकालिकात छापण्यात आली होती. 'सृष्टीज्ञान'चे गो. रा. परांजपे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह परिभाषेचे शब्दकोश

तयार केले होते. भारतात विद्यापीठे निघाली, तेव्हा उद्देश तरुणांनी इंग्रजीतून पाश्चात्य विद्या शिकाव्या व नंतर स्वभाषेतून त्या लोकांपर्यंत पोचवाव्या असा होता. पण तसे घडले नाही, कारण तरुणांचे देशी भाषांचे ज्ञान अपुरे होते. आणि पुढे तर बराच काळ विद्यापीठीय अभ्याक्रमातून मराठीलाच हद्दपार करण्यात आले.

भौतिक ज्ञानसंग्रहाबाबत आपण सातत्य राखले नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पाश्चात्य जगात रेनेसांसनंतर मध्ययुगीने अंधार संपला. विज्ञान तंत्रज्ञानात संशोधन सुरू झाले. इंग्लिश भाषेने प्राचीन ग्रीक लॅटिनच्या आधाराने विज्ञानाची परिभाषा घडवली. आपल्याजवळ हक्काची संपन्न संस्कृत भाषा होती. तिच्या आधारे परिभाषा बोजड न होण्याची काळजी घेत, मराठीच्या प्रकृतीला अनुसरून परिभाषा घडवणे सहज शक्य होते. मराठी विज्ञान परिषद त्यादृष्टीने सध्या काम करीत आहे. सरकारने त्यासाठी अनेक समित्या गठीत केल्या आहेत. परंतु पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे. लोकांचा पाठिंबा अशा प्रयत्नांना लाभत नाही. त्यांची इंग्रजीकडील धाव कायम आहे. असे असले तरी मराठी भाषेमध्ये परिभाषा घडवून मराठीतून वैज्ञानिक लेखन करण्याची पूर्ण क्षमता आपल्यामध्ये आहे यात शंका नाही. मराठी विश्वकोशातील वैज्ञानिक विषयांच्या मराठीतील दीर्घ टीपा याची साक्ष देतात. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे संगणकावर, स्मार्ट फोन मराठी भाषेत माहितीचे साठे आपण जतन करू शकतो.

शेवटचा पण सर्वात महत्त्वाचा मुद्दा भाषेच्या विकासामागे, प्रतिष्ठेमागे अर्थकारण असते. भाषेच्या वापरामागे मुख्य प्रेरणा आर्थिक असते. जो समाज भौतिकदृष्ट्या प्रगतिपथावर असतो तो कृषी, उद्योग–व्यवसाय, व्यापार इत्यादी क्षेत्रांत आघाडी घेत असतो. त्या भाषेला जगात प्रतिष्ठा लाभते. त्यामुळे महाराष्ट्रात मराठीचा विकास आणि मराठी भाषकांचा विकास समांतरपणे, जोडीजोडीने झाला तरच मराठीचा दबदबा निर्माण होईल.

“मराठी असे तुमची मायबोली
तिचे पुत्र आम्ही तिचे पांग फेडू
माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा
लाभले आंम्हास भाग्य बोलते मराठी”

या सर्व प्रतिभासंपन्न कवींच्या काव्यपंक्तीमागील भावना अत्यंत सच्च्या आहेत. त्या ऐकताना, वाचताना आपली मने भारावून जातात. परंतु आपले भाषिक वर्तन या कवितांमधील आशयाशी सुसंगत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मराठीच्या प्राध्यापकांनी आपला वाटा उचलून या वस्तुस्थितीत बदल घडवण्यासाठी प्रयत्न करीत राहावेत असे वाटते. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आपल्या कार्यकक्षेत राहून आपण भाषा संवर्धनासाठी झटले पाहिजे. भाषेत होणाऱ्या भेसळीला विरोध करावा, मौलिक संशोधन करावे. आपले अध्यापन माहितीपूर्ण तसेच लक्षवेधी व्हावे यासाठी प्रयत्नशील रहावे. महासंगणकाचे निर्माते विजय भटकर म्हणतात त्याप्रमाणे, 'डिजीटल युगात इतर व्यवहारांप्रमाणे भाषिक व्यवहारांसाठी डिजीटल तंत्रज्ञान अपरिहार्य राहणार आहे." तेव्हा भाषेमागे तंत्रज्ञान उभे करण्याचे कामही आपल्याला करावे लागणार आहे. असो,

शांत स्वभावाचे, नम्रवृत्तीचे प्राचार्य महेंद्र गिरी हे माझे आवडते विद्यार्थी. त्यांचे आमंत्रण मी नाकारू शकले नाही. वस्तुत: सेवानिवृत्तीनंतर गेली पंधरा वर्षे माझे वर्गखोल्यांमधून शिकवणे संपलेले आहे. सध्याचे अभ्यासक्रम मला नीटसे माहीत नाहीत. म्हणून मनात तेवढासा उत्साह नव्हता, पण इथे आल्यानंतर नव्या-जुन्या, परिचित, अपरिचित अशा प्राध्यापकांना, मंचावरच्या विद्वान स्नेह्यांना भेटल्यामुळे एक वेगळीच उभारी मनाला जाणवत आहे. त्यासाठी मी आपणा सर्वांची आभारी आहे.

❖❖❖

# ३० वे अधिवेशन
# गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
# चांदूर बाजार, जि. अमरावती
# ४ मार्च २०१७
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. पी. एल. सोनटक्के

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३० व्या अधिवेशनाचे अध्यक्षपद मला देऊन सन्मानित केल्याबद्दल आमंत्रक व आयोजक यांचा मी अत्यंत आभारी आहे. हे अध्यक्ष पद योगायोगाने माझ्याकडे चालून आले. सदर अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र थोरात यांची प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांनी अध्यक्षपद भूषविण्यास असमर्थता व्यक्त केली आहे, असा भ्रमणध्वनी प्रा. रवींद्र डाखोरे यांनी केला नि म्हणाले की सोनटक्के सर आम्हा सर्वांची इच्छा आहे की, आपल्या महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या ३० व्या मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्षपद आपण भूषवावे. मी. गो.सी.टोम्पे महाविद्यालयात ३६ वर्षे मराठीचे अध्यापन केले असून या महाविद्यालयाचा मी निवृत्त प्राचार्य आहे. त्यामुळे महाविद्यालयाचे ट्रस्टीज, प्राध्यापक व कर्मचारी यांच्या मनात माझ्याप्रती अजूनही स्नेहभावना असली पाहिजे म्हणून महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य डॉ. विजय टोम्पे व अधिवेशनाचे समन्वयक प्रा. रवींद्र डाखोरे यांनी अध्यक्षपदासाठी माझ्या नावाची निवड केल असावी, असे वाटते. आपण सर्वांच्या प्रेमापोटी व मराठीच्या प्राध्यापकांची या निमित्ताने गाठभेट घडेल या हेतूने ऐनवेळी अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वीकारण्यात मी संमती दर्शविली. मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन म्हणजे वर्षातून नित्यनेमाने घडून येणारे स्नेहमीलन. या मीलन सोहळ्यात सहभागी होता आले याबद्दल मला अत्यंत आनंद होत आहे. प्रतिभावंत कवी व नाटककार वि. वा. शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी १९१२ हा जन्मदिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून नुकताच महाराष्ट्र शासनाच्या पातळीवरून साजरा करण्यात आला. 'ज्ञानपीठ' पुरस्कारप्राप्त कुसुमाग्रजांनी आपल्या काव्यातून मराठी मायबोलीवरचे प्रेम प्रभावीरीत्या व्यक्त केले आहे.

"माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा,

हिच्या संगाने जागल्या,
दऱ्याखोऱ्यातील शीळा,
माझ्या मराठी मातीला,
नका म्हणू हीन दीन,
स्वर्ग लोकाहून थोर,
मला हिचे महिमान....”

असा मराठीचा अभिमान संत कवी साहित्यिक या सर्वांनी व्यक्त केला आहे. मराठी भाषा संपन्न आहे. तिची शब्दसंपत्ती समृद्ध आहे. सूक्ष्मातीसूक्ष्म आशय व्यक्त करण्याची ताकद मराठीत आहे. ‘इये मऱ्हाटिचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळु करी’, या शब्दांत ज्ञानेश्वर माऊलीने मराठीचा गौरव केला. ‘ज्ञानेश्वरी’ हा मराठीचा आद्य काव्यग्रंथ नसला तरी तिच्यातील भाषेची संपन्नता व समृद्धीने मराठीला प्रमाणभाषेचा दर्जा लाभला. श्री चक्रधर स्वामींच्या मुखातून अस्सल वऱ्हाडी बोलीतून ‘लीळा चरित्र’ ग्रंथ आकाराला आला. वऱ्हाडी बोलीचे अकृत्रिम रूप ‘लीळाचरित्रात’ पहावयास मिळेल. त्यामुळे तो मराठीचा आद्य गद्यग्रंथ ठरला आहे. नामदेव, तुकाराम व एकनाथ ह्या संत कवींनी मराठी भाषा अधिक समृद्ध केली. केशवसुत, बालकवी, गोविंदग्रज, मर्ढेकर, या कवींनी मराठीला नवा आयाम दिला. निबंधकारांनी मराठीला सामाजिकतेचे देणे बहाल केले. राम जोशी, प्रभाकर, सगनभाऊ वगैरे शाहिरांनी लावणी, पोवाड्यातून श्रृंगार व वीर रसाची रेजचेल केली. कविवर्य कुसुमाग्रजांनी मराठी काव्यात आपल्या प्रतिभेने चंद्र चांदण्याच्या जोडीला ‘क्रांतिज्योती’ पेटविल्या.

मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनात मराठीतील प्राचीन संतकवी, आख्यान कवी, अर्वाचीन मराठीतील कवी व नाटककार, निबंधकार यांच्या नावाजलेल्या व लोकप्रिय साहित्यकृतींवर चर्चा व्हावी. त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून सकस व आशयधन साहित्य निर्मिती करण्याच्या दृष्टीने काय करता येईल? वर्तमान युगात मराठी भाषेची होणारी पिछेहाट, बोलींची नप्रायता, मराठी भाषावृद्धीसाठी कोणते प्रयत्न करता येईल? मराठीच्या अध्यापनातील समस्या इत्यादी गोष्टींवर चर्चा व्हावी, हे अभिप्रेत असते.

मराठी भाषा प्राचीन आहे. तिला दीड–दोन हजार वर्षांची परंपरा आहे. मराठी भाषा ८–९ व्या शतकापासून अस्तित्वात आली. जगात ही दहाव्या क्रमांकावर बोलली जाते. मराठी आपली मातृभाषा आहे. आजवरच्या सर्वच कल्पक व प्रतिभावंत साहित्यिकांनी मराठी भाषेची थोरवी व गोडवा

आपल्या साहित्यकृतींतून व्यक्त केला आहे. संतश्रेष्ठ, ज्ञानेश्वरांनी मराठीविषयी 'अमृताते पैजा जिंके' अशी महत्ता गायिली. महानुभाव पंथाचा आख्यान कवी संतोषमुनी कृष्णदास तर म्हणतो–

'तैसी छप्पन भाषाचिये मुगुटि : सोभे सुहांवि सुंदर मराठी आणि संस्कृत वाढाविले पोटि : वागावि पुढां करूनि ऐसी ते सर्व भाषांची जननि : उत्तम पवित्र मऱ्हाठी वाणी आदिपुरुषे अंगीकारीली म्हणौनी : आन्नावर हे ब्रीदे जाले'

महानुपंथाचे संस्थापक, आदिपुरूष श्री चक्रधर स्वामींनी आपल्या बोलण्यात मराठीच्या अकृत्रिम बोलीचा अंगीकार केलेला होता व तो आविष्कार म्हाइंभटाच्या 'लीळाचरित्र' या गद्यग्रंथातून प्रकर्षाने आढळतो. त्यामुळे महानुभाव पंथाच्या सर्व कवींनी साहित्यनिर्मितीसाठी मराठी वापरली.

वि. वा. शिरवाडकरांनी मराठी रंगभूमीला 'नटसम्राट'सारखे अजरामर नाटक दिले. मराठी भाषेला संत–पंत, शाहीर, अर्वाचीन कवी, नवकवी या सर्वांच्या संघटित प्रयत्नाने अभिजातता लाभली. ज्या भाषेत समृद्ध साहित्यसंपदा निर्माण होते, ती भाषा अभिजात. याशिवाय दुसरातिसरा अभिजात भाषेचा निकष असूच शकणार नाही असे मला वाटते.

परंतु आज मराठी भाषा हीन–दीन अवस्थेला पोचली आहे. याचे महत्त्वाचे कारण आंग्लभाषेचा प्रभाव जागतिकीकरणाच्या काळात तंत्रयुग उदयाला आले नि इंग्रजी भाषा ही जगाची मध्यवर्ती भाषा झाली. इंग्रजी भाषेला विरोध करण्याचे कारण नाही. परंतु आज मराठी भाषिकाला धड इंग्रजी बोलता येत नाही अन् धड मराठीही बोलता येत नाही. मराठी माणूस आज हिंदी व इंग्रजीमिश्रित मराठी बोलतो. अशा भाषेच्या मिश्रणाला भाषाशास्त्रज्ञांनी 'धेडगुजरी' भाषा संबोधले आहे. परंतु हा जातिवाचक शब्द असल्यामुळे तो खटकणारा व अयोग्य वाटतो. या कारणाने भविष्यात मराठी भाषेचे काय होईल, याची चिंता वाटते. भारतापुरता विचार केला तर आज आपल्या जवळपास २०० बोलीभाषा नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे डॉ. गणेश देवीसारख्या अभ्यासकाचे मत आहे. बोली या भाषेच्या जीवनवाहिन्या मानल्या तर त्या बोलीचा स्रोत आटला की भाषा न व्हायला वेळ लागणार नाही. बोलीतून भूमिनिष्ठ लोकसंस्कृती, परंपरा, कुलाचार आणि चालीरीतींची वैशिष्ट्ये समर्थपणे व्यक्त होत असतात. बोलींतून कृषी संस्कृतीशी संबंधित गाणी, लोकगीते, उत्सव व परंपरांचे आविष्कार होत असतात. जयवंत दळवी, राजन गवस, चिं. त्र्यं. खानोलकर, आनंद यादव, पुरुषोत्तम बोरकर, सदानंद

देशमुख, आसाराम लोमटे या सर्वांनी आपल्या प्रदेशातील परंपरा, सणवार, उत्सवादी प्रसंगातून तिथल्या माणसांची मानसिकता व्यक्त होत असते. परंतु, काळ बदलत आहे. आज बोलींवर प्रमाणभाषेसह इंग्रजीचे आणि प्रसार माध्यमांच्या भाषेचे अतिक्रमण व्हायला लागले आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात बोली टिकाव्यात असं वाटत असेल तर साहित्य, संस्कृतींच्या संमेलनासारख्या उत्सवांतून बोलींवर मोठ्या प्रमाणात चर्चा घडून येणे गरजेचे आहे. सांस्कृतिक वैशिष्ट्ये जपणाऱ्या मालवणी लोकगीतातील शब्द वापरून प्रवीण दशरथ बांदेकर सांगतात की, 'आराड गें बेडके सांजावंदे, आयोची बोली जित्ती ऱ्हवांदे'

मराठी भाषा आणि साहित्याच्या अभिवृद्धीसाठी सर्जनशील लेखक, वाचक, प्रकाशक आणि मराठी भाषिक या सर्वांनी एकत्र येवून नवा विचार करावा लागेल. साहित्यातील नवीन नवीन प्रवाहांचे आणि प्रयोगांचे स्वागत करावे, पुस्तक प्रकाशनाची बाजारपेठ फुलवावी; हे साहित्य संमेलनाचे प्रयोजन असते. सर्व प्रकारचे प्रादेशिक भेदाभेद बाजूला सारून अ. भा. साहित्य संमेलनासारख्या पर्वणीच्या उत्सवात बोलींवर परिसंवाद झडायला पाहिजे होते; पण तसे घडले नाही. बोली वैविध्यांची कुठलीच दखल साहित्य संमेलनात घेतली जात नाही, ही एक खेदाची बाब म्हणावी लागेल.

सांप्रतकाळी आपलीच मायबोली आपल्याला पारखी होत चालली आहे. प्रत्यक्षात ही ज्ञानभाषा होण्यासाठी कुसुमाग्रजांनी अथक परिश्रम घेतले. परंतु, जागतिकीकरण व तंत्रज्ञानाच्या या युगात इंग्रजी भाषेला अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे. कोवळ्या–कोवळ्या आपल्या पाल्यांना इंग्रजी शाळेत कॉन्व्हेंटमध्ये शिकण्यासाठी पाठविण्याची जणू चढाओढ पालकांमध्ये लागलेली आहे. त्यामुळे दिल्लीपासून गल्लीपर्यंत कॉन्व्हेंटचे हायब्रीड वाण भरमाप पसरले आहे. मराठी शाळेत आपला पाल्य शिकला तर तो हुशार नाही, स्पर्धेच्या युगात तग धरू शकणार नाही या लालसेपाटी पालक आपल्या २–३ वर्षाच्या बालकांना मराठी शाळेत टाकायची हिम्मत करत नाही. आपला पाल्य इंग्रजी शाळेत शिकला की तो हुशार होणारच, ही धारणा अत्यंत चुकीची आहे. यामुळे बालपणापासून मुलांच्या मनात मातृभाषेविषयी हीनभावना तयार होऊ लागली आहे. किंबहुना दैनंदिन जीवनातही बहुतेकांना मराठी बोलण्याची लाज वाटायला लागली आहे. आज मराठी भाषिक आपल्या बोलण्यात हिंदी, इंग्रजी, मराठी शब्दांचा सरमिसळ करीत शब्दांची उधळण करतो. टुम म्हणून, सुशिक्षिताचे निदर्शक म्हणून किंवा हलगर्जीपणामुळे इंग्रजी शब्दांचा आणि

वाक्प्रचाराचा वापर सर्व स्तरात सुरू आहे. इंग्रजी भाषेतील शब्दांची फार मोठ्या प्रमाणात उसनवारी आमच्या बोलण्यात झालेली आढळते. अपील, इंजेक्शन, इंजिनियर, कॉलेज, गॅस, किचन, टेबल, टेलिफोन, डॉक्टर, बस, डेपो, फ्रीज, बॅटरी, मोटार सायकल, स्टेशन, पार्लर, मेकअप इत्यादी शब्द आमच्या रोजच्या बोलण्यात सर्रास येतात. दुकानाच्या पाट्या क्वचितच मराठीत आढळतात. सर्वत्र इंग्रजी दुकानाच्या पाट्या झळकतात. एका खेड्यात तर हजामतीच्या दुकानावर 'अप्सरा जेन्ट्स पार्लर' अशी पाटी वाचायला मिळाली. जणू तिथे पुरुष घुसला की अप्सरासारखा सुंदर पुतळा होऊन बाहेर पडतो. मराठी चित्रपटांची पोस्टर गर्ल, टाईमपास, फॅमिली कट्टा अशी नावे आढळतात. मराठी नाटकांची नावे 'गेट वेल सून', 'ऑल लाईन क्लियर' अशी इंग्रजीत दिसतात. कळत नकळत मायबोली काळाच्या पडद्याआड ढकलली जात आहे आणि त्यामुळे आज 'मराठी बोलु कौतुके' चे दिवस संपले आहेत. 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी' असे सुरेश भट गजलेतून म्हणतात. त्याचा आम्हाला विसर पडलेला आहे. आता मराठी बोलायची व ऐकायची सवय लुप्त होत चालली आहे असे जाणवते.

हे मराठी प्राध्यापकांचे अधिवेशन असल्यामुळे मराठीच्या प्राध्यापकांना मराठीचे अध्यापन करताना येणाऱ्या अडचणींवर बोलणे अप्रस्तुत ठरू नये. आज विद्यार्थ्यांना साध्या साध्या मराठी शब्दांचा अर्थ कळत नाही. धड मराठी बोलता येत नाही की धड लिहिता येत नाही अशी त्यांची अवस्था आहे. म्हणून मराठीच्या प्राध्यापकांनी कोणत्याही शाखेच्या प्रथम वर्षाला क्रमिक पुस्तके शिकविण्यास सुरुवात करण्यापूर्वी अखिल भारतीय साहित्य महामंडळाने आखून दिलेल्या शुद्धलेखनाच्या नियमांवर चिकित्सक चर्चा–प्रबोधन करावे असा पायंडा घालावा म्हणजे विद्यार्थ्यांना मराठी शुद्ध लिहिण्याचे पाठ मिळेल व काही अंशी त्यांच्या लिहिण्यात चांगला फरक पडेल. विद्यापीठ पातळीवरील मराठी वाङ्मयाच्या अभ्यास मंडळाने निवडलेल्या अभ्यासक्रमामध्ये विविधता आहे. वाङ्मयाचे जास्तीत जास्त प्रकार अभ्यासण्यात यावेत हे त्यामागे उद्दिष्ट असते. परंतु अलीकडे वाङ्मय शाखेतील विद्यार्थ्यांचा बौद्धिक दर्जा फारच घसरला असल्याची जाणीव प्रकर्षाने होते. काव्य, साहित्यविचार, भाषाविज्ञान यांसारखे ग्रंथ शिकविताना प्राध्यापकांना असे वाटते की, आपल्यासमोर विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या रूपात निर्गुण निराकार परब्रह्म देवी–देवतांची रूपे अवतरली की काय? आपल्या पुढ्यात निर्विकार चेहऱ्यांचे पुतळे बसलेले दिसतात. काही विद्यार्थी शिकायला

येतात की नुसता ‘टाईमपास’ त्यांना करायचा असतो? केवळ पाच–दहा टक्के विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानलालसा, वाचनाची आवड, श्रवणक्षमता उत्तम असलेली पहायला मिळते. आजची मातृभाषेविषयीची अनास्था दूर करायची असेल तर माझे मत असे आहे की, कोणतीही ज्ञानशाखा असो पदवीपर्यंत मातृभाषेचे शिक्षण व मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण देण्याची योजना आखली पाहिजे. इंजिनियरिंग असो मेडिकल सर्वच शाखांत मातृभाषा अभ्यासली जावी. प्राध्यापकांच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास इतर विषयांच्या प्राध्यापकांहून मराठीचा प्राध्यापक हटके, वेगळा असला पाहिजे. त्याची अध्यापनाची हातोटी रंजक असली पाहिजे. तो थोडा वेल्हाळ असावा म्हणजे रंजकतेबरोबर नैतिकमूल्ये, चारित्र्यमूल्य, सामाजिकता, प्रबोधन विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे सुलभ होईल. प्राध्यापकांबद्दल अधिक बोलणे वा उपदेशाचे बोधामृत पाजणे म्हणजे संधी सापडली म्हणून अध्यक्षपदावरून काहीतरी हाणा हे ‘शायनिंग’ मारल्यासारखे होईल. ‘व्यक्ती तितक्या प्रवृत्ती’ या न्यायाने सर्व प्राध्यापक आपल्या कार्यात तज्ज्ञ असतात आणि प्रत्येकाने अध्यापनाची विशिष्ट शैली कमावलेली असते याहून अधिक बोलणे न लगे!

गत पाच–सहा वर्षांपासून मराठीच्या अध्यापनाशी असलेला माझा संबंध तुटल्यामुळे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठीच्या अभ्यासक्रमाविषयी चर्चा व त्यातील त्रुटींवर बारकाव्यासह प्रकाश टाकणे वेळेअभावी म्हणजे दोन–तीन दिवसांपूर्वीच अध्यक्षपदाची जबाबदारी येऊन पडल्यामुळे मला शक्य झाले नाही, याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. कारण या विषयावर थातुरमातूर बोलणे न्यायसंगत ठरणार नाही.

## मराठी भाषेपुढील आव्हाने :–

मराठीच्या वऱ्हाडी, नागपुरी, हळबी, अहिराणी, डांगी आणि कोकणी या प्रमुख बोली असून त्यांचे क्षेत्र बरेच विस्तीर्ण आहे. यापैकी वऱ्हाडी बोली प्राचीन व आद्य म्हणावी लागते. डॉ. गणेश देवी यांच्या नेतृत्त्वाखालील काही मंडळींनी केलेल्या अभ्यासानुसार बोलींची यादी साठच्या घरापर्यंत जाऊ शकते. जागतिकीकरणाचा रेटा, तंत्रयुगाच्या आगमनाने प्रमाणभाषेत घडून आलेली इंग्रजीची सरमिसळ, आर्थिक व सामाजिक चलनवलन या अनेक गोष्टींमुळे भाषेचे सपाटीकरण होण्याचा धोका निर्माण झाला आहे. बोली कशाबशा जगत आहेत. त्यांचा जीव गुदमरायला लागला आहे. वर्धा येथे झालेल्या ‘सत्यशोधकी’ साहित्य संमेलनात डॉ. आ. ह. साळुंखे यांनी

बोलींच्या अस्तित्वाविषयी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या मते प्रमाण मराठीने बोलींतील शब्द स्वीकारून प्रमाणभाषा अधिक समृद्ध व सशक्त करावी. त्यासाठी पावले टाकली पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे प्रमाणभाषा व बोली यात वैर आहे हा गैरसमज सोडून दिला पाहिजे. यादवकाळपूर्वी बोली रूपाने असणाऱ्या मराठीला यादवांची राजवट आणि ज्ञानेश्वरादिकांचे वाग्वैभव यामुळे प्रमाणभाषेचा दर्जा मिळाला. प्रमाणभाषा अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या व्याकरणिक नियमांच्या चौकटीत बद्ध असली तरी तिने अधिक सकस व समृद्ध होण्यासाठी बोलींतील जिवंत शब्द व रूपे आत्मसात केली पाहिजेत. प्रा. श्री. म. माटे यांनी मराठी भाषेत शब्दांचा भरणा व्हावयास हवा असेल तर निरनिराळ्या पेशांतील, धंद्यातील रूपके भाषेत प्रविष्ट व्हावयास हवीत, व ती प्रविष्ट करून देण्यास त्या त्या पेशांतील, धंद्यातील माणसे वाङ्मय लेखनाच्या प्रांगणात उतरावयास हवीत असे आग्रहाने प्रतिपादन केले होते. यासाठी एकट्याने प्रयत्न करून चालणार नाही तर त्या–त्या बोलींच्या सहवासातील सर्जनशील लेखक, अभ्यासक यांनी बोलींतून शब्दभांडार निवडून प्रमाणभाषेत समाविष्ट केले पाहिजे. आपल्या साहित्यकृतींत बोलींतील जिवंत शब्दरूपे गोवली की ही प्रमाणभाषेशी आपसूक समाविष्ट होतील. वाङ्मयीन महत्तेच्या दृष्टीने 'प्रमाणभाषा श्रेष्ठ बोली निम्न' ही शिष्टानुवृत्ती सोडून दिली पाहिजे.

मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन दरवर्षी भरविण्याची मुहूर्तमेढ डॉ. भाऊ मांडवकरांनी रोवली. ते दरवर्षी कुठे ना कुठे अधिवेशन घेत. यासाठी त्यांनी अपार कष्ट वेचले. प्रसंगी पदरचा पैसा खर्च केला. सदस्य जमविले. निधी गोळा केला. अधिवेशन घेण्यासाठी कोणतेही महाविद्यालय तयार झाले नाही, तर स्वतःच्या महाविद्यालयात अधिवेशन घेत. या कार्यात यांनी कधी खंड पडू दिला नाही. त्यांच्यानंतर डॉ. पवन मांडवकरादी मित्रमंडळींनी हा वारसा पुढे अखंडपणे सुरू ठेवला. आज मराठी प्राध्यापक परिषदेचे ३०वे अधिवेशन. या अधिवेशनाचे अध्यक्षपद अनाहूतपणे मला लाभले, याला आयोजक व आमंत्रकांना माझ्याविषयी वाटणारा स्नेह कारणीभूत असावा. इथे संपन्न झालेल्या मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनानं ज्या मराठीच्या प्राध्यापकांनी हजेरी लावली, नव्हे माझे बीजभाषण नाईलाजाने प्राध्यापकांना विद्यार्थ्यांप्रमाणे बंडाळी व बोंबाबोंब करता येत नाही म्हणून शांततेने ऐकले, त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच या अधिवेशनाचे आमंत्रक व आयोजक यांचे आभार मानून माझ्या भाषणाला विराम देतो.

❖❖❖

# ३१ वे अधिवेशन
# जिजामाता कला महाविद्यालय
# दारव्हा, जि. यवतमाळ
# १ फेब्रुवारी २०१८
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. केशव फाले

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ–मराठी प्राध्यापक परिषद आणि जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या एकतिसाव्या अधिवेशनाचे उद्‌घाटक, नवसंजीवन शिक्षण मंडळाचे मार्गदर्शक मा. श्री. राहूलभाऊ ठाकरे, नवसंजीवन शिक्षण मंडळाचे व्यवस्थापक मा. श्री. अशोकभाऊ ठाकरे, बोरीच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाचे व्यवस्थापक मा. श्री. जगन्नाथराव बोरकर, परिषदेच्या अधिवेशनाचे माजी अध्यक्ष डॉ. पी. एल. सोनटक्के, स्वागताध्यक्ष या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्रू जाधव, बीजभाषक तथा गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. मनोज तायडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत नाकाडे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. पवन मांडवकर व सर्व सदस्यगण, अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य तसेच उपस्थित सर्व प्राध्यापक बंधू–भगिनी आणि इतर मान्यवर व रसिकजन...

मराठी प्राध्यापक परिषदेच्या एकतिसाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाच्या निमित्ताने आपण माझा सन्मान केला त्याबद्दल प्राध्यापक परिषद, आयोजक संस्था व महाविद्यालय, तसेच आपल्या सर्वांचा मी आभारी आहे. त्यासाठी मी सर्वांना मनापासून धन्यवाद देतो.

प्राध्यापक परिषदेचा अध्यक्ष केला की त्याचं अवतारकार्य संपून जातं असा एक समज आहे. पण मला तसं वाटत नाही. कारण काहींना सेवानिवृत्ती नंतर, काहींनी सेवानिवृत्ती पूर्वी ५–७ वर्षे आधी हे पद भूषविलेले आहे. आणि आपल्यातले काही लोक सेवानिवृत्तीनंतरही अनेक वर्षे मराठी भाषा व साहित्याला आपली सेवा देत आहेत. हे लक्षात घेता सेवानिवृत्तीला चार वर्षांचा अवधी असताना, केवळ प्रा. अतुलकुमार सारडे यांच्या स्नेहपूर्ण आग्रहामुळे मला हे बाशिंग बांधावं लागलं.

त्यामुळे, या निमित्ताने आपणांशी संवाद साधण्याचा प्रयत्न मी करणार आहे. हे करताना आपणास मार्गदर्शन करण्याएवढा मी विद्वान किंवा मोठा आहे, असा भाव अजिबात नाही. केवळ एक अध्यापक म्हणून ३० वर्षांचा अनुभव व काहीशा जेष्ठतेच्या आधाराने मी मराठी भाषा व साहित्याच्या अध्यापनाबाबत आपल्याशी हितगुज करणार आहे. मराठीच्या प्राध्यापक कसा असावा?

त्याच्या अंगी कोणते गुण व कौशल्ये असावीत? यावर मी काही बोलणार नाही. कारण यावर यापूर्वी बरच बोलून झालं आहे. मी फक्त एवढंच म्हणेन की, एकदा आपण प्राध्यापक पद स्वीकारलं ना! तर मग त्या पदाला साजेसं असं काहीतरी आपण करावं. मराठीच्या अभ्यासक्रमावर तर मी अजिबात बोलणार नाही. कारण आयोजकाने घालून दिलेल्या विषयाच्या मर्यादेचे मला तंतोतंत पालन करायचे आहे.

।।१।।

मित्रांनो, मराठी ही एक प्रादेशिक भाषा असली तरी भारतातील एकूण २३ भाषांमध्ये तिचा चौथा क्रमांक लागतो. हिंदी, बंगाली. तामिळ नंतर मराठीचा नंबर आहे. महाराष्ट्राबाहेरही ती अनेक राज्यांमध्ये बोलली जाते. जगामध्ये अंदाजे ९ कोटी लोक मराठी बोलतात. बोलणाऱ्यांच्या संख्येचा विचार केला तर मराठी ही जगात एकोणीसाव्या क्रमांकाची असूनही अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी अद्याप संघर्ष करावा लागत आहे. ही बाब आपल्यासाठी गौरवास्पद नाही. परवाच पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने दिल्लीमध्ये यासाठी धरणे आंदोलन केले. मराठीचे पाईक म्हणून आपणही यामध्ये सहभागी झालो पाहिजे. तसा ठराव याठिकाणी आपल्याला करता येईल. मायबोलीवर प्रेम करणाऱ्या समस्त मराठी बांधवांनी आपल्या अस्मितेसाठी पुन्हा एकदा एल्गार करण्याची गरज आहे. म्हणून साहित्यिकांनी, प्राध्यापकांनी, अभ्यासकांनी, विचारवंतांनी यातील अडथळे दूर करण्यासाठी एकदिलाने झटावे असे मी यानिमित्ताने आवाहन करतो.

।।२।।

जागतिकीकरणाने जग जवळ आले आहे. तंत्रज्ञानात वेगाने बदल होत आहेत. अशावेळी मराठीसारख्या प्रादेशिक भाषेसमोर मोठे आव्हान उभे झाले आहे. एक अभ्यास विषय म्हणून मराठी भाषा किंवा वाङ्मय याबाबत विद्यार्थ्यांमध्ये उदासीनता दिसून येते, असे असले तरी मराठीचे काय होईल? ती जगेल की नाही? याची चिंता करण्याचे अलीकडे तरी फारसे कारण वाटत

नाही. अगदी उद्यापासून मराठीने विविध भाषांचे वार झेलले आहेत. या वारांनी उलट नवी रूपे धारण करीत ती विकसित होत गेली आहे. तिच्या विविध बोलींनी तिला सतत बळ पुरविले आहे. म्हणून जोपर्यंत बोलीरूप मराठी बोलणारा सर्वसामान्य मराठी माणूस जिवंत आहे. तोपर्यंत मराठीला मरण नाही.

परंतु, तरीही आपण बेसावध व अगदी बेफिकीर राहून चालणार नाही. आज चिंतेची बाब म्हणजे विविध माध्यमांच्या आक्रमणामुळे वाचन संस्कृती नष्ट होत आहे. ही बाब समाजस्वास्थ्याला मारक आहे. दोन—तीन तासांत वाचून होणारी अनेक दर्जेदार पुस्तके उपलब्ध असताना ती वाचण्यासाठी तरुण पिढीला वेळ नाही. परंतु हेच लोक मोबाईलवर तासन्‌तास घालवतात आणि उपलब्ध असेल ते वाचतात. किमान या नव्या माध्यमाच्या आधारे तरी म्हणजे फेसबूक, ब्लॉग, ट्वीटर, कट्टा, वेबसाईट यांतून चांगले दर्जेदार साहित्य किंवा त्यावरील समीक्षा किंवा आपले विचार नव्या पिढीपर्यंत पोचविण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. ज्यांना शक्य आहे त्यांनी या माध्यमांच्याद्वारे मराठी भाषा व साहित्य यावरील आपले विचार, चिंतन पुढच्या पिढीपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करायला हवा. आपल्यातील काही लोक हे कार्य उत्तम प्रकारे करीत आहेत, ही समाधानाची बाब आहे.

।।३।।

आज तरुण पिढीवर सोशल मीडियाचा मोठा प्रभाव असला आणि हे माध्यम कितीही प्रभावी असले तरी, ते एक दुधारी शस्त्र आहे. या माध्यमाद्वारे समाजहिताचे, देशहिताचे निकोप असे विचार त्यांच्यापर्यंत पोचत आहेत, असे म्हणता येत नाही. सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध विचारधारांचे भाडोत्री प्रचारक समाजमनामध्ये विष कालवण्याचे प्रयत्न करीत असताना दिसतात. अशा वातावरणात किमान आपल्या संपर्कात असलेल्या तरुण पिढीला आपण अध्यापनाच्या निमित्ताने मार्गदर्शन केले पाहिजे. आपण सगळे शब्दांचे धनी आहोत.

आम्हा घरी धन, शब्दांचीच रत्ने, शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ।
शब्दचि आमुच्या जिवाचे जीवन, शब्दे वाटू धन जनलोका ।।

तुकारामांच्या या उक्तीप्रमाणे शब्द जसे धन आहे, तसेच ते शस्त्रही आहे. शब्दाने कार्यभाग घडतात तसे बिघडतातही. म्हणून या शस्त्राचा वापर करताना काय दक्षता घ्यावी? याबाबत आपण नव्यापिढीला सावध केले पाहिजे. माणसाने जिभेवर नियंत्रण ठेवावे, असे आपण ऐकत आलो. आता

जिभेप्रमाणे बोटांवरही नियंत्रण ठेवण्याबाबत तरुण पिढीला अवगत करण्याची वेळ आली आहे. एक चुकीचा शब्द किंवा एखादी चुकीची पोस्ट प्रसारित केली तर विध्वंसाचा वणवा पेटू शकतो. हे केवळ बोटांवर नियंत्रण न ठेवल्याने घडते. कधी उत्साहाच्या भरात, कधी झोपेच्या तंद्रीत आपण बोटे चालवतो, आणि अनर्थ घडतात. समाजातील एक जबाबदार घटक या नात्याने याची जाण विद्यार्थ्यांना करून देऊन समाजस्वास्थ टिकविण्यासाठी आपण योगदान द्यावे.

भाषेचा अध्यापक हा एकमेव घटक असा आहे की, ज्याला प्रचलित सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीवर भाष्य करण्याची संधी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मिळत असते. त्याचा योग्य प्रकारे लाभ उचलला तर तरुणांना आदर्श करू शकतो. ही संधी आपल्याशिवाय इतर विषयाच्या अध्यापकांना मिळत नाही. त्यामुळे आपण स्वतःला भाग्यशाली समजून समाजप्रबोधनाच्या या संधीचा लाभ घेतला पाहिजे.

परंतु प्रबोधनाचे हे कार्य करीत असताना आपले अध्यापन हे संतुलित विचारांना अग्रक्रम देणारे, कुठलाही अभिनिवेश न बाळगता समतोल राखणारे, जातिधर्मनिरपेक्ष जाणिवेने ओथंबलेले, मानवतेच्या भावेनेने ओतप्रेत भरलेले असावे. अभ्यासक्रमात नेमलेल्या साहित्यकृतींमधून अभिव्यक्त झालेल्या भावना व विचारांना नेमकेपणाने विद्यार्थ्यांपर्यंत पोचविणारे असावे. म्हणजे आपल्या व्यक्तिगत भावना व वैचारिक बांधिलकीला आवर घालत पालक–शिक्षकाच्या भूमिकेतून अध्यापन करावे. याची जाण व तसे भान सतत ठेवून अध्यापन करावे, असे जेष्ठतेचा लाभ घेत मी सर्वांना आवाहन करतो.

।।४।।

जागतिकीकरणाच्या युगात मराठीचे काय महत्त्व आहे? असा प्रश्न उपस्थित केला जातो. स्पर्धा परीक्षांमध्ये भाषेचा अभ्यासक्रम सक्तीचा असतो. त्यामध्ये व्याकरण व उपयोजित मराठीचा भाग अधिक आहे. विद्यार्थी येथे अडतो. त्याला किती लोक मदत करतात? व्याकरणाला आपल्यापैकी किती लोक सहजतेने घेतात? आणि किती नाके मुरडतात? ज्या ठिकाणी आपला विद्यार्थी अडतो, जेथे त्याला आपली अधिक गरज असते, अशावेळी, तो प्रांत आपला नाही. ही भूमिका असता कामा नये. दुसरे म्हणजे, शिक्षणाशिवायही मराठीत पास होता येते, असा समज झाला आहे. पण व्याकरणाच्या परीक्षेत शिक्षकाशिवाय पास होणे कठीण आहे, हे ही विद्यार्थ्यांना माहीत आहे. लेखनविषयक नियमांना धरून लेखन अथवा शुद्धलेखन यासाठीही लोक

आपल्याकडे आशेने पाहतात. अडलेला आपल्याकडेच येतो. मग तो विद्यार्थी असो की इतर कोणी सहकारी. म्हणजे आपल्याला संधी आहे, आपण कामाचे आहोत, पण कोणाच्या कामात पडलो तर ना! ही कानउघाडणी नसून आपल्याकडील जमेच्या बाजूची जाणीव करून देणं आहे.

।।५।।

प्राध्यापक या नात्याने सर्वांवर एक सामाजिक जबाबदारी येऊन पडते. भाषेच्या शिक्षकाकडे ती अधिक असते. कारण व विचार भावनांशी थेट संबंध असलेल्या भाषा व साहित्याचे आपण अध्यापन करतो. महत्त्वाचे म्हणजे, इतर विषयांचा ज्ञानाशी संबंध असतो, पण भाषेचा ज्ञानासोबतच मनाशी संबंध असतो. म्हणूनच मन मोकळं करण्यासाठी अनेक विद्यार्थी भाषेच्या अध्यापकाचा आधार घेत असतात. त्यांच्यासाठी तो हक्काचा माणूस असतो. हे आपलं वेगळेपण आहे. एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडविण्यामध्ये भाषेच्या अध्यापकाचा अधिक वाटा असतो. कारण एकूणच माणसाचे व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्यामध्ये भाषेचे फार मोठे योगदान असते. शाश्वत जीवनमूल्ये किंवा नैतिक मूल्ये ही मातृभाषेच्या माध्यमातूनच रुजविली जाऊ शकतात. साहित्य, समाज आणि संस्कृती यांचे दृढ असे नाते आहे. संस्कृती रक्षणाबरोबरच मानवता धर्माचे संगोपन करण्यामध्ये मराठीचे योगदान अधिक आहे. एका अर्थाने संतांनी सुरू केलेला लोकशिक्षणाचा वारसा मर्यादित स्वरुपात का होईना, आपल्याला चालवायचा आहे. त्यांनी तळागाळातील समाज घटकांना शहाणे करून सोडण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. शिक्षणाची गंगा तळागाळात पोचली असल्याने अशी समाजघटकांतील आपल्या सान्निध्यात असलेल्या तरुणाईला आपण आधार द्यावा.

।।६।।

अमरावती विद्यापीठ सुरू झाले तेव्हा एम.ए. मराठीसाठी केवळ दोन—तीन महाविद्यालये होती. आज अनेक महाविद्यालयामधून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. जवळ जवळ प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मराठीच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय झाली आहे. विद्यापीठातील पदव्युत्तर विभाग वगळता सर्वच पदव्युत्तर वर्ग पदवीचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयामध्ये आहे. हे वर्ग कायम विनाअनुदानित असले आणि आपला कार्यभार त्यावर अवलंबून नसला तरी त्याला 'ब्याद' न मानता ती एक 'संधी' समजून सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून पदव्युत्तर विभागांना अधिक सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

शिवाय एक उल्लेखनीय बाब अशी की, नवीन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम—२०१६ नुसार संलग्नीत महाविद्यालयांसाठी एक स्वतंत्र पदव्युत्तर मंडळ पहिल्यांदाच निर्माण केल्या गेले आहे. तसेच पदवी स्तरावरील अनुभवी अध्यापकांना पदव्युत्तर शिक्षक म्हणून मान्यता देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. याचा अर्थ पदव्युत्तर शिक्षण व पदव्युत्तर अभ्यासक्रम यामध्ये विद्यापीठ विभागांच्या बरोबरीने संलग्नीत महाविद्यालयांचे योगदान अपेक्षित आहे.

।।७।।

पदव्युत्तर शिक्षणाप्रमाणेच संशोधन क्षेत्रातही महाविद्यालयांचे योगदान गृहीत आहे. म्हणूनच महाविद्यालयांमध्ये संशोधन केंद्रे सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. एकीकडे संशोधनाच्या सुविधा व संधी वाढत असतानाच, दुसरीकडे विद्यापीठीय संशोधनाचा दर्जा बराच खालावला, असा सूर निघताना दिसतो. सर्वच विषय व विद्याशाखांच्या संदर्भात घडत आहे. ही बाब खरी नाही, असे आपल्यापैकी कोणाकडूनच म्हणवणार नाही. या पार्श्वभूमीवर आपण आपल्या विषयातील संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

आपण किमान एवढी तरी दक्षता घेतली पाहिजे की, आपल्या नावासमोर प्रा. डॉ. अमुकअमुक असे जेव्हा आपण छापतो, तेव्हा त्याखाली छापलेल्या समीक्षापर लेखाचा, शोध—निबंधाचा, प्रबंधाचा, प्रकल्पाचा दर्जा त्याला साजेसा असावा. संशोधनाबाबतचा कुठलाही प्रकल्प असो, तो सिद्ध करताना मेहनत घेतली पाहिजे. आपल्यामध्ये क्षमता असूनही केवळ परिश्रमांपासून पलायन करण्याच्या प्रवृत्तीमुळे आपण 'जुगाड टेक्नॉलॉजी' च्या नादी लागतो. आणि आपल्या नावावर हिणकस लेखन जमा करतो. एकदा प्रसिद्ध केलेला मजकूर आपल्याला परत घेता येत नाही. तो तसाच पुढच्या पिढीकडे सरकत राहातो. काहीवेळा दर्जा तर सोडाच, संशोधनातील शिस्त किंवा संकेत पाळले जात नाहीत. आणि छापून आले म्हणून ते योग्यच असा आग्रह धरला जातो.

आपल्यापैकी बहुतांश जण पीएच.डी.चे मार्गदर्शक झाले आहेत. एक संशोधक म्हणून किंवा एक मार्गदर्शक म्हणून कार्य करीत असताना संशोधनातील शिस्तीचे पालन करण्यासोबतच संशोधनाचा दर्जा सांभाळला जाईल याची दक्षता घ्यावी, असे मी सर्वांना आवाहन करतो.

।।८।।

बदलत्या परिस्थितीत यापुढे अभ्यासक्रमातही आमूलाग्र बदल होणार आहेत. तसे करावे लागणार आहे. शासनाच्या नव्या धोरणानुसार सर्वच अभ्यासक्रम हे कौशल्याधारित, रोजगार निर्मितीक्षम असावेत अशी अपेक्षा राहणार आहे. त्यासाठी मराठी भाषा व साहित्य या दोन्हींचा अभ्यासक्रम तयार करताना या नव्या अपेक्षांना तो खरा उतरेल याचे आपल्यासमोर आव्हान आहे. त्यासाठी सर्वांना चिंतन करावे लागणार आहे. अभ्यासक्रम कार्यरत झाल्यानंतर त्यावर चर्चा करण्यापेक्षा त्यापूर्वीच आपले योगदान देता येईल. मराठी भाषा व साहित्याच्या अभ्यासक्रमामध्ये कौशल्याधारित अभ्यासघटक कसे सामाविष्ट करता येईल याचा विचार करावा.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये मराठीचा पेपर 'आवश्यक' असतो. त्यामध्ये व्याकरण व उपयोजित मराठीचा भाग अधिक आहे. त्यावर मोठा भाग अभ्यासक्रमात आणावा लागेल. याशिवाय मराठीचा वावर असलेली प्रसार माध्यमे, मनोरंजन क्षेत्र, सिनेमा, दूरदर्शन, आकाशवाणी यांसारख्या क्षेत्रांमध्ये कथा, पटकथा, संवाद, गीत लेखन, प्रिंट मीडियामध्ये संपादन, वृत्तलेखन, पत्रकारिता, इले. मीडियात वार्तांकन, निवेदन, संकलन, संपादन इ. कौशल्ये विकसित करणारे घटक अभ्यासक्रमात आणावे लागतील.

साहित्य ही एक कला आहे असे मानले जाते. साहित्याच्या अध्यापनाच्या माध्यमातून या कलेचा व त्याला पूरक अशा इतर कलांचा उपयोग व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी आणि त्यानुषंगाने रोजगार मिळविण्यासाठी होऊ शकतो का? याचाही विचार करावा लागणार आहे. इतर विषयांना म्हणजे वाणिज्य किंवा विज्ञान विद्याशाखेतील विषयांना रोजगारासाठी उद्योगांची उपलब्धता असते. त्याप्रमाणे आपल्यासाठी कुठल्या संधीच नाहीत, असे नाही.

।।९।।

आपली इन्डस्ट्री म्हणजे प्रकाशन व्यवसाय, प्रसार माध्यमे, नाट्य–सिनेमा जगत हे मोठे व्यवसाय आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी आहेत. अनेकजण प्रकाशकाकडून पुस्तके छापून घेतात. महाविद्यालयामध्येसुद्धा छपाईची कामे नेहमीच असतात. योग्य प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळाले तर तरुण यामध्ये करिअर करू शकतात किंवा आहे त्या व्यवसायातही त्यांना रोजगार मिळू शकतो. मराठी कम्पोजर, प्रूफ रीडर इ.ना चांगली मागणी आहे. वृत्तपत्र संपादन व्यवसायात अनेक लोक मराठीचे आहेत.

अलीकडे त्याला इलेट्रॉनिक्स मीडियाची जोड मिळाली आहे. छोट्या गावांमध्येसुद्धा केबल नेटवर्क आले आहे. त्यांना वृत्त निवेदक/निवेदिकांची गरज आहे. मुलाखतकारांची गरज आहे. स्थानिक स्तरावर कार्यक्रम तयार करणे, चर्चा घडवून आणणे यासाठी भाषेची उत्तम जाण असणाऱ्यांना प्राध्यान्य राहू शकते.

।।१०।।

भाषिक कौशल्ये विकसित करण्यावर भर देतानाच मराठी साहित्याच्या विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलतेचा विकास करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे. संवेदनशील मनाचा, कलागुणांचा चाहता, सर्जनशील असा विद्यार्थी मराठी वाङ्मय घेतो. त्याच्यामध्ये विविध कलागुणांची पेरणी आपण करू शकतो. वाचन, लेखन, संहिता लेखन, संवाद लेखन, वृत्त लेखन, वार्तांकन, नाट्य–पथनाट्य लेखन इ कौशल्ये विकसित करण्यास मदत करू शकतो. त्यासाठी असे विविध कलागुण व कौशल्ये विकसित करणाऱ्या घटकांचा अभ्यासक्रमात समावेश व्हायला पाहिजे. कौशल्याधारित अभ्यासक्रम ही आता काळाची गरज आहे. कौशल्याधारित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून व्यावसायिक कौशल्ये (जॉब स्कील्स) यांवर भर दिला जावा. यामुळे कौशल्य–विकासातून रोजगार निर्मितीसोबतच राष्ट्रनिर्मितीचे ध्येय साध्य करता येईल.

।।११।।

आपला अभ्यासक्रम कौशल्याधारित असावा ही काळाची गरज असली तरी, मानव्यविद्याशाखा ही व्यावसायिक शिक्षण देणारी विद्याशाखा नाही, हेही लक्षात घ्यावे लागेल. मानवजातीला भावनिक, नैतिक व वैचारिक बळ देण्याची जबाबदारी मातृभाषेच्या शिक्षकावर असते, ही बाब विचारात घेता, बदलत्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वास्तवात आपले उत्तरदायित्व काय? याचा विचारही यानिमित्ताने करूया!

समाज हा सतत परिवर्तनाकडे वाटचाल करीत असतो. पुरोगामी विचार समाजाला उन्नतीच्या दिशेने नेत असतात. परंतु, आजच्या काळात परिवर्तनाच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण होत आहेत. प्रतिगामी विचार छुप्या मार्गाने येत आहेत. समाजात धार्मिक किंवा जातीय संघटना जोर धरत आहेत. सोशल मिडियाचा प्रादुर्भाव वाढत आहे. लोक टाकावू परंपरा, कर्मकांड यामध्ये पुन्हा गुंतत आहेत. याला कारण अनुकरणशील वृत्ती हे तर आहेच, यापेक्षा जीवघेणी स्पर्धा, वाढते ताणतणाव यांमुळे माणसे उदासीन व भयभीत झाली आहेत. त्यामुळे ती सुरक्षित कवच शोधत असताना व ते मिळत नाही म्हणून

निराशेत असतानाच त्यांची पावले मागे पडत आहेत. अशा अनेक कारणांमुळे समाज प्रतिगामित्वाकडे झुकत चालला आहे. अशा परिस्थितीत महाविद्यालयात शिकणाऱ्या तरुण पिढीला मातृभाषेचा अध्यापक या नात्याने आपण योग्य मार्गदर्शन करू शकतो. आपल्या अभ्यासक्रमातूनही पुरोगामी, परिवर्तनवादी विचार आणि विविध सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणारे विचारवंतांचे विचार त्यांच्यापर्यंत पोचवित असताना आजच्या संदर्भात त्याचे अन्वयार्थ लावून विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवा विकसित करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपण करू शकतो. मराठीच्या अध्यापकांवर ही एक सामाजिक जबाबदारी आहे असे समजून आपल्या अध्यापनाची दिशा आपण आखायला हवी आणि त्याप्रमाणे कार्य करावयास हवे.

।।१२।।

एकंदरीत आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहून, सामाजिक बांधिलकीची जपणूक करीत, आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरीत, संशोधक–वृत्ती कायम जोपासत, प्रबोधनाचा वसा सांभाळत आपले ज्ञानदानाचे कार्य करीत राहावे. अध्यापनाच्या माध्यमातून आयुष्याच्या संवेदनशील वळणावर असलेल्या महाविद्यालयीन तरुणांमध्ये समाज व देशहितकारक विचारांची पेरणी करून सुजाण नागरिक घडविण्याचा प्रयत्न करावा. आजच्या तरुणाईला सदैव परिवर्तनाचा पाईक बनून राहण्याची आणि जगाच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची प्रेरणा देत राहावे.

।।१३।।

शेवटी पुन्हा एकदा नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, जिजामाता कला महाविद्यालय, मराठी प्राध्यापक परिषद आणि सर्व उपस्थितांचे मी आभार मानतो. आणि 'अमृताते पैजा जिंकणाऱ्या' आपल्या मायबोलीच्या जागराच्या निमित्ताने आयोजित या उत्सवात कविवर्य सुरेश भटांच्या ओळींचे स्मरण करून माझ्या शब्दांना पूर्णविराम देतो.

लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म–पंथ–जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

धन्यवाद !

❖❖❖

# ३२ वे अधिवेशन
# महात्मा फुले कला, वाणिज्य आणि सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड, जि. अमरावती
# १६ मार्च २०१९
# अधिवेशनाध्यक्ष : डॉ. शंकर वा. राऊत

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या बत्तीसाव्या अधिवेशनाच्या उद्‌घाटन प्रसंगी लाभलेले अध्यक्ष मा.श्री. हर्षवर्धनजी देशमुख, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, उद्‌घाटक, मा. डॉ. राजेश जयपुरकर, प्रकुलगुरू, सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती, पूर्व अधिवेशनाध्यक्ष मा. डॉ. केशव फाले, प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब, प्रमुख उपस्थित मा. प्रा. डॉ. मनोज तायडे, पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख, सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती, मा. डॉ. प्रफुल्ल गवई, व्यवस्थापन परिषद सदस्य, सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती, मा. डॉ. संतोष चव्हाण, मराठी विभाग प्रमुख, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, मा. डॉ. गोविंद गायकी, प्राचार्य, मॉडेल कॉलेज बुलढाणा, मा. डॉ. गजानन जाधव, प्राचार्य, व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा, मा. डॉ. पवन मांडवकर, प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब तथा अध्यक्ष मराठी प्राध्यापक परिषद सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती, व मराठी प्राध्यापक परिषदेचे सर्व सदस्यगण, अभ्यासमंडळाचे सर्व सदस्यगण तसेच मा. डॉ. जे. डी. वडते, प्राचार्य, महात्मा फुले कला–वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड तसेच या परिषदेचे समन्वयक, संयोजक मराठी विभाग आणि उपस्थित सर्व प्राध्यापक बंधू–भगिनी आणि इतर मान्यवर व रसिकजन हो..

या परिषदेसाठी अध्यक्षपदाचा बहुमान आपण मला दिलात त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. माझी ही निवड होण्याला माझ्या अधिकारापेक्षा आपला स्नेहच अधिक कारणीभूत झाला आहे. ह्याची मला जाणीव आहे.

विदर्भाचा कॅलीफोर्नीया म्हणून संबोधल्या गेलेल्या वरूड नगरीत शारदेच्या या दरबारात आपण एकत्र जमलेले आहोत, याचा तर आनंद आहेच पण विविध विषयाच्या अनुषंगाने विचार मंथन होणार ही गौरवाची बाब आहे.

विद्यापीठातील मराठी भाषेचा व विषयाचा प्रश्न आपल्या उपजीविकेशी व अस्तित्वाशी निगडित असल्याने वाचन संस्कृतीविषयी दक्ष असणे क्रमप्राप्त वाटते. मराठी हा मातृभाषेचा विषय असल्याने निर्वाह निभावण्यापुरती सफाई त्यात आली तरी पुरे असा समज बळावत चालल्यामुळे विद्यार्थ्यांना मराठीच्या अध्ययनाची आवश्यकता उत्तरोत्तर कमी जाणवू लागली. त्यात मिडियाची मोठ्या प्रमाणात भर पडली आहे. टी.व्ही., मोबाईल या साधनांमध्ये तो अधिकच गुंतला जात आहे. दूरदर्शन, दूरभाष याकडे लक्ष आणि वाचनाकडे दुर्लक्ष अशा कचाट्यात आजचा मराठी तरुण सापडला आहे. आता तर प्राध्यापकांनी वर्गात शिकवायचे नि विद्यार्थ्यांनी नुसते ऐकायचे ही पद्धत जुनी झाली असे जाणवते. कारण विद्यार्थ्यांना अध्यापन प्रक्रियेत सहभागी करून घेता आले पाहिजे. मराठीच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक म्हणून नव्हे तर मित्र म्हणून पाठीशी उभे राहावे, असे मला वाटते. खरं तर विद्यार्थ्यांनी स्वतःच कृती करत करत शिकावे अशी ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धती पुढे आणावी. त्यामुळे आकलन—आस्वाद ही प्रक्रिया पूर्ण होईल. आणि अनेक संदर्भ ग्रंथाचे वाचन करावे लागल्यामुळे वाचन संस्कृती टिकून राहील.

विद्यापीठ स्तरावर मराठीचे दोन विषय अभ्यासासाठी ठेवण्यात आले आहेत. एक म्हणजे आवश्यक मराठी व दुसरा 'मराठी वाङ्मय' हा ऐच्छिक विषय. खरे तर लिखित आणि अलिखित अशा दोन्ही प्रकारचे वाङ्मय संस्कृतीच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे आहे. पण विद्वानांनी निर्माण केलेल्या ग्रांथिक वाङ्मयात संस्कृतीचे दर्शन अगदी स्थूलरूपानेच घडते. त्यात संस्कृतीच्या व्यापक अंगाचा विचार असून बारीक—सारीक गोष्टींचा त्यात अंतर्भाव केलेला नसतो. समाजातील सर्व स्तरांचे चित्रण त्यातून होणे शक्य नसते. पण या उलट लोकवाङ्मयाचे निर्माते जनतेतील, सर्वसाधारणातील असल्याकारणाने संस्कृतीतील साध्यासुद्धा या वाङ्मयाची उपेक्षा करणे सर्वस्वी लांच्छनास्पद आहे. प्रत्येक बोलीभाषेला स्वतःचा रचना प्रकार आहे. व्याकरण आहे. शब्दाला अर्थ असतो. संदर्भ असतो. संस्कृती असते. एकच शब्द वेगवेगळ्या वाक्यात आला की त्याचा अर्थ बदलतो. शब्द दीर्घ असेल किंवा ऱ्हस्व असेल तरी अर्थ बदलतो. उदा. दिन आणि दीन चा अर्थ बदलतो. उच्चार जरी एकच वाटत असला तरी वाक्यात लिहिला जातो तो योग्य अर्थानुसारी शब्द. इंग्रजी शिकताना स्पेलिंगकडे नीट लक्ष द्या, असे म्हणत अध्यापक त्या योग्य शब्दावर लक्ष केंद्रित करतात. sleep आणि slip या दोन्ही शब्दांचे उच्चार एक वाटत असले तरी स्पेलिंग वेगवेगळे वाक्यानुसारी

बदलतात. ते पाहावेच लागतात. मराठीत हेच शब्द लिहिताना स्लिप आणि स्लीप असे ऱ्हस्व–दीर्घ लिहितात. तेव्हा त्याचे अर्थ वाक्यानुसारी–स्पेलिंगनुसार बदलतात. तसेच मराठीत ऱ्हस्व–दीर्घ–अनुस्वार–विसर्ग–उकार–वेलांटी–हलंत–जोडाक्षर–रफार–पूर्णविराम असे कितीतरी व्याकरणिक संकेत नियमानुसारी पाळावेच लागतात. पूर्वी सोपेपणासाठी अशाही सूचना सूचविण्यात आल्या होत्या की शब्द दीर्घ तरी लिहावेत किंवा ऱ्हस्व तरी लिहावेत. अशाने काही बिघडणार नाही. परंतु ऱ्हस्व–दीर्घानुसारी लेखन अस्तित्वात असल्याकारणाने शब्दांचे अर्थ बदलतात एवढे मात्र निश्चित. असा व्याकरणिक भाग विचारात न घेता घरी बसून, प्राध्यापिकाविना अभ्यास होऊ शकेल. अनिश्चितता उभी राहिल. खरे म्हणजे प्राध्यापकाची आवश्यकता वाटेल असाच अभ्यासक्रम आणि विचारधारा असावयास पाहिजे.

मराठी ही प्रादेशिक भाषा असली तरी जगामधील अंदाजे ९ कोटी लोक मराठी बोलतात. तसे पाहिले तर मराठी ही जगात एकोणविसाव्या क्रमांकावर आहे. ती अकराशे वर्षाहून जुनी असली तरीही मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी अद्याप संघर्ष करावा लागत आहे. ही बाब आपल्यासाठी गौरवास्पद नाही.

भाषाधोरण समितीवर काम करणारी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली काम करणारी समिती आणि डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली काम करणारी समिती यांनी ठामपणे मराठीबाबत सूचना केल्यात. मात्र या वर्षीच्या भाषादिनी विद्यमान शिक्षणमंत्र्यांनी ८० टक्केच भाषाधोरण तयार आहे, असे म्हटले यावरून राजकारणात भाषेचा बळी जाताना आज स्पष्ट दिसतो आहे, असे शिक्षणतज्ज्ञ डॉ. वीणा सानेकर स्पष्टपणे आपले मत नोंदवितात. पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने दिल्लीमध्ये यासाठी धरणे आंदोलन केले होते. याची आपणा सर्वांना जाण आहेच. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी अडथळ्यांची जी कसरत सुरू आहे ती दूर करण्यासाठी साहित्यिकांनी, प्राध्यापकांनी, अभ्यासकांनी, विचारवंतांनी एकत्र आले पाहिजे व अडथळे दूर केले पाहिजेत.

महाराष्ट्र राज्याची स्थापना १९६० साली झाली. तेव्हा राज्याचा सगळा कारभार मराठीत व्हावा, असे मान्य झाले. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण या द्रष्ट्या व्यक्तिमत्त्वाने मराठीसाठी भव्य दिव्य स्वप्न पाहिले नि ते सत्यात उतरले पाहिजे. या ध्यासातून त्यांनी मराठीच्या विकासाच्या विविध यंत्रणा निर्माण केल्या. साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोष

प्रकल्प, विद्यापीठ पाठ्यपुस्तक मंडळ यांची निर्मिती हे त्याचे फलित. मराठीच्या बाबतीत द्रेपणाने अशी ठाम पावले उचलावीत आणि मराठीला अभिजात दर्जा मिळवून द्यावा अशी मा. विद्यमान मुख्यमंत्री महोदयांना विनंतीवजा सूचना करतो.

मराठीसाठी राज्यात स्वतंत्र भाषाविभाग अस्तित्वात आला तोही राज्याच्या स्थापनेनंतर पन्नास वर्षांनी. मराठी अभ्यासकेंद्राने विभागाची रचना कशी असावी याचा सविस्तर आराखडा शासनाला सादर केला. राज्यातील भाषा नियोजन कसे असावे आणि त्याकरिता आर्थिक बाबींपासून भाषा विकासाच्या कामापर्यंतचे सखोल नि विचारपूर्वक प्रारूप तयार केले. अनेकदा पाठपुरावा करूनही विद्यमान भाषा विभाग मंत्र्यांनी त्या आराखड्याच्या चर्चेस अभ्यास केंद्राच्या सदस्यांना बोलाविले नाही. उलट मराठी सक्तीची करणे म्हणजे लोकांच्या पायात बेडी घालणे, असे त्यांना वाटते.

केरळ, तामिळनाडू, अगदी अलीकडे अस्तित्वात आलेल्या तेलंगणात देखील त्यांच्या—त्यांच्या भाषेची सक्ती करणे त्या त्या राज्याला जमते, पण आमच्या महाराष्ट्रात मात्र शिक्षणात मराठीचा आग्रह धरणे शिक्षणमंत्र्यांनाच पटत नाही. 'असा आग्रह धरून आमचे लोक मागे पडतील', असे त्यांना वाटते. फ्रेंच, जर्मन, जपानी यासारख्या विदेशी भाषा रुजविणे नि त्या राज्यात वाढविणे ही आमच्या शासनाची जबाबदारी आहे काय? इस्रायल या देशासाठी मराठी भाषा शिकवण्यासाठी सामंजस्य करार झाला एवढेच काय? या प्रयोगानंतर अनेक देशांसोबत भाषा शिकविण्याबाबत करार करण्यात येतील अशी घोषणा केवळ घोषणाच राहिली.

पुस्तकांचे गाव उभारणे, स्पर्धाक्रार्यक्रमांचे 'इव्हेंट' करून मराठी जगविता येईल काय? शिक्षणातील मराठी जगण्यासाठी तिचे अभ्यासक्रमातील स्थान जपणे गरजेचे आहे. आपली भाषा जगात टिकविण्यासाठी अनेक पातळ्यांवर तिची सक्ती व्हावयास पाहिजे. आज जगात बोलबाला असलेली इंग्रजी ही लॅटीन नि ग्रीक सत्ता मोडून काढून सक्तीनेच टिकवली गेली. महाराष्ट्र हा एकमेव असा प्रदेश आहे जेथे या राज्याच्या भाषा टाळून परक्या भाषा शिकविण्याचा परवाना दिला जातो. आज शासन उदासीन नि समाज तटस्थ अशा कात्रीत मराठी श्वास घेते आहे. खरे तर, स्वभाषेची अवनती ही त्या समाजाची अधोगतीच असते.

ग्रामीण परिसर हा हा म्हणता कधी शहरे होतो हे कळतही नाही. शहरी वृत्ती—प्रवृत्ती ग्रामीणतेपर्यंत सहज पोहचते. मित्रमंडळ, राजकारण,

समाजकारण, खाणे–पिणे, गप्पा–टप्पा, राहणीमान, बोलीभाषा या साऱ्याच बाबीवर शहरी परिणाम झपाट्याने होतो आहे. मराठीऐवजी हिंदी–इंग्रजी बोलण्यात तरुणाईला अभिमान वाटतो. मराठी बोलताना कधी इंग्रजी शब्द तर कधी हिंदी शब्द वाक्यात आले म्हणजे चांगले इंप्रेशन पडते, असा समज होतो. येथेच मराठीवर इतर भाषांचे आक्रमण वाढलेले असते. खरे म्हणजे राष्ट्रभाषा हिंदी आणि आंतरराष्ट्रीय भाषा इंग्रजी आलीच पाहिजे पण मराठीचा बळी देऊन नव्हे.

आपलं शैक्षणिक धोरण राष्ट्रीय पातळीवरून वेळोवेळी नियुक्त केलेल्या आयोगांच्या शिफारसींचा विचार करून निश्चित होते. हे आपणा सर्वांना माहीत आहे.

साहित्य जीवन दृष्टी देते. आणि अशी दृष्टी साहित्याचे संगोपन करते. ह्या परस्परपूरक बाबी आहेत. म्हणूनच ललित साहित्याप्रमाणे वैचारिक साहित्याच्या निर्मितीची गरज आहे, या गंगाधर पाणतावणे यांच्या विचारांची विशेषत: नवोदित लेखकांनी जाणीव ठेवावी. अर्थात नवोदित लेखकांनी आत्मकेंद्री दृष्टीबरोबरच सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून लेखन केले पाहिजे.

विं. दा. करदींकर म्हणतात– 'लेखन ही जीवनवेधी कला आहे. त्यामुळे तिला भोवतालच्या जीवनापासून वेगळे काढता येत नाही. म्हणून लेखकाच्या जगण्याला व अविष्काराला सामाजिकतेची आणि वैचारिकतेची चौकट आपोआप प्राप्त होत असते.' लेखकांनी शब्दांशी इमान राखले पाहिजे. ह्यासाठी अनुभवाची सखोलता, संपन्नता वाढविली पाहिजे. मर्ढेकरांच्या सैद्धांतिक भाषेत सांगायचे झाल्यास लेखनपूर्ण आणि लेखनगर्भ आत्मनिष्ठा टिकली पाहिजे. अनुभव तोडके तर लेखन उथळ होईल. नवोदितांनी लेखनकलेची व प्रकाशनाची घाई करू नये. परंपरेपासून काय घ्यायचे नि काय नाकारायचे याचा विवेक लेखकाला करता आला पाहिजे. हा विवेक ज्याला करता येत नाही त्याला नवनिर्मिती करता येत नाही. थोर समीक्षक भालचंद्र नेमाडे यांची अलीकडेच 'हिंदू–एक जगण्याची अडगळ' ही कादंबरी प्रकाशित झाली. ह्यानिमित्त नेमाडेंची भरभरून मुलाखत सर्वत्र प्रसारित झाली. त्यांच्या मते, 'जुन्या वस्तू टाकून फेकून दिल्या जात नाहीत तर त्या अडगळीत संग्रही ठेवल्या जातात. येथे केशवसुती सूत्रांची नेमाडेंनी पुनर्मांडणी केली आहे. याचाच अर्थ संशोधनाला पूर्ण विराम नाही, हेच सिद्ध होते. समाज वास्तवाचे आकलन–प्रकटन लेखकाला करता आले पाहिजे आणि त्याचा त्याला अन्वयार्थ लावता आला पाहिजे. आज समाजातील विविध समस्या व गरज

लक्षात घेऊन संशोधनाची दिशा निश्चित करणे गरजेचे ठरते आहे. औद्योगिक व तंत्रज्ञानाच्या विकासासाठी शिक्षणात बदल व अभ्यासक्रमाची पुनर्ररचना विचारात घेणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाचा संबंध बदलत्या उत्पादन प्रणालीशी व कुशल मनुष्यबळाशी जोडण्यावर भर दिला जातो आहे. संशोधनही उपयोजित स्वरूपाचे असावे. आज शिक्षण हे चौकटबद्ध अभ्यासक्रम वर्गखोल्यातून ठरावीक पद्धतीने अध्यापन आणि रूढ प्रकारच्या परीक्षा या पलीकडे जाणे गरजेचे आहे.

खुद्द इंग्लंडमध्ये इंग्लिश भाषेला प्राध्यान्य मिळावे, म्हणून इंग्लिश लोकांना जवळ जवळ पाचशे वर्ष लढा द्यावा लागला. इंग्लिश या परकीय भाषेचे भारतातील पुरस्कर्ते म्हणतात की, इंग्लिश ही आमच्या जीवनाचा भाग होऊन बसली आहे. ती देशी भाषांपेक्षा सरस (सुपेरिअर) आहे. त्यातील टेक्निकल शब्द हिंदी किंवा इतर भारतीय भाषांमध्ये नाहीत. इंग्लिश भाषेपुढे भारतीय भाषा हिणकस आहेत. इंग्लिश भाषा ही आमच्या जीवनाचा घट्ट भाग झाली आहे. इंग्लिश भाषेचे वळण सोडून देऊन देशी भाषांचा आमच्या मातृभाषांचा स्वीकार करणे आता मानसिक दृष्टीनेही फार कठीण काम आहे. असे असले तरी 'कोर्टातील व्यवहार व कोणतेही व्यवहार हे लोकभाषेतच व्हायला हवेत. कारण लोकांशी असलेल्या सर्व संबंधित गोष्टी या लोकांना समजणे, हा त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे', असे अलाहाबाद हायकोर्ट म्हणते. थोडक्यात म्हणजे देशाची व प्रदेशाची स्वतःची मातृभाषा हीच खरीखुरी ज्ञान भाषा असते. कर्नाटक सरकारने 'कन्नडभाषा' नावाचे एक स्वतंत्र खातेच तयार केले असून त्या खात्याला एक स्वतंत्र मंत्री नेमला आहे. कन्नड भाषेचे संरक्षण, संवर्धन व विकास एवढेच त्याचे काम. कर्नाटकमध्ये कन्नड माध्यमाला महत्त्व आहे. तेथे काही विशि कौशल्याच्या नोकऱ्यांमध्ये कन्नड माध्यमातून शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी आरक्षण (रिझर्व्हेशन) आहे. हीच गोष्ट आपल्याकडे सुरू करावी असे ठामपणे वाटते.

मराठी भाषेचा अभिमान बाळगणाऱ्यांना थेट बाराव्या—तेराव्या शतकात जावे लागेल. महानुभाव—वारकरी संप्रदायाच्या चळवळींनी मराठी वाडमयाची जडणघडण केली. त्या काळात मराठी भाषा, वाङ्मय आणि संस्कृती हे प्रश्न अतिशय महत्त्वाचे होते. बाराव्या—तेराव्या शतकात भाषेचा प्रश्न चक्रधर, ज्ञानेश्वरांना महत्त्वाचा वाटला. मराठी भाषेचा पुरस्कार हे त्यांचं अंतःसूत्र होतं. चक्रधर स्वामीच्या मराठीला धक्का बसू नये म्हणून नागदेवाचार्य केशिराजांना म्हणतात— नको गा केशव देया । येणे माझिये स्वामीचा सामान्यु

परिवारू नागवेल की। म्हणोनि संस्कृतबद्ध रचना न किजे।' तर ज्ञानेश्वरांनीही माझा मऱ्हाटाची बोलू कवतिके। परी अमृतातेही पैजा जिंके' अशी भाषिक अस्मिता बाळगून सर्वसामान्यांच्या भाषेला सन्मानित केले.

आधुनिक कवी बी यांनी आपल्या 'डंका' कवितेत तर ज्ञानेश्वरांना बंडवाला संबोधले.

या बड्या बंडवाल्यात'ज्ञानेश्वर माने पहिला'
मोठ्यांच्या सिद्धांताचा घेतला पुरा पडताळा,
डांगोरा फोलकटाचा पिटविला अलम् दुनियेला,
झुंजोनिया देवां दैत्यां
'अमृतामधिं' न्हानी जनता
उजळिला मराठी माथा
सत्तेचे प्रत्यय आले तेजाचे तारे तुटलें

प्राध्यापकांनी आधुनिक तंत्र विद्येशी जुळवून घेतले पाहिजे. संगणक, लॅपटॉप, प्रोजेक्टर या आधुनिक साधनांचा त्याने कुशलतेने उपयोग करावा. वार्षिक परीक्षा आता संपुष्टात येत असून सत्र परीक्षा रुजत आहे. तेव्हा त्या परीक्षेला उपयोजित अभ्यासक्रमाची आखणी केली पाहिजे. वर्षातून दोन परीक्षा विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी नियोजन करून अभ्यासक्रम परीक्षेपूर्वी संपविणे. गृहपाठ, मुलाखत ह्या सर्व बाबी पार पाडाव्यात. मराठीच्या प्राध्यापकाच्या कितीही मनात असलं की ही सत्र परीक्षा नको तरी विद्यापीठीय आदेशाचे पालन करणे आपले कर्तव्य आहे. तेथे प्राध्यापकांनी तसूभरही मागे राहता कामा नये.

एक महत्त्वाचे–लेखक आपल्यातूनच घडत असतो. लेखकांनी जीवन विषयक जाणिवांचं अंत:सूत्र आपण मांडलं पाहिजे. वसंत आबाजी डहाके म्हणतात– लेखकाने व्यक्त झालं पाहिजे. माणसंही मुकी झाली तर त्यांची दशा जनावरासारखी होईल आपण माणूस आहोत हे कवी, लेखकांनी विसरता कामा नये.

कला शाखा मानवी व्यक्तिमत्त्व घडवणारं एक संस्कार केंद्र आहे. तरुणमनं योग्य प्रयत्नांनी घडवली जाऊ शकतात. जीवनातल्या विविध आव्हानांना निर्भयपणे सामोरे जाण्यासाठी त्यांचं व्यक्तिमत्त्व सिद्ध केल्या जाऊ शकतं. त्यांच्या विकारांना, विचारांना विधायक दिशा दिली जाऊ शकते. कर्नाटकमध्ये कन्नडमाध्यमातून उत्तीर्ण झालेल्यांना नोकरीत जसे आरक्षण आहे तसे काही प्रशासकीय सेवांसाठी कला शाखेची पदवी आवश्यक मानावी.

या प्रसंगी कुसुमाग्रजांची ‘कणा’ ही कविता आठवते.

ओळखलंत का सर मला – पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले केसावरती पाणी
क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून
गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहून
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईन कशी – बायको मात्र वाचली
भिंत खचली चूल विझली होते नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले
कारभारणीला घेऊन संगे सर, आता लढतो आहे.
पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे.
खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला,
पैसे नको सर, जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा

‘कणा’ –कुसुमाग्रज

या परिषदेच्या निमित्ताने प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यावी आणि आपल्या वाणीने प्रेरणेचे संस्कार केंद्र जागृत ठेवावे.

जय हिंद! जय मराठी!!

❖❖❖

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत
# मराठी प्राध्यापक परिषदेची अधिवेशने

| अ.क्र. | स्थान | अध्यक्ष | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कळंब | प्रा. राम डोके | १८ फेब्रुवारी १९८६ |
| २ | अमरावती | डॉ. भाऊ भालेराव | २८ डिसेंबर १९८६ |
| ३ | दारव्हा | प्रा. श्रीहरी गायकवाड | २७ नोव्हेंबर १९८८ |
| ४ | कारंजा लाड | डॉ.द.भि. कुळकर्णी | ३०–३१ डिसेंबर १९८९ |
| ५ | तेल्हारा | कै. मधुकर केचे | २९–३० डिसेंबर १९९० |
| ६ | पुसद | प्रा. राम शेवाळकर | २९ फेब्रु.–१ मार्च १९९२ |
| ७ | मलकापूर | डॉ. भाऊ मांडवकर | ६ फेब्रुवारी १९९३ |
| ८ | अकोला | डॉ. मधुकर वाकोडे | ५–६ फेब्रुवारी १९९४ |
| ९ | मारेगाव | प्रा. हरिभाऊ हिवरे | ४–५ डिसेंबर १९९४ |
| १० | मुर्तिजापूर | डॉ. श्याम सोनारे | ११–१२ फेब्रुवारी १९९६ |
| ११ | वरूड | डॉ. विठ्ठल वाघ | १–२ फेब्रुवारी १९९७ |
| १२ | वणी | डॉ. गोविंद देशपांडे | ३१ जाने.– १ फेब्रु. १९९८ |
| १३ | कळंब | डॉ. श्रीकांत तिडके | १९ फेब्रुवारी १९९९ |
| १४ | चोहोट्टाबाजार | डॉ.सौ. सिंधू मांडवकर | १५ फेब्रुवारी २००० |
| १५ | आकोट | डॉ.रा.गो. चवरे | २४ सप्टेंबर २००० |
| १६ | येवदा | डॉ. कुमुदिनी खोरगडे | ८ मार्च २००२ |
| १७ | यवतमाळ | डॉ. अक्षयकुमार काळे | ६ फेब्रुवारी २००३ |
| १८ | राळेगाव | प्रा. बाळाभाऊ कळसकर | ३–४ जानेवारी २००४ |
| १९ | मलकापूर | डॉ. रमाकांत कोलते | २२–२३ जानेवारी २००५ |
| २० | कळंब | डॉ.ना.ह. वानखडे | १० मार्च २००६ |
| २१ | पुसद | डॉ.बा.दा. जोशी | २४ जुलै २००७ |
| २२ | कारंजा लाड | डॉ. सुशीला पाटील | १४ मार्च २००९ |
| २३ | अकोला | डॉ. रमेश अंधारे | १५ फेब्रुवारी २०१० |
| २४ | नेर | डॉ. उत्तम रूद्रवार | १४ फेब्रुवारी २०११ |
| २५ | मारेगाव | डॉ.एस.एम. कानडजे | १३ मार्च २०१२ |
| २६ | वणी | डॉ. सुखदेव ढाणके | ०९ मार्च २०१३ |
| २७ | मलकापूर | डॉ. सतेश्वर मोरे | ३० जानेवारी २०१४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | कारंजा लाड | डॉ. रविकिरण पंडित | २६ मार्च २०१५ |
| २९ | अंजनगावसुर्जी | डॉ. विजया डबीर | ०५ फेब्रुवारी २०१६ |
| ३० | चांदूर(बाजार) | डॉ.पी.एल. सोनटक्के | ०४ मार्च २०१७ |
| ३१ | दारव्हा | डॉ. केशव फाले | ०१ फेब्रुवारी २०१८ |
| ३२ | वरूड | डॉ. शंकर राऊत | १६ मार्च २०१९ |

## मराठी प्राध्यापक परिषद

नोंदणी दि. २४–२–१९९२, सहा. धर्मदाय आयुक्त मान्यता दि. १७–८–१९९४ (नोंदणीसाठी डॉ. भाऊ मांडवकर १९८४ पासून प्रयत्नशील होते. अर्ज सादर केल्यानंतर सहायक धर्मदाय आयुक्तांनी वारंवार घटना बदलावयास लावली व अखेरीस १९९२ ची घटना मान्य झाली.)

### पहिली कार्यकारिणी १७ ऑगस्ट १९९४ पासून पुढील पाच वर्षे

कार्यकारिणी सदस्यांची यादी

१. डॉ. भाऊराव मारोती मांडवकर – अध्यक्ष
२. डॉ. सौ. जयश्री बबनराव तोटे – उपाध्यक्ष
३. प्रा. राजू तुळशीरामजी आद – सचिव
४. डॉ. रामदास गोविंदराव चवरे – सहसचिव
५. डॉ. सौ. अनुराधा अनिल वऱ्हाडे – कोषाध्यक्ष
६. डॉ. श्रीमती कुमुदिनी रामचंद्र खोरगडे – सदस्य
७. प्रा. मनोहर नारायणराव सरपटवार – सदस्य

### दुसरी कार्यकारिणी १७ ऑगस्ट १९९९ पासून पुढील पाच वर्षे

कार्यकारिणी सदस्यांची यादी

१. डॉ. भाऊराव मारोती मांडवकर – अध्यक्ष
२. डॉ. रा. गो. चवरे – उपाध्यक्ष
३. प्रा. रा. तु. आदे – सचिव
४. प्राचार्य डॉ. सिंधू मांडवकर – कोषाध्यक्ष
५. प्रा. सौ. सुशीला अशोकराव धाबे – सहसचिव
६. प्रा. डॉ. राजकुमार खर्चे – सदस्य
७. प्रा. शंकर राऊत – सदस्य

### तिसरी कार्यकारिणी १७ ऑगस्ट २००४ पासून पुढील पाच वर्षे

१. डॉ. भाऊ मांडवकर – अध्यक्ष

२. डॉ. रा. गो. चवरे – उपाध्यक्ष
३. प्रा. रा. तु. आदे – सचिव
४. डॉ. राजकुमार पुरुषोत्तम खर्चे – कोषाध्यक्ष
५. प्रा. हरिदास देविदास आकोटकर – सहसचिव
६. प्रा. बाळकृष्ण रंगराव सरकटे – सदस्य
७. प्रा. गजानन गोपालराव हेरोळे – सदस्य

**चौथी कार्यकारिणी १७ ऑगस्ट २००९ पासून पुढील पाच वर्षे**

१. प्राचार्य डॉ. रा. गो. चवरे – अध्यक्ष
२. प्रा. मनोहर बन्सोड – उपाध्यक्ष
३. प्रा. रा. तु. आदे – सचिव
४. डॉ. गजानन मुंदे – सहसचिव
५. प्राचार्य डॉ. पवन मांडवकर – कोषाध्यक्ष
६. प्रा. अंबादास घुले – सदस्य
७. प्रा. गजानन गोपाळराव हेरोळे – सदस्य

**पाचवी कार्यकारिणी १७ ऑगस्ट २०१४ पासून पुढील पाच वर्षे**

१. प्राचार्य डॉ.पवन मांडवकर – अध्यक्ष
२. प्रा. अनुप नांदगावकर – उपाध्यक्ष
३. प्रा. राजू तुळशीरामजी आदे – सचिव
४. प्रा. डॉ. गजानन हेरोळे – कोषाध्यक्ष
५. प्रा. अतुलकुमार सारडे – सहसचिव
६. प्रा. डॉ. ममता इंगोले – सदस्य
७. प्रा. अनिल काळबांडे – सदस्य
८. प्रा. डॉ. मीना अंदुरे/जुनघरे – महिला प्रतिनिधी
९. प्रा. डॉ. शुभांगी कोंडोलीकर –महिला प्रतिनिधी

जिल्हा प्रतिनिधी :

| | |
|---|---|
| १. यवतमाळ जिल्हा | १. प्रा. सिद्धार्थ भगत, राळेगाव |
| | २. प्रा. डॉ. युवराज मानकर, बाभुळगाव |
| २. अकोला जिल्हा | १. प्रा. विनय पैकिने, अकोला |
| | २. प्रा. प्रकाश वानखडे, बाळापूर |
| ३. अमरावती जिल्हा | १. प्रा. डॉ. रमाकांत इटेवाड, अमरावती |
| | २. प्रा. डॉ. दिनेशचंद्र राऊत, अमरावती |

४. वाशिम जिल्हा	१. प्रा. डॉ. विजय जाधव, वाशिम
२. प्रा. डॉ. शरद वाघोळे, मंगरूळपीर

५. बुलडाणा जिल्हा	१. प्रा. डॉ. शोभा नाफडे
२. प्रा. आनंद धुंदाळे

❖❖❖

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद आजीवन सदस्य

१. डॉ. भाऊ मांडवकर, २. डॉ. सिंधू मांडवकर, ३. डॉ. सुभाष खंडारे, ४. डॉ. कुमुदिनी खोरगडे, ५. डॉ. जयश्री तोटे, ६. डॉ. गोपाल डिवरे, ७. प्रा. राम डोके, ८. प्रा. उषा देवस्थळे, ९. प्राचार्य राम शेवाळकर, १०. प्रा. नारायण वानखडे, ११. डॉ. एस.एस. कानडजे, १२. प्रा. शोभा देशमुख, १३. डॉ. शरद कळणावत, १४. डॉ. रमाकांत कोलते १५. प्रा. निर्मला महात्मे, १६. प्रा. शीला पैठणकर १७. डॉ. अनुराधा वऱ्हाडे, १८. डॉ. श्रीकांत तिडके, १९. डॉ. सुभाष वाघमारे २०. डॉ. संजीवनी देशमुख, २१. प्रा. बी.एम. सोनोने, २२. प्रा. जे.एस. गवळीकर, २३. प्रा. एन.एल. बुराडे, २४. प्रा.कु. पी.टी. हेंड, २५. डॉ. आशा थोरात, २६. प्रा. वसुधा घुरडे, २७. प्रा. बा.वा. कळस्कर, २८. प्रा. जी.एम. देशमुख, २९. प्रा. मनोहर बनसोड, ३०. डॉ. नरेशचंद्र काठोळे ३१. डॉ. जनार्धन मचाले, ३२. प्रा. सुखदेव ढवळे, ३३. प्रा. हरिभाऊ हिवरे, ३४. डॉ. बी. डी. जोशी, ३५. प्रा. निर्मला काठोळे, ३६. डॉ. प्रमिला दारव्हेकर, ३७. डॉ. रामदास चवरे, ३८. डॉ. सुशीला पाटील, ३९. प्रा. करुणा ठाकूर, ४०. प्रा. आर.आर. शर्मा, ४१. प्रा. लीलाधर वैद्य, ४२. प्रा. चारुलता केतकर, ४३. प्रा. डी.व्ही. भोकरे, ४४. डॉ. गोविंद देशपांडे, ४५. डॉ. शंकर राऊत, ४६. प्रा. जी.आर अंबाडकर, ४७. डॉ. रा.तु. आदे, ४८. डॉ. रविकिरण पंडित, ४९. डॉ. राजकुमार खर्चे, ५०. प्रा. मंदाकिनी रेवसे, ५१. डॉ. विभावरी हस्तक, ५२. प्रा. डी.एम बोदडे, ५३. प्रा. मीना ठाकरे, ५४. डॉ. शोभा काठोळे, ५५. डॉ. सतीश तराळ, ५६. डॉ. प्रतिभा जंगले, ५७. प्रा. विजय वाघमारे, ५८. प्रा. निर्मला काकडे, ५९. डॉ. लीला भेले, ६०. डॉ. नलिनी पाटील, ६१. प्रा. गणेश पेंडोखरे, ६२. प्रा. महेश हंबर्डे, ६३. डॉ. शोभा नाफडे, ६४. प्रा. चिंतामण कांबळे, ६५. डॉ. गोपाल उपाध्ये, ६६. प्राचार्य हिंमत सपकाळ, ६७. प्रा. लता खेडकर, ६८. डॉ. शाम सोनारे, ६९. डॉ. मनोज तायडे, ७०. प्रा. अरविंद मेहता, ७१. प्रा. सुमती भोगे, ७२. डॉ. सुनंदा गडकर, ७३. डॉ. विजया खांडेकर, ७४. डॉ. पूनम

अभ्यंकर, ७५. डॉ. सुशीला धाबे, ७६. प्रा. सतेश्वर मोरे, ७७. प्रा. सुभाष वि. इंगोले, ७८. प्रा. सुरेश दवंडे, ७९. प्रा. नीला कोंडोलीकर, ८०. डॉ. वर्षा चिखले, ८१. डॉ. मीता कांबळे, ८२. प्रा. कल्पना मशाखेत्री, ८३. डॉ. ह.दे. आकोटकर, ८४. प्रा. सुलभा कडू, ८५. डॉ. पी.एल. सोनटक्के, ८६. डॉ. दिलीप अलोणे, ८७. डॉ. विनय पैकिने, ८८. डॉ. पवन मांडवकर, ८९. डॉ. संजय पाटील, ९०. डॉ. जी.जी. हेरोळे, ९१. प्रा. जी. डी. चौधरी, ९२. डॉ. सविता रेखे/ सरोदे, ९३. प्रा. संदीप वानखडे, ९४. डॉ. सुनील राठोड, ९५. डॉ. विलास तायडे, ९६. प्रा. लक्ष्मण पवार, ९७. डॉ. अनिल बाभुळकर, ९८. डॉ. रवींद्र केदार, ९९. डॉ. ममता इंगोले, १००. प्रा. अतुल सारडे, १०१. डॉ. विनायक त्रिपत्तीवार, १०२. प्रा. अतुल टेवरे, १०३. प्रा. अनुप नांदगावकर, १०४. डॉ. श्रद्धा पाटील, १०५. डॉ. केशव गाडबैल, १०६. डॉ. सीमा चवरे, १०७. डॉ. ज.पां. खोडके, १०८. डॉ. रमाकांत इटेवाड, १०९. प्रा. एस.डी. कोंडोलीकर, ११०. प्रा. अर्चना गढीकर, १११. डॉ. लता जावळे, ११२. डॉ. निशा नायगावकर (जोशी), ११३. डॉ. मीना अंदुरे (जुनघरे), ११४. प्रा. कल्पना बोरकर, ११५. डॉ. स्मिता शेंडे, ११६. डॉ. बाळकृष्ण सरकटे, ११७. प्रा. डी.ए. शिंदे, ११८. प्रा. जी. टी. चवरडोल, ११९. प्रा. साळुंके, १२०. डॉ. गजानन जाधव, १२१. प्रा. एस.पी. महाजन, १२२. डॉ. गजानन मुंधे, १२३. डॉ. आशालता आसुटकर, १२४. डॉ. प्रल्हाद वावरे, १२५. डॉ. विनोद इंगळे, १२६. प्रा. छाया खर्चे, १२७. डॉ. अनिल काळबांडे, १२८. प्रा. विठ्ठल जीवतोडे, १२९. डॉ. राजेद्र हावरे, १३०. डॉ. अभय जोशी, १३१. डॉ. अंबादास घुले, १३२. डॉ. पी. आर. जाधव, १३३. डॉ. पी.जी. राठोड, १३४. डॉ. दिनेश राऊत, १३५. प्रा. महेद्र गिरी, १३६. डॉ. रवींद्र खडेराव, १३७. डॉ. शर्मिष्ठा भगत, १४८. प्रा. तोष्णा बोंदाडे, १४९. डॉ. उत्तम रूद्रवार, १४०. डॉ. वाय.एस. मानकर, १४१. प्रा. एम.जी. वाकडे, १४२. डॉ. के.व्ही. बऱ्हाटे, १४३. डॉ. संजय पोहरे, १४४. डॉ. गणेश माल्टे (पाटील), १४५. डॉ. शरद उमाटे, १४६. डॉ. प्रमोद गारोडे, १४७. डॉ. प्रदीप राऊत, १४८. डॉ. नंदकुमार भाकरे , १४९. प्रा. रमेश खंडारे, १५०. प्रा. प्रकाश वानखडे, १५१. डॉ. मनोज फडणीस, १५२. डॉ. केशव फाले, १५३. प्रा. आर.आर. शेख, १५४. डॉ. भीमराव शेजुळे, १५५. प्रा.कु. आकाशवाणी तोडसाम, १५६. डॉ.कु. सुचिता ढेरे, १५७. डॉ. एस.जे. वाघोळे, १५८. डॉ. विजय जाधव, १५९. डॉ. विवेक देशमुख, १६०. डॉ. ए.बी. दडमल, १६१. प्रा. रवींद्र डाखोरे, १६२. प्रा. आनंद यु. धुंदाळे, १६३. प्रा. अविनाश मेश्राम, १६४. डॉ. सुवर्णा गाडगे, १६५. डॉ. माधुरी भटकर, १६६. डॉ. कल्पना मेहरे, १६७. प्रा. मुनेश्वर जमईवार, १६८. डॉ. भास्कर पाटील, १६९. डॉ.

कैलास वानखडे, १७०. डॉ. दिवाकर सदांशिव, १७१. डॉ. अशोक इंगळे, १७२. डॉ. शांतरक्षित गावंडे, १७३. डॉ. विश्‍वजित कांबळे, १७४. डॉ. अविनाश धोबे, १७५. प्रा. हरिश्चंद्र नरेटी, १७६. डॉ. गजानन बनसोड, १७७. प्रा. डोंगरे, १७८. प्रा. आर.के. भुरके, १७९. प्रा. प्रमोद राऊत, १८०. प्रा. पाखरे, १८१. प्रा. रजाने, १८२. प्रा. सौ. मिश्रा, १८३. प्रा. श्रीमती अर्चना भगत, १८४. डॉ. निळकंठ बोरोडे, १८५. प्रा. विनोद कोंकणे, १८६. प्रा. सजय आगलावे, १८७. प्रा. जामनेकर, १८८. डॉ. अंशुमती पेंडोखरे, १८९. डॉ. माधुरी पाटील, १९०. डॉ. के.एस. जमधाडे, १९१. प्रा. अनिल भगत, १९२. प्रा. रणजीत गणोदे, १९३. प्रा. संतोष डुकरे, १९४. प्रा. मुकेश सरदार, १९५. प्रा. प्रतिभा आवंडकर, १९६. डॉ. मंदा नांदुरकर, १९७. डॉ. गजानन लोहवे, १९८. डॉ. किशोर बुटले, १९९. डॉ. पुरुषोत्तम निर्मळ, २००. डॉ. शिल्पा काकडे, २०१. डॉ. सुलभा खर्चे, २०२. डॉ. वीरा मांडवकर, २०३. डॉ. संतोष चतुर, २०४. डॉ. राजेश चवरे, २०५. डॉ. सुभाष जाधव, २०६. डॉ. अनंता सूर, २०७. डॉ. सिद्धार्थ भगत, २०८. प्रा. अनिल दौलतकार, २०९. डॉ. सुशीला ढगे, २१०. डॉ. आनंद डुडुल, २११. डॉ. पंढरी डोईफोडे, २१२. डॉ. श्रीकृष्ण पदमणे, २१३. डॉ. सविता पवार, २१४. प्रा. गणेश काकडे, २१५. प्रा. सागर गवई, २१६. डॉ. अण्णा वैद्य, २१७. डॉ. पंकज वानखडे, २१८. डॉ अशोक कांबळे, २१९. डॉ. नेमीचंद चव्हाण, २२०. डॉ प्रमोद देवके, २२१. डॉ. रूपेश कऱ्हाडे, २२२. डॉ. अलका गायकवाड (लुंगे), २२३. डॉ. प्रियदर्शनी देशमुख, २२४. डॉ. सुजाता आठवले, २२५. प्रा. कु. स्वप्ना मानखैर, २२६. डॉ. एच.बी. गजभे, २२७. डॉ. प्रफुल्ल गवई, २२८. डॉ. भूमिका वानखडे, २२९. डॉ. अनिता कांबळे, २३०. डॉ. हेमा जवंजाळ, २३१. डॉ. नकुल धरमकर, २३२. प्रा. हरिदास आखरे, २३३. डॉ. अनुराधा मुळे, २३४. प्रा. दीपाली गावंडे, २३५. प्रा. सौ. रेखा इंगोले, २३६. डॉ. वंदना भोयर, २३७. डॉ. विक्रम मोरे, २३८. डॉ. किरण वाघमारे, २३९. डॉ संतोष चव्हाण, २४०. प्रा. नितीन टेकाम, २४१. डॉ. भगवान साबळे, २४२. डॉ. सुनील राठोड, २४३. डॉ. अन्नपूर्णा चौधरी, २४४. प्रा. तुकाराम कांबळे, २४५. डॉ. श्रीकृष्ण काकडे, २४६. डॉ. शिवाजी नागरे, २४७. डॉ. चंदू पाखरे, २४८. डॉ. रंजना जोशी, २४९. डॉ. प्रणव कोलते, २५०. प्रा. रेखा अढाव, २५१. डॉ. चारुशीला रूमाले, २५२. डॉ. मोना चिमोटे.

❖❖❖